# प्रवरा परिक्रमा

(प्रवरा परिक्रमा प्रकल्प)

लेखक तथा संपादक

**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

**प्रकल्प संघटक मा.ॲड. के. डी. धुमाळ**

अध्यक्ष, श्री अगस्ती ऋषी देवस्थान ट्रस्ट, अकोले, अहमदनगर

संघटक सहाय्यक : ह.भ.प. राजेंद्र महाराज नवले

(अध्यक्ष, पायी परिक्रमा)

रामनाथ मुतडक, मॅनेजर अगस्ती आश्रम

(परिक्रमा व्यवस्था प्रमुख)

**सहाय्यक संपादक तथा सहसंघटक : प्रा.डॉ. मच्छिंद्र मालुंजकर**

**प्रकल्पासाठी सहाय्यक सहयोगी लेखक**

मा.श्री. हेरंब कुलकर्णी, मा.श्री. विजय सांबरे, मा.श्री. भूषण देशमुख,
मा.श्री. महादेव कुलकर्णी, मा.श्री. रामनाथ आरोटे, मा.श्री. अरविंद भांगरे,
मा.श्री. विठ्ठल खाडे, मा.श्री. योगेश कर्डिले, मा.प्राचार्य प्रकाश टाकळकर,
मा.श्री. बाळासाहेब गाडे, मा.श्री. दिलीप क्षीरसागर, मा.ॲड. के. डी. धुमाळ,
मा.ह.भ.प. राजेंद्र महाराज नवले, मा.श्री. प्रा.डॉ. मच्छिंद्र मालुंजकर

मौर्या प्रकाशन

**प्रवरा परिक्रमा**
**(Pravara Parikrama)**

**लेखक तथा संपादक :**
**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष- ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रकाशक / मुद्रक**
दिलीप महाजन / गौरी देव / योगिनी आठल्ये
मोरया प्रकाशन
'अनुश्री', ४०/१०, एरंडवणा, पुणे ४११०३८
मो. ९२२३५०१७९७, ८६००१६६२९७
६, 'दिव्यकुंज'. सुदर्शननगर, R10 एम.आय.डी.सी.,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०३
email : info@moryaprakashan.com
web. www.moryaprakashan.com

**प्रथमावृत्ती :** २०२२

**© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे**
ISBN 978-93-92269-21-9

**अक्षरजुळणी :** श्रीपाद कुलकर्णी

पृष्ठे २+१४+१४२

मूल्य ३००/-

# प्रवरा परिक्रमा : अनुक्रमणिका

## भाग पहिला – प्रवरा परिक्रमा : प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे


१) नमामी देवी अमृते – पुण्यमयी प्रवरा ३

अ) प्रवरा नदीची दिव्य नावे

ब) प्रवरा परिक्रमा संकल्प आणि महत्त्व

क) प्रवरा परिक्रमा कशी करावी

ड) प्रवरा परिक्रमेचा हेतू आणि फलश्रुती

इ) प्रवरा परिक्रमेचा संकल्प संस्कृत आणि मराठी


## भाग दुसरा – हाक प्रवरेची
## संपादक प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे
## सहसंपादक – प्रा.डॉ. मच्छिंद्र मालुंजकर


| | | | |
|---|---|---|---|
| १) | जीवनदायिनी प्रवरेचे स्मरण | – श्री. हेरंब कुलकर्णी | २५ |
| २) | पर्यावरण, पावित्र्य आणि निसर्गसौंदर्य राहिले तरच वैभवाला अर्थ | – श्री. विजय सांबरे | ३० |
| ३) | प्राचीनतम संस्कृतीची साक्ष आणि स्वत्त्वाचा इतिहास | – श्री. भूषण देशमुख | ४१ |
| ४) | साखर उद्योगाने घडविली अर्थक्रांती | – श्री. महादेव कुलकर्णी | ५२ |
| ५) | भंडारदरा, निळवंडे आणि अन्य पाटबंधारे – या अमृतकुंभांनी ऐश्वर्य लाभले | – श्री. रामनाथ आरोटे | ६२ |
| ६) | आदिवासी आणि प्रवरा अनुबंध | – श्री. अरविंद भांगरे | ८७ |
| ७) | आदिवासी आणि प्रवरा अनुबंध | – श्री. विठ्ठल खाडे | १०२ |
| ८) | समृद्ध पर्यटन अनुभव | – श्री. योगेश कर्डिले | ११९ |
| ९) | परिक्रमेतून परिवर्तनाची दिशा | – प्राचार्य प्रकाश टाकळकर | १२६ |
| १०) | केशव गोविंद बन परिक्रमेसाठी योगदानास सिद्ध | – श्री. दिलीप नरहर क्षीरसागर | १३१ |
| ११) | श्री अगस्तीऋषी देवस्थान ट्रस्ट परिक्रमा प्रकल्पाच्या सिद्धीसाठी सिद्ध | – श्री.ॲड. के. डी. धुमाळ | १३३ |
| १२) | लेखक परिचय सूची | – डॉ. मच्छिंद्र मालुंजकर | १३७ |
| १३) | मानचित्र संग्रह | – श्री. बाळासाहेब गाडे | |

# भाग एक

# प्रवरा परिक्रमा

## (१)

### ।। नमामी देवी अमृते ।।

# पुण्यमयी प्रवरा

नगर जिल्ह्याच्या उत्तर भागाची जीवनदायिनी म्हणूनच प्रवरा नदीचा परिचय आहे. विशेषतः साखर उद्योगामुळे प्रवरा नदीचे महात्म्य अधोरेखित झाले आहे. अतिप्राचीन काळात उगम पावलेली ही नदी लक्षावधी वर्षांपासून बारमाही वाहणारी नदी आहे. अलीकडे ब्रिटिश काळात भंडारदरा येथे नदीवर धरण बांधण्यात आले आणि या धरणाच्या नियोजनामुळे साखर उद्योगाला चालना मिळाली. शेतजमिनी ओलिताखाली आणून; कृषीउद्योगाचा विकास घडू लागला. आता निळवंडे धरणासह अनेक छोटे बंधारे प्रवरा नदीवर बांधले गेले आहेत. त्याचबरोबर पाटपाणी योजना कार्यान्वित झाल्या आहेत. बागायती शेतीमुळे उत्तर नगर जिल्हा विशेष संपन्न झाला आहे. प्रवरेच्या उपनद्यांचे अर्थात कृष्णवंती, म्हाळुंगी, आढळा, मुळा यासह अनेक छोट्या नद्या, यांचे प्रवाह प्रवरेत मिसळले गेले आणि प्रवरा म्हणूनच प्रवाहित होत; प्रवरासंगम-कायगाव टोका येथे गोदावरीला मिळाले. 'प्रवरा पानम् - गोदास्नानम्' या प्राचीनतम धारणेला विशेष महत्त्व आले.

प्रवरेच्या तीरावर सुमारे पन्नास हजार वर्षांपूर्वीही उत्तम संस्कृती नांदत होती; असे उत्खननात स्पष्ट झाले आहे. निरनिराळ्या ठिकाणच्या ऐतिहासिक व पुरातत्त्वशास्त्रीय उत्खननानुसार, सलग असा दहा हजार वर्षांचा इतिहास मांडता येतो. प्रवरा तीरावरील प्रागऐतिहासिक, सांस्कृतिक, पौराणिक, दैवतकथांचे,

ऋषीकथांचे, लोकगंगेतील मौखिक पारंपरिक अवशेष, प्रवरेचे प्राचीनतम सांस्कृतिक वैभव ठळकपणे मांडतात. प्राचीन शिल्पशैलीतील मंदिरे या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवितात.

अमृतमंथन प्रसंगापासूनचे संदर्भ आणि विशेषतः वाल्मिकी रामायणातील श्रीराम, महर्षी अगस्त्य आणि हनुमान यांविषयी मौखिक परंपरांमधील कथात्म अवशेष पाहिले; तर महर्षी अगस्त्य यांचे गुरुकुल, अगस्त्य विद्या प्रसार, त्यातही विशेषतः कृषी, आरोग्य विद्या प्रसार आणि समाधीसाधना यांसंबंधातील परंपरा, पुण्यमयी प्रवरेचे महात्म्य विषद करतात. प्रभु रामचंद्रांच्या वननिवासातील महत्त्वाचा काळ प्रवरा तीरावर व्यतित झाला आहे, याचे स्पष्ट उल्लेख वाल्मिकी रामायणात आहेत. प्रभु रामचंद्रांनी अमृतवाहिनीची परिक्रमा करीत शिवाराधना केली असावी; याचा स्पष्ट संकेत स्थानमहात्म्य सांगणाऱ्या मौखिक परंपरेतील कथांमधून स्पष्ट होतो. उदा. सिद्धेश्वर, रामेश्वर, कोल्लाळेश्वर आदी.

प्राचीनतम सह्यगिरीच्या कुशीतून वाहणाऱ्या या अमृतधारेचे महात्म्य अपार आहे. वेदोपनिषदे यांपासून ते भावार्थदीपिका आणि अमृतानुभवापर्यंत; या अमृतधारेने ज्ञानसंजीवन सर्वांना दिले. प्रवरेच्या दातृत्वाने तिच्या मांडीवर मळे फुलले. आज मात्र ही मातृदेवता आपल्याच संतानांच्या आधीनतेने, आपल्या पारंपरिक पुण्यमयी प्रवाहाबाहेर, दोन्ही तीरावरील संतानांची न शमणारी तहान शमविण्याचा प्रयत्न करीत; स्वतःचे पात्र कोरडे, प्रसंगी गटारांना सामावणारे घेऊन; उजाडपणे मिरविते! महर्षींच्या अर्घ्यप्रदानाने, प्रभु रामचंद्रांच्या स्नानाने आपला अमृतश्राव घेऊन; अधिकाधिक पुण्यमयी करून; नदी, आपल्याच संतानांचा बुभूक्षित आक्रोश, जीवाच्या आकांताने सहन करीत, त्यांच्याच नियोजनाप्रमाणे प्रवाहित होऊन; वाहण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे! औद्योगिक प्रगतीच्या स्पर्धापूर्ण युगात, कलीच्या प्रभावी संघर्षात्मक उपद्रवांना सांभाळीत पसायदानाची कांक्षा पुन्हा पुन्हा जागवीत आहे. यात भर म्हणून की काय अनेकानेक मुराद पर्यटक भंडारदरा, नेवासा, शनिशिंगणापूर, शिर्डी, प्रवरासंगम, देवगडच्या पर्यटनासाठी येतात आणि श्रद्धा, सबुरी, समृद्धीचे भान न ठेवता, भोगपूर्ण आनंदमग्न होतात. तरीही प्रवरामाय त्यांच्याकडे स्नेहाळ नजरेने पाहाते.

प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे, सरिताओघाचे सातत्य व सौंदर्य जोपासून आणि तीर्थक्षेत्र विकास, पर्यटन विकास, सेवा आणि श्रद्धा या सर्व

गोष्टींविषयी जनजागृती करण्यासाठी आणि पर्यटकांचे लक्ष वेधून; रोजगाराच्या संधी निर्माण होऊन; स्थानिकांना स्थिर, अधिक प्रगत आणि समाधानी जीवन प्राप्त व्हावे; यासाठी 'प्रवरा परिक्रमा प्रकल्प' आयोजित करणे आवश्यक आहे. या प्रकल्पात प्रवरा तीरावरील ग्रामस्थ, समाजधुरिण, प्रतिष्ठित, व्यावसायिक, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि विद्यार्थीगण, विविध संप्रदायांचे पायिक, पक्षोपपक्षांचे नेते अशा सर्व भूमिपुत्रपुत्री तथा प्रवरापुत्रपुत्री अर्थात बंधुभगिनींनी पुढाकार घेऊन; प्रवरासेवा, संस्कृती उपासना यांत झोकून देणे आवश्यक आहे.

प्रवरा परिक्रमेच्या प्राचीनतम अशा परंपरेचे पुनरुत्थान करणे आणि नवपरंपरा प्रस्थापित करणे; हे सर्वांचे कर्तव्य आहे. वैचारिक स्वरूपातील आणि अन्य सर्व प्रकारचे मतभेद दूर ठेवून; अमृतवाहिनी प्रवरेचे अमृत दिव्य पावित्र्याने सर्वांपर्यंत पोचविण्याचे व्रत अंगिकारले पाहिजे.

चला, स्वतः परिक्रमा करा, इतरांना परिक्रमेला प्रवृत्त करा, परिक्रमा साधकांचे गावोगावी स्वागत आणि सेवा करण्यास सिद्ध व्हा. प्रवरा प्रवाहाचे पांग फेडून जीवन कृतार्थ करा.

●●●

# अ) प्रवरा नदीची दिव्य नावे

श्री शिवपार्वती महर्षी अगस्त्य आणि ब्रह्मर्षी नारद यांच्या विनंतीनुसार अमृतकलशातून भगवान श्री विष्णू अर्थात मोहिनीस्वरूपा, यांनी अंगुष्ठ स्पर्शाने मानवांसाठी अमृतधारा प्रवाहित केली. म्हणून 'अमृतवाहिनी' रत्नगडातून प्रकटली. हे 'अगस्त्य महात्म्य' ग्रंथात स्पष्ट केले आहे.

श्री ब्रह्मदेवांनी या नदीचे सुवर्णासमान तेजस्वी आणि मौल्यवान नदी, असे वर्णन करून; सर्व देवदेवतांना या नदीचे महत्त्व सांगितले; म्हणून या नदीला सुवर्णमुखरी असेही नाव मिळाले. मात्र ते फारसे प्रचलित नाही, असे श्री विरुपाक्ष जंगम यांनी 'सुवर्णमुखरी अवतरण' अर्थात अमृतवाहिनी 'प्रवरा महात्म्य' या पुस्तकात नोंदविले आहे.

अमृतमंथन पर्वकाळात म्हणजे भगवान विष्णूंच्या अंगुष्ठ स्पर्श पर्वकाळात जलधारा प्रकटली; म्हणून या नदीला मोठ्या कौतुकाने महर्षी अगस्त्यमुनींनी 'पर्वरा' असे नाव दिले आहे, असे डॉ. अरुणा ढेरे यांनी 'प्रवरा खोरे'मध्ये नोंदविले आहे.

प्रवरा ही अमृतासारख्या श्रेष्ठ रसाची म्हणजे प्रवररसाची नदी आहे म्हणून ती प्रवरा नदी होय, असे ब्रह्मांडपुरात वर्णन आहे. ब्रह्मांडपुराणांतर्गत 'महालयामात्म्यात' नामोत्पत्ती सांगितली आहे. लोकभाषेत पर्वरा आणि प्रवरा यांचे 'पेहेरा' हे नाव प्रचलित आहे, असे डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात. पद्मपुराणातही प्रवरेचा उल्लेख असल्याचे, गोपाळकवींच्या मराठीतील महाभारतात, अनुशासन पर्वात, म्हटले आहे, ह्या नोंदी 'प्रवरा खोरे' मध्ये केलेल्या आहेत.

कळसाईच्या लेकरांनी गोपालन आणि दुग्धव्यवसाय सुरू केला. एका गौळणीला खाट्या गायीच सांभाळणे वाट्याला आले. तिचे दुःख खाट्या गायींना पाहावेना. खाट्या गायींनी तिला मध्यरात्री प्रवरेवर जाऊन दूध भरून घेत जा, असे सांगितले. मध्यरात्री प्रवरेत दुधाच्या धारा वाहू लागल्या. घागरी भरून गौळण दूध घेऊन जाऊ लागली. एका गौळणीने तिला विचारले ''तुझ्या गायी खाट्या एवढं दूध कुठून?'' गौळण म्हणाली, ''एक गाय प्रवरा माय!'', सर्वांना याचा प्रत्यय आला. तेव्हापासून लोकपरंपरेत प्रवरा क्षीरवाहिनी म्हणून ओळखली जाऊ लागली. असे 'चाळीसागाव डांगाण परिसर' या डॉ. अनिल सहस्रबुद्धे लिखित प्रबंधातील, लोककथा संग्रहातील, कथेच्या आधारे सांगितले जाते. ●●●

## ब) प्रवरा परिक्रमा संकल्प आणि महत्त्व

प्रभुरामचंद्रांच्या पावन पदस्पर्शाने अपरिमित प्रभावी झालेली; अमृतवाहिनी, पर्वरा, पेहरा, प्रवरा, क्षीरवाहिनी; अशा प्रवरेची परिक्रमा! सत्य-कृत, त्रेता, द्वापार युगात आणि कलियुगातही घडते आहे. परिक्रमा महर्षी अगस्त्य, वाल्मिकी, नारद, राम, पांडव, धौम्यऋषी, राष्ट्रकुट चालुक्य, यादव, पेशवे, अहिल्यादेवी यांनी केली असावी असे त्या-त्या संदर्भातील, मौखिक परंपरेतील स्थानमहात्म्याच्या कथांवरून म्हणता येते.

**१) प्रवरा नदी ही साक्षात अमृतधारा आहे.** समुद्रमंथन किंवा अमृतमंथन, या प्राचीन पौराणिक तथा ऐतिहासिक प्रसंगी, देवासूरांनी केलेल्या, समुद्रमंथनातून, क्रमाक्रमाने अनेक दिव्य रत्ने बाहेर पडली. सागरप्राशन करणाऱ्या, भगवान महर्षी अगस्तिमुनी आणि श्री भगवद्‌भक्त ब्रह्मर्षी नारदमुनी यांच्या उपस्थितीत, साक्षीने हा प्रसंग घडत होता. कालकूट विष आले. ते भगवान शिवांनी धारण केले. अखेर प्रत्यक्ष अमृतकलश प्रकटला. याच अमृतासाठी, अर्थात अमृततत्त्वासाठी हा खटाटोप होता! त्या अमृतावर प्रथम अधिकार कोणाचा? या प्रश्नावरून वितंडवाद सुरू झाला. भगवान श्री शिव, सागराचे सद्‌गुरू भगवान महर्षी अगस्त्यमुनी आणि भगवद्‌भक्त ब्रह्मर्षी नारदांनी, भगवान श्री विष्णूंना यातून मार्ग काढण्यासाठी विनंती केली. श्री भगवान विष्णूंनी सर्वांनाच संमोहित करणारे, मोहिनी रूप धारण केले. त्या रूपाने संमोहित झालेल्या देवासूरांनी मोहिनी देवींचे मार्गदर्शन घेणे मान्य केले. सर्व दिव्यरत्नांचे प्रथम पूजन करावे व नंतर अमृत वितरण करावे असा प्रथम प्रस्ताव देवांनी मांडला. म्हणून प्रथम देवांना व क्रमाने नंतर असूरांना अमृत वितरित करावे; असे श्री मोहिनी देवींनी मार्गदर्शन केले. संमोहनामुळे देवासूरांना प्रस्ताव मान्य झाला. या परामर्शाप्रमाणे दिव्यरत्नांचे पूजन करण्यासाठी अतिप्राचीन असे आणि या प्रसंगाचे साक्षी असलेल्या सह्यगिरीवरील, एक स्थान, श्री मोहिनींनी निर्देशित केले. ते स्थान म्हणजे आजचा रतनगड किंवा रत्नगड होय!

रत्नगडावर दिव्यरत्नांचे पूजन सुरू असतांना भगवान महर्षी अगस्त्यमुनी आणि भगवद्‌भक्तशिरोमणी नारद यांनी श्री शिवांना आणि श्री मोहिनींना, देवासूरांप्रमाणे मानवांनाही अमृत मिळावे, अशी विनंती केली. भगवान शिवांनी करुणापूर्णतेने श्री मोहिनीस्वरूप भगवान विष्णूंना मानवांसाठी अमृत प्रदान करण्याची प्रार्थना केली. संमोहित देवासूरांच्या साक्षीने श्री विष्णूस्वरूपा मोहिनींनी आपल्या पदकमलाच्या

अंगुष्ठस्पर्शाने, अमृतकलशाला धारा प्रवाहित करण्याची आज्ञा करताच; अंगुष्ठस्पर्शाने कललेल्या कलशातून अमृतधारा प्रवाहित झाली. हीच अमृतवाहिनी प्रवरा होय. 'प्रवरापानम् गोदा स्नानम्' अशी उक्ती तेव्हापासून प्रचलित आहे.

परिक्रमा करतांना रत्नगड परिसर, या अमृतवाहिनी प्रवरेच्या उगमस्थानापासून; तीर्थ घेत, प्रवरासंगमापर्यंत जावे आणि परिक्रमा करीत पुन्हा उगमस्थानी येऊन तीर्थ घ्यावे. या तीर्थ प्राशनाने आधीव्याधीमहाव्याधी आपसूकच नाहीशा होऊन; जीवन आरोग्यवान आणि आनंदी होते. प्रपंचात राहूनही मोक्षानुभूती घेण्याचा हा अत्यंत प्रभावी असा मार्ग होय. उगमस्थानी तीर्थप्राशनाने प्रत्यक्ष भगवान विष्णू, भगवान शिव, गोमाता, शक्तिस्वरूपिणी कळसूबाई आणि देवी अमृता अर्थात प्रवरा यांचे दर्शन घडून मानव देह पावन होतो. उगमस्थानीच्या प्रवाहातून प्रत्यक्ष अमृताचा लाभ मानवाला होतो. हा लाभ घेऊन उगमस्थानी हरिहर स्वरूप अमृतेश्वराचे पूजन करावे म्हणजे अमृततीर्थ प्राशन फलदायी होते. या अमृत प्राशनाने अमर होता येत नसते. मृत्यू अर्थात देहविसर्जन अपरिहार्य आहे. अमृतप्राशनाने दिव्य आरोग्यप्राप्ती, मानसिक प्रसन्नता आणि सच्चिदानंद अनुभूती मात्र नक्कीच प्राप्त होते.

**२) भगवान महर्षी अगस्त्यमुनी विद्या-सामर्थ्याचा लाभ :-**

प्रवराखोरे हे दंडकारण्यातील तपोवनांतर्गत, अगस्त्यपूर क्षेत्र होय. अमृतेश्वरांची स्थापना आणि देवीमाता अमृतवाहिनीची उत्पत्ती, यांमध्ये महर्षी अगस्त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. महर्षींच्या विश्व व्यवस्थापन प्रक्रियेतील स्वीकृत आणि सोपविलेल्या, व्यवस्थापन कार्याची, प्रयोगसिद्धी, उपयोजनसिद्धी आणि सुनियंत्रण सिद्धी यासाठीच्या प्रत्यक्ष कार्याकरिता महर्षींनी प्रवरातीरी अगस्तपूर क्षेत्रात, अर्थात अगस्त्यपूर म्हणजे अकोले येथे, केंद्रीय आश्रम स्थापन केला. प्रवरेच्या उत्तर आणि दक्षिण तीरावर त्यांची साधना केंद्रे असल्याचे; अलिकडील काळात पुन्हा प्रत्ययास येत आहे. सिद्ध श्री किसनगिरी महाराज यांना साक्षात्कार देऊन; सिद्धीयोग आणि अध्यात्मविद्या प्रसार कार्यासाठी महर्षी अगस्त्यांनी आज्ञांकित केले. सिद्ध श्री किसनगिरी महाराजांनी गोधेग्राम या प्रवरेच्या; आढळा-म्हाळुंगी-मुळा-प्रवरा संगमोत्तर आणि गोदासंगमपूर्व अशा क्षेत्रात; नित्य भगवान महर्षी अगस्त्यमुनी यांचे दर्शन घेऊन; सिद्धियोग आणि अध्यात्मविद्या तपस्यापूर्वक प्राप्त केली. त्यांनी जनकल्याण आणि अध्यात्म प्रचार कार्यास वाहून घेतले. त्यासाठी

प्रवरेच्या उत्तर तीरावर गोधाग्रामी, महर्षी अगस्त्यांचे साधनास्थळ प्रकट झाले आहे. महर्षींचे मंदिर आता तेथे विराजमान असून; अग्नाई म्हणजेच इग्मवाह तथा दृढस्यूत या अगस्तिपुत्रांची माता, अर्थात लोपामुद्रा यांचे मातृकादेवीस्थान आहे. दक्षिण तीरावर सिद्ध श्री किसनगिरी महाराज यांचे साक्षात्कारी, सिद्ध असे देवगड पीठ आहे. श्री किसनगिरी महाराजांची संजीवन समाधी येथे असून; या स्थळाचा भगवान दत्तात्रयांचे सिद्धपीठ म्हणून विकास झाला आहे. येथे भगवान महर्षी अगस्त्यमुनी पंचायतनाची स्थापना केलेली असून, अमृतवाहिनी प्रवरामाता प्रयागतीर्थावर सुंदर घाट बांधला आहे. येथून होडीने पलीकडे उत्तर तीरी महर्षींच्या दर्शनार्थ जाता येते. सिद्ध श्री संत किसनगिरी महाराजांचा वारसा संत श्री भास्करगिरी महाराज पुढे नेत आहेत. गोदा प्रवरा संगम अर्थात कायगावटोके या जोड गावास काशी क्षेत्राची महानता प्राप्त झाली आहे. या स्थानी पेशवेकालीन, खास उभारलेले, अगस्त्य पंचायतनामधील श्री सिद्धेश्वरांचे स्थान आहे. तसेच अगस्त्य पंचायतनाचे दर्शन घडते. येथे अगस्त्य विद्येची फलप्राप्ती होते.

प्रवरेच्या उत्तर तीरावर अगस्त्य पंचायतनातील महत्त्वाचे स्थान म्हणजे कुंभेफळ या गावचे शेषनाग सिंहासनावर विराजमान नारायण अर्थात भगवान विष्णूंचे एकमेवाद्वितीय स्थान होय. विश्वाच्या व्यवस्थापन कार्यात महर्षी अगस्त्यांना सतत प्रेरणा देत अष्टभैरवांना सहाय्यभूत होणारे हे विष्णूमंदिर, भगवान विष्णूंच्या धारणाशक्तीचे अलौकिक दर्शन घडविते.

श्री क्षेत्र नेवासा येथे, म्हणजे निधीनिवासी, महाशक्ती मोहिनींचे मोहिनीराज यांचे दर्शन, महर्षी अगस्ती आणि ब्रह्मर्षी नारद यांच्या साक्षीने घडते. त्याचबरोबर मोहिनीचे महालया अर्थात म्हाळसा अवतार प्राकट्य स्थानाचे दर्शन घडते. महर्षी अगस्त्यांनी प्रवरेच्या उत्तर तीरावर, ब्रह्मर्षी नारदांचे चिरवास्तव्य असावे; म्हणून नारदेश्वर मंदिर स्थापित केले आहे. त्याचे समाजकंटकांनी दर्ग्यात रूपांतर केले होते. आता मोहिनीराज, महालया म्हाळसा भक्तांनी नारदमंदिराचे पुनरुज्जीवन कार्य सुरू केले आहे. प्रवरेच्या दक्षिण तीरावर स्थित नेवासा येथे महर्षी अगस्त्य कृपेने अद्वैतविद्येचा वाङ्मयविलास; संतशिरोमणी श्री माऊली ज्ञानेश्वर यांच्या मुखाने आणि सिद्धसंत माऊली निवृत्तीनाथ कृपेने, सच्चिदानंद बाबांच्या हस्ते अमृतवाहिनी तीरी घडला. हा वृत्तांत अगस्त्य कादंबरीत वर्णन केला आहे. दक्षिण तीरावर याच भूमीत शक्तिमाता रेणुका, भवानी, अंबाबाई आणि चतुश्रृंगी यांच्या स्वयंभूप्राकट्यासह

कुंभोद्‌भव महर्षी अगस्त्यमुनींचे, आयुर्वेद सिद्धपीठ, प्रकाशमान झाले आहे. रांजणगाव देवी या नावाने प्रसिद्ध असलेल्या या ग्रामी, अग्याच्या टेकडीवर महर्षींचे सिद्धपीठ आहे. अशा प्रकारे भगवान महर्षी अगस्त्यमुनी यांच्या तपःसामर्थ्याने अमृतवाहिनी पर्वरा, पेहेरा, क्षीरवाहिनी प्रवरा खोरे प्रभावित आहे. संपूर्ण महर्षी अगस्त्यविद्या अर्थात धनुर्वेद, आयुर्वेद, ज्योतिर्वेद, जलव्यवस्थापन, पर्यावरण व्यवस्थापन, कृषीव्यवस्थापन, प्राणीव्यवस्थापन, अध्यात्मविद्या, सिद्धीसाधना, न्याय नीती, वाङ्‌मयविद्या अशा सर्व प्रकारच्या विद्या साधनेतील महर्षींच्या साधनेच्या प्रभावाने प्रवरा खोरे भारित आहे. भगवानमहर्षी अगस्त्यमुनीकृपेने, प्रतिभा, प्रज्ञा जागृत होते आणि विद्यासाधनेत गति प्राप्त होऊन यश प्राप्त होते. हे प्रवरा परिक्रमेचे दिव्यत्व होय.

**३) प्रभुरामचंद्रांचे अनुचर होण्याचे भाग्य लाभते :–**

महर्षी अगस्त्य बंधू महर्षी वसिष्ठ शिष्य, इक्ष्वाकुवंशीय, रघुकुलभूषण, प्रभुरामचंद्रांनी वनवासाचा अंतिमकाल भगवान महर्षी अगस्त्यमुनींच्या सान्निध्यात व त्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यतित केला. याचा विस्तृत वृत्तांत, महर्षी वाल्मिकींनी रामायणात लिहिला आहे. प्रभुरामचंद्र आजच्या अकोले येथील महर्षी अगस्ती आश्रमात आले. भगवान अगस्त्यमुनींनी त्यांना गोदातीरावर पंचवटी क्षेत्रात, आश्रम उभारून, वास्तव्य करण्याची आज्ञा केली. महर्षींशी प्रभूंचा नित्य परामर्श होता. महर्षींनी प्रभुरामचंद्रांना अकोले येथील याच केंद्रीय आश्रमात, दिव्य खड्ग, अक्षयबाणाभाता, दिव्यबाण आदी दिव्य अस्त्रशस्त्र प्रदान केली. प्रभुरामचंद्रांनी महर्षींच्या विद्येने भारलेल्या प्रवरा खोऱ्यात प्रवरेची एकप्रकारे प्रथम परिक्रमा केली. सीता अपहरणापूर्वी केलेल्या या प्रवरा परिक्रमेत प्रभुरामचंद्र श्रीसीतामाई आणि श्रीरामभक्त बंधू लक्ष्मण यांनी प्रवरेच्या उत्तर आणि दक्षिण तीरावर शिवआराधना केली. यामुळे या प्रत्येक शिवस्थानाला हरिहरभेटीचे, अर्थात शिवविष्णू अद्वैताचे महत्त्व आहे. अमृतेश्वर श्री सिद्धेश्वर, रामेश्वर, कोल्हाळेश्वर, हरिहरेश्वर अशी अक्षरशः अनेक स्थाने प्रवरातीरी निर्माण झाली आहेत. तातोबाचा अर्थात महर्षी वाल्मिकींचा मठ रंधा धबधब्याच्या खाली उत्तर तीरावर स्थित आहे. भगवती सीतामाईंच्या उत्तर वनवासातील लवकुश जन्म, संगोपन आणि रामायण कथन या ठिकाणी घडले. नदीतीरावर 'सीतापाऊल' असे दिव्य स्थान आहे. निळवंडे धरणाच्या पाणीसाठ्यातून या स्थानापर्यंत जाण्यासाठी पर्यटकांना मोटरलाँच उपलब्ध आहे. प्रभुरामचंद्रांविषयीच्या

या शिवविष्णूअद्वैताच्या कथा पांडवांच्या वनभ्रमंती काळात; प्रवरातीरी महर्षी धौम्य ऋषींनी पांडवांना सांगितल्या. प्रवराखोरे ही अद्वैताची पेठ आणि संतांची भूमी म्हणून प्रसिद्ध झाली! या पावनतीर्थाच्या परिक्रमेने शिवविष्णूअद्वैतत्त्व, परिक्रमा करणाऱ्या भक्ताच्या ठायी प्रभावित होऊन; सच्चिदानंद स्वरूप अमृतभावानुभूती घडते. प्रवरा खोरे असे अध्यात्मिक सुगंधाने भारलेले आहे. म्हणूनच रामभक्त चिरंजीवी श्री हनुमान प्रवरामातेची नित्य परिक्रमा करतात.

**४) महाराष्ट्राचे लोककुलदैवत शिवस्वरूप श्री मार्तंडभैरव खंडेराय यांच्या महालया परिणयाने ही भूमी शिवशिवा अद्वैताचा अमृतानुभव श्री ज्ञानेश्वरमाऊली मुखाने भक्तांना देते.** प्रवरेच्या उत्तर तीरावर मोहिनी रूप मोहिनीराजांनी, ब्रह्मर्षी नारदांच्या साक्षीने, महालया अर्थात म्हाळसाई अवतार धारण केला. ते नेवासा येथील महालया म्हाळसापीठ, शिवशक्तीचे जागरण करते. मोहिनींच्या संमोहक रूपावर संमोहित झालेल्या शिवांनी, मोहिनीदेवींचा भार्या म्हणून स्वीकार करण्याची वांच्छा केली. मोहिनींनी मार्तंडभैरव या लोककल्याणकारक अवतारात, शिवांची ही वांच्छा पूर्ण होईल असे वचन दिले. नेवासा येथे दक्षिण तीरावर मोहिनीराजांचे अर्धनारी स्वरूपात दिव्य दर्शन घडते; तर उत्तर तीरावर महालया म्हाळसांचे दर्शन घडते. कृतयुगापासूनची शिवविष्णूअद्वैताची ही परंपरा परिक्रमा करणाऱ्या भक्तांना अनुभवता येते. जीव शिव होतो. ह्याच महालया म्हाळसांनी प्रवरेच्या उत्तर तीरावर महर्षी अगस्त्यमुनींच्या आश्रम परिसरात घोर तपश्चर्या करून; मार्तंडभैरवांना अर्थात खंडेरायांना प्राप्त केले. ते शिवविष्णूअद्वैताचे दिव्यस्थान; निळवंढे-म्हाळादेवी प्रकल्पाच्या सान्निध्यात, म्हाळादेवी या नावाने वसलेल्या, नगरीत आहे. या लोकदैवतांचे दर्शन म्हणजे लोकजीवनाची धन्यता होय!

**५) मोहिनीराज आणि सर्व देवदेवतांच्या भाववैभवात जाण्याचे भाग्य :-**

श्री मोहिनींनी अमृतवितरणाचे काम सुरू केले; तेव्हा देवांची आवली अर्थात रांग एका बाजूला आणि दानवांची रांग एका बाजूला होती. या पंगतीत मायावी रूपाने राहू येऊन बसला. वाटणी करतांना राहूचे हे कपट इंद्रदेवांच्या लक्षात आले, परंतु तोपर्यंत राहूने अमृत प्राशन केले होते. ते उघड होताच देवदानवांचे युद्ध जुंपले. मोहिनीस्वरूप श्री विष्णूंनी आपले मूळ आयुध, सुदर्शनचक्र आवाहित केले. त्यामुळे मोहिनीचे उजवे अर्धे शरीर श्री विष्णूंचे मूळ रूपात प्रकटले आणि अर्धे शरीर मोहिनी देवींचे राहिले. म्हणजेच अर्धनारी स्वरूप होऊन

मोहिनींचे मोहिनीराज झाले. अशा अर्धनारी रूपात, भगवान विष्णूंचे विश्वातील एकमेव स्थान, निधीनिवास किंवा नेवासे येथे प्रवरेच्या दक्षिण तीरावर स्थित आहे. भगवान विष्णूंनी अर्थात मोहिनीराजांनी सुदर्शनाने राहूचा शिरच्छेद केला, परंतु एवढ्या अवधीत अमृत राहूच्या मुखात तसेच होते. ते शीर रत्नगडानजिक दक्षिण भागात स्थित असलेल्या आजच्या हरिश्चंद्र गडावर पडले. शीरामधून अमृत बाहेर पडले तेच मुळा नदीच्या रूपाने पुन्हा प्रवरेला येऊन मिळाले. असे शीर तुटूनही राहूदैत्याचे धड लढत होते तेव्हा दैत्यवध करण्यासाठी स्वतः भगवती सरसावल्या. त्यांनी मोठा कोलाहल करून राहूचा नाश केला. ते धड किंवा काया दूर जाऊन पडली. मुळा नदीच्या तीरी प्रसंगाची साक्ष देत राहू-अरी अर्थात आजच्या राहुरी शहराच्या रूपाने प्रकट आहे. राहू दैत्याला, अमृत, भगवानविष्णूंचे सुदर्शन आणि भगवतींची शक्ती यांचा स्पर्श झाल्याने त्याचा उद्धार झाला आणि सूर्यमालेत स्थान मिळाले. दक्षिण काशी प्रवरासंगम येथे त्याची साक्ष कायगावी मिळते. भगवतीच्या कोलाहलामुळे त्यांचे उग्र रूप निर्माण झाले. भगवान विष्णूंनी त्यांना शांत केले. या प्रसंगाची साक्ष, प्रवरेच्या उत्तर तीरावर कोल्हारभगवतीपूर ही जोड ग्रामे देतात. देवांच्या आवली जेथे बसल्या होत्या ते स्थान देवावली अर्थात देवळाली हे ग्राम होय. हे स्थान प्रवरेच्या उत्तरतीरी निर्माण झाले. समुद्रमंथनाशी निगडित दिव्यकथांनी अमृतवाहिनीचे रूप अधिकच दिव्य अनुभूती देते. प्रवरेच्या गॅझेटमध्ये डॉ. अरुणा ढेरे यांनी या कथांची नोंद केली आहे. तशाच काही पर्यायी कथाही नोंदविल्या आहेत.

**६) बिल्वतीर्थाचे दर्शन :-**

प्रवरेच्या उत्तर तीरावर हरिहरेश्वर हे प्रसिद्ध स्थान आहे. 'श्री केशव गोविंद महात्म्य' ग्रंथात पुराण कथा समाविष्ट आहे. प्रवरेकाठी बिल्ववनात शिवपार्वती विहारासाठी आले. बिल्ववनात त्यांचे मन रमले. पार्वतीमातांना तहान लागली तेव्हा शिवांनी बेलाचे पान धरणीवर टाकून तीर्थ निर्माण केले. पार्वतीमातांची तहान शमली. भगवान शिवांनी त्या तीर्थाला आशीर्वाद दिला. 'तुझ्या ठिकाणी माणसाला चारही पुरुषार्थ सिद्धीचे सामर्थ्य प्राप्त होईल' असे वरदानही दिले. या तीर्थाशी जोडलेली आणखी एक महत्त्वाची कथा म्हणजे; त्रिपूर दैत्याच्या उपद्रवाने त्रासलेले देव इंद्रदेवांच्या नेतृत्वाखाली भगवान ब्रह्मदेवांकडे आले. ब्रह्मदेवांनी त्यांना भगवान विष्णूंकडे पाठविले. भगवान विष्णूंनी सर्व देवांसह, बिल्वतीर्थावर

जाऊन भगवान शिवांची उपासना करण्याचा उपाय केला. तेथे श्री विष्णूंनी शिवलिंगाची स्थापना केली. भगवान शिवांनी प्रसन्न होऊन; त्रिपुरासुरापासून अभय प्रदान केले. श्री विष्णूंनी म्हणजे हरीने हराची उपासना केली; म्हणून हे लिंग हरिहरेश्वर म्हणून प्रसिद्ध झाले. भगवान शिवांनी इंद्र आणि विष्णूंना बिल्वतीर्थाच्या पश्चिमेला दोन लिंगे स्थापन करावयास सांगितली, हीच लिंगे आज श्री इंद्र आणि विष्णू यांनी स्थापन केलेल्या क्रमाने केशव आणि गोविंद, या नावांनी प्रसिद्ध आहेत. 'श्री हरिहर केशव गोविंद त्रिस्थला महिमा' या डॉ. सुभाष सोन्याबापू मेहेत्रे लिखित ग्रंथात याविषयी विस्तृत माहिती आली आहे.

याशिवाय बिडालक्ष दैत्याच्या उपद्रवाने भयभीत झालेल्या देवांनी पार्वतीमातेची उपासना करून विनवणी केली. पार्वती मातांनी बिल्ववनाच्या दक्षिणेला लिंग स्थापन करून शिवांची प्रार्थना केली. प्रसन्न होऊन आशुतोष शिवांनी विडालाक्षाचा वध केला. बिल्ववनामुळे व पुराणकथांच्या प्रभावाने प्रवरातीरी निर्माण झालेल्या या नगरीला बेलापूर असे नाव प्रसिद्ध झाले. शिवाराधनेसाठी बेलापूर परिसरात आणि प्रवरेच्या उत्तर दक्षिण तीरांवर अनेक शिवलिंगे देवांनी स्थापन केली आहेत. त्यात ब्रह्मेश्वर, कालिकेश्वर, सूर्येश्वर, रामेश्वर, अमलेश्वर अशी कितीतरी शिवलिंगे आहेत. शिवविष्णू अद्वैताची ही प्रतिके होत. यांत इंद्रस्थापित इंद्रबिल्वेश्वर, वायूस्थापित अमलेश्वर, कुबेरस्थापित नीलेश्वर अशी अनेक स्थाने आहेत. प्रवरामाईंच्या उत्तर आणि दक्षिण तीरावर जवळपास प्रत्येक गावी वेगवेगळ्या नावाने शिवलिंग प्राचीन काळापासून आहे. ही शिवलिंगे प्रभूरामचंद्रांनी केलेल्या प्रवरा परिक्रमेची साक्ष देतात म्हणूनच रामभक्त हनुमान नित्य परिक्रमेसाठी येतात.

**७) विश्वातील एकमेव, विस्मयचकित करणारी मंदिरे :– खांबरुप देवांची मंदिरे**

**(१) केशव गोविंद स्तंभरूप देव :–** बेलापूरला बिल्ववनात इंद्र आणि विष्णूंनी स्थापन केलेली लिंगे जमिनीत लुप्त झाली. एका शूद्र म्हणविणाऱ्या कुलातील शिवभक्ताला ।। ॐ नमः शिवाय ।। या शिवषडाक्षरमंत्राची प्राप्ती झाल्यावर त्याला शिवांचे दोन वेळा बटुरूप दर्शन झाले. त्यानंतर त्याला स्तंभरूपाने त्या बटुरूप शिवांनी दर्शन दिले. या बटुरूपांत शिव आणि विष्णू असल्याचे सांगून त्यांच्या स्तंभरूप लिंगांची स्थापना करण्यास सांगितले. लोकपरंपरेत डांगु आणि नागु या दोन विठ्ठलभक्तांना पंढरीवारी वृद्धापकाळात करणे अशक्य झाल्यावर; हेच दोन बटू हरी आणि हर स्वरूपात स्तंभरूपाने त्यांच्यासमोर प्रकटले. प्रवरेतून

चंदनाचे दोन ओणके वाहात आलेले त्यांना मिळाले. देवाची आज्ञा समजून केशव गोविंद स्वरूपात, या दोन बटूंची स्तंभदेव रूपाने या भक्तांनी स्थापना केली. श्री विष्णू हे शिवभक्त म्हणून त्यांचे केशव हे नाव हरांनी धारण केले तर विष्णूंचे भक्तांना भावणारे गोपालन करणारे गोविंद रूप; हे गोविंद नाव दुसऱ्या स्तंभाला दिले. शिवविष्णू अद्वैताचा प्रत्यय, असा देवासूर संग्राम काळापासून आधुनिक काळापर्यंत येतो आहे. प्रवरा खोरे या गॅझेटमध्ये 'श्री केशव गोविंद महात्म्य' ग्रंथाच्या आधारे डॉ. अरुणा ढेरे यांनी ह्या कथा नोंदविल्या आहेत. या कथेचे अनेक पर्यायही लोकगंगेत प्रचलित आहेत. 'श्री हरिहर केशव गोविंद त्रिस्थली महिमा' या डॉ. मेहेत्रे लिखित ग्रंथातही या क्षेत्राची विस्तृत माहिती आहे.

**(२) नेवासे येथील जगद्विख्यात पैसाच्या खांबाचे मंदिर :–** निधीनिवास नेवासे या पुण्यभूमीत प्रवरेच्या उत्तर आणि दक्षिण तीरावर कोटी शिवलिंगे आहेत; असे मानले जाते. म्हणूनच नेवासे या क्षेत्राला काशी क्षेत्राचे महत्त्व आहे. यात श्री करवीरेश्वर अर्थात कनैरेश्वर नावाचे एक प्राचीन असे शिवालय होते. याच शिवालयातील सभामंडपात एका खांबाला टेकून श्री ज्ञानदेवमाऊलींनी श्रीमद्भगवद्गीतेवरील 'भावार्थदीपिका' म्हणजेच 'ज्ञानेश्वरी' सांगितली. त्या खांबावर करवीरेश्वरास नंदादीप लावण्याविषयी दिलेल्या वर्षासनाबाबतचा एक लेख कोरलेला आहे. एकप्रकारे श्री ज्ञानदेव मुखाने 'ज्ञानेश्वरी' हा नंदादीप चिरंतनासाठी प्रकाशित झाला असावा. या खांबाला प्रसाद खांबाचे अर्थात 'पसाय'चे म्हणजे 'पैसा'चे महत्त्व प्राप्त झाले. जणू भगवंत प्रत्यक्ष ज्ञान स्वरूप असे; या खांबातून प्रकटले. या पैसाच्या खांबाचा आशीर्वाद घेण्यासाठी मोठ्या भावभक्तीने श्रद्धेने भक्त, कलावंत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, लोकधुरिण मोठ्या ओढीने जगभरातून येतात आणि माऊलींकडून जणू शक्तिपाताचा लाभ घेतात.

**३) असाच अमृतानुभव – पैसाचा खांब :–** ह.भ.प. निवृत्तीमहाराज वक्ते यांच्या 'ब्रह्मचित्कलादर्शन अर्थात श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा' या गीताप्रेस, गोरखपूरने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथातील उल्लेखाप्रमाणे, 'ज्ञानेश्वरी लिहून ही मंडळी नेवाशाहून ब्राह्मणीस गेली. तेथे ज्ञानेश्वर महाराजांनी ज्या खांबास टेकून अमृतानुभव सांगितला, तो खांब अजूनही ब्राह्मणीस आहे.' यावरून अमृतानुभव ब्राह्मणीस सांगितला, हे सिद्ध आहे. आजही तेथे ब्राह्मणीस मुक्ताबाईचे मंदिर असून तिच्यापुढे रेडा आहे. मुक्ताबाई लहान असल्यामुळे जो पैठणला रेडा वेद बोलला,

त्याच रेड्याच्या पाठीवर बसून मुक्ताबाई प्रवास करीत असे. मुक्ताबाई देवी असल्यामुळे तिचे वाहन रेडा आहे. त्या रेड्याच्या पाठीवर मुक्ताबाईच्या पादुका आहेत. ब्राह्मणीस शके १२१२ च्या कार्तिक वद्यात अमृतानुभव सांगितला. निवृत्तिनाथ म्हणाले, 'तुम्ही ज्ञानेश्वरी गीतेवरील टीका लिहिली, पण तुमचा 'सर्व खल्विदं ब्रह्म' याविषयीचा स्वतःचा काही अनुभव सांगा. म्हणून ज्ञानेश्वरांनी ब्राह्मणीस अमृतानुभव सांगितला.'

ह.भ.प. निवृत्तीमहाराज वक्ते यांच्या या उल्लेखाच्या आधारे आज आणि प्रत्यक्ष ब्राह्मणीतील मौखिक परंपरेप्रमाणे, ब्रह्मचित्कला म्हणजे मुक्ताई अर्थात ब्राह्मणी. ब्राह्मणी म्हणजे ब्रह्मज्ञानी. माऊली ज्ञानेश्वरांनी जेथे, ज्या खांबास टेकून श्री निवृत्तिनाथ कृपेने आपले, स्वतःच्या चिंतनातून स्वीकृत तत्त्वज्ञान, 'अमृतानुभव' स्वरूपात, १९ प्रकरणात ८११ ओव्यात, ब्रह्मचित्कला मुक्ताबाईंच्या समोर निरुपित केले तेथे त्यामुळे मुक्ताई ब्रह्मज्ञानी अर्थात ब्राह्मणी झाली. या प्रसंगाची आठवण म्हणजे ब्राह्मणी गाव. त्यातील मुक्ताई मंदिर आणि अमृतानुभव प्रसाद खांब अर्थात पैसाचा खांब या खुणा होत. वस्तुतः हे बल्लाळेश्वरांचे मंदिर होय. पाठीमागे शिवालय आहे. या मंदिरात मच्छिंद्रनाथांचे वास्तव्य झाले होते. येथे ही चारी भावंडे थांबली आणि अमृतानुभव प्रकट झाला. जणू बल्लाळेश्वरी मुक्ताई स्वरूपात अवतरल्या म्हणून हे मुक्ताईचेही मंदिर होय. येथून मुक्ताईंची पालखी दिंडी पंढरपुरास जाते.

नेवासा येथील वै.ह.भ.प. बन्सीमहाराज यांच्या पारंपरिक मताप्रमाणे, ज्ञानेश्वरी प्रसंगानंतर, लगोलग सद्गुरू निवृत्तीनाथ यांच्या आज्ञेने, 'अमृतानुभव' ग्रंथ निरुपण प्रसंग 'अनुभव-अमृत कथन' या स्वरूपात नेवासा येथील निवासातच बहुधा कनैश्वराच्याच मंदिरात घडला. हाही मतप्रवाह तेवढाच दृढ आहे.

**८) पंच-प्रयागांचे दर्शन आणि स्नान :- (प्रयाग म्हणजे नद्यांचा संगम) :-**

**(१) प्रवरा संगम कायगाव-टोके :-** अमृतवाहिनी, क्षीरवाहिनी, पर्वरा, पेहरा, प्रवरा या नावाने प्रसिद्ध प्रवरा नदी, कृष्णवंती, आढळा, म्हाळुंगी आणि मुळा नद्यांना उदरात घेऊन श्री क्षेत्र टोके येथील सिद्धेश्वरानजिक गोदावरीला मिळते. आणि 'प्रवरापानम्, गोदा स्नानम्' असा महाप्रयाग अमृतयोग घडतो. दक्षिण काशी असे या प्रयागक्षेत्राचे महात्म्य आहे. श्री संत दासगणूंनी ब्रह्मपुराणाच्या आधारे लिहिलेल्या 'गौतमीमहात्म्य' या ग्रंथात- कायगाव-टोके या जोड गावींच्या

या संगम क्षेत्राचे महात्म्य वर्णन केले आहे. प्रवरा नदीच्या अर्थात अमृतवाहिनीच्या टोकाशी टोकेगावी प्रवरा गोदेला मिळते. मोहिनीस्वरूप विष्णूंनी राहूंचा सुदर्शन चक्राने वध केल्यानंतर, भगवती आणि विष्णूंनी शीरविरहित लढणाऱ्या राहूची काया, अर्थात धड, संगमतीरावर, पलिकडे भिरकावले. ते जेथे पडले तेथे कायगाव निर्माण झाले. अमृत, सुदर्शन, भगवती आणि श्री विष्णूंच्या स्पर्शाने प्रवरेत पावन झालेली दुष्ट राहूची काया; संगमक्षेत्री पडली आणि राहू दैत्याचा उद्धार होऊन; सूर्यमालेत स्थान मिळाले. कायगाव-टोके ही अशी संगमाभोवतीची गावे पुण्यक्षेत्र झाली.

कायगाव जवळच सोमगंधर्वाने या तीर्थी गंधर्वांसाठी अमृत मिळविले. श्री सरस्वतींच्या कृपेने देवांसाठी संपूर्ण अमृत पुन्हा मुक्त केल्याची कथा सोमतीर्थाशी निगडित आहे. जवळच काळेश्वराचे स्थान आहे. पुरुरवाची कथा या शिवलिंगाशी जोडलेली आहे. शिवांनी निर्माण केलेल्या अंबिकावनात जो पुरुष प्रवेश करील त्याची स्त्री होईल असे वैशिष्ट्य होते. इल नावाचा राजा चुकून या वनात गेला. तो स्त्री झाला. त्याचे बुद्धराजाशी लग्न झाले. त्या इलास झालेला पुत्र पुरुरवा. मुलगा मोठा झाल्यावर, इलाने पुरुरवास वृत्तांत सांगून पुन्हा पुरुषत्वप्राप्तीची इच्छा व्यक्त केली. पुरुरव्याने शिवांना प्रसन्न करून उपाय विचारला. शिवांनी या क्षेत्री स्नान केल्यास, पुन्हा पौरुषप्राप्ती होईल असा वर दिला. त्याप्रमाणे इलाचे स्त्रीत्व नदीरूप होऊन नदीला मिळाले. इला पुन्हा पुरुष झाली. काळेश्वर तीर्थी स्नान केल्यास पौरुष प्राप्ती होते. संगमक्षेत्राला उत्तर क्रियेच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. हा संगम मोक्षदायिनी आहे. या पवित्रतीर्थाविषयी अनेक कथा उपलब्ध आहेत. डॉ. अरुणा ढेरे यांनी 'प्रवरा खोरे' या गॅझेटमध्ये कथा नोंदविल्या आहेत.

**(२) (मुरला) मुळा प्रवरा संगम- पाचेगाव-संगमेश्वर :-** मुळा नदीचा उगम अजुबा आणि हरिश्चंद्र पर्वतात सांगितला जातो. बहुतेक लोक मुळेचा उगम हरिश्चंद्रपर्वतात झाल्याचे सांगतात. राहूच्या शिराची कथा जशी मुळेच्या उगमाशी जोडली जाते तशीच राजा हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास अशी हरिश्चंद्राची स्थाने प्रत्यक्ष दाखवत, हरिश्चंद्राचे रांजण दाखविले जातात. विश्वामित्रांनी हरिश्चंद्राची सत्वपरीक्षा पाहण्यासाठी; डोंबाघरी पाणी भरायला भाग पाडले. पाण्याच्या रांजणाला मुळाशी म्हणजे बुडाशी छिद्र पाडून ठेवले. हे सत्व सिद्ध करणारे पुण्यमयी पाणी नदीरूपाने वाहू लागले. तीच मुळा होय. राहूने प्राशन केलेले अमृत शिरच्छेदामुळे

वाहू लागले. ते त्याच्या मुखातील आणि शरीरातील अमृत निपटून काढण्यासाठी मोहिनीस्वरूप भगवान विष्णूंनी राहूला पायाच्या अंगठ्याने दाब दिला या प्रक्रियेत गुद्‌द्वाराद्वारे सुरा आणि मुखावाटे अमृत बाहेर पडले. त्यातील अमृतवाहिनी म्हणजे प्रवरा आणि शरीरमुळातून बाहेर पडली ती मुळा अशी आणखी एक कथा जोडली जाते. तसेच हरिश्चंद्रतीर्थाचे 'चंद्रिका' शक्तीतीर्थ म्हणून महत्त्व आहे. चंद्रिका शक्तीतीर्थाचा उल्लेख मत्स्यपुराण, स्कंदपुराण, देवीभागवतात आढळतो. या गडावरून मळगंगा अर्थात मंगलगंगा आणि हरिश्चंद्र सत्त्वतीर्थ अर्थात मुळा अशा दोन नद्यांचा उगम सांगितला जातो. सर्वतीर्थांचा आढळ या गडावर आहे. साधनेसाठीचे शक्तिपीठ म्हणून या गडाचे महत्त्व सर्वदूर माहीत होते. श्री चांगावटेश्वराने, येथे गुरुकुल स्थापन करून; चौदाशे वर्षे तप केले. नाथ, सिद्ध, शाक्ततांत्रिक या सर्वांच्या दृष्टीने हे महत्त्वाचे स्थान आहे. येथून निघालेली मुळा नदी नेवाशाच्या अलीकडे पाचेगाव या पुण्यगावी प्रवरेला येऊन मिळते आणि अमृतवाहिनी आणि सत्त्वतीर्थांचा पुण्यमयी प्रयाग होतो. संगमस्थान म्हणूनच ते प्रसिद्ध असून संगमावर शिवांचे उपासनापीठ स्थापित आहे. ते पीठ प्रवरेच्या दक्षिण तीरावर आणि मुळेच्या उत्तर तीरावर असे संगमाच्या मध्ये उभे आहे. डॉ. अरुणा ढेरे यांनी या कथा नोंदविल्या आहेत.

**(३) म्हाळुंगी (महालंघी)– प्रवरा प्रयाग :–** पट्टागड किंवा विश्रामगड परिसरात उगम पावलेली महालंघी, म्हाळुंगी ही म्हाळसादेवींची आठवण करून देत, सिन्नर, अकोले, संगमनेर तालुक्यातून वाहात येऊन संगमनेर गावात प्रवरेला मिळते. या संगमावरूनच संगमनेर अर्थात संगमाच्या काठावरील नगर, असे संगमनेर हे प्राचीन नगर निर्माण झाले आहे.

**(४) आढळा (आरदळा) प्रवरा प्रयाग :–** ही नदी म्हाळुंगीच्या सान्निध्यातच पट्टा परिसरात उगम पाऊन, म्हाळुंगीच्या बरोबर वाहात येऊन; संगमनेरजवळच मंगलापूर अर्थात मंगळापूर येथे प्रवरेला मिळते आणि मंगल प्रयाग निर्माण होतो. याही कारणाने संगमनेर गावाला संगमनेर असे नाव असावे. आढळा ही आरदळा– तेजस्वीशक्ती प्रदान करणारी शक्तीदेवता म्हणून प्रसिद्ध आहे. समशेरपूरजवळ, टाकारी किंवा टाहाकारी या गावी एक प्राचीन शक्तीपीठ असून; प्राचीन सुंदर लेण्यांचा उत्तम नमुना आहे. कामशिल्पांचे सुंदर नमुने या मंदिरावर आहेत. १०५० चा शिलालेख आणि यादवकालीन हेमाडपंथी शिल्प शैलीचे एक मंदिरही येथे

आहे. या प्रयागात ऊर्जालाभ होतो.

**(५) कृष्णवंती– प्रवरा प्रयाग :–** कळसूबाईच्या पायथ्याशी उगम पावणारी कृष्णवंती म्हणजे प्रत्यक्ष पार्वतीदेवींना वंदन करून; मोहिनीस्वरूपा श्री विष्णूंनी अर्थात श्रीकृष्णांनी मानवांवरील प्रेमाने प्रदान केलेल्या अमृतधारेत कृष्णभक्ती धारा समर्पित करण्यासाठी आवेगाने येणारी राधाच होय. खळाळती कृष्णवंती अर्थात प्रेमधारा राधा दक्षिण तीरावरील भंडारदरा गावासमोर उत्तर तीरावर अमृतमयी होते. या संगमाच्या रूपाने राधाकृष्णअद्वैत शिवशिवांच्या साक्षीने प्रकटते. त्या अद्वैत योगाला आशीर्वाद देण्यासाठी जगन्माता महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती स्वरुपिणी शिवा घोरपड्याईच्या रूपाने पुन्हा प्रकटते, प्रेमाद्वैताचा हा कल्लोळ, मानवांच्या जीवनमुक्ततेसाठी दरीत झेपावतो. हाच रंधा येथील धबधबा.

**९) अलौकिक शक्तिपीठांचे दर्शन :–**

प्रवरासंगम येथील सिद्धेश्वर मंदिरात लक्ष्मीयंत्रासह लक्ष्मीदेवी, नेवासे येथील मोहिनीस्वरूपा आणि महालया म्हाळसादेवी, रांजणगाव देवी आणि भगवतीपूर येथे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचे दर्शन, सोनई–ब्राह्मणी येथे बल्लाळेश्वरी तथा संत मुक्ताई, अकोले येथील ज्येष्ठा कनिष्ठा आणि श्री महालक्ष्मी, रंधाफॉल येथील घोरपड्याई, कळसूबाई या अलौकिक शक्तिपीठांसह अनेक शक्तिपीठांचे दर्शन परिक्रमेत घडते.

**१०) परिक्रमा करतांना दिव्य दर्शनांचा अनुभव :–**

प्रवरामाता, शिव, पार्वती, विष्णूलक्ष्मी, खंडेराय–म्हाळसा, महर्षी अगस्त्य, लोपामुद्रा माता, ब्रह्मर्षी नारद, श्रीरामभक्त हनुमान, श्री गुरु दत्तात्रेय आणि माऊली यांचे या ना त्या रूपात परिक्रमा करतांना दर्शन घडतेच. अनुभव घ्यावा.

**११) पर्यटनस्थळांचे दर्शन :–**

१) भंडारदरा तलाव, भंडारदरा धरण २) घाटघर धरण, घाटण देवी ३) सांदणदरी (दिव्य प्रसिद्ध दरी) ४) रंधा येथील सुप्रसिद्ध धबधबा ५) निळवंडे धरण ६) जोरवे धरण ७) शनिशिंगणापूर ८) देवगड ९) प्रवरासंगम यात मुळा धरण आणि राहाता उपासनी महाराज, शिर्डी साईनाथ, सर्वतीर्थ टाकेद आदी स्थळांचा लाभ घेणे शक्य आहे. १०) साखरउद्योग भेट ११) ऐतिहासिक महत्त्वाची स्थळे. जोर्वे, दायमाबाद आणि नेवासे येथील उत्खनन स्थळे व अन्य. १२) ट्रेकर्ससाठी रतनगड, कळसुबाई आदी आव्हानात्मक सह्य शिखरे. ●●●

# क) प्रवरा परिक्रमा अशी करावी

१) प्रवरा परिक्रमा कोणत्याही महत्त्वाच्या पवित्र स्थळापासून सुरू करून त्याच स्थळी येऊन पूर्ण करावी. अतिवृष्टीचा काळ वगळून केव्हांही परिक्रमा करता येते.

२) उत्तर आणि दक्षिण तीरांवरून जेथून परिक्रमा सुरू केली जाईल तेथेच प्रदक्षिणा म्हणजे परिक्रमा पूर्ण होईल. परिक्रमा करतांना प्रवरासंगम आणि रतनवाडी येथेच प्रवरा ओलांडायची आहे तरच परिक्रमा होईल.

३) रतनवाडी, अकोले अगस्ती आश्रम किंवा अकोले श्री सिद्धेश्वर, संगमनेर, कोल्हार, देवळाली प्रवरा, बेलापूर, नेवासा उत्तर किंवा दक्षिण, देवगड, प्रवरासंगम, श्री सिद्धेश्वर मंदिर यांपैकी एखाद्या ठिकाणाहून परिक्रमा सुरू करणे सोयीचे होऊ शकते. संयोजकांनी तसे संयोजन करावे.

४) परिक्रमा सुरू करतांना परिक्रमेचा संकल्प करावा. प्रवरेचे पूजन करावे त्याचबरोबर श्रीगणेश, शिव, विष्णू, लक्ष्मी, अगस्त्य, नारद, हनुमान यांचेही पूजन करावे. शक्य त्याप्रकारे अन्नदान व अन्य दान करावे. परिक्रमा पूर्ण करतांना सांगता पूजन करावे. तसेच प्रवरा अमृत कुंभाचे स्वतःच्या घरात अमृतपूजन सोहळा करावा. पूजनात प्रवरेची आरती महत्त्वाची आहे तसेच प्रवरा वंदना अष्टक म्हणावे. पायी परिक्रमा जास्त फलदायी ठरते. दिव्यानुभूती येतात.

५) परिक्रमा करतांना व्रतस्त राहावे. सात्त्विक आहार ठेवावा. कोणत्याही स्वरूपाचे व्यसन करू नये. भजन, पूजन, जप, श्रवण, कीर्तन यांत वेळ व्यतित करावा.

६) प्रत्येक दर्शन प्रसंगी पूजन अर्चन करावे.

७) परिक्रमा एकट्याने, पतीपत्नीने, आईवडील व अपत्य यांनी, सामूहिक स्त्रीपुरुष यांनी करावी.

●●●

## ड) परिक्रमेचा हेतू आणि फलश्रुती

अमृतवाहिनी प्रवरा जीवनदायिनी, पौरुषप्रदायिनी, आरोग्यदायिनी, लक्ष्मीदायिनी, यशदायिनी आहे. परिक्रमा करणाऱ्या व्यक्ती किंवा समुदायाने यापैकी कोणत्याही अपेक्षेने हेतुपूर्वक परिक्रमेचा संकल्प करावा. सर्वकल्याण हेतूनेही ही सामूहिक स्तरावर परिक्रमा करणे फलदायी होते. केवळ पर्यटन हेतूने परिक्रमा शक्यतो करू नये. पर्यटन, सहल आपसूकच घडेल. केवळ पर्यटनासाठी भ्रमंती करण्यासाठी प्रवास करतांनाही स्वतःच्या व अन्य कोणाच्या श्रद्धेला तडा जाणार नाही, याची काळजी घ्यावी.

संकल्प हेतूप्रमाणे फलप्राप्ती तात्काळ होते एवढे सामर्थ्य अमृतवाहिनीचे आहे. पायी पर्यटन करतांना शरीरशुद्धी व मनःशुद्धी होऊन एकप्रकारे वृत्तीपालट होऊन सात्त्विकवृत्ती वृद्धिंगत होते. आयुरारोग्य लाभते. संकटांवर मात करण्याचे सामर्थ्य प्रकटते. सर्वप्रकारचे नैराश्य नाहीसे होते. अमृतवाहिनी प्रवरा, शिवपार्वती, म्हाळसामार्तंड, विष्णू लक्ष्मी, प्रभु रामचंद्र, शक्तिमाता, हनुमान, नारद, महर्षी अगस्त्य, प्रवरा तीरावरील तपस्वी, यांची दिव्य दर्शने साधकांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपात- पशू, पक्षी, वृक्ष आणि विभूती या स्वरूपात होतात.

प्रवरा तीरावर, महर्षी अगस्ती आश्रमात, श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये व संगमांवर हेतुपूर्वक किंवा संकल्पपूर्वक यज्ञ, याग, अभिषेक, पारायणे सिद्ध होतात. हेतू किंवा संकल्प सफलतेने पूर्ण होतो. विद्यार्थ्यांना विद्या-ज्ञान, धनार्थियांना धन, पुरुषार्थियांना पुरुषार्थ, विवाहेच्छुकांना विवाहसंपन्नता, अपत्येच्छुकांना इष्ट अपत्य प्राप्ती, जलार्थियांना उदंड जलप्राप्ती, आरोग्यार्थियांना आरोग्यप्राप्ती अवश्य होते. द्वंद्वे, वाद, भांडणे आणि संकटे यांचे निवारण होते. यासाठी रुद्राभिषेक, अगस्त्य महात्म्य, पारायण, लोपामुद्रा चरित्र पारायण, प्रवरामहात्म्य पारायण, श्रीमद्भागवताचे आयोजन, श्री रामकथाज्ञानयज्ञाचे आयोजन करणे, अत्यंत शुभ फलदायी आहे.

***टीप :-*** *ज्या पर्यटकांना केवळ पर्यटन म्हणूनच प्रवास करावयाचा आहे त्यांना कोणत्याही अटी नाहीत. मात्र कोणाच्याही श्रद्धेला तडे जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. पर्यटकांना शनिशिंगणापूर, साकुरी (राहाता) येथील उपासनी महाराज, शिर्डीचे साईनाथ ही स्थळेही पाहता येतात. तसेच कळसुबाई, सर्वतीर्थ किंवा जटायूतीर्थ टाकेद याही गोष्टी पाहाता येतील.*

●●●

# इ) प्रवरा परिक्रमेचा संकल्प

## (संस्कृत आणि मराठी)

**संस्कृत :–**

श्रीमद्‌भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य
अद्य ब्रह्मणो द्वितीये परार्धे विष्णूपदे श्री श्वेतवराहकल्पे
वैवस्वतमन्वन्तरे अष्टाविंशे युगचतुष्के कलियुगे
प्रथमचरणे जंबुद्विपे भरतवर्षे भरतखंडे दक्षिणापथे दंडकारण्ये
महाराष्ट देशे गोदावर्याः दक्षिणतीरे, प्रवराया दक्षिण । उत्तर तीरे,
बौद्धावतारे महर्षी अगस्त्य तथा श्रीराम क्षेत्रे आश्रमे
अस्मिन वर्तमाने शालिवाहन शके ……… नाम संवत्सरे ……… अयने ……… ऋतौ ……… मासे ……… तिथौ……… वासरे ……… दिवसनक्षत्रे शुभकामनायोगे शुभकरणे ……… स्थिते वर्तमान चंद्रे ……… राशिस्थिते सूर्ये ……… स्थिते देवगुरौ शेशेषु ग्रहेषु यथा यथां राशिस्थानस्थितेषु सत्सु एवं गुणविशेषविशिष्टायां शुभपुण्यतिथौ ममआत्मनः वेदोक्त तथा पुराणोक्त तथा लोकोक्त फलप्रात्यर्थं अस्माकं सकुटुंबानां सपरिवारानां द्विपदचतुष्पद सहितानां क्षेम, स्थैर्य, अभय, आयुरारोग्य, ऐश्वर्य, अभिवृध्यर्थं समस्त मंगल प्राप्त्यर्थं समस्त अभ्युदयार्थं, प्रवरा परिक्रमा सिध्यर्थं श्री प्रवरामाता देवता प्रित्यर्थ यथामिलिते उपचार द्रव्यैर्ध्याना ऽऽ आवाहनादि षोडशोपचार द्रैव्यः पूजां करिष्ये.

**मराठी :–**

महाभागाशाली व पुरुषश्रेष्ठ, सर्वव्यापी विष्णूचे आज्ञेने वर्तमानकाली, आदिब्रह्माच्या दुसऱ्या परार्धात, विष्णूपदात, श्री श्वेतवाराहकल्पांत, वैवस्तवमन्वंतरामध्ये, २८ व्या युगचतुष्कांतील कलियुगाच्या पहिल्या चरणात, जंबुद्विपातील भरतवर्षात (हिंदुस्थानात), दंडकारण्यात गोदावरीच्या दक्षिण तीरास, प्रवरेच्या दक्षिण/उत्तर तीरास, बौद्धावतारात श्री महर्षी अगस्त्य तथा श्रीराम क्षेत्रात, आश्रमात, शालिवाहन शकाच्या …… संवत्सरात उत्तर/दक्षिण आयनात, …….ऋतूत ……… मासात …… पक्षात …… तिथीस …… वारी ……. दिवस नक्षत्रात शुभनाम योगात, शुभकरणात …….राशिस्थित चंद्र असतांना …….राशीत सूर्य असतांना …….राशीवर देवगुरू बृहस्पती असतांना आणि इतर

ग्रह बरोबर आपापल्या राशीवर स्थित असतांना अशा विशेष गुणांनी श्रेष्ठ झालेल्या कल्याणकारक व पुण्यकारक अशा तिथीस मला स्वतःला वेदोक्त तथा पुराणोक्त तथा लोकोक्त फलप्राप्ती होण्यासाठी माझ्या कुटुंबाला क्षेम, स्थैर्य, दीर्घायुष्य, आरोग्य, ऐश्वर्य उत्कर्ष होण्यासाठी प्रवरामाता देवता प्रसन्न व्हावी म्हणून यथाशक्ती मिळालेल्या पूजासाहित्याने मी ध्यान आवाहनादी सोळा उपचारांनी प्रवरामातेची पूजा करतो/ते आहे.

●●●

**संदर्भग्रंथ–**

१) प्रवरा खोरे :– महाराष्ट्र शासन– महाराष्ट्र गॅझेटिअर, प्रकाशक– दशनिका विभाग.

२) महाराष्ट्र शासन, मुंबई मु. संपा. डॉ. अरुणचंद्र शं. पाठक मधील प्रकरण.

३) सांस्कृतिक जीवन– लेख– सांस्कृतिक जीवन व लोक :– डॉ. अरुणा ढेरे, वन्य संस्कृती :– डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी नोंदविलेल्या संदर्भांच्या आधारे.

४) श्री मोहिनीराज :– महादेव शास्त्री, प्रकाशक :– इंडिया बुक कंपनी पुणे प्रथम आ. १९७७

५) प्रवराकाठची संस्कृती :– लेखक प्रकाशक – नारायण गंधे, संगमनेर प्र. आ. १९८७

६) प्रवरा महात्म्य :– बबन ऊर्फ विरुपाक्ष भाऊ जंगम, अकोले प्रकाशक सौ. सिंधु ऊर्फ वरुधा वि. जंगम, सुवर्णमुखरी प्रकाशन प्र. आ. २००९

७) दंडकारण्यातील अगस्ती आश्रम, अकोले :– बबन ऊर्फ विरुपाक्ष भाऊ जंगम प्र. आ. २००८–२००९.

८) रामभक्त हनुमान :– डॉ. अनिल सहस्रबुद्धे, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे प्र. आ. डिसें. २०२०.

९) अगस्त्य :– अनिल सहस्रबुद्धे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, द्वि. आ. २०१७.

१०) नारद :– अनिल सहस्रबुद्धे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०१७.

११) अगस्त्य महात्म्य :– अनिल सहस्रबुद्धे, प्रकाशक सौ. उषा सहस्रबुद्धे, नगर प्र. आ. २००८, द्वि. आ. २०१८.

१२) ऋषी लोपामुद्रा चरित्र :– अनिल सहस्रबुद्धे, आनंदोत्सव प्रकाशन मंच अ.नगर, फेब्रुवारी २०१८.

१३) श्री हरिहर केशव गोविंद त्रिस्थळी महिमा :– डॉ. सुभाष सोन्याबापू मेहेत्रे, बेलापूर (नगर) प्रेसकडे.

●●●

## भाग दुसरा

# हाक प्रवरेची

# १) जीवनदायिनी प्रवरेचे स्मरण

कोणत्याही गावाची नदी ही त्या गावाच्या संस्कृतीशी जोडलेली असते; किंबहुना त्या नदीच्या काठी त्या गावाचा इतिहास घडत असतो. परंपरा निर्माण होतात आणि त्या गावात राहाणाऱ्या व्यक्तींचे भावबंध त्या नदीशी तयार होतात. त्या व्यक्ती पुढे कुठेही गेल्या तरी ती नदी त्यांना साद घालत असते. माहेरवाशिणीला माहेरची असणारी ओढ आणि कोणत्याही व्यक्तीला नदीची वाटणारी ओढ ही अगदी सारखीच असते. महाराष्ट्रातील आणि भारतातील अनेक नद्या या धार्मिक परंपरेशी जोडलेल्या असल्यामुळे त्यांच्याविषयी श्रद्धेची भावना अधिक आहे. त्यातून अनेक नद्यांना तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यातून त्या नद्यांची काळजीही शासनाच्या मदतीने घेतली जाते. अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा नदी ही अशीच श्रद्धेचा विषय आहे. शतकानुशतकांच्या परंपरा आणि श्रद्धेशी जोडलेली ही नदी अनेक पौराणिक कथांच्या संदर्भाने येत राहते. त्यामुळे अनेक तीर्थक्षेत्र या नदीच्या काठाशी वसलेली आहेत. त्यामुळे श्रद्धेच्या माध्यमातून या नदीचे पर्यावरणीय संवर्धन करण्याचा प्रयत्नही व्हायला हवा.

पूर्वीच्या काळी गाव नदीकाठी वसायचे. गावातील उद्योगधंदे नदीच्या कडेलाच सुरू व्हायचे. लोकांच्या सर्व व्यवहाराचे जीवनकेंद्र नदी होती. नळयोजना नसल्याने नदीवर जाणे सर्वांनाच अपरिहार्य असायचे. त्यातून नदीचे महत्त्व सर्वांनाच समजत होते व आपल्या स्वार्थासाठी का होईना लोक नदीची काळजी घ्यायचे, पण हळूहळू नळयोजना आल्या आणि अनेकांचे नदीकाठी जाणे थांबले. गावाची रचना नदीकेंद्रित होण्याऐवजी ती हायवेकेंद्रित झाली. गावाबाहेरून जाणारा मुख्य हायवे हेच विकासाचे केंद्र लोक समजू लागले व नदीकाठी न राहता त्या हायवेकाठी जाऊन राहायला, व्यवसाय करायला लागले. हायवे सर्वांनाच रोजगार

देऊ शकत नाही, पण त्यातून गावातील नदीकेंद्रित भावपूर्ण वातावरण होते ते मात्र प्रदूषित झाले. हायवेने निर्माण केलेले बटबटीत जीवनप्रवाह, धाबे, त्यातून आलेली व्यसने आणि वेश्याव्यवसाय, पैसाकेंद्रित जीवनव्यवस्था, जमिनी विकून अचानक हातात आलेल्या पैशातून लागलेली व्यसने आणि चैन त्यातून झालेले मृत्यू हे वाढत गेले. नदीकेंद्रित जीवनप्रणाली आणि हायवेकेंद्रित जीवनप्रणाली यातील तीव्र विरोधाभास हा स्पष्टपणे आता सर्वांच्या लक्षात येतो आहे. त्यामुळे नदी हेच पुन्हा जीवनाचे केंद्र व्हायला हवे. ''मध्यंतरी बीड जिल्ह्यात आर्वी येथे गेलो होतो. तेथे दीपक नागरगोजे या कार्यकर्त्याने गावची नदी पुन्हा प्रवाही करण्यासाठी प्रयत्न केले. नदीतील सर्व गबाळ, दगड, माती काढली. नदीचे खोलीकरण केले व त्यातून नदी प्रवाही केली. नंतर नदीच्या काठी असलेल्या शेतात बोअरवेल घेतले आणि त्याचा परिणाम असा झाला की नदीचे पाणी वाहते झाले व आजूबाजूच्या शेतातही सिंचन झाल्याने शेतीची स्थिती सुधारली. आज त्या गावातील शेती बागायती होऊन उत्पन्न वाढले आहे. नदीकेंद्रित अर्थव्यवस्था इतकी महत्त्वाची ठरू शकते.''

नदीविषयी श्रद्धा म्हणजे किंवा हात जोडणे नव्हे तर नदीला जपणे, प्रदूषणापासून वाचवणे हेही तितकेच महत्वाचे आहे. आपल्या श्रद्धेचा आधार असलेल्या नदीकडे त्याच दृष्टीने पाहायला हवे. पूर्वी बारमाही वाहणारी नदी ही धरणे आणि बंधारे बांधल्यामुळे तिच्या वळणावर मर्यादा येत गेल्या. बांधकामे वाढल्याने होणारा वाळू उपसा, कारखान्यांनी सोडलेले रासायनिक द्रव्य, वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात नदीत येणारे सांडपाणी या सर्वच गोष्टींमध्ये नदीचे प्रदूषण ही सर्वात मोठी गंभीर अशी समस्या निर्माण झाली आहे. प्रसिद्ध गंगानदीच्या शुद्धीकरणासाठी तर राष्ट्रीय स्तरावर सतत चर्चा होत असते, परंतु तेच प्रश्न कमीअधिक प्रमाणात आज छोट्या नद्यांच्या बाबतीतही दिसत आहेत. प्रवरा नदीला प्रदूषणापासून वाचवणे, हे आज सर्वात मोठे आव्हान आपल्या समोर उभे आहे. त्यासाठी आपल्याला प्रवरा नदीच्या प्रदूषणाची तीव्रता समजावून घ्यायला हवी. ''प्रवरा नदीसंदर्भात बोलायचे तर वाळू उपसा हे प्रवरा नदीसंदर्भातील आज मोठे आव्हान झाले आहे. आज सेवा क्षेत्रातला सर्वात मोठा व्यवसाय हा बांधकाम व्यवसाय असल्यामुळे बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर वाळू लागते. वाळू उपसा हा बेकायदेशीर असल्यामुळे त्यातील तस्करी सुरू झाली आहे.

प्रशासनाच्या मदतीने होणारा हा गैरव्यवहार, या व्यवसायात उतरलेले गुंड प्रवृत्तीचे दादा लोक यामध्ये हा वाळू उपसा रोखणे खूप मोठे आव्हान आहे. अनेक चांगल्या अधिकाऱ्यांच्या जीवावरही गुंडगिरी बेतली आहे, हे वृत्तपत्रातल्या बातम्यांमधून आपल्याला कळते. त्यामुळे वाळू उपसा आणि त्यातून नदीचे नैसर्गिक होणारे शुद्धीकरण होण्याला खूपच मर्यादा येत आहेत. त्यातून नदीपात्रात होणारे मोठे खड्डे, त्या खड्ड्यांमध्ये बुडून गेलेले अनेक जीव, प्राकृतिक सौंदर्यावर होणारा परिणाम हे सारे बघता नदीत वाळू राहायला हवी. नदीमधील जलवनस्पती आणि नदी पात्रातून चालताना होणारा वाळूचा हळूवार स्पर्श आज नाहीसा झाल्याने खडबडीत दगडांची फक्त नदी उरली आहे. तेव्हा सरकार म्हणून त्या बाबतीत नक्कीच सरकारची भूमिका असायला हवी. तरीही त्या परिसरातील गावांनी आपल्या गावातील वाळू उपशावर नियंत्रण आणणे महत्त्वाचे आहे. काठावरील गावांच्या ग्रामसभा आणि प्रमुख गावे यांनी याबाबत पुढाकार घेऊन प्रबोधन करणे, अशा प्रकारची वाळू तस्करी रोखायला प्रशासनाला सहकार्य करणे, प्रसंगी आक्रमक भूमिका घेणे करायला हवे. हे होत नसल्याने व मला काय त्याचे? अशीच भूमिका लोक घेत असल्याने आज वाळू उपसा प्रचंड वाढला आहे.''

तालुक्याच्या गावची लोकसंख्या वाढती झाल्याने सांडपाणी थेट नदीत सोडले जाते. कारखान्यांचे दूषित पाणी व रसायने नदीत सोडली जातात. खेड्यातही गटारी थेट नदीत जातात, हीच स्थिती आहे. त्यामुळे एकीकडे कारखान्यांची दूषित रसायने तीर्थक्षेत्र म्हणताना नदीची सरकार गटारे करत आहे. अशा स्थितीत स्वच्छ भारत योजनेअंतर्गत तातडीने गटारीचा एक थेंबही नदीच्या पात्रात जाणार नाही. यासाठी गटारी बांधून ते पाणी इतरत्र वळवण्याची गरज आहे. रजनीश आश्रम पुणे यांनी गटारीच्या पाण्याचा केलेला निचरा शुद्धीकरण व त्याचे केलेले उपयोग याचा अभ्यास करायला हवा. त्याचप्रमाणे जालना जिल्ह्यात विजयअण्णा बोराडे यांनीही अशाच प्रकारे त्या पाण्याचा उपयोग करून दाखवला आहे. प्रवरेच्या काठावरील नगरपालिका, ग्रामपंचायत यांनी हा अभ्यास करून प्रवरेत जाणारे सांडपाणी दुसरीकडे वळवून त्याचे शुद्धीकरण करणे किंवा इतर वापर करणे यासाठी प्रकल्प उभे करायला हवेत. अशा प्रकल्पांना आज-काल वेगवेगळ्या जागतिक संस्था मदत करतात किंवा वेगवेगळ्या कारखान्यांचा सीएसआर फंड सुद्धा मिळू शकतो

यादृष्टीने प्रवरेकाठच्या गावांनी ही मोहीम राबवायला हवी.

नद्यांवर धरणे बांधण्याचा एक परिणाम असा झाला की नदीपात्रात उगवणाऱ्या विविध वनस्पती व नदीच्या काठावरही वेगवेगळ्या वनस्पती उगवत होत्या, पण बराच काळ नदीपात्र कोरडे राहत असल्यामुळे या वनस्पती मृत होऊन जैवविविधतेवर परिणाम होत आहे. तेव्हा ज्या धरणाखाली कालवे नाहीत. अशा नद्यांमध्ये अधूनमधून आवर्तन सोडण्याची गरज आहे. प्रवरेच्या बाबतीत आवर्तने येत असली तरी उन्हाळ्यात मात्र जास्त वेळा आवर्तन देण्याची या जैवविविधतेसाठी गरज आहे. त्याचप्रमाणे यंत्राच्या माध्यमातून नदीपात्राचे खोलीकरण आणि नदीपात्राच्या किनारी बोअरवेल हे अशास्त्रीय आहे, त्यामुळे नदीपात्रातील नैसर्गिक जलस्रोताला धक्का पोहोचून ते बंद होतात आणि बोअरवेलच्या प्रचंड उपशामुळे भूगर्भातील पाणीसाठे लवकर संपतात.त्यामुळे त्यावर कायद्याने बंधने घालणे आवश्यक आहे.

प्रवरा नदीचा किनारा हा आज अतिक्रमणांच्या विळख्यात सापडला आहे व त्या किनाऱ्याचे सौंदर्य नासले आहे. पूर्वीच्या काळी अनेकांची संध्याकाळ ही नदीकाठच्या हिरवळीवर सूर्यास्ताच्या साक्षीने रंगत असेल, परंतु आज किनाऱ्यावर सोडलेल्या गटारी, कडेची उचलून नेलेली वाळू, वीटभट्ट्या व गावातील बांधकामांचे नको असलेले मटेरियल यामुळे नदीकिनाऱ्यावर आज चालणेच मुश्किल झाले आहे. तेथे फिरायला जाणे हा तर खूप दूरचा भाग. गावकरी नदीकाठी येत नसल्यामुळे व्यसनी लोकांचे किनारे अड्डे झाले आहेत. दारू, गांजा सेवन करण्यासाठी नदी किनारा आज हक्काचे ठिकाण झाले आहे त्यामुळे संध्याकाळी तिथे जायची भीती वाटते.

दारूच्या पडलेल्या बाटल्यांमुळे धुणे धुवायला गेलेल्या अनेक महिलांचे पाय रक्ताळलेत. अशा स्थितीत आपल्याला नदीचे किनारे सुशोभित करणे ही महत्त्वाची मोहीम हाती घ्यायला हवी. नदी किनारे फिरण्याचे ट्रेक केले, तिथे हिरवळ निर्माण केली लहान मुलांच्या खेळण्याचे साहित्य ठेवले तर नदीकिनारा हेही फिरण्याची सर्वात सुंदर जागा होईल व लोकांचा तिथे वावर वाढला तर तेथील अतिक्रमणे व गैरव्यवहार याला मर्यादा येऊ शकेल. यादृष्टीने स्थानिक ग्रामपंचायत नगरपालिका नगरपंचायत यांनी नदी किनारे सुशोभित करणे हा प्राधान्याचा विषय करायला हवा. त्यासाठी स्थानिक आमदार निधी खासदार

निधीचा वापर हवा, त्यातून नदी सुशोभन होऊ शकते. आमदार निधी, खासदार निधी आज मंदिरांचे सभागृह बांधण्यासाठी वापरले जातात; ते जर प्रवरा नदीच्या किनाऱ्यासाठी वापरले तर संपूर्ण प्रवरा नदीचा काठ अतीव सुंदर होऊन त्या ठिकाणी अनेक कलात्मक गोष्टी अनेक सांस्कृतिक कार्यक्रम या ठिकाणी होऊ शकतील. मुंबईची चौपाटी जशी गजबजलेली असते त्याचप्रमाणे अनेक छोट्या व्यावसायिकांनाही हा किनारा मदत करू शकतो. पक्की बांधकामे न करता तात्पुरत्या स्वरूपाचे विक्री व्यवसाय इथे होऊ शकतील. स्वच्छतेची अट घालून असे होणे नक्कीच शक्य आहे. नदीचा किनारा सुशोभित करण्यासाठी स्थानिक शाळा-महाविद्यालयांना हा किनारा दत्तक घ्यायला हवा. शाळा-कॉलेजातील समाजसेवेचे तास एनसीसी, एनएसएस यांनी या किनाऱ्याची निगा राखणे, हे किनारे सुशोभित करणे असे केले तर त्यातून नक्कीच मदत होऊ शकेल. नदीच्या किनाऱ्यावर झाडे लावणे हाही एक सुंदर उपक्रम असू शकतो. नदीतून वाहणाऱ्या पाण्यामुळे झाडे लवकर मोठे होतील व नदीचा किनारा अधिक सुंदर अधिक सुशोभित होईल. नदीकिनारी हिरवळ निर्माण करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने पुढाकार घेतला तर ते खूपच सुंदर वाटेल. नदीचा किनारा योग्य पद्धतीने वापरला जात नसल्याने त्यावर अतिक्रमण खूपच वाढले आहे. अनेकदा प्रत्येक गोष्ट कोणताही प्रश्न मांडला की ते सरकारने करावे अशा प्रकारचे पालुपद व उत्तरे मांडली जातात, परंतु आपण हे लक्षात घ्यायला हवे की सरकारचा यात नक्कीच सहभाग असला पाहिजे, परंतु नदीवर होणारी आक्रमणे रोखणे, त्या आक्रमणात आपला स्वतःचा सहभाग नसणे आणि त्याच वेळी नदीपात्रातील प्रदूषण रोखून नदीचा किनारा सुशोभित करणे हे काम सरकारचे कमी आणि समाजाचे जास्त आहे. आपल्या गावातील त्या नदीत कुठलाही प्रदूषित पदार्थ जाणार नाही, वाळूउपसा होणार नाही. नदी किनाऱ्यावर अतिक्रमणे होणार नाहीत व नदीचा किनारा सुंदर होईल यासाठी आपल्याला जास्तीत जास्त प्रयत्न करायला हवेत.

**– हेरंब कुलकर्णी,**
अकोले, मो. ८२०८५८९१९५

●●●

# २) पर्यावरण, पावित्र्य आणि निसर्गसौंदर्य राहिले तरच वैभवाला अर्थ

**प्रवरेचा उगम व विस्तार :–**

नदी एक जिवंत, वाहतं चैतन्य. मनुष्य जातीसह सर्व सजीव प्राण्यांना समान आधार देणारं. भटक्या अवस्थेतून माणूस स्थिर झाला तो नदीकिनारी. पुढे उत्क्रांतीच्या नानाविध टप्प्यात त्याचे नदीशी शाश्वत नातं निर्माण केले. अगदी पहाटपासून ते रात्री झोपण्यापर्यंत अनेक कारणांनी मानव नदीशी बांधला गेला. उगमापासून ते संगमापर्यंत तिचे अनेकांशी ऋणानुबंध निर्माण झाले. पुढे सांस्कृतिक घडामोडीत वेदवाङ्मय निर्माण झाले, लोकसाहित्य निर्माण झाले. स्त्री–पुरुषांनी आपल्या दैनंदिन जीवनात कष्टप्रद जीवनशैलीमध्ये आनंदरस निर्माण करण्यासाठी लोककथा वा लोकगीतांतून भवतालच्या निसर्गातील सर्वच घटकांचे (आजच्या भाषेत जैवविविधता) महत्त्व मांडले. पंचमहाभूतांचे स्तवन आळवले. अशा या उत्कट परंपरेतून नदी किंवा नद यांची वर्णने, स्तुतीसुमने जगभर निर्माण झाली आहेत. असा हा चराचर सृष्टीसाठीचा समान धागा म्हणजे नदी.

उत्तर सह्याद्रीतील कळसूबाई शिखराच्या परिसरात असलेल्या रतनगडाजवळील कात्राबाईची खिंड हे प्रवरा नदीचे उगमस्थान. कात्राबाई खिंडीचा हा भाग सह्याद्रीतील सदाहरित अशा उत्तम जंगलाने व्यापलेला आहे. याची समुद्रसपाटीपासून उंची आहे तब्बल ९२८ मीटर. येथील देवराईमधून प्रवरेचा प्रवाह सुरू होतो, असे स्थानिक आदिवासी बांधव सांगतात. देवराई म्हणजे ग्रामदैवताच्या नावाने राखलेले आदिम असे प्राथमिक जंगल. आदिवासींच्या संवर्धन परंपरेचा वारसा सांगणारा एक उत्कट नमुना आहे. देवराईच्या रूपात जंगल का राखले जाते, याचे मुख्य कारण जल सुरक्षा आहे, असे आदिवासी ठामपणे

सांगतात. असे हे देवराई व नदीच्या उगमाचे नाते जवळपास सर्वच नद्यांना लागू पडते. किंबहुना नदी हे राई वा बनाचे लेकरूच म्हटले तर वावगे ठरणार नाही.

प्रवरा नदी रतनगडाच्या बाजूने खाली रतनवाडी गावात वाहत येते. भंडारदरा धरणाच्या पुढे दरीतून खोल वाहत, तिचा प्रवास अकोले, संगमनेर, राहाता, श्रीरामपूर, नेवासा या तालुक्यातून होतो. नगर-औरंगाबाद जिल्ह्याच्या सीमेवर कायगाव टोका येथे ती गोदावरीला मिळते. हे ठिकाण समुद्रसपाटीपासून ५१० मीटर उंचीवर येते. प्रवरा संगम म्हणून हे तीर्थक्षेत्र प्रसिद्ध आहे. रतनवाडी ते प्रवरा संगम असा तिचा २३० किलोमीटरचा प्रवास होतो. वाटेत तिला सर्वप्रथम कृष्णवंती, पुढे संगमनेरजवळ आढळा, म्हाळुंगी या पट्टा किल्ला परिसरात उगम पावणाऱ्या उपनद्या येऊन मिळतात. निमज गावाजवळ धमोली नदी, पुढे तोलखंडी नाला, मुईमळा नाला, पिंपरणेजवळ देव नदी, शेडगावजवळ दिग्रस नदी, तर वांदराह नदी आश्वी खुर्दजवळ येऊन मिळते. शिवडीचा नाला, धरण नाला, लेंडगा नदी, लेंधोरा नाला, काझी नाला, मंडपूर नाला असे ज्ञात-अज्ञात लहान-मोठे नदीप्रवाह प्रवरेला येऊन मिळतात. नेवासा तालुक्यात तिळापूर या गावी मुळा व प्रवरेचा संगम आहे. मुळा नदी ही कुमशेतच्या धारेराव देवराईत उगम पावते. अकोले, संगमनेर, राहुरी, नेवासा या तालुक्यातून वाहणारी ती अवखळ नदी आहे. तुलनेने पेहरा संथ वाहते. प्रवरेच्या प्रवासात नद्यांशिवाय अनेक लहान-मोठे ओढे-नाले जल भरण करतात व उगमच्या ठिकाणी बालक भासणारी प्रवरा उर्फ पेहरा संगमाच्या ठिकाणी पोक्त बनते. प्रवरा व मुळा या नद्यांमुळे एक विस्तीर्ण खोरे तयार झाले आहे. या खोऱ्याचे एकूण क्षेत्रफळ आहे ६ हजार ५६९ चौरस किलोमीटर. अहमदनगर जिल्ह्याचा ३६.८७ टक्के भूभाग या प्रवरा खोऱ्याने व्यापला आहे.

**प्रवरेची परिसंस्था :-**

परिक्रमावासियांनी प्रवरेची परिसंस्था समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. खरं तर परिसंस्था (इकोसिस्टिम) हा शब्द पर्यावरणशास्त्रातील महत्त्वाची पारिभाषिक संज्ञा आहे. प्रवरा नदीच्या उगम स्थानी असणारे जंगल ही पण एक परिसंस्थाच. सहस्त्रधारांनी कोसळणारे पावसाचे पाणी जंगलातील वनस्पती, माती व त्यातील जीव जीवाणूंच्या सहाय्याने जमिनीत झिरपते व झऱ्यांच्या रूपात बाहेर पडते. असे असंख्य झरे परिसंस्थेचे घटक बनतात व त्या झऱ्यातून जलप्रवाह निर्माण होतात.

पुढे त्यांचे मिळून ओढ्यानाल्यात रूपांतर होते व त्याची नदी बनते. सरिता सर्जनाची ही सेंद्रिय क्रिया अनादिअनंत काळ सुरू आहे. थोडक्यात सांगायचे तर प्रवरेच्या परिसंस्थेचे मूळ उगमाच्या ठायी असणाऱ्या देवराईत व सभोवतालच्या जंगल परिसंस्थेत दडलेले आहे. म्हणून नद्या टिकवायच्या असतील तर उगमस्थानांतील जंगल पण जपावेच लागेल. भंडारदरा धरणातून प्रवरा नदीचा प्रवाह ईशान्य दिशेला वाहतो. कातळ कड्यांना चिरत तो पूर्वेला वळतो. अनेक घळई, घळया, डोह, रांजणखळगे, धावत्या, डोंगरबाहू या भूरूपांची निर्मिती झालेली आपणास दिसते. रंधा गावाजवळील धबधबा हे एक प्रेक्षणीय स्थळ तर आहेच, पण त्याबरोबर प्रवरेने निर्माण केलेले हौशी अभ्यासकांसाठीचे निसर्गनिर्मित दालन म्हणावे लागेल. ही सर्व भूरूपे व त्यातील जलचर, मासे, खेकडे, शैवाल, सूक्ष्म जीव जीवाणू हे नदी परिसंस्थेचा हिस्साच आहे. नदीचे व त्या सर्व जीविधतेचे शाश्वत नाते आहे व त्यांचे परस्परांचे अस्तित्व पण जाळीदार नात्यात बांधलेले आहे. नदी व माणूस यांचा संबंध सर्वांना ठाऊक आहेच. पोषण व अन्नसुरक्षा, पिण्याचे शुद्ध पाणी, आंघोळीला पाणी, शेतीला पाणी, गुरांना पाणी (म्हशीला तासन्‌तास डुंबायला...), औद्योगिक कारणासाठी, इतर दैनंदिन गरजेसाठी पाणी, अशी लांबलचक यादी नदीची उपयुक्तता सिद्ध करते. कोळी, भोई, भिल्ल अशा एक ना अनेक मच्छिमार व इतर समुदायांचे जीवन नदीमुळेच बहरते. अशा प्रकारे कोणतीही नदी पर्यावरणीय सेवा (इकोसिस्टिम सर्विसेस) मानवाला पुरवते व स्वरक्षणाची जबाबदारी काठच्या गाव समाजाकडे सोपवते. म्हणूनच मानव हाही नदी परिसंस्थेचा एक घटक आहे, हे मान्यच करावे लागेल. आपली सुटका नाही. निसर्ग त्याचं तो पाहून घेईल, या स्वार्थी मनोवृत्तीला पण तिलांजली द्यावी लागेल तरच आपण जिला माता मानतो, या बोलण्याला काही अर्थ आहे.

नदीला मिळणाऱ्या नानाविध प्रवाहांचीही पण परिसंस्था विचारात घेणे इष्ट आहे. पुढे विस्तारत जाणारे नदीचे पाणलोटक्षेत्र (वॉटरशेड) हे डोंगर, टेकड्या, माती, खडक, मुरूम, झाडे, झुडुपे, गवताळ पट्टे-कुरणे, शेती व तेथील पिके, पाळीव प्राणी, पशू पक्षी अशा वैविध्यपूर्ण घटकांनी व्यापलेले असतात. त्यांचा व नदीचा संबंध समजून घेतला पाहिजे. त्यांचे परस्पराशी नाते उलगडून पाहायला हवे. प्रवरा खोऱ्यातील पाणलोट धुंडाळला तर त्याची नानाविध रूपे पुढे येतात. नदीच्या दोन्ही काठाला कुठे डोंगराळ टेकड्यांचा प्रदेश, खुरट्या झाडोऱ्यांनी

व्यापलेला, कुठे गवताळ परिसंस्था आढळते तर कुठे नव्याने सुरू झालेली बागायती शेती, तर पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी जिरायती शेती. संगमनेरच्या पुढे संगमापर्यंत असणारी एक पीक पद्धतीने (ऊस शेतीमुळे) नदीची परिसंस्था बदलेली आढळेल. आपले जीवनमान उंचावण्याच्या प्रयत्नात मानवाने सारा भूभागच (लँडस्केप) बदलून टाकल्यामुळे नदीची कोलमडलेली व्यवस्था प्रकर्षाने दिसू लागते.

सहा तालुक्यांनी व्यापलेले प्रवरेचे खोरे एकूण पाच कृषी हवामान विभागात मोडते. पहिला सह्याद्रीच्या घाट माथ्याचा विभाग, तद्नंतर येतो मध्यम पावसाचा पूर्वेकडे उतार असणारा मध्यम पावसाचा प्रदेश, तो झाला की पर्जन्यछायेचा सपाट असा जिरायती टापू, काळ्याभोर जमिनीचा भूप्रदेश मराठवाड्याशी नाते सांगतो. अशी ही सूक्ष्म हवामानाची विविधता प्रवरा खोऱ्यात दिसते.

**नदीचे जैव–सांस्कृतिक महत्व**

**रसामाजि प्रवररस, रक्षितो वरिष्ठ सुरस**
**बोघरूपे ते अकल्मष, प्रवरा नदी पै जाली**
**प्रवररसा तेचि प्रवरा, अखंडे वाहे मुनेश्वरा**
**रक्षावया जगादाधारा, अचळ तेथे राहिली**

महालयाक्षेत्राच्या म्हणजे नेवाश्याच्या ओवीबद्ध मराठी महात्म्यात प्रवरेचे सुंदर वर्णन मिळते. पुराणातील उल्लेखानुसार अगस्ती ऋषींनी या नदीचे 'पर्वरा' असे नामकरण केले आहे. प्रवरा ही पेहरा, अमृतवाहिनी अशा नावांनीपण ओळखली जाते. नदीला समानार्थी असणारी आपगा, तटिनी, तटी, तरंगिणी, निम्नगा, सरिता अशी किती तरी नावे आहेत. प्रवरेला अमृतवाहिनी म्हणण्यामागे एक लोककथा प्रचलित आहे. गोठ्यात खाट्या गायी पाळणाऱ्या गवळीण स्त्रीकडे दूध, दही, तुपाचा एवढा रतीब कसा? हा सवाल अनेकांना पडायचा. मध्यरात्री ती अनाम गवळी महिला कळशी घेऊन प्रवरेला जायची व मधल्या धारेतून चक्क दूध भरून आणायची. या लोककथेतील मिथक बाजूला केले तर दिसते या नदीचे पाणी किती शुद्ध होतं, पवित्र होते अगदी धारोष्ण दुधागत.

'गोदावरीच स्नान व प्रवरेचे पान' अशी म्हण पूर्वापार येथील जनसामान्यात प्रचलित आहे. म्हणजे पवित्र गोदावरी उर्फ गंगेत स्नान केले की पुण्य मिळतं व प्रवरेचे नीळशंख गार पाणी प्राशन केले की जन्माची तहान भागते. असे हे प्रवरा

महात्म्य गावोगावी लोककथांमधून लक्ष वेधून घेते.

आदिवासी समाज तर प्रवरेला माई संबोधतो. तिचे अस्तित्व पावित्र्य राखण्याच्या अनेक परंपरा या वनोपजीवी समाजात आढळतात. नदीला जन्म देणारी देवराई असो वा पात्रातील लोकदैवतासाठी राखलेले पूजनीय डोह असो. या साऱ्या प्रथा परंपरा नदीशी असणारे जैव-सांस्कृतिक नाते अधोरेखित करतात. रंधा धबधब्याजवळील घोरपडा देवीच्या डोहात मासेमारी न करण्याचा कडक नियम होता. देवीच्या नावाने हा डोह राखलेला होता. तेथील मत्सविविधता संरक्षित व संवर्धित करण्याचे शहाणपण आदिवासी व वननिवासी बांधवांनी निर्माण केले होते, पारंपरिक नीतिनियम ठरवून. ठाकर आदिवासींच्या लोकगीतात तर नदीची बहुविध वर्णनं ऐकायला मिळतात. बोहड्याच्या नाचगाण्यात तर चक्क माश्याची सोंग वापरतात. अशी नदीच्या सहवासातून उत्क्रांत झालेली संस्कृती किती उदात्त आहे, याची प्रचिती येते.

चाळीसगाव डांगाणात 'पेहराची बहीण कृष्णवंती' अशी लोककथा प्रसिद्ध आहे. कळसूबाई ही प्रवरेची बहीण आहे. प्रवरेला भेटायला कळसूबाई दरवर्षी यायची, ती कृष्णवंती नदीच्या रूपात. एकदा त्यांचे तू मोठी का मी मोठी यावरून भांडण झालं. प्रवरा म्हणाली, मी मोठी आहे; कारण मी अमृताचा कुंभ फोडून आलीये; तर कृष्णवंती म्हणाली की, मी खूप उंचावरून वाहत येते म्हणजे मीच मोठी आहे. भांडणात प्रवरेने तिला शाप दिला की, तू फक्त चार महिनेच वाहशील व तुझ्या पोरांचं म्हणजे शेतकऱ्यांचे नुकसान करशील. कृष्णवंती पण काही कमी नव्हती. ती म्हणाली, परवरे तुझ्या अमृताचं पाणी होईल व तू दरीदरीतून वाहशील. अशी ही गमतीदार लोककथा, आदिवासींचं मानस सांगणारी.

बालपणी आई गेल्यावर पोरक्या झालेल्यांनी गावच्या नदीलाच आई मानले. आजही गावोगाव नदीच्या महापुरात पट्टीचे पोहणारे स्वत:ला अभिमानाने मिरवतात, पण नदीवर विजय मिळवल्याचा उन्माद कधी चेहऱ्यावर दिसत नाही. नदीत पोहताना कितीही पाणी तोंडात गेले तरी चूळ नदीच्या प्रवाहात सोडायची नाही, असा दंडक आजही अनेक ग्रामवासी सांगतील. नदी पार करून देणारी नाव व नावाडी या उभयतांना पंचक्रोशीत मानाचे स्थान असायचे. महापुरात पण नावा चालवणारे हे लोक खऱ्या अर्थाने हिरो होतो.

स्त्री व नदीचे नाते तर जन्मांतरीचे. पूर्वी पाणी योजना नव्हत्या. पिण्याचे

पाणी आणायला, कपडे धुवायला सातत्याने नदीवर जावे लागे. आपले सुख-दु:ख या सासुरवाशिणी जात्यावरील, सणासुदीच्या, लग्नसमारंभातील गीतातून आळवताना आजही दिसतात. बांबूचा कंद लावायचा असेल तर ठाकर महिलांच्या मते, मृग नक्षत्रात पावसाने नदी वाहती झाली की कंदाची लागवड करावी, बांबू हमखास जगतो. अशी किती तरी उदाहरणे सांगता येतील. नदीतील मच्छसंपदा नष्ट न होऊ देता मासेमारी करण्याचे अनेक नियम या समाजाकडे आहेत. नदीच्या प्रवाहात वाहत जाणारे मासे व पुन्हा प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने चढणारे मासे यांना पकडण्यासाठी बांबूचे भोताडे तयार करतात, त्यातील तंत्र व कौशल्य वाखणण्याजोगे आहे. स्त्री तत्त्वाशी नदीचे फार हृद्य नाते आहे. आपल्याकडील अनेक नद्या ह्या पुत्रवती आहेत. नदीचे पूजन हा एक सोहळाच असतो. ओटीभरण, साडीचोळी नेसवणे, महापूर ओसरावा म्हणून तिला नारळाची ओटी देतात. नदीला स्त्रीधर्म असतो. म्हणून पावसाळ्यात (मातीमुळे) लाल पाणी वाहते. तेव्हा त्यात स्नान करू नये, असा समाज संकेत रूढ आहे.

नदीकाठी बागायत फुलवणारा आद्य शेतकरी म्हणजे गावोगावचा माळी समाज. आजही त्यांची सुपीक शेती नदीकाठीच आढळते. आश्वी गावातील 'माळ्याचा मळा' प्रवरेच्या उत्तर तीरावर टिकून आहे. त्यांनी केवळ शेतीच टिकवली नाही, तर नदीकाठच्या उपयुक्त झाडोऱ्याचेही रक्षण केले आहे. नदीकाठची वृक्षसंपदा नष्ट होते आहे, या पार्श्वभूमीवर या समाजाने जाणीवपूर्वक नानाविध वनस्पती जपून नदीकाठ सुरक्षित ठेवला आहे. उन्हाळ्यात वाळूमध्ये टरबुजाच्या वाड्या फुलल्या व त्याची थंडगार गोड चव आजही अनेकांना तोंडी असणार.

मनोरंजनाची आधुनिक साधने नव्हती त्या काळी, म्हणजे दोन दशकापूर्वी गावातील लहान-थोरांचे भटकणे नदीवर ठरलेले असायचे. चाकरमाने, सेवानिवृत मंडळी सायंकाळी नदीकाठी हौशेने जमायची व त्यांचे स्वमनोरंजन नदीच्या सहवासात व्हायचे. समाजापासून दूर असणाऱ्या, भयप्रद भासणाऱ्या हटयोगी मंडळींचा वावर पण शंकराच्या मंदिर परिसरात असायचा.

नदीशी भावनिक, सांस्कृतिक व व्यावहारिक नाते असणाऱ्या समाज व्यवस्थेने नदीची परिसंस्था जपण्याचे कार्य केले आहे. कृषी संस्कृतीचा पाया रोवणाऱ्या ऋषि-मुनींची तपोभूमी नदीकाठीच होती. प्रवरेकाठी सप्तऋषींपैकी एक अशा अगस्ती ऋषींचा आश्रम होता. रामायणातील तातोबा म्हणजेच वाल्मिकी

ऋषींचा आश्रम पण प्रवरेकाठी होता. महाराष्ट्रातील संतपरंपरा व नदी यांचे नाते सर्वदूर सर्वश्रूत आहे. प्रवरेकाठीच ज्ञानदेवांनी नेवासे येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी निर्माण केली. शिवाला मानणारा शैव संप्रदाय व पुढे वारकरी पंथाची पताका प्रवरेच्या साक्षीनेच जगभर पोहोचली. अहिल्याबाई होळकर या प्रागतिक विचारांच्या मराठा महिला राज्यकर्तीने गावोगाव जलव्यवस्था उभारल्या. अहिल्यादेवींच्या बारवा आजही गावोगाव दिसतात. मुख्य नद्यांच्या काठी घाट बांधले. यातून नदीची उपयोगिता व व्यवस्थापन कौशल्य अधोरेखित होते. दैनंदिन जीवन असो वा मृत्यूपश्चात निघणारी अंत्ययात्रा याचा संबंधपण नदीशीच येतो. 'पात्रातून ताटात' या उक्तीनुसार नदीशिवाय मानवी जीवन अशक्य आहे. एकूणच मानवाचा विकास असो, वा मोक्षप्राप्तीचा मार्ग याची पूर्ती नदीशिवाय असंभव आहे. याला प्रवरेकाठची नदीमातृक संस्कृती कशी अपवाद ठरेल? समर्थ रामदासांनी उदकाचे म्हणजे पाण्याचे अगदी चपखल वर्णन केलंय...

**उदक तारक उदक मारक**
**उदक नाना सौख्यदायक**
**पाहता उदकाचा विवेक अलौकिक आहे**

मनोज बोरगावकर या नव्या दमाच्या लेखकाने 'नदीष्ट' नावाचे स्वानुभवाधारित सुंदर पारदर्शक असे ललित लेखन केले आहे. त्यात आपल्याला नदीचं आकर्षण का आहे, हे सांगताना लेखक म्हणतो....

जन्माच्या आधी आपण आईच्या गर्भात पाण्यातच होतो ना! आईच्या गर्भात म्हणजे एका डोहात आपण किती निर्धास्त तरंगत होतो. ना काळवेळेची सुध, ना चिंता, ना कशाची भीती. इकडून तिकडे, या किनाऱ्यावरून त्या किनाऱ्यावर, अगदी नदीसारखे. काहीसे तळ न लागणारे, आपले आपलेच वाटणारे, श्वासातून, चिंब चिंब भिजवणारे! नदी आणि आईचा गर्भ किती सारखे आहेत नाही! आपल्या असलेल्या नदीच्या अनादी आकर्षणाचे कारण आईच्या गर्भाशी तर निगडित नसेल ना? नदीवर येण्याचे, मनसोक्त डुंबण्याचे हेच कारण असावे.

नदीला येणाऱ्या महापुराचे व होणाऱ्या नुकसानीविषयी लेखक सांगतो... नदीला आलेला महापूर म्हणजे तिची भडास आहे. वर्षानुवर्षे साठून राहिलेली. माणसांची पापं तिनं तरी किती दिवस साठवून ठेवायची? अजीर्ण झाली असतील तिला ती. काय काय खेळ नाही करत आपण तिच्या आयुष्याशी. तिच्या

खळाळणाऱ्या प्रवाहाला जागोजागी बांध घालून आपण तिला वेसण घालतो. तिच्या अंगोपांगाला इजा होईल अशा तऱ्हेने वागतो. तिच्या पाण्याचा व्यापार करतो. या पाण्याच्या वाटपावरून तंटेबखेडे लागले आहेत. तिच्यावर जागोजागी बंधारे घातल्याने ती हिरमुसली आहे. तिच्यातील वाळू उपसून गाभ्यालाच इजा झालीय. महापुरातही ती आपल्याकडून ती घेऊन जाते, त्याच्या दामदुपटीत जीवन पेरून जाते. आडदांड मुलाच्या कानफटात मारतानाही त्याला इजा होण्यापेक्षा तो सुधारावा ही जशी आईची भावना असते, अगदी तशीच भावना महापुरातल्या नदीची असते. तिला जीवन उद्ध्वस्त करायचे नसते तर पुनरुज्जीवन करायचे असते, पण जेव्हा जेव्हा तिच्यावरील अन्यायाचा अतिरेक होतो, तेव्हा सारी कायनात तिच्या बाजूने उभी राहते. आकाश धो-धो कोसळायला लागतं. ती बेलगाम होऊन वाहायला लागते. मग ना घर पाहते ना दार... ना वस्ती पाहते ना गाव...

**प्रवरेकाठी नांदलेल्या राजवटी :-**

प्रवरेच्या खोऱ्याचा अनेक महासत्ता व राजवटींशी संबंध आला, त्यात सातवाहनांच्या काळात पैठण, सिन्नर, अकोले, जुन्नर, नाणे घाट, कल्याण, सोपारा हा जगप्रसिद्ध व्यापारी मार्ग प्रवरेच्या खोऱ्यातून जात होता. पुढे अभीर, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव या घराण्यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध प्रवरा काठाच्या जनमानसाशी आला असावा. यादवांच्या कालखंडात संपन्नता होती, त्याचे द्योतक असणारी अनेक हेमाडपंथी मंदिरे प्रवराकाठी निर्माण झाली. उगमाच्या ठायी असलेल्या रतनवाडीच्या अमृतेश्वरापासून ते मुखाजवळील प्रवरा संगम येथील सिद्धेश्वर मंदिरापर्यंत अशी मंदिर शृंखला आजही टिकून आहे. मुस्लिम राजवटीमध्ये निजामशाहीचा प्रभाव पडला, मराठा मुघल कालखंडात प्रवरा खोऱ्यात अनेकदा सत्ता संघर्ष झाला. शहाजी महाराजांनी स्वत: वजीर होऊन पेमगिरी किल्ल्यावर मूर्तजाला केलेला अभिषेक असेल किंवा जालना लुटीनंतर शिवाजी महाराज प्रवरा काठाने संपत्ती घेऊन पट्टा किल्ल्यावर पोहोचल्याचा प्रसंग असो. अशा राजकीय घडामोडींचे हे खोरे केंद्र होते. उत्तर पेशवाईच्या काळातील त्र्यंबकजी डेंगळे यांचा ब्रिटिशांशी झालेला संघर्ष असो, की आदिवासींच्या बंडाचे नेतृत्व करणारे राघोजी भांगरे, भागोजी नाईक आदींनी केलेला संघर्ष समर हे सर्व प्रवरेच्या साक्षीनेच झाले असणार.

**प्रवरेचे जल व्यवस्थापन :–**

प्रवरा नदीच्या आधाराने उत्क्रांत झालेल्या मानवाने कृषी व पशुपालन ही जीवनशैली स्वीकारली. नदीकाठी वस्ती करून राहिलेल्या आद्य शेतकऱ्यांनी प्रथम पाळीव प्राण्यांच्या व नंतर पिकांच्या विविध जाती विकसित व संगोपित केल्या. बारमाही वाहणाऱ्या नद्यांचे पाणी विविध क्लृप्त्या वापरून शेतीसाठी उपयोगात आणले जाऊ लागले. नदीचा मुख्य प्रवाह अडवून तिच्या दोन्ही काठांनी पाट काढले व त्यावर बागायत फुलू लागले. ब्रिटिश पूर्वकाळात जलव्यवस्थापनाचे हे लोककेंद्री मॉडेल सर्वत्र विकसित झालेले होते. संगमनेर तालुक्यातील ओझर गावात प्रवरेला वळण बंधारा घालून पाटांची निर्मिती केली होती, याचे अवशेष आजही जगूबाईच्या डोहाजवळ आढळतात. विस्तीर्ण अशा बंधाऱ्याच्या बांधकामात हेमाडपंथी मंदिराचे खांब वापरलेले आहेत, हे विशेष. त्या जलव्यवस्थेतील अखेरचा दुवा असणारा जुना पाट आश्वी परिसरात आजही अस्तित्वात आहे. पुढे ब्रिटिश राजवटीत बागायती क्षेत्र वाढवण्याला प्राधान्य दिले, त्यासाठी वळण बंधारा तंत्र (डायवर्सिफाईड इरिगेशन टेक्निक) हे पारंपरिक प्रारूप त्यांनी वापरले. मँचेस्टरमधील गिरण्यांना लागणारा कापूस या परदेशात पिकवण्यावर भर दिला. त्यासाठी प्रवरेवर १८६७ साली लाख बंधारा बांधला व १८७३ मध्ये ओझर बंधारा निर्माण केला. प्रवरा डावा व उजवा तट कालवा यांची निर्मिती करून प्रवरा खोऱ्यात व्यापक पातळीवर जलव्यवस्थापन प्रक्रिया सुरू झाली. दुष्काळी भागातील शेती बागायती करण्याचे धोरण इंग्रज राज्यकर्त्यांनी स्वीकारल्यामुळे भंडारदरा नावाचे धरण नदीच्या उगमाजवळ १९२६ साली बांधून पूर्ण केले. पर्जन्यछायेच्या भागात पाट पाणी खेळू लागले. सुरुवातीला कापूस, मोसंबी, भुईमूग अशी पिके घेणारे शेतकरी ऊस पिकाकडे वळले. सासवड माळीनगर भागातील माळी लोकांनी श्रीरामपूर व कोपरगाव परिसरात येऊन बागायती ऊस शेती पद्धती विकसित केली. गूळ निर्मितीचा व्यवसाय भरभराटीला आला. काही खासगी साखर कारखाने उदयाला आले.

सर्वसमावेशक विकासासाठी क्रांतिकारक असा ‘सहकार कायदा’ याच काळात संमत झाला. डॉ. धनंजयराव गाडगीळ व पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटलांनी गाव पातळीवर विविध कार्यकारी सहकारी संस्थांची उभारणी केली व त्यातून पुढे शेतकऱ्यांच्या मालकीच्या प्रवरा सहकारी साखर कारखान्याची निर्मिती

झाली. सहकारी चळवळ ही ग्रामीण शेतकऱ्यांच्या अर्थकारणातील एक मैलाचा दगड ठरली. प्रवरेच्या शाश्वत जलस्त्रोतामुळे ऊस बागायत व दूध व्यवसाय हे शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे आधार बनले. दुष्काळी समजला जाणारा नगर जिल्हा साखर, दूध व फळ बागायतीचे हब बनला.

एकूणच पेहरेच्या खोऱ्यात धार्मिक, नैसर्गिक, सामाजिक, औद्योगिक विकासाला चालना मिळाली. विविध पर्यटन स्थळे, शेतीतील प्रयोग, सहकारी संस्थांचे जाळे, कर्तृत्ववान व्यक्ती अशी मांदियाळी निर्माण झाली.

**प्रवरेचा प्रवाह जपायलाच हवा :–**

'प्रवरा परिक्रमा' या प्रकल्पाचा उद्देशच हा आहे की, नदीचे पावित्र्य, परिसंस्था, तिच्या आधाराने निर्माण झालेली समाजव्यवस्था अबाधित राहावी. पेहरेची नदीमातृक संस्कृती टिकावी. त्यासाठी नदी पुनरुज्जीवन हे तातडीने हाती घेणे गरजेचे आहे. सरकार पाहून घेईल ते नदी आपोआप शुद्ध होते, अशा निष्क्रिय विचारधारेला बाजूला ठेवावे लागेल. या महत्कार्यामागील आव्हाने खूप मोठी आहेत. आपल्याकडील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जनजीवन, त्यांच्या धारणा खूप भिन्न आहेत. विविधतेत एकता असे आपण कितीही अभिमानाने सांगत असलो तरी नानाविध समाज घटकांच्या अस्मितांमुळे अनेकदा नकारात्मक वातावरण निर्माण होते. हे पण वास्तव स्वीकारावे लागेल.

नदीकाठी गावं, शहरं, उद्योग, कारखाने झपाट्याने वाढत आहे. नदी व इतर जलस्त्रोत यांना गटारगंगा करून मृत नदीत रूपांतर केले जात आहे. बेसुमार वाळू उपसा झाल्याने नदीचे पाणी झिरपून जमिनीतील जलसाठा सुरक्षित राहण्याची व्यवस्था नष्ट झाली आहे. वाळू माफिया निर्माण होत आहे. शहरीकरण, (मध्यम व उच्च मध्यमवर्गीय लोक गरजेपेक्षा अधिक बांधकामे करतात), रस्ते, महामार्ग, विमानतळ अशी अवाढव्य बांधकामे उभी करून नैसर्गिक साधनांचे नष्टचर्य सुरू आहे. मानवाने धारणाक्षम विकास घडवून आणण्यासाठी शाश्वत जीवनशैली स्वीकारणे गरजेचे आहे, या संकल्पनेची अनेकदा थट्टा होते. पण मानवी अस्तित्व टिकवायचे असेल तर लोक पुढाकारातून उपक्रम हाती घ्यावे लागतील. शासकीय धोरणे, कायदे, कार्यक्रम यांची जोड घ्यावी लागेल. संवर्धन कृती कार्यक्रम आखणी व परिणामकारक अंमलबजावणी कशी होईल, कोणते घटक सहभागी करून घेता येतील, असे सविस्तर नियोजन करावे लागेल. Pravara calling.

प्रवरेची हाक! असे उपक्रम हाती घ्यावे लागतील. नमामी गंगे, नमामी चंद्रभागे, Kaveri Calling अशा कामातील भलेबुरे अनुभव दिशादर्शक ठरतील. ठराविक कोसानंतर नदीचे पाणी शुद्ध होते. पण कधी, तर ती वाहती राहिली तर! तिचा मूळ प्रवाह शाबूत राहिला तर!

प्रवरेची पुनर्स्थापना हे कार्य वाटते तेवढे सोपे नाही, पण खोऱ्यातील मानवी अस्तित्व टिकवायचे असेल तर नदी व जलव्यवस्था जपलीच पाहिजे. आजघडीला या महान कार्याचा आपण विचार केला आहे, परिक्रमेच्या निमित्ताने चर्चा व लेखनातून त्याचा उच्चार करत आहोत, पण कृती करणे महत्त्वाचे आहे... वैयक्तिक व सामूहिक पातळीवर सर्व समावेशक कृती ही काळाची गरज आहे. परिक्रमा म्हणजे फक्त अध्यात्मिक, भावनिक वा धार्मिक अंगाने नाही, तर त्यातून नदीचे पावित्र्य व व्यवस्था जपणारा संवेदनशील, कृतिशील गाव समाज व नेतृत्व निर्माण करणे, हा ध्यास असावा लागणार आहे. पुढील पिढीने हे असिधारा व्रत अंगिकारावे लागेल, प्रवरेच्या पुनरुत्थानासाठी निर्धार करावा लागेल. तरच प्रवरेला आपण प्रवाहीत करू शकू. असे भव्य दिव्य स्वप्न पाहायला काय हरकत आहे?

**– विजय प्रल्हाद सांबरे**

अश्वीबुद्रुक, मो. ९४२१३२९९४४

●●●

# ३) प्राचीनतम संस्कृतीची साक्ष आणि स्वत्त्वाचा इतिहास

अमृतवाहिनी म्हणून ओळखली जाणारी प्रवरा नदी मानवी संस्कृतीच्या विकासाची साक्षीदार आहे. इतिहासातील अनेक महत्त्वाचे टप्पे या नदीनं पाहिले. मानवी वस्तीसाठी ही नदी अतिशय उपयुक्त ठरली आहे. आद्य पुराश्मयुग (Lower Paleolithic), मध्य पुराश्मयुग (Middle Paleolithic), उत्तर पुराश्मयुग (Upper Paleolithic), मध्याश्मयुग (Mesolithic) या सर्व कालखंडांतील अश्मयुगीन मानवी उत्क्रांतीचे टप्पे इथे होऊन गेले. त्यानंतर अवतरलेल्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या काळातील स्थळं इथं सापडली. महाराष्ट्रातील पहिली मानवी वसाहत प्रवरा नदीकाठी वसली आणि आजही महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा याच नदीकाठी प्रगतीची नवी शिखरं गाठत आहे.

पुराश्मयुगात साधारण तीन लाख वर्षांपूर्वी प्रवरेचा प्रवाह नेवाशाजवळ १० ते २० मीटर उंचीवरून वहात होता. तिचं पात्र उथळ व दगडगोट्यांनी भरलेलं होतं. पुढे एक ते दीड लाख वर्षांनंतर प्रवरा, कृष्णा, गोदावरी या नद्यांची पात्रं भूकंपीय हालचालींमुळे खोल होण्यास सुरुवात झाली. हल्लीच्या पातळीपेक्षा प्रवरेच्या प्रवाहाची पातळी १५ ते २० मीटर खाली होती. साधारण एक लाख वर्षांपूर्वी मध्यपुराश्मयुगाला प्रारंभ झाला. ते ३० हजार वर्षे टिकलं. या काळातील जीवाश्म या परिसरात मिळाले आहेत. सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी मध्याश्मयुगाची सुरुवात झाली. या काळातील लोक कंदमुळं, फळं, मासे व लहान प्राण्यांवर उपजीविका करत. पुढे मान्सूनचा पाऊस मोठ्या प्रमाणात होऊ लागल्यानं नदीचं पात्र खोलं होत गेलं. सुमारे सात हजार वर्षांपूर्वी प्रवरा सध्याच्या पातळीवर वाहू लागली.

अश्मयुगानंतर प्रवरेकाठी ताम्रपाषाणयुगीन संस्कृती नांदली. मानवानं शेती सुरू केली. तांब्याची आणि दगडांची हत्यारे तो वापरू लागला. इ.स. पूर्व १४०० च्या सुमारास प्रवरेकाठी जोर्वे संस्कृतीचा उगम झाला.

प्रवरा नदीकाठी जोर्वे (ता. संगमनेर), चिरकी नाला (नेवासे) व दायमाबाद (ता. श्रीरामपूर) येथे झालेल्या उत्खननात वेगवेगळ्या प्रागैतिहासिक कालखंडातील मानवी वसाहतींचे पुरावे सापडले. सिंधु खोऱ्यातील मोहंजोदडो आणि हडप्पा संस्कृतीशी मिळत्याजुळत्या अनेक गोष्टी दायमाबादमध्ये आढळल्या. नेवासे हे सर्वात मोठं नागरी केंद्र असल्यानं तिथं सलग वसाहतीचे पुरावे प्रारंभिक ऐतिहासिक काळातही मिळाले. दहाव्या शतकानंतर या भागात पुन्हा मोठ्या प्रमाणात वसाहती निर्माण झाल्या.

१९५० मध्ये पुण्यातील डेक्कन कॉलेजचे पुरातत्त्व शास्त्रज्ञ डॉ. हसमुख धिरजलाल सांकलिया आणि डॉ. शांताराम भालचंद्र देव यांच्या मार्गदर्शनाखाली जोर्वे गावातील पांढरीवर उत्खनन करण्यात आलं. काळाच्या उदरात गडप झालेल्या ताम्रपाषाण काळातील संस्कृतीचे अवशेष तिथं आढळले. जवळे कडलग येथील पांढरीवरही काही खापरं सापडली. नंतर इनामगाव (ता. शिरूर, जि. पुणे), दायमाबाद (ता. श्रीरामपूर), प्रकाशे (धुळे), बहाळ (जळगाव) आदी २०० ठिकाणं उजेडात आली. इसवी सन पूर्व १४०० ते १००० हा जोर्वे संस्कृतीचा कालखंड मानला जातो. पुढे मोठा दुष्काळ किंवा महापुरात ही संस्कृती नष्ट झाली असावी.

रानटी अवस्थेतून सुसंस्कृती अवस्थेकडे वाटचाल करणारा हा कालखंड होता. या उत्खननात शेतकऱ्यांची घरं, झोपड्या असलेल्या वसाहती सापडल्या. ही घरं आयताकृती, चौरसाकृती, क्वचित गोलाकार होती. घरांच्या बांधकामात तीन इंच व्यासाचे लाकडी वासे किंवा बांबू वापरले जात. भिंती माती किंवा कुडाच्या असत. छपरं सखल किंवा थोड्या उताराची असत. धान्य साठवण्यासाठी कणग्या वापरल्या जात. सर्वात मोठी कणगी चार फूट उंच व तीन फूट घेर असलेली आढळली. तिच्यावर नाजूक बोटांनी नक्षीकाम केलेलं आहे. बार्लीसारखे धान्य आणि दगडी जातीही घरात आढळली.

रेशीम व कापसाच्या धाग्यांपासून कपडे विणण्याची कला तेव्हाच्या माणसांना अवगत होती. उत्तम भाजलेली मातीची भांडी तेव्हाचे लोक वापरत असत. लाल

किंवा गेरू रंगाच्या या भांड्यावर काळ्या रंगाने भौमितिक नक्षी काढलेली आढळते. मोठे रांजण, हंडी, वाडगे तिथं सापडले. द्रव ठेवण्यासाठीच्या काही भांड्यांना तोटी असल्याचे आढळले.

आधी भटका असलेला हा समूह शेतीमुळे स्थिरावला. हे लोक नदीच्या पाण्याचा वापर करून शेती करत. गहू, जव, तांदूळ, वाटाणा, उडीद यासारखी पिकं ते घेत असावेत. पशुपालनही ते करत. शेती करण्याआधी उदरनिर्वाह प्रामुख्यानं शिकारीवर अवलंबून होता. वाघ, सिंहासारख्या हिंस्त्र प्राण्यांची ते शिकार करत. हरणं, मोर यांना संरक्षण देत. जनावरांची कातडी कमावण्याची कला त्यांना अवगत होती. दगड आणि हाडांपासून बनवलेली हत्यारं शिकारीसाठी वापरली जात. हत्यारं बनवण्यासाठी तांब्याच्या धातूचा वापर झाला, म्हणून ताम्रपाषाण युग असंही या काळाला संबोधलं जातं.

माणूस मेल्यानंतर त्याचं दफन केलं जात असे. त्यासाठी विशिष्ट पद्धत अवलंबली जात असे. लहान मुलांच्या अस्थी मातीच्या पात्रात पुरण्यात येत. भाजलेल्या मातीच्या दोन कुंभांत कलेवर ठेवलं जात असे. पाय दक्षिणेकडे केले जात. घरात किंवा अंगणात दफनविधी केला जाई. मृताजवळ भांडी, मणी, नेकलेस अशा काही वस्तू ठेवल्या जात असत. ही भांडी तांब्याची किंवा कार्नेलियनची असत. मृतात्मा त्रास देऊ नये, म्हणून त्याचे घोट्याखालील पाय कापले जात असावेत. नेवासे येथे एक शव पाच रांजणात पसरलेल्या अवस्थेत मिळालं.

१९५४-५६ दरम्यान डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे डॉ. सांकलिया यांनी नेवाशातील लाडमोड टेकडीवर उत्खनन केलं. सर्वात शेवटच्या थरात आद्य पुराश्मयुगीन कालखंडाचे अवशेष आढळले. डोलेराईट दगडापासून बनवलेली हत्यारं मोठ्या प्रमाणात सापडली. जनावरांचे अश्मीभूत अवशेषही मिळाले. तेथे मिळालेल्या हातकुऱ्हाडी, फरशी, छिलके, तासण्या व हातोडे ॲबीव्हीलियन व ॲश्युलियन तंत्रानं बनवलेल्या होत्या. मध्यपुराश्मयुगातीलही तासण्या, वेधणी, अणी, दातेदार हत्यारे, कोरणी, हातकुऱ्हाडी व तोड अशी हत्यारं सापडली.

जर्मन पुरातत्व शास्त्रज्ञ गुईन कॉर्विनस यांनी १९६३ मध्ये प्रवरा नदीकाठच्या उजव्या किनाऱ्यावरील चिरकी नाल्यावर उत्खनन करून आद्यपुराश्मयुगीन वसाहतीचा

शोध लावला. दोन हजारांपेक्षा जास्त हत्यारे तिथं सापडली. ही हत्यारं असिताष्म (बेसॉल्ट) दगडापासून बनवलेली होती.

ताम्रपाषाणयुगीन कालखंडात मानवाने महाराष्ट्रात वस्ती केल्याचे पुरावे प्रवरेच्या काठी असलेल्या नेवासे व दायमाबाद येथे मिळाल्याने महाराष्ट्रात ताम्रपाषाणयुग झालंच नाही, हा पूर्वीचा गैरसमज दूर झाला. सिंधु संस्कृतीची महत्त्वाची स्थळं पाकिस्तान आणि भारतातील राजस्थान, गुजरात व हरियाणा व्यतिरिक्त महाराष्ट्रातसुद्धा होती हे दायमाबाद येथे केलेल्या उत्खननावरून स्पष्ट झालं.

१९५८ मध्ये बी. पी. बोपर्डीकर यांनी बेलापूरजवळील दायमाबाद परिसरातील पुरातत्त्वीय स्थळाचा शोध लावला. १९५८-५९ मध्ये म. न. देशपांडे यांनी केलेल्या उत्खननात मृदभांडी, हत्यारे व अन्य अनेक गोष्टी सापडल्या. कुत्र्याचं डोकं आणि वशिंड बैल यांची भाजलेल्या मातीची शिल्पं मिळाली. विविध प्रकारचे मणीही सापडले. दायमाबाद येथे सापडलेल्या एका मोठ्या घड्यावर रानातला देखावा चितारण्यात आला आहे. वरच्या भागात एक मनुष्य उभा असून त्याच्या दिशेनं हरणांची जोडी जात आहे. मधल्या जागेत दोन मोर आहेत आणि खालच्या बाजूस उलट्या दिशेने तीन वाघ पळ काढत आहेत, असा देखावा रंगवलेला आहे.

१९७४ मध्ये पृष्ठभागावर ब्राँझच्या चार मूर्ती सापडल्या. दोन बैलांना जोडलेली गाडी व त्यामध्ये उभा असलेला माणूस, हत्ती, रेडा व गेंडा या मूर्ती चाकांवर बसवलेल्या अवस्थेत मिळाल्या. या मूर्ती सध्या दिल्लीतील नॅशनल म्युझियममध्ये ठेवण्यात आल्या आहेत. काहींच्या मते या मूर्ती सिंधु संस्कृतीशी निगडित आहेत. त्यानंतर एस. आर. राव यांनी १९७४-७५ मध्ये याच ठिकाणी दुसऱ्यांदा उत्खनन केलं. त्यात पिवळसर रंगाची चित्रीत भांडी सापडली. त्यावर काळ्या व करड्या रंगात विविध आकार चितारलेले दिसतात. राखी व लाल रंगाची मृदभांडीही सापडली. ग्रीस आणि रोम या देशांशी तेव्हा प्रवरा खोऱ्यातील गावांचा व्यापारी संबंध होता, याचे पुरावेही उत्खननात मिळाले.

सम्राट अशोकाच्या निधनानंतर पुढील पन्नास वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्रात सातवाहन घराण्याचा उदय झाला. सातवाहनांची नाणी नेवासे येथे सापडली आहेत. याचा अर्थ प्रवराकाठच्या प्रदेशावर त्यांचं राज्य होतं. नेवासे येथील

उत्खननात सातवाहनांचे आरंभीचे दोन राजे म्हणजे सिरी सातकर्णी व सातवाहन यांची नाणी एक स्तरात, तर नंतरच्या सातवाहन राजांची नाणी पुढच्या स्तरात सापडली.

सातवाहन-पश्चिमी क्षत्रप यांच्यानंतर इ. स. ४०० पासून इ.स. ५५० पर्यंत प्रवरा खोऱ्यात पूर्व राष्ट्रकूट घराण्याचं राज्य असावं. इ.स. ५५० ते ६७० दरम्यान कर्नाटकातील बदामीच्या चालुक्य घराण्याचा अंमल या भागावर होता. सातव्या शतकाच्या पूर्वार्धात वातापीच्या (बदामी) दुसऱ्या पुलकेशी राजानं हा प्रदेश जिंकून घेतला. आठव्या शतकाच्या मध्यास राष्ट्रकूट राजवंशाकडे सत्ता आली. राष्ट्रकुटांनंतर या प्रदेशावर कल्याणीच्या चालुक्यांनी आपला अंमल बसवला. हरिश्चंद्रगडावरील आठ लेणी व हरिश्चंद्र मंदिराची निर्मिती पश्चिमी चालुक्याच्या काळात (इ. स. ९७३-११९०) झाली असल्याचे डॉ. बर्गेस यांचं म्हणणं आहे.

बाराव्या शतकाच्या अखेरीस चालुक्यांची सत्ता क्षीण होऊन प्रवरा खोरं पंचम भिल्लम यादवांच्या राज्यात आलं. यादव काळात नेवासे हे निवास (प्राचीन निधिनिवास) म्हणून ओळखलं जात असे. नेवाशात लिहिल्या गेलेल्या ज्ञानेश्वरी ग्रंथात रामचंद्र यादवांचा यादवकुलभूषण असून न्यायप्रिय व कलांचा आश्रयदाता असा उल्लेख आहे.

यादव घराण्याचा अंत झाल्यानंतर इ.स. १३१८ मध्ये प्रवरा खोऱ्यावर दिल्लीच्या सुलतानांची सत्ता आली. पुढे सुमारे १५० वर्षे इथं बहामनी राजवट होती. इ.स. १४९० च्या सुमारास बहमनी राज्याच्या विघटनाला प्रारंभ झाला. अहमदनगरच्या निजामशाहीची सत्ता १४९० ते १६३६ पर्यंत टिकली. इ.स. १६२२ मध्ये मोगल बादशहा जहांगीर याचा मुलगा शहाजहान यानं बंड पुकारलं. मदत मागण्यासाठी तो दखखनमध्ये आला. निजामशाहचा वजीर मलिक अंबर यानं शहाजहान, त्याची पत्नी व चार मुलांची राहण्याची व्यवस्था संगमनेर येथील प्रवरा नदीकाठच्या गढीत केली होती. जहांगीराला हे समजताच त्यानं चौदा वर्षांचा दाराशुकोह व आठ वर्षांच्या औरंगजेबाला ओलिस ठेवण्याचे आदेश दिले. ही घटना २ मार्च १६२६ रोजी घडली.

मलिक अंबरच्या काळातच शहाजीराजांच्या कर्तृत्वाला बहर आला, पण १६२४ मध्ये झालेल्या भातोडीच्या लढाईनंतर मतभेद होऊन शहाजीराजांनी निजामशाही सोडली. दोन हजारांची फौज घेऊन शहाजीराजे मोगलांच्या सेवेत

रूजू झाले. त्यांना पाच हजारांची मनसब देण्यात आली. खानजहान लोदीच्या मदतीनं त्यांनी सहा महिन्यांतच जुन्नर, संगमनेरपासून नगर, दौलताबादपर्यंतचा परिसर जिंकून घेतला. संगमनेरची जहागिरी शहाजीराजांकडे आली. पुढे शहाजीराजे पुन्हा निजामशाहीत परतले. त्यांनी नाशिक, त्रिंबक, जुन्नर व संगमनेरवर वर्चस्व मिळवले. शहाजीराजांचे वास्तव्य अनेक दिवस नेवाशातील वाड्यात असे. १६३३ पर्यंत आदिलशाहीतील अनेक सरदार शहाजीराजांना येऊन मिळाले. निजामशहाचा वारस असलेला मुर्तजा नावाच्या मुलाला संगमनेरजवळील पेमगिरी किल्ल्यावर राज्याभिषेक करून शहाजीराजांनी सगळी सूत्रं आपल्या हाती घेतली.

निजामशाही संपवण्यासाठी सन १६३६ मध्ये शहाजहान दक्षिणेत आला. नाशिक, त्रिंबक, जुन्नर व संगमनेर ताब्यात घेण्याचा आदेश त्याने आपल्या सरदारांना दिले. शाहिस्तेखान आठ हजारांची फौज घेऊन ८ मार्च १६३६ रोजी संगमनेरला आला. याचदरम्यान शहाजीराजांनी बारा हजारांची फौज घेऊन जुन्नर व संगमनेरमधील मोगलांच्या प्रदेशावर हल्ले केले. हे लक्षात येताच शाहिस्तेखानाने शहाजीराजांचा पाठलाग केला. दरम्यान, विजापूरच्या सैन्याने पराभव स्वीकारल्यामुळे शहाजीराजे एकटे पडले. मोगलांनी जुन्नर, संगमनेर ताब्यात घेतलं. निजामशाही संपुष्टात आल्यानंतर शहाजीराजांनी आदिलशाहीची चाकरी पत्करली.

शहाजीराजांचे स्वराज्याचे स्वप्न त्यांचे पुत्र शिवरायांनी साकारले. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७९ मध्ये जालन्यावर केलेल्या स्वारीच्या वेळी परत येताना महाराजांची प्रवरा खोऱ्यातील पट्टा किल्ल्यावर विश्रांती घेतली, म्हणून हा किल्ला 'विश्रामगड' म्हणूनही ओळखला जातो.

छत्रपती संभाजी महाराजांच्या निर्घृण हत्येनंतर त्यांची पत्नी येसूबाई, लहान मुलगा शाहू यांना औरंगजेबाने आपल्या छावणीत आणून ठेवलं. याचदरम्यान शाहूचा विवाह लावून जहागिरी म्हणून त्यास नेवासे परिसर दिला.

पेशवाईत कायगाव टोके, प्रवरासंगम, तसेच संगमनेरचं महत्त्व वाढलं. टोके येथे गोदावरी व प्रवरेकाठी घाट बांधलेले आहेत. घाटाच्या बाजूस दगडी बांधकाम असलेल्या ओवऱ्या आहेत. साडेतीन शहाण्यांपैकी अर्धे शहाणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाना फडणवीसांनी बांधलेला वाडाही इथे होता. जायकवाडी धरणाच्या बांधकामाच्या वेळी टोके बुडीत क्षेत्रात गेल्यानं तेथील ग्रामस्थांचं स्थलांतर करण्यात आलं. त्यामुळे आता केवळ सिद्धेश्वराचं मंदिर आणि परिसरात काही

घरांची दगडी जोती तेवढी उरली आहेत.

महादजी शिंदे यांची जहागिरी पारनेर, श्रीगोंद्यात होती. संगमनेर तालुक्यातील अंभोरे येथील म्हस्के-देशमुखांची मुलगी भवानीबाई हिच्याशी महादजी शिंदे यांचा विवाह १७७७ मध्ये झाला. ग्वाल्हेरएवजी संगमनेरात राहणे भवानीबाईंनी पसंत केले. त्यांच्यासाठी मोठा वाडा महादजींनी बांधून दिला. हा वाडा आजही पहायला मिळतो. भवानीबाईंनी बांधलेले मंदिर प्रवरेकाठी आहे. संगमनेरमधील पेटिट विद्यालयाच्या परिसरात पूर्वी पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी एक विठ्ठल सुंदर परशरामी यांचा वाडा होता. अकोले तालुक्यातील कोतूळ हे त्यांचे मूळ गाव. १७६३ मध्ये झालेल्या राक्षसभुवनच्या लढाईत ते मारले गेले.

पेशवाईला घरघर लागली असताना १७९८ मध्ये आदिवासींना एकत्र करून वालजी भांगरे याने अधिकार मिळवण्यासाठी पेशव्यांविरोधात बंड उभारलं, पण हिराजी वांबळे यांनं ते मोडून काढलं.

पेशवाईच्या अखेरच्या पर्वात इंग्रजांना विरोध करणारे त्रिंबकजी डेंगळे हे प्रवरा खोऱ्यातील निमगाव जाळीचे रहिवासी. सन १८१६ मध्ये इंग्रजांनी त्यांना कैद करून ठाण्याच्या तुरुंगात ठेवलं. मात्र, तेथून निसटून प्रवरेकाठच्या जंगलात फिरत त्रिंबकजींनी इंग्रजांना जेरीस आणलं. जून १८१८ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आहिरवाडी येथे आपल्या सासूरवाडीला त्रिंबकजी आले असता तेथील पाटलाने इंग्रजांना खबर दिली. कॅप्टन स्वॅनस्टनच्या नेतृत्वाखालील तुकडीनं गावाला वेढा देऊन त्रिंबकजींना पकडलं. ठाणे आणि नंतर चुनारच्या तुरुंगात त्यांना ठेवण्यात आलं. १८२९ मध्ये कारागृहातच त्यांचा अंत झाला.

पेशवाईत अनेक गडकोट, चौक्यांवर भूमिपुत्र आदिवासींची नियुक्ती केली होती. ब्रिटिशांनी नवीन व्यवस्था करताना त्यांना दूर केले. काही कोळी नाईकांच्या वतनदाऱ्या बंद केल्या. त्यात जमादार रामजी भांगरे याचा समावेश होता. रतनगडाचे किल्लेदार गोविंद खाडे यांच्या प्रोत्साहनाने त्याने बंड पुकारले. इंग्रजांचा ताबेदार म्हणून राहण्यास गोविंद खाडे यांनी नकार दिल्याने त्यांचे वतन काढून घेण्यात आले होते. त्यांनी १८२८ मध्ये इंग्रजांविरोधात हालचाली सुरू केल्या होत्या. किल्ला परत मिळवण्यासाठी आणि शिबंदीतून कमी केलेल्या लोकांची व्यवस्था करण्याकरिता लुटालूट करण्यास त्यांनी संमती दिली. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कॅप्टन मॅकिन्टॉशची नियुक्ती करण्यात आली. त्याला प्रत्युत्तर देण्याकरिता तीन

गावे बंडखोर कोळ्यांनी लुटली. इंग्रज सैनिकांनी त्यांचे रस्ते रोखल्याने अन्नपाणी मिळेनासे झाले. शेवटी रामजीसह ८० जण पकडले गेले. त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आले. त्यांना जन्मठेप आणि काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली.

ही बातमी कळताच रामजींचा साथीदार कोळ्यांचा प्रमुख रामा किरवा आपल्या दोनशे जणांच्या टोळीसह ओतूर भागात निसटून गेला. सह्याद्रीच्या घाटात त्याने सावकारांची लुटालूट सुरू केली. त्याला पकडण्यासाठी सतराव्या नेटिव इन्फंट्रीचा कॅप्टन लुकीन, अकराव्या पलटणीचा लेफ्टनंट लॉईस व तेराव्या पलटणीचा लेफ्टनंट फोर्बस यांच्या नेतृत्वाखाली पलटणी पाठवण्यात आल्या. बंडखोरांना पकडून अहमदनगर, ठाणे व पुण्यातील तुरुंगात ठेवण्यात आले. रामा किरवा याला १८३० मध्ये अहमदनगरच्या किल्ल्यात उघड्यावर फाशी देण्यात आलं. तथापि, त्यानंतरही क्रांतीचा वणवा शमला नाही. राघोजी भांगरे यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडलं. महादेव कोळी, भिल्ल, ठाकर, कातकरी अशा सगळ्यांनी त्यांना साथ दिली. मात्र, देवजी, भाऊजी हे सहकारी कामी आल्याने राघोजीची टोळी विखुरली गेली. पंढरपूरच्या वाळवंटात गोसाव्याच्या वेशातील राघोजींना पकडण्यात लेफ्टनंट गेल याला यश आलं. राजद्रोहाचा खटला चालवून २ मे १८४८ रोजी राघोजी यांना ठाण्यातील तुरुंगात फाशी दिलं गेलं.

भागोजी नाईक आधी पोलिस खात्यात होते. क्रांतिकारकांना मदत केल्याबद्दल त्यांना तुरुंगात डांबण्यात आलं. सुटका झाल्यानंतर त्यांनी उठावात झोकून दिलं. साथीदारांची जमवाजमव करून त्यांना लढाईचे शिक्षण भागोजी देऊ लागले. हे कळताच जेम्स विल्यम्स हेन्री हा अधिकारी पोलिसांची तुकडी घेऊन भागोजींना पकडण्यासाठी आला. ४ ऑक्टोबर १८५७ रोजी नांदूरजवळच्या डोंगरात भागोजी आणि या तुकडीची चकमक उडाली. यात हेन्री ठार झाला. १८ ऑक्टोबर १८५७ रोजी समशेरपूर येथे पुन्हा चकमक उडाली. त्यात कर्नल मॅकन, लेफ्टनंट ग्रॅहम, मेजर चॅपमन हे अधिकारी जखमी झाले. जुलै १८५९ मध्ये भागोजी व हारजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली भिल्ल आणि कॅप्टन नटालच्या अधिपत्याखालील कोळ्यांच्या फौजेत संगमनेरच्या आग्नेयेस आठ मैलांवर दरा येथे चकमक झाली. त्यात भिल्लांचा पराभव झाला. हारजी नाईक याला तुरुंगात डांबण्यात आले, पण

भागोजीने लुटालूट सुरूच ठेवली. पुढे ११ नोव्हेंबर १८५९ रोजी भागोजी व त्याचे साथीदार सिन्नर तालुक्यातील मीठसागरे येथे असताना फितुरीतून त्यांचा घात झाला. मेजर फ्रँक सूटरच्या पलटणीने केलेल्या हल्ल्यात भागोजी आणि त्याचे साथीदार मारले गेले.

१९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात प्रवरा परिसरातील नेत्यांचा मोठा सहभाग होता. अण्णासाहेब शिंदे, भास्करराव दुर्वे, भाऊसाहेब थोरात, पी. जी. भांगरे, पी. बी. कडू, धर्मा पोखरकर, नारायण अहिरे, रामभाऊ नागरे अशा अनेकांचे योगदान महत्त्वपूर्ण होते.

प्रवरेची परिक्रमा करताना अगदी रतनगडापासून प्रवरासंगमपर्यंत इतिहासाच्या पाऊलखुणा पहायला मिळतात. इथला प्रत्येक दगड हा इतिहास तुम्हाला सांगण्यासाठी उत्सुक आहे. तो वाट पाहतोय तुमच्या आगमनाची....

## यादवांच्या काळातील गडकोट

प्रवराकाठच्या भूप्रदेशावर आंध्रभृत्य, चालुक्य, देवगिरीचे यादव, बहमनी, निजामशाही यांचा अंमल होता. नंद आणि मौर्य घराण्याच्या खाणाखुणा फारशा आढळत नसल्या, तरी सम्राट अशोकानंतर उदयाला आलेल्या सातवाहनांच्या काळातील अनेक महत्त्वाची ठिकाणे या परिसरात आढळतात. दुसरा भिल्लम (इ. स. ९२५-९५०) याच्या काळातील ताम्रपटात प्रवरा व आढळा खोऱ्यातील गावांचा उल्लेख आहे. सिंदीनगर (सिन्नर), अर्जुनोण्ढिका (राजापूर), संगमनगर (संगमनेर), चिखलीग्राम (चिखली), जम्बलेनिग्राम (जवळे कडलग), वव्वूलवेंद्र (वेल्हाळे), मातुलिंगी (म्हाळुंगी) अशी ग्रामनामे तेव्हा होती. सातवाहनांच्या गाथासत्तसईत प्रवरा खोऱ्याचे जनजीवन आणि समाज व्यवस्थेचं वर्णन आलं आहे. यादवांच्या काळात गडकोट उभारले गेले. हरिश्चंद्रगड, रतनगड, अलंग, कुलंग, मदन, पट्टा किल्ला हे त्यापैकी होत. पाण्याची सोय करण्यासाठी गडावर टाके खोदण्यात आली. इंग्रजांनी १८२० मध्ये रतनगड जिंकला, पण गोविंदराव खाडे या किल्लेदारानं पुन्हा त्याचा ताबा मिळवला. इंग्रजांनी अनेक गडांवरील पायऱ्या आणि तटबंदी तोफांचा मारा करून उद्ध्वस्त केल्याचे आढळते.

## आद्य पुराश्मयुगीन संस्कृती

प्रवरा खोऱ्यातील चिरकीनाल (नेवासे) येथे आढळलेली आद्य पुराश्मयुगीन संस्कृती ही ॲश्युलियन परंपरेतील आहे. हे स्थान चिरकी येथे प्रवरासंगमजवळ प्रवरेकाठी आहे. नदीपात्रापासून तीन ते वीस मीटर उंचीवर दगडी गोटे व वाळूच्या थरात त्या काळातील फरश्या, हातकुऱ्हाडी, तासण्या, चाकू यासारखी हत्यारं मोठ्या प्रमाणात सापडली. अश्मयुगीन वसाहतीचे येथील क्षेत्र ५०० ते ६०० चौरस मीटर असावे. हत्ती, घोडा, बैल, हरीण यांचे जीवाश्मही तेथे सापडले. वस्तीला कुंपण म्हणून मोठ्या दगडी शिळा अर्धवर्तुळाकार रचलेल्या आढळल्या. हा काळ एक ते दीड लाख वर्षांपूर्वीचा असावा.

## ऐतिहासिक समशेरपूर

बाजीराव पेशवे व मस्तानीचा मुलगा समशेरबहाद्दरला अकोले तालुक्यातील समशेरपूरची जहागिरी मिळाली होती, असे स्थानिक मंडळी सांगतात. नाशिकचे कलेक्टर जॅक्सन वधातील एक सूत्रधार वीर वामनराव जोशी हे समशेरपूरचे रहिवासी. त्यांना २५ वर्षे जन्मठेपेची शिक्षा झाली. १९३० मध्ये झालेल्या जंगल सत्याग्रहात अच्युतराव पटवर्धन आणि अन्य नेत्यांचं वास्तव्य सावरगाव, समशेरपूर परिसरात होतं. शिवकाळातील शेकोजी थोरात यांना त्यांनी गाजवलेल्या पराक्रमाबद्दल वीरगावची जहागिरी मिळाली. अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डाचे २७ वर्षे अध्यक्षपद भूषवलेले सरदार शिवराव भवानराव थोरात वीरगावचेच रहिवासी. दुसऱ्या महायुद्धातील पराक्रमाबद्दल ज्यांना ब्रिटिश सरकारचा व्हिक्टोरिया क्रॉस मिळाला, त्या नामदेवराव जाधवांचे अखेरची काही वर्षे वास्तव्य याच परिसरातील वीरगावात होतं. बापू गोखले यांच्या सुनेचे सतीचे स्मारक ब्राह्मणवाडा येथे आहे.

## मौखिक परंपरेतील इतिहास

भारतीय कालगणना विचारात घेता अमृतवाहिनी प्रवरेच्या दोन्ही तीरांवर, तसेच गोदावरी आणि कृष्णा खोऱ्यात सत्य/ कृतयुग, त्रेतायुगात आणि द्वापारयुगात घडलेल्या घटना आणि प्रसंगावर आधारित असंख्य कथा मौखिक परंपरेने अगदी पत्यामुद्यासह मोठ्या प्रमाणावर सापडतात. त्यांशी धर्मजीवनश्रद्धा घट्टपणे जोडलेल्या

अनुभवता येतात. रामायण, महाभारतातील आणि पुराणात या मौखिक परंपरांना भक्कम आधार आहे हे विशेष. कलियुगातील प्रारंभीच्या अडीच हजार वर्षांतील घटनांशी त्यांचा अनुबंध जोडलेला दिसतो. मध्ययुगीन साहित्याच्या आधारे हे उजेडात आले आहे. ज्ञानेश्वरीपासून ते अगदी अलीकडे प्रसिद्ध झालेल्या प्रवरा नदीच्या गॅझेटमध्ये आणि शोध पांडुरंगाचा पुस्तकांत या इतिहासाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला गेला. आधुनिक काळातील इतिहास व पुरातत्वीय संशोधन पद्धतीने केलेल्या संशोधनात आढळून आलेल्या अवशेषांचे अवलोकन करून सांस्कृतिक इतिहास लेखन करण्याचा प्रयत्न अपुराच ठरतो.

**– भूषण देशमुख**

अहमदनगर, मो. ९८८१३३७७७५

●●●

# ४) साखर उद्योगाने घडविली अर्थक्रांती

'क्रियेविन वाचाळता व्यर्थ आहे' ही उक्तीच अहमदनगर जिल्ह्यातील पाण्यात मुरलेली असावी. या जिल्ह्यातील लोक लढाऊ, क्रांतीकारक, जगण्याची तीव्र इच्छा. या लोकांना वर्तमानाचे पूर्ण भान. किंबहुना काळाचं पुढचं या लोकांना दिसतं. दुष्काळ यांच्या पाचवीला पुजलेला, पण कितीही संकटं आली तरी न डगमगता भविष्यावर आपला ठसा उमटविण्याची या लोकात जिद्द. सहकारी संस्थांचे जाळे त्यांनी या जिल्ह्यात निर्माण केले. त्या ताकदीवर राज्यात आपली राजकीय ताकद उभी केली. राज्यात कुठलीही योजना आली की, आपल्या जिल्ह्यात आली पाहिजे, असा यांचा खाक्या. रस्त्याच्या शासनव्यवस्थेवर यांचा दबाव असायचा. जिल्ह्याचा पूर्वीचा लाल रंग मागे पडला. मध्यंतरी तिरंगा अग्रेसर झाला. याच रंगाने जिल्ह्यात क्रांती घडविली. आता भगव्याकडे वाटचाल. काळाची पावलं ओळखणारी ही माणसं. एकेकाळी राज्यातील पक्षांचे प्रदेशाध्यक्ष याच जिल्ह्याने दिले. मंत्रीपदही भरभरून मिळायची. दिग्गज मंडळींनी या जिल्ह्यास आकार, रंगरूप दिले. मोठं आर्थिक परिवर्तन परिश्रमातून, कष्टातून घडविले. आता काळ बदलला आहे. कोण कुठं दिसेल, हे सांगणं अवघड झालं आहे.

जिल्हा तसा वैशिष्ट्यपूर्ण. भौगोलिक वा प्राकृतिकदृष्ट्या जिल्ह्याचे दोन भाग पडतात. उत्तर आणि दक्षिण. उत्तरेत अकोलेसारख्या तालुक्यात जोरदार वृष्टी होते तर दक्षिणेत कर्जत-जामखेडसारख्या पर्जन्यछायेखालील तालुक्यात पावसाची अवकृपाच. प्रवरा, मुळेच्या पाण्याने उत्तर भाग समृद्ध. कमी पावसाने दक्षिण कोरडाच. असे चित्र असले तरी उत्तरेत बारा, तर दक्षिणेत अकरा साखर कारखाने आहेत. उत्तरेत सहकारी तत्त्वावर भर. दक्षिणेत खासगी प्रमाण जास्त. सहकारातून साखर कारखानदारी आल्याने जिल्ह्यात आर्थिक परिवर्तन घडले. 'सहकारातून

ग्रामोद्धार' ही या जिल्ह्याची ख्याती.

जिल्हा महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला. विस्ताराच्या वा क्षेत्रफळाच्या दृष्टीने राज्यात प्रथम क्रमांकाचा. जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७ हजार ०४८ चौरस किलोमीटर. राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.५४ टक्के. शेतीलायक लागवडीयोग्य क्षेत्र १४ लाख ७९ हजार ४९७ हेक्टर. ५५ टक्के भाग गोदावरी खोऱ्यात येतो. उर्वरित ४५ टक्के भाग कृष्णा खोऱ्यात येतो. बव्हंशी तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात. त्याचे एकूण क्षेत्रफळ १४ हजार ३२३.३९ चौरस किलोमीटर असून ते जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ८४.०१ टक्के आहे. गोदावरी, भीमा प्रमुख नद्या. प्रवरा, मुळा, आढळा, म्हाळुंगी, ढोरा, घोड, सीना या उपनद्या. जिल्ह्यात ८० ते ८२ टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून मिळतो. पश्चिम घाटातील डोंगरमाथ्यावर यापेक्षा अधिक पाऊस. बहुतांशी जिल्ह्याला सातत्याने दुष्काळाला सामोरे जावे लागते. पाऊस सरासरी पाचशे ते पाच हजार मिलीमीटरपर्यंत पडतो.

भंडारदरा, निळवंडे, मुळा हे मोठे प्रकल्प. वांबोरी चारी, मुळा भागडा चारी, घोड, कुकडी डावा कालवा, पिंपळगाव जोगा कालवा, आढळा, मांडओहोळ, घाटशिळ पारगाव, सीना, विसापूर, भोसाखिंड (कुकडी-सीना जोडकालवा) आणि भोजापूर, ताजनापूर, साईगंगा या उपसा सिंचन योजना या प्रकल्पांचे पाणी जिल्ह्यात खेळते. पुणे जिल्ह्यातील घोड, कुकडी व नाशिक जिल्ह्यातील गोदावरी, दारणाचे पाणी जिल्ह्याच्या वाट्यास काही प्रमाणात मिळते. मोठे, मध्यम, लघु प्रकल्प, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, शेततळी, उपसासिंचन अशा एकूण १४३ पाणी योजना. हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यावर अंतिम सिंचन क्षमता ५ लाख ६४ हजार हेक्टरवर जाईल. जिल्ह्यात एकूण १ हजार ६०३ गावे. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ४५ लाख ४३ हजार १५९ आहे. गेल्या दहा वर्षात ती आणखी वाढली असेल.

केवळ धरणांच्या पाण्यावर विसंबून न राहाता शेतीच्या पाण्याच्या विविध योजना जिल्ह्याने राबविल्या. 'पाणी आडवा, पाणी जिरवा' हा माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचा कार्यक्रम जिल्ह्याने खऱ्या अर्थाने राबविला. शेततळी, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, पाझर तलाव साखर कारखान्यांनी आपल्या निधीतून व सरकारच्या मदतीने पूर्ण केले. शेतीला पाणी कसे मिळेल या ध्यासाने येथील राजकारण्यांनी जीवापाड प्रयत्न केले. वृक्षतोडीवर कुऱ्हाडबंदी, मोकाट गुरांना

चराईबंदी, श्रमदान या त्रिसूत्रीने खेड्यात पाणी कसे आणता येते, याचा आदर्श काहींनी घालून दिला. त्यात संगमनेर तालुक्यातील फादर बाखर यांचा मेंढवण प्रकल्प, पारनेर तालुक्यातील राळेगण सिद्धी येथील अण्णा हजारे यांचा प्रयोग, नगर तालुक्यातील हिवरेबाजार येथील पोपट पवार यांच्या पाणी उपलब्ध करण्याच्या योजना आदर्शवतच आहेत. यातून राज्यात आदर्श गावाची संकल्पना आली असावी. गावात पाणी आले म्हणजे गाव समृद्ध होईल, यादृष्टीने भारावलेली मंडळी पाण्यासाठी विविध प्रयत्न करीत असतात. लढे उभारत असतात.

मध्यंतरी राज्यातील पाणीवाटपाचा क्रम बदलण्याचे घाटत होते. पिण्याचे पाणी, औद्योगिक वापराचे पाणी व शेवटी शेतीला पाणी, असा क्रम ठरविण्याचे चालले होते. त्यास बाळासाहेब विखे यांनी विरोध केला. शेतीला त्यांनी अग्रस्थानी आणले. शेतीच्या पाण्यासाठी स्वतःच्या पक्षाच्या सरकारशी लढा देण्यास ते कचरले नाहीत. मुळा धरणाचे पाणी बारमाहीऐवजी आठमाही करावे, असा फतवा तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी काढला होता. त्याचेही समर्थन विखे यांनी केले होते. अन्य राजकारण्यांनी त्यास विरोध केला. पाथर्डीसारख्या दुष्काळी तालुक्यास वांबोरी चारीचे पाणी मिळावे, या प्रश्नावरही बरीच आंदोलने झाली. विखेही यावर आग्रही होते. शंकरराव चव्हाण यांनी हा प्रश्न सोडवला. माजी खासदार बाळासाहेब विखे यांनी 'महाराष्ट्र पाणी परिषदे'ची स्थापना केली. राज्याच्या पाण्याचाही विचार केला. राज्यातील नद्यांचे पाणी कसे अडवता येईल, याबाबतच्या विविध योजना त्यांनी राज्य सरकारला सुचविल्या, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे कसे वळवता येईल, याचे उपाय सुचविले. गोदावरी व तापी या तुटीच्या खोऱ्यात पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे वळविण्याचा पर्याय अंमलात आला तर त्याचा फायदा नगर जिल्ह्यालाही निश्चितच होईल.

उपलब्ध पाण्याचा पुरेपूर उपयोग, वापर या लोकांनी केला आहे. पाण्यासाठी या जिल्ह्यातील भांडणे नवीन नाहीत. अमृतवाहिनी प्रवरेच्या पाण्याने जिल्ह्यात प्रथम समृद्धता आणली, हे खरे! पण उत्तरेतील तालुक्यात प्रवरेच्या पाण्याचा वाद किती पेटला होता, हे सर्वश्रुत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या मध्यस्थीने या वादावर तोडगा काढण्यात आला. त्यानुसार श्रीरामपूर तालुक्याला ५२ टक्के, अकोले, संगमनेरला ३० टक्के, राहुरीला १५ टक्के व नेवाशाला तीन टक्के, असे भंडारदऱ्याचे पाणीवाटप शेवटी सर्वानुमते मान्य करण्यात आले. तेव्हा राहाता

तालुका अस्तित्वात नव्हता. लोणी प्रवरा परिसर श्रीरामपूर तालुक्यातच होता. राहात्याचा काही भाग कोपरगावात, तर काही भाग श्रीरामपुरात होता. प्रवरेच्या पाण्याचा वाद जिल्ह्यांतर्गत असल्याने तो मिटला खरा, पण नगर, नाशिकच्या पाण्याचा वाद तसाच आहे. शंकरराव कोल्हे व शंकरराव काळे यांनी या प्रश्नावर बरीच आंदोलने केली. त्यांच्या मते नाशिकमधील नवनवीन उद्योगांमुळे कोपरगावच्या पूर्वीच्या ब्लॉकचे पाणी नाशिककरांनी पळविले. पूर्वीचे बांधून दिलेले पाणी आम्हाला परत मिळावे, असा त्यांचा आग्रह होता. नाशिकमध्ये नंतर नवीन धरणे बांधण्यात आली. गंगापूर, वैजापूर तालुक्यासाठी असलेल्या गोदावरीच्या एक्स्प्रेस कॅनालचे पाणी कोपरगावकरांना मिळावे अशीही त्यांची मागणी होती. पश्चिमेकडील पाणी पूर्वेकडे वळवावे, अशीही या नेत्यांची मागणी होती. याशिवाय समन्यायी पाणीवाटपाचा कायदा अस्तित्वात आल्यावर नाशिक, नगरचे औरंगाबादशी भांडण सुरू झाले आहे. या प्रश्नावर नगरच्या राजकारण्यांनी जोरदार आंदोलनेही केली, पण सरकारने जुमानले नाही. उपलब्ध पाणी जिल्ह्याबाहेर कसे जाणार नाही, नवीन पाणी कसे आणता येईल. याबाबत येथील राज्यकर्ते जागृत आहेत. आहे त्या पाण्यात काटकसरीने कसा वापर करता येईल, या विचाराप्रतही आता राजकारणी येत आहेत. बऱ्याच तालुक्यात पाणी आले असले तरी नगरसारखा दुष्काळी तालुका उपेक्षितच आहे. त्याच्या साकळाईसारख्या योजनेकडे सरकार अद्याप लक्ष देत नाही.

पाटपाण्याच्या व अन्य योजनांमुळे जिल्ह्यातील साखर कारखानदारीने आर्थिक क्रांतीच घडविली आहे. दुष्काळी भागात वा पर्जन्यछायेखालील या जिल्ह्यात पाणी योजना आल्या तेव्हा येथील शेती फुलली. उसासारखे नगदी पीक शेतकऱ्यांच्या हाती आले नि क्रांतीच झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी १९२६ मध्ये अकोले तालुक्यात प्रवरा नदीवर भंडारदरा (विल्सन डॅम) धरण बांधले. प्रारंभी पाण्याची चव लोकांना कळली नाही. बाहेरची मंडळी जिल्ह्यात आली. त्यांनी श्रीरामपूर, कोपरगाव पट्ट्यात खासगी साखर कारखानदारी सुरू केली. पण १९५० मध्ये डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता व पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकाराची मुहूर्तमेढ रोवली. लोणीप्रवरेला सहकारात पहिला सहकारी साखर कारखाना मोठ्या कष्टातून सुरू केला. आशिया खंडातील हा पहिलाच सहकारी साखर कारखाना, यामुळे पुढे जिल्ह्याचे आर्थिक चित्रच

बदलले. ‘सहकाराचे मॉडेल’ कसे असावे, याचा आदर्शच या कारखान्याने राज्याला दिला. यानंतर जिल्ह्यात सहकारी साखर कारखानदारी फोफावली. गेल्या सत्तर वर्षात जिल्ह्याची आर्थिक स्थिती कमालीची सुधारली. जनतेच्या सहभागातून ही कारखानदारी वाढल्याने नंतर खासगी साखर कारखान्यांनी गाशा गुंडाळला. मात्र अलीकडे हे चित्र पुन्हा बदलते काय, असे वाटते आहे.

जिल्ह्यात आजमितीस सहकारी व खासगी क्षेत्रात तेवीस साखर कारखाने आहेत. त्यात चौदा सहकारी व नऊ खासगी आहेत. गेल्या २०१९-२०२० च्या हंगामात दहा सहकारी व चार खासगी असे चौदा साखर कारखाने चालू होते. कारखान्यांची गाळपक्षमता दोन हजारापासून बारा हजार टनापर्यंत आहे. म्हणजे एक लाखावर टन ऊस हे कारखाने गाळतात. तेवढीच, त्यापेक्षा जास्त साखर निर्मिती होते. साखर उतारा दहा टक्क्याच्या जवळपास आहे. साखर कारखानदारीत जिल्हा राज्यात पहिल्या पाचमध्ये आहे. ऊस गाळप व साखर उत्पादनात तिसऱ्या क्रमांकावर आहे. साखर कारखानदारीमुळे त्या त्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील पन्नाससाठ गावातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेला मोठा फायदा झाला आहे.

जिल्ह्यातील अर्थकारणाचा विचार केला तर शहरी वा नागरी भागात फारसे औद्योगिकीकरण झालेले नाही. ग्रामीण अर्थकारणावरच जिल्ह्याचे वैभव आहे. नागरी अर्थकारणही ग्रामीण अर्थकारणाशी निगडित आहे. ग्रामीण अर्थकारणात साखर कारखानदारी आघाडीवर आहे. स्वातंत्र्यानंतर जिल्ह्याचे अर्थकारण ग्रामीण विकासाभोवतीच फिरते आहे. साखर कारखान्यांची वार्षिक उलाढाल पन्नाससाठ हजार कोटीच्या आसपास असावी. वेगवेगळ्या करांच्या रूपाने राज्य व केंद्र सरकारच्या तिजोरीत साखर कारखाने भरच घालतात.

सहकार चळवळ व त्या माध्यमातून आलेल्या साखर कारखानदारीने ग्रामीण विकासाला चालनाच मिळाली. ‘सहकारातून समृद्धीकडे’ या संकल्पनेतून ग्रामीण व दुर्बल घटक व तळागाळातील माणसाच्या आर्थिक विकासाच्या आंचेतून ही चळवळ जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात रुजली, फोफावली. भांडवलशाही व साम्यवाद यामध्ये सहकार हा सुवर्णमध्य आहे. त्यात दोष, उणिवा असल्या तरी विकासाला दिशा मिळाली. जनतेचे, दुर्बल घटकाचे कल्याण नक्कीच या चळवळीतून झाले, हे नाकारून चालणार नाही. केवळ साखर निर्मितीवरच कारखाने थांबले आहेत, असे नाही. यातून पूरक उद्योगाकडे वळले आहेत. आसवनी प्रकल्प,

सहवीजनिर्मिती, इथेनॉल व अन्य पूरक पदार्थाच्या निर्मितीकडे काही कारखान्यांनी वाटचाल सुरू केली आहे. कारखान्यांनी कार्यक्षेत्रात पाणीयोजनांबरोबर अंतर्गत रस्त्यांची बांधणीही केली. शिक्षणाचे जाळेही निर्माण केले. साखर कारखान्यांबरोबर दूधसंस्था, वित्तपुरवठा करणाऱ्या बँका, पतसंस्था, सूतगिरण्या जिल्ह्यात सुरू झाल्या.

प्रवरा परिसरात पद्मश्री विखे व बाळासाहेब विखे यांनी कारखान्याच्या माध्यमातून शिक्षणाची कवाडे उघडली. त्यांच्या प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत केजीपासून पीजीपर्यंतचे शिक्षण मिळते. तांत्रिक, वैद्यकीय व अन्य व्यावसायिक शिक्षणाच्या सुविधाही त्यांनी निर्माण केल्या आहेत. त्यात सुमारे पन्नास हजार विद्यार्थी शिक्षण घेत असावेत. शंकरराव कोल्हे यांनी आपल्या संजीवनी उद्योगसमूहाच्यावतीने कोपरगाव परिसरात, भाऊसाहेब थोरात व बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर परिसरात अमृतवाहिनी उद्योग समूहाच्यावतीने शिक्षणाची मोठ्या प्रमाणात सोय उपलब्ध केली आहे. तेथेही हजारो मुले विविध प्रकारचे शिक्षण घेत आहेत. शंकरराव काळे यांनी स्वतःच्या शिक्षण संस्था न काढता रयत शिक्षण संस्थेला वाहून घेतले. रयतच्या माध्यमातून आईच्या स्मरणार्थ नगरला काळे यांनी राधाबाई काळे महिला महाविद्यालय सुरू केले आहे. मुलींच्या शिक्षणाची मोठी सोय त्यांनी केली. यशवंतराव गडाख यांच्या मुळा एज्युकेशन संस्थेने सोनई-नेवासा परिसरात शिक्षणाच्या विविध शाखा सुरू केल्या आहेत. अन्य कारखान्यांनीही आपापल्या कार्यक्षेत्रात शिक्षण संस्था उभारण्यात मोलाचे योगदान दिले आहे. शिक्षणाच्या या सोयीमुळे जिल्ह्यातील विद्यार्थी पुण्यामुंबईकडे न जाता जिल्ह्यातच शिक्षण घेत आहे. विशेषतः शिक्षणाचा खर्च न परवडणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची मुले शिकून उच्चविद्याविभूषित होऊ लागली आहेत. कारखान्यांनी केवळ पदव्युत्तर शिक्षणच नव्हे तर तांत्रिक, वैद्यकीय, व्यावसायिक शिक्षण उपलब्ध केल्याने त्यातून बरेचसे डॉक्टर्स, इंजिनिअर्स शिकून बाहेर पडले आहेत. ते स्वतःच्या पायावर उभे राहून अर्थार्जन करू लागले आहेत. कारखान्याच्या परिसरात छोट्यामोठ्या व्यावसायिकांना रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या आहेत. कारखान्यातील कामगार व त्या परिसरातील व्यावसायिकांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली. एका कारखान्याच्या कार्यक्षेत्रात २५ ते ३० हजार लोकांना रोजगार उपलब्ध झाला असावा. ऊस

तोडणी कामगारांनाही कारखान्यामुळे हंगामी का होईना रोजगार मिळाला आहे. कारखान्यांच्या या विकास कामाच्या माध्यमातून जिल्ह्यात आर्थिक क्रांतीच झाली आहे. लोकांच्या हातात पैसा खुळखुळू लागला आहे. पूर्वी पायी, बैलगाडी, सायकलीने फिरणारा मोटीराने हिंडताना माणूस आज मोटारसायकलीने, मोटारीने हिंडताना तो दिसतो. साखरेच्या अर्थकारणामुळे झालेली ही अर्थक्रांतीच नव्हे काय?

इतकेच नव्हे तर साखरेला जोड म्हणून दूध धंदाही जिल्ह्यात विकसित झाला आहे. गावागावात दूध संघ, दूध संस्था निर्माण झाल्या. राज्यात रोज ४० ते ५० लाख लिटर्स दूध उत्पादन होत असेल तर त्यापैकी सुमारे १४ लाख लिटर दूध नगर जिल्ह्यात उत्पादित होते. ही धवलक्रांतीच म्हणावी लागेल. यामुळे शेतकऱ्यांच्या हातात मोठ्या प्रमाणात पैसा उपलब्ध झाला आहे. विदर्भ-मराठवाड्यात जे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण आहे, तसे या जिल्ह्यात नाही.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांना दिलासा तर दिलाच, पण प्रत्येक खेड्यात विविध कार्यकारी सेवासंस्था सुरू झाल्या. त्या संस्थांनी शेतकऱ्यांना पत निर्माण करून दिली. हंगामात बी-बियाणे, खते, औजारे आदिवासी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिल्याने सावकार पाशातून त्यांची सुटका झाली. जिल्ह्यात जवळपास तेवीस नागरी सहकारी बँकाही आहेत. पतसंस्थांचे जाळेही जिल्ह्यात निर्माण झाले आहे. या संस्थात लोकांच्या कोट्यवधी रुपयांच्या ठेवी जमा आहेत. सहकारामुळे नगरची बाजारपेठ बहरली आहे. नगरची कापडबाजारपेठ तर राज्यात प्रसिद्ध आहे. येथील हॉटेल व्यवसाय व अन्य छोट्यामोठ्या व्यवसायांनाही उत्तेजन मिळाले आहे. सहकारी वा साखर कारखानदारीमुळे जिल्ह्यातील जनतेला विकासाची फळे चाखायला मिळतात ही वस्तुस्थिती आहे.

सहकार वा साखर कारखानदारीमुळे जिल्ह्याचे चित्र व आर्थिक परिस्थिती बदलली आहे. नसता येथील लोकांनाही ऊसतोडीसारख्या कामावर सधन जिल्ह्यात जावे लागले असते. विकासाच्या प्रश्नावर मातब्बर राजकारणी एकत्र असायची. कुठलीही नवी योजना, प्रकल्प, प्रयोग आपल्या जिल्ह्यात कसा आणता येईल, याची दूरदृष्टी त्यांच्यात होती. गटतट असतातच. पण सर्व पक्षाचे नेते विकासाच्या प्रश्नावर एकत्र येऊन सत्तेशी दोन हात करायला सिद्ध असत. पुढच्या पिढीत जिल्ह्याचा हा स्थायीभाव कमी होतांना दिसत आहे.

साखर कारखानदारीपुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ही कारखानदारी संकटात आल्याचे दिसते. या उद्योगापुढे चार प्रकारची आव्हाने आहेत. एकतर कारखान्यांनी उसाचे उत्पादन, उत्पादकता व उतारा वाढविणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे कारखान्याचे आर्थिक व्यवस्थापन उत्तम रीतीने करणे. तिसरे साखरेची विक्री तथा मार्केटिंग कौशल्याने हाताळणे. साखर कारखाने १८० दिवस चालविण्यासाठी ऊस उत्पादन वाढवण्यावर भर द्यावाच लागेल. आज एकरी २५ ते ४५ टनाच्या आसपास ऊस उत्पादन असावे. उताराही दहाच्या जवळपास आहे. तो वाढविण्याचा प्रयत्न करावा लागेल. निर्यातीवर सबसिडी असली तरी साखरेचा उत्पादन खर्च टनामागे कमी कसा करता येईल, यावर भर देणे गरजेचे आहे. गैरव्यवस्थापनामुळे काही कारखान्यात बाधा पोहोचत असेल तर त्यासही आळा घालावा लागेल. साखर कारखानदारी नफ्यात चालवायची तर कारखानदारांना ही पथ्ये पाळावीच लागतील.

राज्यात साखर कारखान्यांपुढे आणखी एक प्रश्न उद्भवला आहे. उसाच्या भावासाठी वा दरासाठी मध्यंतरी ऊस उत्पादकांनी आंदोलने छेडली. काही कारखान्यांनी तसा भावही दिला. आता हे प्रकरण कारखान्यांच्या अंगलट येऊ पाहाते आहे. सरकारने निर्धारित केलेल्या उसाच्या रास्त व किफायतशीर दरापेक्षा (एफआरपी) शेतकऱ्यांना अधिकचा दर हा कारखान्यांना झालेल्या नफ्यातून देण्यात आला, असा दावा प्राप्तीकर विभागाने केला. प्राप्तीकर विभागाने सात हजार सहाशे कोटी रुपयांच्या वसुलीच्या नोटिसाही कारखान्यांना पाठविल्या आहेत. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयानेही प्राप्तीकर विभागाच्या बाजूने निकाल दिला आहे. सहकाराला प्राप्तीकर लागू होत नाही. शेतकऱ्यांच्या पैशाला प्राप्तीकर कसा लागतो, अशी भूमिका साखर कारखान्यांनी घेतली. या विभागाच्या नोटिसींना सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्यायालयाने प्राप्तीकर विभागाची बाजू उचलून धरली आहे. एफआरपी कायद्यानुसार उसाची रक्कम चौदा दिवसाच्या आत शेतकऱ्यांना देणे बंधनकारक आहे. मात्र उत्पादन खर्च जास्त असल्याने कारखाने एफआरपी देण्यास असमर्थ असल्याचे दिसून येते. आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे दरही पडलेले व सरकारचे आयातनिर्यात धोरणही साखर कारखान्यांना अडचणीचे ठरले आहे. जिल्ह्यातील काही कारखान्यांना हा प्रश्न भेडसावणार आहे.

साखर उद्योगातील लाखो ऊसउत्पादक, कामगार व या क्षेत्रातील राजकारणी

यामुळे या उद्योगाला सरकारकडून कायम मदत करण्यात येते. साखर उद्योगातील राजकारण्यांना सांभाळण्यासाठी अशी मदत अपरिहार्यही असेल. पण हा उद्योग सरकारच्या मदतीवर किती काळ अवलंबून राहणार, हा प्रश्न आहे. कारखान्यांनी स्वावलंबी होण्यासाठी आपले स्वभांडवल उभारणे गरजेचे आहे. काटकसर करून अवांतर वायफळ खर्च त्यांनी टाळायला हवा. बँकाकडून आर्थिक पुरवठा होत नसल्याने कारखान्यांना देणी देता येत नाहीत. त्यामुळे प्रत्येक गाळप हंगामात शेतकऱ्यांना थकबाकीला तोंड द्यावे लागते. याबाबत सरकारने हस्तक्षेप करण्याची साखर कारखान्यांची मागणी आहे. उत्पादन खर्च व विक्रीकर यातली तफावत सरकारने भरून काढावी तरच साखर उद्योगाला तग धरण्यास मदत होईल, अशी त्यांची अपेक्षा आहे.

तोट्यातील साखर कारखाने वर काढायचे असतील तर ब्राझीलचा प्रयोग येथे राबवायला हवा. साखर उत्पादनाकडे कमी लक्ष देऊन इथेनॉल उत्पादनावर भर देण्यावर कारखान्यांनी जोर देणे काळानुरुप होईल. हाच तो प्रयोग. ब्राझील साखर उत्पादनात जगात प्रथम क्रमांकावर आहे. त्यानंतर भारताचा क्रम लागेल. राज्य व त्यातही नगर जिल्हाही साखर उत्पादनात आघाडीवर आहे. जिल्ह्यातील साखर कारखान्यांनीही इथेनॉल निर्मितीवर भर दिला आहे. सहवीज निर्मितीकडेही साखर कारखाने वळले आहेत. निर्माण झालेल्या इथेनॉल व विजेला उठाव मिळावा, चांगले दर मिळावेत, अशी कारखान्यांची अपेक्षा आहे. साखर उद्योग ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. एक आदर्श व मोलाचे साधन आहे. त्यालाही उतरती कळा लागली आहे, अशी शंका येते. यात सहकारातील धुरीणच सहकारी साखर कारखाने अडचणीत आले वा आणले तर त्याचे खासगीकरण करतात. त्यांचे सगेसोयरेच ते विकत घेतात. सहकाराचे खासगीकरण होताच डबघाईला आलेले कारखाने त्याच मंडळीचे नियंत्रण असूनही व्यवस्थित चालायला लागतात. हा चमत्कार राज्यानेच नव्हे तर या जिल्ह्यानेही पाहिला आहे.

साखर कारखाने सद्यःस्थितीत अडचणीत असले तरी यातून ते अनुशासनाने बाहेर पडू शकतात. साखर कारखानदारी टिकवावीच लागेल. तिला घरघर लागली तर सामान्य माणसाचे जीवन पूर्ववत उजाड होईल. स्वतःचा फायदा न पाहाता पुन्हा पूर्वी सारखी विकासाची दूरदृष्टी राजकारण्यांनी अंगी बाळगली तर पूर्वीचे दिवस यायला हरकत नाही. केशवसुतांच्या काव्यपंक्तीप्रमाणे 'आम्हाला वगळा,

गतप्रभ होतील क्षणी तारांगण' ही वृत्ती राजकारण्यांनी पुन्हा दाखवली तर हा उद्योग अडचणीतून बाहेर पडू शकेल. अर्थकारणाला गती द्यायची तर ग्रामीण विकासाचा हा कणा मोडून चालणार नाही. साखर कारखानदारीने जिल्ह्यात केलेली आर्थिक क्रांतीची घोडदौड अशीच पुढे चालू राहिली तर येथील लोकांचा आर्थिक स्तर आणखी उंचावल्याशिवाय राहणार नाही.

**– महादेव कुलकर्णी**

**अहमदनगर, मो. ९४२०३४३८१२**

●●●

# ५) भंडारदरा, निळवंडे आणि अन्य पाटबंधारे – या अमृतकुंभांनी ऐश्वर्य लाभले

**– रामनाथ आरोटे**

भंडारदरा धरण अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुका हा आदिवासी तालुका म्हणून सर्वांनाच परिचित आहे. या जिल्ह्याची पश्चिम सीमा ठाणे, दक्षिण सीमा पुणे, उत्तर सीमा नाशिक या जिल्ह्यांना जोडून आहे. या तिन्ही सीमांचा संगम अकोले तालुक्याच्या पश्चिम हद्दीलगत आहे. पुणे–नाशिक महामार्गावरील संगमनेरहून ६५ किलोमीटर अंतरावर व मुंबई–आग्रा महामार्गावरून घोटी गावावरून ३५ किलोमीटर अंतरावर असलेला भंडारदरा परिसर सर्वांनाच हवाहवासा वाटतो.

या परिसरास वर्षभर सर्व ऋतुत व विशेष करून पावसाळ्यात पर्यटकांची झुंबड उडते. सह्याद्रीच्या पर्वत रांगा, कळसूबाई शिखर, कोकण कडा, सांदन दरी, घाटघर उदंचन प्रकल्प, रतनगड, रंधा धबधबा, भंडारदरा धरण (विल्सन डॅम), अमृतेश्वर मंदिर, भंडारदरा धरणाचे पायथ्याशी १२ मेगावॅट क्षमतेचे विद्युत गृह क्र. १ व रंभा फॉल जवळील कोदणी गावाजवळ उभारलेले ३४ मेगावॅट क्षमतेचे विद्युत गृह क्र. २ आदी ठिकाणे पर्यटकांची आकर्षण केंद्रे आहेत.

पूर्वीपासून या परिसरात पावसाचे प्रमाण अत्युत्तम असल्याने नगर जिल्ह्यातील भंडारदरा चेरापुंजी म्हणून प्रसिद्ध आहे. शहरांतील गर्दीत श्वास कोंडलेल्या वातावरणातून बाहेर मोकळ्या हवेचा व निसर्गाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी पर्यटकांना भंडारदरा आकर्षित करतो. मुंबई, नाशिक व महाराष्ट्रातील हौशी पर्यटक प्रतिवर्षी तीर्थाटन करावे असे या भागाला भेट देतात. स्वातंत्र्यपूर्व काळातही भारतीयांसारखेच किंबहुना त्याहूनही अधिक ब्रिटिशांनादेखील या परिसराने आकर्षित केले. डोंगराळ

भाग, रस्त्यांची अडचण, नैसर्गिक अडथळे, गैरसोयी पार करून ब्रिटिशांनी या भागाचा वेध घेतला. स्वातंत्र्यानंतरही पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय योग्य, निसर्गरम्य ठिकाणे असूनही आजपर्यंत या परिसराचा पाहिजे तेवढा विकास होऊ शकला नाही हे पर्यटकांच्या दृष्टीने दुर्दैवच म्हणावे लागेल.

**भंडारदरा परिसरात भेट देण्यायोग्य ठिकाणे :–**

**१. भंडारदरा धरण :–**

**अ) इतिहास :–** अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळी भागाला वरदान ठरलेले भंडारदरा धरण प्रवरा नदीवर बांधण्यात आले असून भंडारदरा व शेंडी या गावांच्या दरम्यान आहे. प्रवरा नदीचा उगम पश्चिम घाटांतील रतनगडावर होतो. प्रथम सन १८९३ मध्ये प्रवरा नदीवर ओझर येथे, १८६९ मध्ये लाख येथे उन्नेयी बंधारा (Pickupweir) बांधून आजुबाजूचे क्षेत्र ओलिताखाली आणण्यात आले होते. ओझर येथील बंधाऱ्यामुळे प्रवरा डावा व उजव्या कालव्याची तर लाख बंधाऱ्यावर फक्त डाव्या कालव्याची निर्मिती करण्यात आली होती. रब्बी व उन्हाळा हंगामात प्रवरा नदीत पुरेसे पाणी उपलब्ध होऊ शकत नसल्याने आवश्यक तेवढे क्षेत्र सिंचनाखाली येत नव्हते.

सिंचनासाठीच्या पाण्याची आवश्यकता ध्यानी घेऊन सन १८७८ मध्ये प्रवरा नदीवर म्हाळादेवी येथे धरण बांधण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले. १८८२ मध्ये या मातीच्या धरणास केंद्र शासनाने मान्यताही दिली होती. तथापि मातीची धरणे सुरक्षित होत नाहीत हे एकरुख, वाघाड व अस्थी या म्हाळादेवी धरणापेक्षा कमी उंचीचे धरणांचे अनुभवावरून लक्षात आल्यानंतर प्रवरेच्या मुखाजवळ साम्रद येथे सन १८८९ मध्ये दगडी धरण बांधण्याचे प्रस्तावित झाले होते. जलग्रहण क्षेत्र व पाणीसाठ्याचे कमतरतेमुळे १८९५ मध्ये पुन्हा म्हाळादेवी मातीधरणाचे काम सुरू करण्याचे ठरले. परंतु कमकुवत पायामुळे हे काम थांबविण्यात आले. यानंतर रंधा येथे व दुसरी ईश्वरदा (भंडारदरा) येथे धरणासाठी पर्यायी जागांचे सर्वेक्षण झाले. ईश्वरदा हे नाव फारसे परिचित नसल्याने जवळच्या खेड्याचे भंडारदरा हे नाव निश्चित करण्यात आले.

भंडारदरा धरणाच्या जागेचा शोध सन १९०३ मध्ये ऑर्थर हिल यांनी कार्यकारी अभियंता या पदावर काम करत असतांना लावला व पुढील सर्वेक्षण श्री. सी. बी. पुली, सहाय्यक अभियंता यांनी एच.ओ.बी शौब्रीज कार्यकारी

अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली केले. भंडारदरा धरणाचे बांधकाम सन १९१० मध्ये सुरू होऊन सन १९२६ मध्ये पूर्ण झाले. १० डिसेंबर १९२६ रोजी धरणाचा उद्‌घाटन समारंभ त्यावेळचे मुंबई राज्याचे राज्यपाल सर लेस्ली ओर्मी विल्सन यांचे हस्ते झाला. भंडारदरा जलाशयास मुख्य अभियंता व मुंबई राज्याचे सचिव श्री. आर्थर हिल यांचे नाव त्यांनी पाटबंधारे खात्यात दिलेल्या विशेष योगदानाबद्दल देण्यात आले व भिंतीला सर विल्सन यांचे नाव देण्यात आले म्हणून भंडारदरा धरण 'विल्सन डॅम' म्हणून प्रसिद्ध आहे.

**ब) भंडारदरा धरणाचे संकल्पचित्र :–** भंडारदरा धरणाचे ग्रॅव्हीटी डॅम म्हणून संकल्पचित्र बनविण्यात आले. सहा हजार फूट त्रिज्या असलेल्या वर्तुळाकार कमानीच्या आकाराची दगडी भिंत बांधताना वाळू व चुना यांचे मिश्रण वापरण्यात आले. दर्शनी बांधकामासाठी लागणारा दगड २ किलोमीटर अंतराहून आणण्यात आला. इतर कामासाठी लागणारा दगडही परिसरातच उपलब्ध झाला. धरणस्थळाचे आजुबाजूला वाळू उपलब्ध नसल्याने पर्याय म्हणून दगडाचा चरा कृत्रिम वाळू वापरण्यात आली. बांधकामासाठी लागणारा चुना लासलगावहून मध्य रेल्वेने घोटीपर्यंत व तेथून रस्त्याने वाहनांनी आणण्यात आला. तसेच १६ ते २० मैल अंतरावर प्रवरा खोऱ्यातही उपलब्ध करण्यात आला. वाळू व चुन्याचे मिश्रण कार्यक्षेत्रावर तयार करण्यात आले. धरण बांधकामात दर्शनी बाजूने बांधलेल्या कमानी, स्तंभ, भिंतीला दिलेला वर्तुळाकार अचूक आकार ब्रिटिशांची कामातील निष्ठा, शिस्त, अचूकपणा, गुणवत्ता, कारागिरी व कुठल्याही परिस्थितींना तोंड देत काम करण्याची धडाडी या अनमोल गुणांची साक्ष देतात.

भंडारदरा हे दगडी धरण बांधले त्यावेळी भारतातील सर्वात उंच दगडी धरण होते. आज धरणाला बांधून जवळजवळ ९५ वर्ष होत असूनही धरणाचे बांधकामातून होणाऱ्या पाणी गळतीचे प्रमाण इतर धरणाच्या तुलनेने अत्यल्प आहे, परंतु आता धरणाचे बांधकामात कमकुवतपणा आल्याचे अभ्यासाअंती निदर्शनास आल्याने मजबुतीकरण करणे आवश्यक आहे. याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. भंडारदरा व परिसराचे निसर्ग सौंदर्याची दखल घेऊन पूर्वी चित्रपट निर्मात्यांनी अनेक चित्रपटांचे चित्रीकरणात अंब्रेला फॉल, रंधा फॉल, भिंतीवरील वर्ग –१ चे विश्रामगृह यांना स्थान दिलेले आहे. अनेक नामवंत व्यक्तींनी व कलावंतांनी या परिसरास भेट दिली आहे.

**क) भंडारदरा धरणाचे बांधकाम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे :**

**(अ) अभियंते –** १. एच.ओ.बी. शौब्रीज (सन–१९१० ते १९१२), २. एन. बी. बॅक्स्टर (सन–१९१३ ते १९१४ व १९२३ ते १९२५) ३. एस. सी. मोल्ड (सन–१९१४ ते १९१९ व सन १९२० ते १९२३). ४. टी. ए. ॲन्ड्र्यू (सन–१९२०) ५. डब्ल्यू. एच. ई. गरोड (सन–१९२३)

**(ब) मदतनीस –** १. जे.एम.मॅकी (सन–१९१०), २. एफ. जे. व्होन बाँक (सन–१९१२ ते १९१५) ३. विस (सन–१९१५ व सन १९१९ ते १९२०), ४. एच. सी. क्रॉसल (सन– १९१५–१९१६), ५. ए. एस. मॅन्गर (सन–१९१६ ते १९१९), ६, एच. एल. फ्रान्सीस (सन–१९१९ ते १९२३), ७. एम. टी. गिब्लींग (सन १९२२ ते १९२५), ८. रावबहादूर व्ही. के. चाफेकर (सन–१९१० ते १९२५), ९. खान साहेब एम. अझीझ अहमद (सन–१९१० ते १९२५).

**(क) कर्मचारी –** १. आर. डी. कान्हेरे (सन–१९१५), २. ओ. जे. फर्नांडीस (सन–१९१६ ते १९१), ३. अेन. डब्ल्यू. गोघरी (सन–१९१९ ते १९२५), ४. सुंदरसिंग गोपालसिंग (सन–१९१९ ते १९२३).

**ड) धरणाची ठळक वैशिष्ट्ये :–**

१. प्रकल्पाचे नाव - भंडारदरा धरण (विल्सन डॅम), २. ठिकाण - मौजे भंडारदरा, तालुका - अकोले जिल्हा - अहमदनगर, ३. नदीचे नाव - गोदावरी खोऱ्यातील प्रवरा नदी ४. जलग्रहण क्षेत्र - ४७ चौ.मैल / १२२ चौ. कि.मी., ५, वार्षिक पर्जन्यमान - अ) घाटावर - ५४६० मी.मी., ब) धरणावर- ३२२५ मी.मी. ६. वापरण्यायोग्य पाणीसाठा - ११०३९ दलघफू / ३१२.६० दलघमी क्षमता. ७. मृतसाठा- ३०० दलघफू/८.५० दलघमी. ८. बुडीत क्षेत्र - १५५५ हेक्टर, ९. धरणाचा प्रकार - दगडी धरण. १०. धरणाची लांबी - ५०७ मीटर. ११. धरणाची उंची - ८२.३२ मीटर, १२. धरणाच्या माथ्याची पातळी - ७४६.२३ मीटर, १३. पूर्ण संचय पाणी पातळी - ७४४.७२५ मीटर, १४, धरणाच्या माथ्यावर रुंदी - ७.०० मीटर, १५. धरणाच्या तळाची रुंदी - ७१.२८ मीटर, १६. धरणाच्या सांडव्याची पूर वहन क्षमता - १५०० घमी.प्र.सें (दरवाजांद्वारे), २५५० घमी.प्र.सें (उघड्या सांडव्यावरून), १७. धरणाच्या बांधकामाचा खर्च (धरण व इतर कामे) - १७५.९५ लक्ष.

**इ) धरणातील पाणी सोडण्याची यंत्रणा :–**

धरणातील पाणी सोडण्यासाठी तीन फूट व्यासाचे दोन लोखंडी पाईप वेगवेगळ्या उंचीवर (नदीपात्रापासून ५० फूट, १०० फूट, १५० फूट, २०० फूट) भिंतीला आरपार टाकलेले असून वरील बाजूस आपत्कालीन दरवाजे व खालील बाजूस आवश्यकतेनुसार स्लुईस व नीडल या व्हॉल्व्ह पाण्याचा दाब रोखण्यासाठी व पाणी मोजून सोडण्यासाठी बसविण्यात आले आहेत. डाव्या बाजूने २०० फुटावरील व्हॉल्व्हद्वारे सोडलेले पाणी वेगाने वाहून छत्रीच्या आकाराचे उघड्या खडकावरून पायथ्याशी येते. पांढरे शुभ्र पाणी खळखळ वाहत बारीक तुषार हवेत उडवित खाली येताना छत्रीचा आकार तयार करते त्यामुळे या धबधब्याचे नाव 'अंब्रेला फॉल' म्हणून नाव प्रसिद्ध झाले असून, हा फॉल पर्यटकांना खूपच प्रिय झाला आहे. धबधब्याचे पायथ्याशी उभे राहून अंगावर तुषार घेत ओलेचिंब होण्याचा मोह पर्यटकांना अनावर होतो. आता विद्युत गृह क्र. १ ची विद्युतनिर्मिती व व्हॉल्व्हचा बिघाड या कारणांमुळे हे दृश्य पाहावयास मिळणे दुर्लभ झाले आहे. उजव्या बाजूनेही ५० फूट, १०० फूट व १५० फुटावरील व्हॉल्व्हद्वारे पाणी खडकांवरून खळखळ वाहन नदीपात्रात येते व एक सुंदर धबधबा तयार होतो. दुपारनंतरच्या काळात या धबधब्यामुळे पूर्वकडे नदीत इंद्रधनुष्य तयार होते.

**ई) भिंतीजवळील गार्डन :–**

पूर्वी भिंतीखालील गार्डन खूपच सुंदर होती. त्यातील कारंजे, फुलझाडे, स्वीमिंग पूल, झाडांना बांधलेले ओटे इ. खूपच सुंदर होते. आता मात्र या गार्डनची दुर्दशा झाली आहे. निधीअभावी बरीच वर्षे परिरक्षण व दुरुस्ती न झाल्याने पूर्वीचे सौंदर्य आज राहिलेले नाही.

**उ) लाभक्षेत्र :–**

धरणाच्या निर्मितीनंतर फक्त श्रीरामपूर, राहाता, राहुरी व नेवासा या तालुक्यांना लाभ होत होता. मात्र ज्या तालुक्यांत धरण, धरणग्रस्त आहेत अशा अकोले तालुक्यांत या पाण्याचा लाभ होत नव्हता. तसेच संगमनेर तालुकाही वंचित होता. या तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी समाजसेवकांनी याविषयी संघर्ष करून सन १९९२ चे दरम्यान पाण्याची तालुकानिहाय फेरवाटप केले. आता भंडारदरा धरणाचा लाभ अहमदनगर जिल्ह्यातील अकोले (११.७० टक्के), संगमनेर (१८.३० टक्के), श्रीरामपूर व राहाता (५२.०० टक्के), नेवासा (३.०० टक्के), व राहुरी (१५

टक्के) या सहा तालुक्यांना होतो. या तालुक्यांतील ऊस शेतीवर साखर कारखानदारी उभी आहे व परिसरातील सर्व प्रकारे विकासास हातभार लागला आहे. शेतीबरोबरच औद्योगिक व पिण्याच्या पाण्यासाठी या धरणाचे पाण्याचा वापर होत आहे. भंडारदरा ते ओझरपर्यंत (जवळपास ८५ किलोमीटर) पाणी उपसा सिंचनाद्वारे व पुढे प्रवरा डावा कालवा (७६.८० मिलीमीटर) व उजवा काललां (५२.८० किलोमीटर) याद्वारे शेतीला पाणी दिले जाते. प्रकल्पीय सिंचन क्षेत्र २३ हजार ०७७ हेक्टर आहे आता ते क्षेत्र वाढले आहे.

**ऊ) पूरनियंत्रण :–**

प्रतिवर्षी ऑगस्ट महिन्यात सर्वसाधारणपणे धरण भरते असा अनुभव आहे. पूर्ण संचय पातळीपर्यंत धरण भरल्यानंतर पुराचे पाणी बाहेर सोडण्यासाठी धरणाचे उजव्या बाजूला टेकडीजवळ दोन रेडीयल आकाराचे दरवाजे बसविण्यात आलेले असून एका दरवाजाचा ४१ फूट x २६ फूट असा आकार आहे, याद्वारे १५०० घनमीटर / सेकंद व जवळच्या उघड्या भिंतीवरून दोन हजार ५५० घनमीटर प्रती सेकंद इतका विसर्ग बाहेर पडू शकतो भिंतीवरून बाहेर पडणारे पाणी रस्त्यावर वाहतुकीस अडथळा करते म्हणून दरवाजाद्वारे व विद्युतनिर्मितीसाठी विद्युतगृह क्र.१ चे बोगद्याद्वारे पाणीसाठ्याचे नियमन केले जाते.

पाणी सोडण्याचे दोन्ही दरवाजे स्वयंचलित आहेत. विद्युत शक्तीद्वारे किंवा जनरेटरचे सहाय्याने किंवा हाताने हँडल फिरवूनही आपत्कालीन प्रसंगी हे दरवाजे उघडण्याची सोय असल्याने अनर्थ टळू शकतो.

पूरपरिस्थितीत दरवाज्याद्वारे सोडलेले पाणी व भिंतीवरून पडणारे पाण्यामुळे खालील बाजूस सदर धबधब्याचे विलोभनीय दृश्य तयार करते. रस्त्यावर येणाऱ्या पाण्यात टेपरेकॉर्डरच्या गाण्यांचा तालावर पर्यटक आनंदविभोर होऊन नाचताना दिसतात व गर्दी करतात, प्रसंगी त्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊन पाटबंधारे कर्मचारी व पोलिसांची बंदोबस्त ठेवतांना तारांबळ उडते, कधीकधी मद्यधुंद पर्यटकांमुळे अप्रिय व मनाला हुरहूर लावून जाणारे प्रसंगही घडतात व या आनंदावर विरजण पडते.

**१. विद्युतनिर्मिती प्रकल्प :–**

भंडारदरा धरणाचे पायथ्याशी पूरपरिस्थितीत व आवर्तनकाळात बोगद्याद्वारे सोडलेल्या पाण्यावर १२ मेगावॅट क्षमतेचे विद्युतनिर्मिती केंद्र असून सध्या डॉडसन

या अमेरिकन कंपनीकडे करारावर चालविण्यासाठी शासनाने हस्तांतरित केले आहे. हे विद्युतगृह पूर्ण क्षमतेने चालवण्यासाठी ८५० क्युसेक्स इतका विसर्ग आवश्यक असतो. भंडारदरा धरणाचे खालील बाजूस १३ किलोमीटर अंतरावर कोंदणी या गावाजवळ ३४ मेगावॅट क्षमतेचे विद्युत निर्मिती केंद्र आहे. रंधा फॉलचे उंचीचा वापर करून या विद्युत गृह क्र. २ ची निर्मिती करण्यात आली आहे. रंधा येथे प्रवरा नदीवर उन्नेयी बंधारा बांधून प्रवरा नदीचे पाणी १.५० किलोमीटर बोगद्यातून नेऊन विद्युतगृहाबाहेर प्रवरा नदीवरील सीतामाई फॉलजवळ सोडण्यात आले आहे. पूर्ण क्षमतेने चालण्यासाठी या विद्युतगृहाला २७०० क्युसेक्स इतका विसर्ग आवश्यक असतो. या विद्युतगृहामुळे रंधा धबधब्याचे दृश्य पाहण्यास प्रवाहाअभावी मर्यादा आल्या आहेत हे पर्यटकांच्या दृष्टीने खेदाचीच गोष्ट आहे.

**२. रंधा धबधबा :–**

भंडारदऱ्याचे पूर्वेस १० किलोमीटर अंतरावर कोल्हार–घोटी रस्त्यावरील रंधा धबधबा पर्यटकांचे आकर्षण केंद्र आहे. भंडारदऱ्याहून येणारी प्रवरा नदी रंधा येथे खडकांतून अचानक ४५ मीटर खोल दरीत उतरते त्यामुळे तिचे रंधा धबधब्यात रूपांतर होते. धबधब्याचे दृश्य पूर्वेकडून पाहता यावे म्हणून पाईप रेलींगसह कठडे बांधण्यात आले आहेत.

पावसाळ्यात पूरपरिस्थितीत प्रवरा नदीचे पाणी रंधा धबधब्यात सामावू न शकल्याने दक्षिणेकडे वळून पिंपरचोंडा नाल्याला मिळते. पिंपरचोंडा नाल्याचे पाण्यामुळे व प्रवरानदीचे पाण्याने दोन्ही बाजूने दरीत पाणी कोसळून दोन सुंदर धबधबे पाहावयास मिळतात. प्रवरा नदीचा प्रवाह असा वळल्याने रंधा धबधबा पाहण्यासाठी गेलेले ५ पर्यटक अचानक आलेल्या पुराने रस्ता बंद झाल्याने रात्रभर अडकून पडले होते. त्यामुळे प्रशासन यंत्रणेची तारांबळ उडाली होती. पुराचे पाणी कमी झाल्याने पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर येणे शक्य झाले.

पावसाळ्यात पाण्यामुळे शेवाळलेले नदीकाळचे खडक निसरडे झालेले असतात त्यामुळे नदीकाठी पाण्यात जाणे धोक्याचे असते. सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या सूचनांचे पालन करायला कधीकधी पर्यटक टाळाटाळ करतात त्यामुळे पाय घसरून पडण्याचे व पाण्यात वाहून जाऊन जीव गमावण्याचे प्रसंगही उद्भवले आहेत. रंधा धबधब्याजवळील आदिवासींचे कुलदैवत घोरपडा देवीचे मंदिर आहे. परिसरातील नवविवाहित जोडपी लग्नानंतर देवीचे दर्शनासाठी आवर्जून येत

असतात. नवरात्र उत्सवात वरीच गर्दी या मंदिरात होते. आता या परिसरात शासनाने अनेक सुविधा निर्माण केल्या आहेत.

**३. कळसुबाई शिखर :–**

भंडारदरा परिसरातील जलाशयाभोवताली असलेल्या सह्याद्रीच्या डोंगर रांगांमधील, सर्वच शिखरे समुद्रसपाटीपासून तीन ते पाच हजार फूट उंचीची आहेत. कळसुबाई हे महाराष्ट्रातील अत्युच्य शिखर असून त्याची उंची पाच हजार ४०० फूट (१ हजार ६४६ मीटर) आहे. हे शिखर भंडारदऱ्यापासून उत्तरेला ९ किलोमीटर अंतरावर आहे. कोल्हार–घोटी रस्त्यावर बारी गावाहून शिखराकडे जाणारी पाऊलवाट आहे. बारी गावाची समुद्रसपाटीपासून उंची दोन हजार ५०० फूट असल्याने दोन हजार ९०० फूट एवढीच उंची चढावी लागते. चढण अवघड असल्याने तीन ठिकाणी लोखंडी शिड्यांचा आधार घेत शिखरावर जावे लागते. शिखर चढताना चांगलीच दमछाक होते पण शिखरावर पोहोचल्यानंतर तेथील कळसुबाईचे मंदिर, थंडगार वारा, सभोवतालच्या परिसराचे विलोभनीय दृश्य पाहून चढताना आलेला थकवा सार्थकी लागल्याचे समाधान वाटते.

**४. अमृतेश्वर मंदिर :–**

भंडारदरा जलाशयाचे उजव्या बाजूने पश्चिम टोकाला रतनवाडी गाव असून तासाभरात तिथे पोहोचता येते. गावात नदीकाठीच पुरातन अमृतेश्वराचे मंदिर असून ११ व्या शतकात बांधण्यात आलेले चालुक्य शैलीतील हे शिव मंदिर म्हणजे अप्रतिम शिल्पकलेचा एक नमुना आहे. अकराव्या व बाराव्या शतकात राजाश्रय व अनुकूल वातावरणामुळे तत्कालीन वास्तुकारांनी वास्तुरचनेत जे नवनवीन प्रयोग केले. त्या प्रयोगांची फलनिष्पत्ती या मंदिराचे रचनेत आढळून येते. सामूहिक पूजा व प्रार्थना करण्याचे दृष्टीने मंदिराची रचना केली आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार थेट गर्भगृहातच उघडते. मंत्रोच्चारांचा परिणाम अधिक चांगला व दीर्घकाळ टिकणारा कसा राहील याकडे मंदिराची रचना करताना विशेष लक्ष देण्यात आले आहे.

मंदिराच्या भिंतीवरील कोरीव काम, विविध मूर्ती, सभामंडपाच्या प्रवेशद्वारावरील मैथुनशिल्पे व अन्य सर्वच कोरीव काम अप्रतिम आहे. मंदिराचे बांधकाम पूर्ण दगडात असून बांधकामासाठी चुन्याचा वापर करण्यात आला आहे

**५. रतनगड :–**

रतनवाडी गावचे पश्चिमेस रतनगड आहे. प्रवरा नदीचा उगम याच गडावर

होतो. भंडारदऱ्याच्या नैत्रत्येस असलेला हा गड दुर्गम व दुर्लक्षित आहे. उजव्या बाजूने रतनवाडी रस्त्याने किंवा जलाशयातून बोटीने गडाच्या पायथ्याशी जाता येते.

रतनवाडी गावातून दीड ते दोन तासांत गडावर पायवाटेने जाता येते. गर्द झाडीतून ही पायवाट जात असल्याने चढताना कष्ट जाणवत नाहीत. वाटेत एके बिकट ठिकाणी शिडीचा आधार घेत जपून जावे लागते. पुढे कपारीतून गेल्यानंतर गडाचा दरवाजा लागतो. त्यावर गणेशाची मूर्ती कोरलेली आहे. गडाला अजूनही दोन बाजूनी दरवाजे असून, पैकी त्र्यंबक दरवाजा व दुसरा कोकण दरवाजा, दरवाजाच्या कमाणी कड्यात खोदलेल्या पायऱ्या. पाच-सहा टाक्या, दोन-तीन गुहा गवतात दिसेनासे झालेले इमारतींचे अवशेष इतिहासाची साक्ष देतात. एका पडक्या बुरुजापासून ज्याला राणांचा हुडा म्हणतात, पश्चिम बाजूच्या सह्याद्रीच्या उंच कड्यांचे निसर्गाचे रौद्र रूप पाहावयास मिळते व मनाला अंतर्मुख बनविते.

रतनगडावरील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नेढे किंवा डोंगराला असलेले नैसर्गिक छिद्र साधारणपणे एक मीटर उंचीचे व पाच मीटर रुंदीची हे छिद्रे भंडारदऱ्याच्या भिंतीवरूनही स्पष्ट दिसतात. रतनगडावरून पश्चिमेकडील कोकणचा भाग व उत्तरेकडील भंडारदरा जलाशयाचे मनमोहक दृश्य पहावयास मिळते.

**६. घाटघरचा कोकणकडा घाटघर उदंचण जलविद्युत प्रकल्प :-**

भंडारदरा जलाशयाचे डाव्या बाजूने जाणारा रस्ता घाटघरकडे जातो. घाटघरजवळच अहमदनगर जिल्ह्याची हद्द जेथे संपते तेथे कोकणकडा आहे. सुसाट वारा, जवळजवळ ४५० मीटर खोलीची दरी. याच दरीतून एकटीच वाहणारी शाई नदी, उंचच उंच डोंगरमाथ्यावरून भर्रकन उतरणारे पाणी, कठड्यावरून खाली पाहताना निसर्गाच्या रौद्र रूपाचे दर्शन होते. पावसाळ्यात बऱ्याचदा हा परिसर धुक्यात हरवलेला असतो. घाटघरला निघतानाच भंडारदऱ्यापासून रस्त्याने मुरशेत, पांजरे, उडदावणे ही गावे लागतात. पावसाळ्यात हिरवळीने आच्छादलेले डोंगर, खळखळणारे छोटे मोठे जलप्रपात, रंगीबेरंगी रानफुलाचे ताटवे, नागमोडी वळणे, मधूनमधून पडणारा रिमझिम पाऊस, रस्त्याच्या डाव्या बाजूने दिसणारा अथांग जलाशय, पावसाला न जुमानता इरलं डोक्यावर घेऊन भातखाचरांमध्ये भात लावणी करणारे आदिवासी, कोवळ्या गवतावर यथेच्छ ताव मारणारी जनावरे असे निसर्गाचे अवर्णनीय विहंगम दृश्य पाहात घाटघर कधी येते हे समजत

नाही. घाटघरच्या डाव्या बाजूस महर्षी वाल्मिकींची दिव्य तपोभूमी व समाधीस्थळ आहे. जवळच रामायणातील लव-कुशांचे जन्मस्थान असलेल्या पर्वताचे दर्शन होते. हे स्थान चोंड्याजवळ ५ किलोमीटर अंतरावर आहे. याच कोकण कड्यावरून शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यस्थापनेच्या मोहिमेत अहमदनगरकडून कल्याण येथील किल्ले दुर्गाडी व शहापूरजवळील किल्ले माहुली या प्रथम प्रवासासाठी महत्त्वाचा खुश्कीचा मार्ग वापरात होता. मुंबईकडे भंडारदऱ्याहून जाणारा कमी अंतराचा मार्ग याच कड्याजवळून प्रस्तावित आहे.

कोकणकड्याचे खोलीचा (४५० मी.) वापर करून घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, जपान देशाच्या जे.बी.आय.सी. या वित्त संस्थेच्या आर्थिक मदतीने साकारत आहे. आशिया खंडात व भारतात महाराष्ट्रात अशाप्रकारचा प्रकल्प प्रथमच हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पातून २५० मेगावॅट वीजनिर्मिती संकल्पित आहे.

घाटघर येथे उर्ध्व धरण बांधून ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील चोंडे येथे शाई नदीवर निम्न धरण, ही दोन धरणे **रोलर कॉम्पॅक्टेड कॉंक्रीट** या अद्ययावत तंत्राच्या सहाय्याने बांधण्यात आली आहेत.

उर्ध्व धरणातील (Upper Dam) पाणी विद्युतनिर्मिती अवस्थेत दाब बोगद्यातून ५८ अंश कोनाने डोंगराच्या (कोकणकडा) पोटात भुयारी वीजगृहापर्यंत आणले जाईल. जेथे वीजनिर्मिती करून ते अवजलवाही बोगद्यातून निम्न धरणात (Lower Dam) साठवले जाईल. रात्री मात्र उदंचन अवस्थेत तेच पाणी वीजगृहातील जनित्रांचा (Turbines) उलट मार्गे पंप म्हणून उपयोग करून पुन्हा उर्ध्व धरणात वर उचलून घेण्यात येईल.

दाब भुयारातील पाण्याचा प्रचंड दाब सहन करण्यासाठी बोगद्याला आतून स्टील प्लेटस्‌चे अस्तरीकरण केलेले आहे. दाब भुयाराची लांबी ७०० मीटर असून विद्युत निर्मितीनंतर पाणी अवजल भुयाराद्वारे निम्न धरणात ६०० मीटर प्रवास करून जाते. उर्ध्व व निम्न धरणांतील पाणी पातळीतील फरक ४२० मीटर आहे. प्रत्येक जनित्रातील (Turbine) ३७.२० घनमीटर प्रति सेकंद एवढा विसर्ग लागणार आहे.

वीज टंचाई भेडसावत असताना या विद्युतनिर्मितीने एक आशेचा किरण निर्माण झाला आहे. सध्या ही विद्युतगृहे सुरू झालेली आहेत. जवळच उत्तरेला

हिवरा नाला असून हा पश्चिमवाहिनी नाला पूर्वेकडे वळवून कोकणात वाया जाणारे पाणी भंडारदरा धरणात वळविण्याचे प्रस्तावित आहे.

**७. पर्यटन व औद्योगिक विकास :–**

भंडारदरा परिसरातील सर्वच रमणीय स्थळे पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करणे आवश्यक असून त्यामुळे येथील आदिवासी समाजाच्या उन्नतीला हातभार लागू शकेल. येथे जंगलात मिळणाऱ्या औषधी वनस्पती, हिरडा, बेहडा, जांभुळ, आवळा, रीठा व इतर कितीतरी वनस्पतींवर आधारीत प्रक्रिया उद्योग उभारल्यास कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध होऊ शकेल. पर्यटनाच्या दृष्टीने या स्थळांचा विकास होणे आवश्यक असून त्यामुळे शासनाचे उत्पन्नात वाढ होऊन स्थानिक आदिवासी जनतेला रोजगाराबरोबर चांगली बाजारपेठ उपलब्ध होऊ शकेल.

आदिवासी विकास खाते, वनखाते, सार्वजनिक बांधकाम खाते, जलसंपदा खाते, महाराष्ट्र पर्यटन विकास खाते व इतरही शासकीय यंत्रणाद्वारा या परिसराचे विकासासाठी आपआपले परीने प्रयत्नशील आहेत.

## निळवंडे धरण

**अ) इतिहास :–**

भंडारदरा धरणाच्या निर्मितीनंतर प्रवरा नदीवर याच धरणाच्या खालील बाजूस २५ किलोमीटर अंतरावर निळवंडे धरण बांधण्यात आले आहे. पूर्वेकडील तालुक्यातील लाभक्षेत्रातील पाणीवापर वाढत गेल्याने तसेच लाभक्षेत्रातीलच पण वंचित राहिलेल्या क्षेत्रालाही पाणी उपलब्ध व्हावे म्हणून अधिक पाण्यासाठी निळवंडे धरणाची मागणी जोर धरू लागली.

भंडारदरा धरणाची जागा निश्चित करतेवेळी ब्रिटिशांनी १८७८ मध्ये म्हाळादेवी, अकोले तालुक्यातील येथे धरण बांधण्यासाठी सर्वेक्षण केले होते व १८८२ साली त्याला केंद्र शासनाने मान्यताही दिली होती. मातीचे धरणासाठी योग्य अयोग्य स्थळ म्हणून हे धरणस्थळ नाकारण्यात आले होते, परंतु पुन्हा एकदा म्हाळादेवी धरणाची मागणी होऊ लागली. पुनश्च या जागेचे सर्वेक्षण होऊन ७.९३ लक्ष रु. किंमतीचे धरणास १४ जुलै १९७० ला शासनाने मान्यता दिली. या धरणाची साठवण क्षमता ६.३४ टी.एम.सी. इतकी होती व १६ हजार ८४२ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार होते. या धरणासाठी ७२ किलोमीटर लांबीचा एकच डावा कालवा प्रस्तावित होता. अकोले, संगमनेर, राहाता, श्रीरामपूर, कोपरगाव या पाच

तालुक्यांना लाभ होणार होता. परंतु या धरणाचा प्रस्ताव काही काळ रेंगाळला.

नंतर याच धरणाचे प्रस्तावास प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता रु.१५.८६ कोटीस मार्च १९७७ मध्ये देण्यात आली. या धरणामुळे अकोले तालुक्यातील १४०० हेक्टर क्षेत्र व सहा गावे पाण्याखाली जाणार होती. शेती व्यवसायावर अवलंबून असणारी अधिक कुटुंबे व क्षेत्र धारणा कमी असल्याने प्रकल्पग्रस्त शेतकरी हवालदिल झाले होते. त्यामुळे त्यांनी या प्रकल्पास तीव्र विरोध सुरू केला व धरणाचे बांधकाम बंद पाडले. बुडणारी बागायती ६ गावे वाचवण्यासाठी व पुनर्वसनाची समस्या सोपी करण्यासाठी वरील बाजूस निळवंडे किंवा दिगंबर या ठिकाणी धरण बांधण्याबाबत शासनदरबारी प्रयत्न करून विनंती केली.

यापूर्वी पूर्ण झालेले धरणांचा इतिहास पाहता कुठेही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन समाधानकारक झालेले नव्हते. पर्यायी जमिनी देणे, योग्य भरपाई देणे व गावठाणाची नवीन सर्व सोयीसुविधांनी युक्त वसाहत निर्माण करणे इ. अडचणींचे निराकरण करणे सोपे न वाटल्याने शासनाने सारासार विचार करून दिनांक १४ जुलै १९७७ रोजी मौजे चितळवेढे, तालुका अकोले येथे धरण बांधण्याचा निर्णय घेतला.

या स्थळाचे सविस्तर सर्वेक्षण करून ७० कोटी रु. किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल सप्टेंबर १९८० मध्ये सादर केला. या प्रकल्पात डावा व उजवा कालवा प्रस्तावित करून या धरणाचा लाभ अकोले, संगमनेर, राहाता, श्रीरामपूर, कोपरगाव, व राहुरी या तालुक्यांना होणार होता. या प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा, पूर अभ्यास व पाणी नियोजन प्राप्त झाल्यानंतर १०२.७५ रु. कोटी सुधारित अंदाजपत्रक सन १९८३-८४ ला मंजूर करण्यात आले. मुख्य धरणाचे (मातीधरण) जलरोधी चराचे (COT) खोदकाम सन १९७७ ला सुरू करण्यात आले होते. सन १९७९ ते १९८७ या कालावधीत दोन्ही कालव्यांची काही ठिकाणी कामेही करण्यात आली होती.

चितळवेढे, निळवंडे व दिगंबर या गावांतील प्रकल्पग्रस्तांनी १९७८ पासूनच त्यांच्या पुनर्वसनाचे निर्माण होणारे प्रश्न सुटावेत यासाठी कामास विरोध सुरू केला होता. 'आधी पुनर्वसन मग धरण' ही अट घालून शासनास वेठीस धरून काम बंद पाडले. सन १९८८ मध्ये तत्कालीन जलसंपदा मंत्री यांची प्रकल्पग्रस्तांनी भेट घेऊन याबाबत त्यांना निवेदन दिले. नंतर सन १९९१ मध्ये तत्कालीन आदिवासी विकास व वनमंत्री यांची भेट घेऊन त्यांनी बागायती जमीन वाचविण्यासाठी तसेच

दोन बुडीत गावठाणे वाचविण्यासाठी मौजे दिगंबरच्या खालील बाजूस व मौजे निळवंडेच्या उर्ध्व बाजूस योग्य ठिकाणी धरण स्थळ घेण्याची मागणी केली. वरील सर्व बाजूंचा विचार करून मौजे निळवंडेचे ६०० मीटर उर्ध्व बाजूस सविस्तर सर्वेक्षण करून सविस्तर अहवाल तयार करण्यात आला. या धरणस्थळास शासनाने सन १९९२ मध्ये मान्यता दिली. हे धरण स्थळ अंतिम करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला. शासनाने दिनांक २२ जून १९९३ रोजी २३४.४० कोटीच्या प्रकल्प अहवालास द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली.

या प्रकल्पाचा संकल्पीत पाणीसाठा ८.३२ टी.एम.सी व ६४ हजार २६० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार होते. या धरणाचे बांधकाम दगडी बांधकाम म्हणून प्रस्तावित करण्यात आले. या बांधकामासाठीही पाया खोदण्याचे काम १९९३ ला सुरू करण्यात आले. अंदाजपत्रके सुधारणा करून ७६०.२१ कोटी किमतीचे प्रकल्प अहवालास शासनाने दिनांक ११ नोव्हेंबर २००३ रोजी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. या प्रकल्प अहवालात धरणसाठा ८.३२ टी.एम.सी. व सिंचन क्षेत्र ६४२६० हेक्टरच ठेवण्यात आले होते.

नंतर प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालास शासनाने दिनांक २१ जून २०१७ रोजी २३६९.९५ कोटीचे किंमतीस मान्यता दिली. यात धरणाचा संकल्पित पाणीसाठा ८.३२ टी.एम.सी. हाच ठेवून सिंचन क्षेत्रात मात्र ६८ हजार ८७८ हेक्टर करून वाढ केली आहे.

निळवंडे धरण स्थळाच्या बदलाचा मोठा रंजक प्रवास होऊन अखेर कमी पुनर्वसन व अधिक पाणीसाठा असणारे निळवंडे-२ हे दगडी बांधकामातील धरणाचे बांधकाम पूर्ण होऊन नदीद्वारे पाणीवापरही सुरू झाला आहे. कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत. पूर्वीचे धरण स्थळांच्या तुलनेत निळवंडे धरणाचे बांधकाम पारंपरिक दगडी बांधकाम असून, पाणी गळती विरोधक मजबुती देणारे कोलग्राऊट या आधुनिक पद्धतीचे आहे. सांडवा मध्यभागी ठेवून सर्व विमोचके, विद्युतगृह डाव्या बाजूकडे आहेत. धरणाखाली सुंदर गार्डन प्रस्तावित आहे. डाव्या टेकडीच्या माथ्यावर विश्रामगृह बांधण्यात आले असून जलाशयाचे धरणाचे व परिसराचे विलोभनीय दृश्य या ठिकाणाहून पाहता येते. भविष्यात पर्यटकांसाठी एक आकर्षण केंद्र बनेल यात शंका नाही.

धरणग्रस्तांच्या बाबतीत विचार करता हा खूपच चांगला निर्णय झाला,

याचे श्रेय लोकप्रतिनिधींना व धरणग्रस्तांना जाते. त्यांचे आग्रहास्तव धरणस्थळ वरील बाजूस नेल्यामुळे अनेक कुटुंबाचे संसार स्थिर राहिले. म्हाळादेवी व निळवंडे-१ ही धरणस्थळे तांत्रिक दृष्ट्याही योग्य नव्हती. पर्यायी धरणस्थळे म्हणून सुरुवातीलाच या तिन्ही धरणस्थळांचा तुलनात्मक अभ्यास त्यावेळी झाला असता तर धरण बांधण्यास झालेला विलंब व वाढलेला खर्च वाचविता आला असता हे निश्चित.

धरणातील प्रकल्पग्रस्तांचे एक गाव, एक वाडी पूर्ण बाधीत व १२ गावे अंशत: बाधित असे आदर्श पुनर्वसन शासनाने केले आहे. राज्यातील प्रकल्पग्रस्तांचे आदर्श पुनर्वसन झालेले हे एकमेव धरण आहे.

**ब) निळवंडे धरणाची ठळक वैशिष्ट्ये :-**

१. धरणाचे नाव :- निळवंडे धरण.

२. धरणाचे स्थळ :- निळवंडे.

३. नदीचे नाव :- प्रवरा नदी.

४. धरणाचा प्रकार :- (ग्रॅव्हीटी डॅम) गुरुत्व धरण.

५. धरणाचे बांधकामाचा प्रकार :- दगडी धरण (कोलग्राऊट मेसनरी).

६. अक्षांश (Latitude) :- १९°-३२' - ४५''

७. रेखांश (Logitude) :- ७३° - ५४' - १५''

८. काम सुरू झालेचे वर्ष :- जून १९९३ व पूर्ण झालेचे वर्ष :- प्रगतीपथावर.

९. पाणलोट क्षेत्र :- २०२.२१ चौरस किलोमीटर

१०. बुडणारे क्षेत्र :- १३१७.३५ हेक्टर.

११. प्रकल्पबाधित गावांची संख्या :- २ पूर्णत: व १२ अंशत:

१२. धरणाची लांबी :- ५४० मीटर, उंची :-७४.५० मीटर.

१३. सांडव्याची लांबी :- ७२ मीटर.

१४. सांडव्यातील दरवाजे :- वक्राकार १२.०० x ६.०० मीटर आकाराचे ५ नग.

१५. एकूण जलसाठा :- ८.३२ टी.एम.सी.

१६. प्रकल्पीय पाणीवापर :- १०.१६ टी.एम.सी.

१७. उपयुक्त पाणीसाठा :- ८.१८५ टी.एम.सी.

१८. मृत साठा :- ०.१३५ टी.एम.सी.

१९. बिगर सिंचन पाणीवापर :- ०.४६ टी.एम.सी.

२०. ७५% विश्वासार्हतेनुसार येवा :- ८.२४ टी. एम.सी.

२१. बाष्पीभवन व्यय वार्षिक :- ०.२९ टी.एम.सी.

२२. प्रकल्पाचे लाभक्षेत्र :

अ) एकूण लाभक्षेत्र (जी.सी.ए):- ११६६११ हेक्टर.

ब) लागवडी योग्य क्षेत्र (सी.सी.ए):- ९१२७९ हेक्टर.

क) सिंचन क्षेत्र (आय.सी. ए):- ६८८७८ हेक्टर.

१. प्रवाही सिंचन (डावा कालवा व उजवा कालवा :- ३८८९५ हेक्टर.

२. सूक्ष्म सिंचन (डावा कालवा व उजवा कालवा) :- २५३६५ हेक्टर.

३. उच्चस्तरीय कालबे (डावा कालवा व उजवा कालवा) :- २३२८ हेक्टर.

४. उपसा सिंचन योजना :-२२९० हेक्टर.

२३. लाभार्थी जिल्हेनिहाय पिक क्षेत्र :-

१. अहमदनगर : - ६६२६६ हेक्टर.

२. नाशिक :- २६१२ हेक्टर.

एकूण क्षेत्र :- ६८८७८ हेक्टर.

२४. पाण्याच्या नियंत्रण पातळ्या :- (समुद्रसपाटीपासून)

१. बांधकामाचा माथा पातळी (TBL) :- ६५२.००० मीटर.

२. महत्तम पुर पातळी (MFL) :- ६४९.२३० मीटर.

३. पूर्ण संचय पातळी (FRL) :- ६४८.१५ मीटर.

४. सांडव्याची माथा पातळी (Crest Level) :- ६४१.५० मीटर.

५. लघुत्तम जलपातळी (MDDL) :-६०६.१५० मीटर.

६. बांधकामाची पाया पातळी (DFL) :- ५७७.५० मीटर.

२५. धरणावरील विमोचके (दरवाजे) पातळ्या :-

१. सिंचन विमोचक तळ पातळी :- ५९८.०० मीटर.

२. विद्युत निर्मिती विमोचक तळ पातळी :- ६१०.५० मीटर.

३. सिंचन विमोचक पाणी पुरवठा लघुत्तम पातळी :- ६०६.०० मीटर.

४. संगमनेर शहर पाणीपुरवठा विमोचक तळ पातळी :- ६०१.०० मीटर.

५. उच्चस्तर सिंचन बोगदा विमोचक तळ पातळी :- ५९८.०० मीटर.

६. उच्चस्तर सिंचन बोगदा पाणीपुरवठा पातळी :- ६०६.०० मीटर.

७. उच्चस्तर विद्युत बोगदा पाणीपुरवठा पातळी :- ६२८.८७ मीटर.

८. उच्चस्तरीय कालवा विमोचक तळ पातळी :- ६२७.४० मीटर.

२६. कालवे :-

१. मुख्य डावा कालवा लांबी :-८५ कि.मी, पाणी वहन क्षमता :- १४५० क्युसेक्स.

२. मुख्य उजवा कालवा लांबी :- ९७.कि.मी, पाणी वहन क्षमता :- ५०८ क्युसेक्स.

२७. जलविद्युतनिर्मिती प्रकल्प :-

१. निम्नस्तर :- ३.५० मेगावॅट क्षमतेची २.

२. उच्चस्तर :- ४.६० मेगावॅट क्षमतेची १.

प्रवरा परिक्रमेच्या निमित्ताने प्रवरेचे पावित्र्य व महात्म्य यावर प्रकाश टाकण्यात आला आहे हे उत्तमच झाले, परंतु या पवित्र नदीत नदीकाठावरील गावांचे सांडपाणी विविध मार्गाने विनाप्रक्रिया नदीत सोडले जात आहे व पिण्याचे पाण्याची अशुद्धी वाढत आहे अर्थात प्रदूषण वाढत आहे. गंगाशुद्धीकरण चळवळ सुरू आहे. तशी प्रवरा शुद्धीकरणासाठी प्रवरा काठावरील गावांनी पुढाकार घेतला पाहिजे. सांडपाण्याचे शुद्धीकरण करून मगच हे पाणी नदीपात्रात सोडण्याबाबत (STP Plant) कायदा अस्तित्वात असूनही सर्रास या कायद्याचे उल्लंघन होताना दिसत आहे. पृथ्वीवर पिण्यासाठी उपयुक्त पाण्याची टक्केवारी झपाट्याने कमी होत आहे हे लक्षात घेऊन वेळीच प्रयत्न व्हावेत असे वाटते.

**प्रवरा खोरे :-**

प्रवरा नदी ही गोदावरी नदीची उपनदी आहे. गोदावरी खोऱ्यात प्रवरा खोरे समाविष्ट असून प्रवरा नदीला मिळणाऱ्या ओढे व उपनद्यांवर मध्यम व लघु प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली आहे. त्याबाबत माहिती खालील प्रमाणे आहे.

**अ) कृष्णवंती नदीवरील वाकी लघु पाटबंधारे तलाव :–**

भंडारदरा धारणाचे खालील बाजूस अंदाजे १ कि.मी अंतरावर कृष्णवंती नदी प्रवरा नदीस डाव्या बाजूला येवून मिळते. कृष्णवंती नदीवर मौजे वाकी, तालुका अकोले या गावचे पश्चिम बाजूस लघु पाटबंधारे तलाव व वाकी हा तलाव बांधण्यात आला आहे त्याची ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहे.

१. तलावाचे बांधकाम प्रकार – मातीधरण २. तलावाची लांबी – २१६.०० मीटर. ३. तलावाची सांडवा लांबी – १०३.५० मीटर. ४. तलावाची एकूण लांबी – ३१९.५० मीटर. ५. तलावाची माथा रुंदी – ६.५० मीटर. ६. तलावाची उंची – २९.८३ मीटर. ७. तलावाचे जलग्रहण क्षेत्र – ३५.७७ चौ.कि.मीटर ८. तलावाचे बुडीत क्षेत्र – १८.०० हेक्टर आर. ९. तलावाची साठवण क्षमता – ११२.६६ द.ल.घ.फू. १०. तलावावर कालवे – नाहीत, उपसा सिंचनाद्वारे सिंचन केले जाते. ११. एकूण सिंचन क्षेत्र – ८३७.०० हेक्टर आर. १२. सिंचनाखालील गावे – मौजे शेंडी, चिचोंडी, वारंघुशी, वाकी, मान्हेरे.

**ब) देवगाव ओढ्यावरील टिटवी लघु पाटबंधारे तलाव :–**

भंडारदरा धरणाचे खालील बाजुस देवगावकडून येणाऱ्या ओढ्यावर टिटवी लघु पाटबंधारे तलाव बांधण्यात आला आहे. या तलावाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहे.

१. तलावाचे बांधकाम प्रकार – दगडी बांधकाम (कोलग्राऊट मेसनरी). २. तलावाची भिंतीची लांबी – ८९.७० मीटर. ३. तलावाची सांडवा लांबी – ५०.३० मीटर. ४. तलावाची एकूण लांबी – १४०.०० मीटर. ५. भिंतीची माथा रुंदी – ४.५० मीटर. ६. भिंतीची माथा उंची – ३१.८० मीटर. ७. तलावाचे जलग्रहण क्षेत्र – २९.२१ चौ.कि.मीटर. ८. तलावाचे बुडीत क्षेत्र ९. तलावाची साठवण क्षमता – ३०३.३२ द.ल.घ.फु १०. तलावावर कालवे – नाहीत, उपसा सिंचनाद्वारे सिंचन केले जाते. ११. एकूण सिंचन क्षेत्र – १५५४.०० हेक्टर आर. १२. सिंचनाखालील गावे– टिटवी, देवगाव, शेलविहीरे.

**क) आढळा मध्यम प्रकल्प :–**

आढळा उपनदी प्रवरा नदीस मौजे चिखली तालुका संगमनेर या गावाच्या पूर्वेस अंदाजे ६० कि.मी अंतरावर मिळते. आढळा नदीवर देवठाण, तालुका अकोले या गावाजवळ आढळा मध्यम प्रकल्पाचे बांधकाम करण्यात आलेले

आहे. अकोले तालुक्यापासून देवठाण गाव १२ किलोमीटर अंतरावर आहे. आढळा मध्यम प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहे.

१. प्रकल्पाचे बांधकामाचा प्रकार – मातीधरण. २. प्रकल्पाची भिंतीची लांबी – ६२३.०० मीटर. ३. दगडी बांधकाम लांबी – २२.८० मीटर. ४. सँडल लांबी – ३६०.०० मीटर. ५. सांडवा लांबी – १४४.७८ मीटर. ६. प्रकल्पाची एकूण लांबी – ११५०.५८ मीटर. ७. भिंतीची माथा रुंदी – ६.५० मीटर. ८. प्रकल्पाची भिंतीची उंची – ४०.०२ मीटर. ९. जलग्रहण क्षेत्र – १७०.११ चौ.कि.मीटर. १०. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र – २३०.६७ हेक्टर आर. ११. धरणाची साठवण क्षमता – १०६० द.ल.घ.फू. १२. धरणावरील कालवे – अ) आढळा डावा कालवा – ८.८३ कि.मी. ब) आढळा उजवा कालवा – ११.८० कि.मी. १३. एकूण सिंचन क्षेत्र – ३९१३.०० हेक्टर आर. १४. सिंचनाखालील गावे– अ) अकोले तालुका – देवठाण, विरगाव, हिवरगाव, गणोरे, पिंपळगाव निपाणी. ब) संगमनेर तालुका – जवळे कडलग, वडगाव लांडगा, धांदरफळ बु., राजापुर, चिकणी, कासारवाडी. निमगाव भोजापुर. क) सिन्नर तालुका – नळवाडी, कासारवाडी . ड) जलाशयावर (अकोले तालुका) – सावरगाव पाट, विरगाव व देवठाण.

**ड) भोजापुर मध्यम प्रकल्प :–**

म्हाळुंगी या उपनदीवर मौजे भोजापूर (तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक) या गावाजवळ भोजापूर मध्यम प्रकल्पाचे बांधकाम करण्यात आले आहे. म्हाळुंगी ही नदी संगमनेर गावाजवळ प्रवरा नदीला मिळते. भंडारदऱ्याहून संगमनेर ६५ किलोमीटर अंतरावर आहे. प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहे.

१. प्रकल्पाचा बांधकामाचा प्रकार – मातीधरण. २. धरण भिंतीची लांबी – ४८०.०० मीटर. ३. धरणाची सांडव्याची लांबी – २२५.५५ मीटर. ४. भिंतीची माथा रुंदी – ५.५० मीटर. ५. धरणाची भिंतीची उंची ६. जलग्रहाण क्षेत्र ७. बुडीत क्षेत्र ८. साठवण क्षमता ९. धरणावरील कालवे– ३२.४२ मीटर. – १५४.०० चौ.कि.मी. – ३३५.२२ हेक्टर.आर. – ३५३.१५ द.ल.घ.फु – अ) डावा कालवा – १७.१२ कि.मीटर. ब) दोडी शाखा कालवा – ३.७५ कि.मी. – ४५८०.०० हेक्टर आर. १०. एकूण सिंचन क्षेत्र ११. सिंचनाखालील गावे– अ) नाशिक जिल्हा : – कासारवाडी, चापडगाव, भोजापुर (सोनेवाडी), धुळवट,

नांदुर शिंगोटे, दोडी खु, दोडी बु, खंबाळे, सुरेगाव, मऱ्हळ खु, मऱ्हळ बु., कनकोटी, फत्तेपुर, गुलापुर, निऱ्हाळे, चास, नळवाडी. ब) अहमदनगर जिल्हा : निमोण, पळसखेडे, सोनेवाडी, कऱ्हे व पिंपळे.

**अ) निळवंडे धरणाचे सर्वेक्षण व बांधकाम करणाऱ्या अभियंत्याचे नावाची यादी...**

**१. सर्वेक्षणाने काम करणारे अभियंते :**

**कार्यकारी अभियंता–** १. श्री. ना. मो. मोरे.

**उपअभियंता–** १. श्री. म. ल. अंबिके २. श्री. स. प्र. देशपांडे ३. श्री. अ. मा. गाडगीळ ४. श्री. ग. पु. गुमास्ते ५. श्री. कु. ज. डोके ६. श्री. भा. आ. राजवाडे ७. श्री. शि. रा. राजळे ८. श्री. म. त्रि. कुलकर्णी ९. श्री. शि. शि. कातकाडे १०. श्री. एल. जी. हासे

**कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी– २–** १. श्री. चौकटे २. श्री. वाय. डी. पाटील ३. श्री. अशोक ना. म्हस्के ४. श्री. गोपाळ बोंबडी ५. श्री. राव ६. श्री. गौडा ७. श्री. एस. डी. कदरकर ८. श्री. मा. मु. कळसकर ९. श्री. दि. न. कळसकर १०. श्री. बी. वाय. वाकचौरे ११. श्री. डी. एम. सोनार १२. श्री. ढवळे १३. श्री. गिडगंटी १४. श्री. एन. व्ही. काकडे १५. श्री. एस. एन. लोंढे १६. श्री. एस. आर. निकम १७. श्री. आर. एच. सैंदाणे १८. श्री. एन. डी. डरे १९. श्री. व्ही. एम. दैवज्ञ २०. श्री. आर. पी. बिन्नर २१. श्री. एस. बी. मुळे २२. श्री. एस. पी. जगताप २३. श्री. पिल्लई २४. श्री. सुनिल हांडे २५. श्री. आर. बी. दरंगे २६. श्री. आर. बी. काळे २७. श्री. मच्छिंद्र भोर २८. श्री. समीर भगत २९. श्री. एस. डी. वाघ ३०. श्री. च. स. पुंड ३१. श्री. आर. डी. आरोटे ३२. श्री. मन्नुर ३३. श्री. एस. आर. सोनवणे ३४. श्री. जे. एम. गोडसे ३५. श्री. अ. एच. मुळे ३६. श्री. बी. एस. गायकवाड

**ब) बांधकाम सुरू झालेनंतर काम करणारे अभियंते –**

**कार्यकारी अभियंता –** १. श्री. प्रकाश व्ही. पाठक २. श्री. एन. अ. मोरे ३. श्री. एस. व्ही. प्रदक्षिणे ४. श्री. सि. पी. कळसे ५. श्री. एस. आर. बोडके ६. श्री. एस. डी. कुलकर्णी ७. श्री. एस.बी. मोरे ८. श्री. भ. रा. शिंगाडे ९. श्री. सुभाष पाटील १०. श्री. पी. बी. सुतार ११. श्री. आर. बी. जाधव १२. श्रीमती. सं. रो. जगताप १३. श्री. अ. आर. गुंजाळ १४. श्री. आर. टी. बागुल १५. श्री.

गि. म. संघाणी.

**उपअभियंता –** १. श्री. संजय. एम. बेलसरे २. श्री. सु. नि. प्रदक्षिणे ३. श्री. एस. डी. हांडे ४. श्री. पी. एस. पाबळे ५. श्री. पी. पी. माने ६. श्री. ए. एस. फालक ७. श्री. मि. ज्यो. नाईक ८. श्री. सी. डी. टेंभूर्णीकर ९. श्री. स. रा. बोडखे १०. श्री. पो. अ. रोकडे ११. श्री. एस. एस. सय्यद १२. श्री. के. के. शेख १३. श्री. एस. एन. देशमुख १४. श्री. आर. बी. काळे १५. श्री. एस. आर. वैजापुरकर १६. श्री. पी. बी. तांबोळी १७. श्री. आर. एस. गुंजाळ १८. श्री. एम. एस. आभाळे १९. श्री. जनार्दन सहाणे २०. श्री. मनोजकुमार डोके २१. श्री. विजय गिरी २२. श्री. एस. सी. कर्प २३. श्री. एस. डी. कदरकर २४. श्री. पी. ई. खेडकर २५. श्री. व्ही. एच. लव्हाट २६. श्री. ए.बी. कवडे २७. श्री. आर. आर. कोरे

**शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी : २ –** १. श्री. नानासाहेब बी. खर्डे २. श्री. हारुण क. तांबोळी ३. श्री. रामनाथ द. आरोटे ४. श्री. सुभाष. चु. कर्प ५. श्री. प्रमोद रा. आढाव ६. श्री. भाऊसाहेब द. शेवाळे ७. श्री. रामनाथ पा. काकड ८. श्री. सुनिल गांधी ९. श्री. अंबादास प. येन्नम १०. श्री. सिदाप्पा आ. शहापुरकर ११. श्री. रमाकांत शिरुडे १२. श्री. श्रीकृष्ण करेशिया १३. श्री. आणासाहेब आर. आंधळे १४. श्री. सुनिल बा. वाकचौरे १५. श्री. शरद डी. कांबळे १६. श्री. अरविंद ल. जाधव १७. श्री. उमेश कंगणकर १८. श्री. एस. डी. वाघ १९. श्री. पठाण २०. श्री. शांताराम शेळके २१. श्री. योगेश घुले २२. श्री. विष्णु जाधव २३. श्री. डी. डी. बोरसे २४. श्री. टी. बी. देशमुख २५. श्री. भापकर २६. श्रीमती माधवी कुलकर्णी २७. श्रीमती संगीता खैरणार २८. श्री. जनार्दन सहाणे २९. श्री. आर. एस. शिंदे ३०. श्री. व्ही. आर. चौधर ३१. श्री. बी. आर. नन्नवरे ३२. श्री. अक्षय काळे ३३. श्री. कैलास डोके ३४. श्री. कृष्णा बडे ३५. श्री. विरेंद्र सुभाष पाटील ३६. श्री. वैभव नवले. ३७. श्री. हर्षद गायकवाड ३८. श्री. विकास बाजीराव डुंबरे ३९. श्री. रोहित विलास वैद्य ४०. श्री. राहुल रंगनाथ घारे.

**– रा. द. आरोटे**

मो. ९५८८४५९२०३, ९०४९४५५५७४

●●●

# प्रवरा नदी उगमस्थान
# रतनगड (ता. अकोले)

| उजवी बाजू (दक्षिण) | प्रवरा नदी | डावी बाजू (उत्तर) |
|---|---|---|
| १) रतनवाडी | | १) घाटघर |
| २) कोलटेंभे | | २) उडदावणे / लव्हाळी |
| | | शिंगणवाडी |
| ३) मुतखेल | प्रवाह दिशा | ३) पांजरे |
| | | ४) मुरशेत |
| ४) भंडारदरा | भंडारदरा | ५) शेंडी |
| | धरण | (गावठा शेंडी) |
| ५) गुहिरे | | ६) पिंपळ्याची वाडी |
| ६) रंधा खुर्द | ↓ | ७) रंधा बु।। |
| ७) तेरुंगण (शिवार) | | ८) कोदणी |
| ८) कातळापूर | | ९) टिटवी |
| ९) माळेगाव | | १०) शेलविहिरे |
| १०) केळुंगण (शिवार) | | ११) पिंपरकणे |
| ११) कोहोंडी | | १२) बाभुळवंडी |
| १२) राजूर | | १३) दिगंबर |
| १३) कोकणेवाडी | निळवंडे धरण | १४) पिंपळगाव नाकविंदा |
| | | शिवार |
| १४) चितळवेढे | | १५) निळवंडे |
| १५) विठे | | १६) निंब्रळ |
| १६) ठाकरवाडी | | १७) म्हाळादेवी |
| १७) सावंतवाडी | | १८) मेहेंदुरी |
| १८) रुंभोडी | | १९) उंचखडक ।।बुद्रुक।। |
| १९) इंदुरी | | २०) ढोक्री |
| २०) उंचखडक ।।खुर्द) | | २१) टाकळी |
| | | (अगस्ति आश्रमः |
| २१) माळीझाप (अकोले) | | २२) खानापूर |

| | | |
|---|---|---|
| २२) अकोले | | २३) सुगाव (रेडे) खुर्द |
| २३) सुगाव बुद्रुक | | २४) कुंभेफळ |
| २४) कळस बु।। | | २५) कळस खुर्द |
| २५) सांगवी ता. संगमनेर | | २६) कोकणेवाडी ता. संगमनेर |
| २६) कौठे धांदरफळ | | २७) पिंपळगाव कोंझीरा |
| २७) धांदरफळ खुर्द | | २८) धांदरफळ बुद्रुक |
| २८) निमज | | २९) डेरेवाडी |
| २९) खांडगाव | प्रवाह दिशा | ३०) चिखली |
| ३०) संगमनेर खुर्द | | ३१) मंगळापूर |
| ३१) वाघापूर | ↓ | ३२) कासारा दुमाला |
| ३२) खराडी | | ३३) संगमनेर बुद्रुक |
| ३३) कनकापूर | | ३४) निंभाळे |
| ३४) कनोली | | ३५) कोल्हेवाडी |
| ३५) आश्वी खुर्द | | ३६) समनापूर |
| ३६) दाढ खुर्द, ता. राहाता | | ३७) वडगावपान |
| ३७) चणेगाव | | ३८) जोर्वे |
| ३८) सोनगाव | | ३९) रहिमपूर |
| ३९) रामपूर | | ४०) मनोली |
| ४०) कोल्हार खुर्द | | ४१) ओझर खुर्द ता. संगमनेर |
| ४१) चिंचोली | | ४२) उंबरी बाळापूर ता. राहाता |
| ४२) गंगापूर | | ४३) आश्वी बुद्रुक |
| ४३) पिंपळगाव | | ४४) प्रतापपूर |
| ४४) संग्मापूर | | ४५) दाढ बुद्रुक |
| ४५) डबनगाव | | ४६) हनुमंतगाव |
| ४६) आंबी | | ४७) पाथरे |
| ४७) केसापूर | | ४८) भगवती |
| ४८) बेलापूर खुर्द, ता. राहुरी | | ४९) कोल्हार बुद्रुक |

४९) ब्राह्मणगाव

५०) लाख, ता. राहुरी
५१) मालुंजा खुर्द
५२) माहेगाव
५३) खडसरगाव
५४) पाथरे खुर्द
५५) शेनवडगाव, ता. राहुरी
५६) कोपरे, ता. राहुरी

५७) इमामपूर, ता. नेवासा
५८) तिळापूर
५९) निंभारी
६०) चिंचबन
६१) नेवासा खुर्द, ता. नेवासा
६२) खलालपिंप्री
६३) मुरमे (देवगड)
६४) मडकी
६५) बकुपिंपळगाव
६६) माळेवाडी
६७) प्रवरासंगम, ता. गंगापूर

प्रवाह दिशा

↓

५०) कडीत बुद्रुक
ता. श्रीरामपूर
५१) मांडवे
५२) फत्याबाद
५३) कुरणपूर
५४) गळलिंब
५५) उकलगाव
५६) एकलहरे
५७) बेलापूर बुद्रुक
ता. श्रीरामपूर
५८) वळदगाव
५९) उंबरगाव
६०) पढेगाव
६१) कान्हेगाव
६२) मालुंजा बुद्रुक
६३) भेर्डापूर
६४) वांगी
६५) खर्डी
६६) पाचेगाव, ता. श्रीरामपूर
६७) पुनदगाव
६८) नेवासा बुद्रुक,
ता. नेवासा
६९) बहिरवाडी
७०) धामोरे
७१) बोधेगाव
७२) वाशिम
७३) टोका

**गोदावरी नदी**
**(जायकवाडी बॅक वॉटर)**

**संदर्भ : रामनाथ आरोटे (अभियंता)**

## प्रवरा नदी उगमस्थान रतनगड ता. अकोले पासून अंतर

| उजवी बाजू (दक्षिण) | अंतर (कि. मी.) | एकूण एकंदर | प्रवरा नदी प्रवाह दिशा अंतर | डावी बाजू (उत्तर) | अंतर (कि. मी.) | एकूण एकंदर अंतर |
|---|---|---|---|---|---|---|
| रतनगड | ०.० | ०.० | भंडारदरा | घाटघर | ०.० | ०.० |
| कोलटेंभे | ७.५ | ७.५० | धरण | उडदावणे | ५.० | ५.०० |
| मुतखेल | ६.० | १३.५० | | पांजरे | ५.० | १०.०० |
| भंडारदरा | ४.५ | १८.०० | | मुरशेत | ७.० | १७.०० |
| गुहिरे | ५.० | २३.०० | | शेंडी | २.७ | १९.७० |
| रंधा खुर्द | २.५ | २५.५० | | रंधा बु. | १०.० | २९.७० |
| कातळापूर | ३.५ | २९.०० | | कोंदणी | ४.५ | ३४.२० |
| केळुंगण | ३.० | ३२.०० | | टिटवी | १६.० | ५०.५० |
| राजूर | ६.३ | ३८.३० | | शेलविहीरे | १३.० | ६३.२० |
| चितळवेढे | ५.० | ४३.३० | | पिंपरकणे | १०.० | ७३.२० |
| विठे | १.८ | ४५.१० | | दिगंबर | ८.३ | ८१.५० |
| ठाकरवाडी | १.२ | ४६.३० | | निळवंडे | ५.० | ८६.५० |
| रुंभोडी | ४.५ | ५०.८० | | निंब्रळ | ३.० | ८९.५० |
| इंदुरी | ०.५ | ५१.३० | | म्हाळादेवी | २.८ | ९२.३० |
| उंचखडक बु. | ३.५ | ५४.८० | | मेहेंदुरी | ३.५ | ९५.८० |
| माळीझाप | २.५ | ५७.३० | | उंचखडक खुर्द | १.५ | ९७.३० |
| अकोले | ३.० | ६०.३० | | टाकळी | ६.० | १०३.३० |
| सुगाव बु. | ४.६ | ६४.९० | | सुगाव खुर्द | ३.० | १०६.३० |
| कळस | ४.० | ६८.९० | | कुंभेफळ | ४.५ | ११०.८० |
| सांगवी | २.३ | ७१.२० | | कळस खुर्द | २.० | ११२.८० |
| कौठे धांगरफळ | १.५ | ७२.७० | | कोकणेवाडी | २.० | ११४.८० |
| धांदरफळ खुर्द | ३.८ | ७६.५० | | धांदरफळ बु. | ३.० | ११७.८० |
| निमज | ३.१ | ७९.६० | | डेरेवाडी | ४.० | १२१.८० |
| खांडगाव | ५.८ | ८५.४० | | चिखली | २.० | १२३.८० |
| संगमनेर खुर्द | ४.० | ८९.४० | | मंगळापूर | ३.५ | १२७.३० |
| वाघापूर | ३.४ | ९२.८० | | कासारा दुमाला | ४.० | १३१.३० |

| | | |
|---|---|---|
| खराडी | १.८ | ९४.६० |
| कनोली | ७.० | १०१.६० |
| कनकापूर | १.८ | १०३.४० |
| आश्वी खुर्द | १३.० | ११६.४० |
| दाढ खुर्द | ६.५ | १२२.९० |
| चणेगाव | १.५ | १२४.४० |
| सोनगाव | ५.० | १२९.४० |
| रामपूर | ४.१ | १३३.५० |
| कोल्हार खुर्द | ४.० | १३७.५० |
| चिंचोली | ३.४ | १४०.९० |
| गंगापूर | १.२ | १४२.१० |
| पिंपळगाव | १.२ | १४३.३० |
| डबनगाव | २.३ | १४५.६० |
| आंबी | २.१ | १४७.७० |
| केसापूर | १.५ | १४९.२० |
| बेलापूर खुर्द | २.८ | १५२.०० |
| ब्राह्मणगाव | ४.६ | १५६.६० |
| महालगाव | १३.० | १६९.६० |
| खुदसगाव | ३.२ | १७२.८० |
| पाथरे खुर्द | १.६ | १७४.४० |
| शेनवडगाव | ३.६ | १७८.०० |
| कोपरे | १.५ | १७९.५० |
| तिळापूर | ५.० | १८४.५० |
| इमामपूर | ५.२ | १८९.७० |
| चिंचबन | १५.० | २०४.७० |
| नेवासा खुर्द | ५.० | २०९.७० |
| खलालपिंप्री | ८.३ | २१८.०० |
| मुरमे (देवगड) | ५.१ | २२३.१० |
| बकुपिंपळगाव | ४.० | २२७.१० |
| माळेवाडी | ३.५ | २३०.६० |
| प्रवरासंगम | ४.० | २३४.६० |

| | | |
|---|---|---|
| संगमनेर बु. | ३.० | १३४.३० |
| जोर्वे | १०.० | १४४.३० |
| रहिमपूर | ५.० | १४९.३० |
| ओझर खु. | ४.५ | १५३.८० |
| उंबरी बाळापूर | ५.३ | १५९.१० |
| आश्वी बु. | २.२ | १६१.३० |
| प्रतापपूर | २.५ | १६३.८० |
| दाढ बु. | ३.८ | १६७.६० |
| पाथरे | ७.० | १७४.६० |
| कोल्हार बु. | ६.२ | १८०.८० |
| कडीत बु. | २.० | १८२.८० |
| फत्याबाद | २.० | १८४.८० |
| गळनिंब | २.५ | १८७.३० |
| उकलगाव | ४.० | १९१.३० |
| एकलहरे | १.५ | १९२.८० |
| बेलापूर बु. | ३.० | १९५.८० |
| उंबरगाव | २.५ | १९८.३० |
| पढेगाव | ४.० | २०२.३० |
| मालुंजा बु. | ५.० | २०७.३० |
| भेर्डापूर | ५.० | २१२.३० |
| खर्डी | ६.० | २१८.३० |
| पाचेगाव | ३.७ | २२२.०० |
| पुनदगाव | ५.० | २२७.०० |
| नेवासा बु. | १०.०० | २३७.०० |
| बहिरवाडी | ५.० | २४२.०० |
| बोधेगाव | २.५ | २४४.५० |
| टोका | १२.० | २५६.५० |

# ६) आदिवासी आणि प्रवरा अनुबंध

परिक्रमा म्हणजे श्रद्धेने, संकल्पपूर्वक आपल्या पूजनीय (व्यक्ती किंवा पवित्र नैसर्गिक उर्जास्थाने किंवा धार्मिक मंदिरे) स्थानांची अनवाणी, संसाराचे पाश बाजूला ठेवून, सर्व समाजाच्या, मानवतेच्या व सर्व चराचराच्या अंतिम सुखासाठी व मानव देहाच्या अंतिम पुरुषार्थासाठी केलेली वाटचाल.

गणपतीने माता पार्वतीची, आद्य शंकराचार्यांनी भारताची परिक्रमा केली व कोलंबस, वास्को-द-गामाने पृथ्वीची परिक्रमा केली. या दोन प्रकारच्या परिक्रमेत हेतूचा फरक आहे. पहिली परिक्रमा ही श्रद्धापूर्वक मानवतेच्या कल्याणासाठी केलेली तर दुसरी आर्थिक लाभ डोळ्यापुढे ठेवून केलेली. पायी परिक्रमेत उत्तम आरोग्य तर प्राप्त होतेच, परंतु त्यातून निसर्ग व समाजदर्शन, त्याचे निरीक्षण नोंदविणे, त्यावर चिंतन करून समाजउपयोगी तत्त्वज्ञान मांडणे हा मूळ हेतू दिसतो. यातून त्या भागातील संस्कृती, भाषा, चालीरीती, अन्नधान्ये, खानपान, रीतिरिवाज, वेशभूषा, पाणी, हवामान, हंगाम, सणवार, पीकपद्धती, पाळीव प्राणी, वृक्षवेली, वनौषधी, वन्य पशू-पक्षी, सामाजिक व आर्थिक स्थिती इ.इ. अनेक उपअंगांचा सहवास, अनुभव, त्याची नोंद (लेखन), चिंतन व चिंतनातून सर्वसमावेश असे, समाजविन्मुख तत्त्वज्ञान पुढे आणणे हा दृष्टिकोन पदयात्रा, परिक्रमा, वारी या परंपरेमागे असावा. प्रवरा परिक्रमेतून हे उद्देश साध्य होतील यावर भर देणे अत्यावश्यक ठरते.

अशा प्रकारची परिक्रमा शिवरात्रीच्या दिवशी पूर्ण करण्याचा रिवाज महादेव कोळी समाजातील आमच्या साकीरवाडी या गावातील तरुण मुले १९७० पूर्वी करत होते. शिवरात्रीच्या आदल्या दिवशी सायंकाळचे जेवण करून साकीरवाडीहून निघून हरिश्चंद्रगडावर रात्री १२ च्या सुमारास पोहोचायचे. तेथील मोठ्या गुहेतील

महादेवाच्या पिंडीभोवती ५/१२ प्रदक्षिणा घालून शिवरात्रीची पहिली आंघोळ करायची तसेच ओल्या कपड्यानिशी चालत, धावत, पळत रतनवाडी येथील अमृतेश्वराच्या कुंडात दुसरी आंघोळ करून महादेवाचे दर्शन घेऊन सर्वतीर्थ टाकेदला तिसरी आंघोळ करून, त्र्यंबकेश्वराच्या कुंडात चौथी आंघोळ करून त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेऊन शिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी शिवरात्र सोडायला साकीरवाडीस परत येत. हा प्रवास अनवाणी, पाऊलवाटेने, न खातापिता (निरंक) व पूर्ण श्रद्धेने 'ओम नमो शिवाय', 'हरहर महादेव' या मंत्राचा घोष करत १५ ते १८ तासात ६०-७० मैलाचे अंतर सहज, आनंदाने पूर्ण करत. आता सध्या अशी ज्योतिर्लिंगाची परिक्रमा आमच्या गावात करणारे कोणीही तरुण नाहीत.

**अकोले तालुक्यातील वने व वन्यजीव संपदा :-**

राष्ट्रीय स्तरावर 'सेठ व चॅम्पीयन' या वन-शास्त्रज्ञांनी भारतातील वनांचा अभ्यास करून वनांचे वर्गीकरण निरनिराळ्या प्रकारांत केले आहे. त्यानुसार अकोले तालुक्यात तीन प्रकारची जंगले आढळतात.

१. सदर्न-ट्रॉपीकल सेमी, एव्हरग्रीन वेस्ट-कोस्ट फॉरेस्ट (2A/C2)

२. सदर्न-ट्रॉपीकल ड्राय-मीक्स्ड डेसीड्युअस फॉरेस्ट (5A/C3)

३. सदर्न-ट्रॉपीकल थॉर्न फॉरेस्ट (6A/C1)

वरील तीन प्रकारची वने ही योगायोगाने अति पाऊस, मध्यम पाऊस व अत्यल्प पाऊस पडणाऱ्या क्षेत्रांत आढळतात.

अकोले तालुक्याच्या पूर्वेकडे अत्यल्प पाऊस (५००-७०० मिलीमीटर) पडतो. त्या भागात काटेरी (थॉर्न फॉरेस्ट - (6A/C1) वनस्पती आढळतात. त्यात बोर, टाहंकळ, हिवर, बाभूळ, निवडुंग (साबार) व कडूनिंब या प्रमुख वनस्पती प्रामुख्याने आढळतात. या पावसाच्या पट्ट्याच्या पश्चिमेस मध्यम स्वरूपाचा ८०० ते १२०० मिलीमीटर पाऊस पडतो. या पट्ट्यात सालई, धावडा, मोईन, आवळा, सादडा, बेहडा, कडूनिंब, महारुख, बोंडारी व साग ह्या प्रमुख वृक्ष प्रजाती ड्राय-मीक्स्ड डेसीड्युअस फॉरेस्ट (5A/C3) मध्ये आढळतात. मनुष्याला उपयोगी अशा अवैध साग वृक्षांची तोड झाल्यामुळे वनक्षेत्रांत आता सागाचे प्रमाण नगण्य आढळते. मात्र या पट्ट्यातील खासगी मालकी क्षेत्रात सागाचे प्रमाण व वाढ लक्षणीय आहे. तिसरा वनांचा प्रकार म्हणजे तालुक्यातील अति पावसाचा प्रदेश (दोन ते हजार मिलीमीटर) या सेमीएव्हरग्रीन वेस्ट कोस्ट (2A/C2) फॉरेस्ट

टाईपमध्ये सदाहरित वृक्ष प्रजातीत आंबा, जांभूळ, हिरडा, आवळा, अजनी (करप), कढीपत्ता (खिळखीळा), पीसा, पांगारा, भोमा इ. वृक्ष आढळतात. त्याव्यतिरिक्त खालच्या थरांत करवंद, आळीव, तोरण, अंभेळ, कारवी, चिल्हार, टणटणी, खाजकुहिरी, गुंज इ. लहान वनस्पती आढळतात. तसेच अनेक प्रकारच्या वनौषधी या भागात आढळतात. भारतात दुर्मिळ व नामशेष होत असलेल्या वनस्पतींची यादी 'बॉटनीकल सर्वे ऑफ इंडियाने' पुणे यांनी केली आहे. ही यादी शंभर प्रजातींपेक्षा जास्त आहे. त्यापैकी अकोले तालुक्यात दुर्मिळ व नामशेष होत असलेल्या वनस्पती-प्रजातींची यादी मोठी होऊ शकते. त्यांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी निसर्गप्रेमी व बायो-डायव्हरसिटी मंडळाने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

१९५५ पासून सर्व अकोले तालुका मी पिंजून काढला आहे. साधारणतः १९७० पूर्वी होत असलेला पाऊस, वृक्षराजी व त्यानंतर हळूहळू कमी होणारा पाऊस व लोप पावत असलेली वृक्षराजी व वने यांचा विचार केला. मी उपवनसंरक्षक, अहमदनगर या पदावर सन १९८३ ते १९८६ दरम्यान कार्यरत असताना हरिश्चंद्रगड-कळसुबाई अभयारण्य निर्माण करण्यासाठी एक वर्षभर लिखाण करून त्यावेळचे मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांना मंजुरीसाठी पाठवून ॅ१९८६-८७ मध्ये या अभयारण्यास पश्चिम घाट योजनेअंतर्गत मंजुरी मिळाली. त्यामुळे हा पर्यावरण व वन्यजीव विविधतादृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा वन्यप्रदेशास भारतीय वन्यजीव कायद्याच्या अंमलाखाली आला आहे. याची भेट म्हणून की काय १ मे १९८५ रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेस २५ वर्षे पूर्ण झाली.

**विषमुक्त सात्त्विक अन्न :-**

विषमुक्त सात्त्विक अन्नासाठी पारंपरिक तृणधान्ये हाच एकमेव पर्याय आहे. अर्थात भुकेला कोंडा व निजायला धोंडा. पूर्वी उपवा साला आपले आईवडील राजगिरा व भगर यांचा फराळ करत. राजगिऱ्याचे आरोग्यदृष्ट्या महत्त्व लक्षात घेता, सन २०१३ मध्ये जागतिक 'राजगिरा' वर्ष साजरे केले. दक्षिण आफ्रिकेतील आदिवासी समाजाच्या पोषणमूल्याचा राजगिरा एक प्रमुख भाग आहे. म्हणून हॉलिवूडमधील अभिनेत्यांनी राजगिऱ्यातील पोषणमूल्यांची व त्याचा जेवणात समावेश व्हावा म्हणून जनजागृती केली व त्याला 'सुपरफूड' म्हणून प्रमोट केले; त्यामुळे बाजारात त्याची मागणी वाढून, त्याच्या किंमतीत सुमारे ६०० टक्क्याने

वाढ झाली.

भारतात ज्याला लेसर मिलेट म्हणतात. त्याची लागवड प्रामुख्याने आदिवासी भागांत जास्त प्रमाणात केली जात असे. ओरिसा शासनाने याबाबत मोठा कार्यक्रम घेतला आहे. या मिलेटचे पोषणमूल्य, त्यातील तंतूमय पदार्थ, व्हिटॅमिन्स व मिनरल्सच्या अभ्यासांती म्हैसूर स्थित डॉ. खादर वली या शास्त्रज्ञाने या तृणधान्याच्या पारंपरिक वाणांचा अभ्यास करून कर्नाटक, आंध्रप्रदेश व तामिळनाडूच्या शेतकऱ्यांना प्रवृत्त करून, ही तृणधान्ये नैसर्गिक पद्धतीने पैदास करून त्याची पाकक्रिया, विक्री साखळी व डायबेटिक्स, बी.पी., हार्ट, कॅन्सर इ. मॉडर्न लाईफस्टाईल रोगावर १०० टक्के प्रभावी अशी उपचारपद्धती शोधून काढली आहे व त्यामुळे हजारो रोगी केवळ या तृणधान्यांच्या आहाराने व काही वनस्पतींच्या काढ्याने पूर्णपणे बरे झाले आहेत. हे अद्वितीय काम डॉ. वली गेल्या २० वर्षांपासून करतात. अस्तित्वात असलेल्या पारंपरिक तृणधान्यांची वर्गवारी त्यांनी त्यात असलेल्या पचनीय तंतूमय पदार्थ (Digestive Fibres) चे त्यात असलेल्या पिष्टमय (Carbohydrates) पदार्थाच्या प्रमाणाशी वर्गवारी केली आहे.

(अ) ज्या तृणधान्यात हे प्रमाण १:१० पेक्षा कामे आहेत अशी फक्त ५ तृणधान्ये जगात व भारतात आहेत, ती खालीलप्रमाणे-

| English Name | Botanical Name | |
|---|---|---|
| 1) Barnyard Millet | Echinochloa esculenta | वरई (भगर) |
| 2) Foxtail Millet | Setaria italica | राळा किंवा राळे |
| 3) Browntop Millet | Brachiaria ramosa | माकरा |
| 4) Kodo Millet | Paspalum Scrobiculatum | कोदो/कोदरू/ कोद्रू |
| 5) Little Millet | Panicum Sumatrensis | सावा (हलवी) |

या ५ तृणधान्याला त्यांनी Siridhanyalu असे नाव दिले. Siri म्हणजे Sirniwas (श्रीनिवास) म्हणजे विष्णू ज्यात विष्णूचा वास आहे ती धान्य. (जेथे विष्णूचा वास आहे तेथे विषाणूंचा वास कसा असेन?) धान्याळू म्हणजे धान्य.

विष्णूचा पहिला अवतार मस्त्य म्हणजे मासा. आपण या ५ तृणधान्यांची नावे लक्षात ठेवण्यासाठी सोपा एकच शब्द लक्षात ठेवू या. तो म्हणजे ‘कोरीव मासा’ को = म्हणजे कोदो, रा = म्हणजे राळा, व = म्हणजे वरई, मा = म्हणजे

माकरा व सा = म्हणजे सावा.

(ब) ज्या तृणधान्यांत तंतूमय पदार्थ व पिष्टमय पदार्थ याचे प्रमाण १० ते ६० आहे :- यांना न्यूट्रल तृणधान्ये (Neutral Millet) संबोधले आहे, ती अशी-

१) बाजरी २) ज्वारी ३) मका ४) नाचणी ५) प्रोसो मिलेट

(क) ज्या धान्यात तंतूमय व पिष्टमय पदार्थांचे प्रमाण १:६० पेक्षा जास्त आहेत, ती खालीलप्रमाणे :-

१) गहू = ६३.५० (यात ग्लुटेनचे प्रमाण जास्त)

२) तांदूळ = ३९५.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ही ५ तृणधान्ये जास्तीत जास्त पावसाच्या प्रदेशांत तर येतात तशी ती कमीतकमी व दुष्काळी भागांतील चांगल्या रितीने पैदा होतात.

ज्यावेळी आमच्या गावी (साकीरवाडी) रस्ते नव्हते (१९७२ पूर्वी) व राईस मिल नव्हत्या, तेंव्हा प्रत्येक घराच्या अंगणात व आत घरात उखळे व जाते होती. या उखळात मुसळाच्या सहाय्याने भात कांडून तांदूळ वेगळे केले जात. माझी आई हे उखळात सडलेले (कांडलेले) भात सुपाने पाखडून कोंडा वेगळा करून तांदूळ वेगळे करत असे. पाखडताना मोठा कोंडा वेगळा करून तो पाण्यात थोडावेळ ओला करून गाई-बैलास चंदीमध्ये मिक्स करून देत. पिठासारखा अगदी बारीक कोंडा जो सुपाला चिटकून रहात असे तो वेगळा काढून, त्यात थोडा गूळ कालवून त्याचे लहान लहान लाडू बनवून आम्हाला खायला देत असे. त्याचप्रमाणे जात्यावर दळलेले पीठ भाकरीसाठी घेताना ते लोखंडी पिठाच्या चाळणीने चाळून घेत असे. चाळताना चाळणीत जो काही कोंडा शिल्लक रहात असे, त्यात काही काडी-कचरा असल्यास तेवढा काढून उरलेला कोंडा पुन्हा पिठात टाकून भाकऱ्या करत असे. माझी आई अशिक्षित होती, पण ती जी त्यावेळी करत होती ती आजच्या वैद्यकीय शास्त्र शिकलेले तत्त्व म्हणूनसुद्धा आचरणात आणण्यास सांगत नाही. कोणत्याही शाळेत न गेलेल्या, लिहिता-वाचता न येणाऱ्या माझ्या आईला हे पचनई तंतूमय पदार्थांचे (डायझेस्टीअेबल फायबरचे) आरोग्यदृष्ट्या महत्त्व कोणी शिकविले असेन? तर ते परंपरेने. म्हणून परंपरेने चालत आलेल्या पद्धती/चालीरितीची नोंद घेऊन, त्यांचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करून त्या पाठीमागचा हेतू (तत्त्व) समजून अशा परंपरा समाजाने पुन्हा

अंगिकारल्या पाहिजेत असे मला वाटते.

**जागतिक स्तरावर पेटंट घेऊन निर्यात करता येणाऱ्या गोष्टी :–**

**१) करवंद–आसव (मोहा–आसव, जांभुळ–आसव, आंभेळ–आसव) :–**

आपणाकडे एवढे डोंगर, माथे, उतार उघडेबोडके आहेत. त्यावर निरनिराळ्या प्रकारच्या वाईन बनविण्यासाठी उत्तम करवंदाची फळे लागणाऱ्या जाळीचा (गोड, आंबट–गोड, कडू) अभ्यास व निवड केली आहे. (पुण्याच्या आधारकर इन्स्टिट्यूटमध्ये यावर काही काम झाले आहे. चैत्र पालवी येताच करवंदीच्या फांद्यातून नवीन कोवळे कोंब फुटतात. ते कात्रीने कापून, बारीक वाळू भरलेल्या ट्रेमध्ये पाणी व सेरेडेक्स पावडर घालून घरी आणून ठेवण्यास महिनाभरात त्याला मुळं फुटतात. अशी लहान रोपे मोठ्या पिशवीत भरून मोठी रोपे तयार करता येऊ शकतात.) द्राक्षावर त्याच्या छाटणीपासून २०–२२ वेळा निरनिराळे रासायनिक फवारे दिले जातात व वादळी पावसांत व ढगाळ हवामानात या द्राक्षबागांचे अतोनात नुकसान होते व द्राक्ष बागायतदार कर्जबाजारी होतो व शासनास त्यांच्यासाठी आर्थिक मदत करावी लागते. म्हणून करवंद व इतर रानमेव्यांपासून (जांभळ, तोरण, आंभेळ, मोहा, फुले) नैसर्गिक, आरोग्यदायी व जागतिक स्तरावर नंबर एक होऊ शकतील अशी दर्जेदार वाईन्स बनविता येते याचा मला अनुभव आहे. यातून डोंगरउतार पडिक जमिनीवर वृक्षसंपदा वाढून पर्यावरण संवर्धन, रोजगार निर्मिती ही उद्दिष्ट्ये साध्य होतील. यासाठी नाशिक, पुणे जिल्ह्यातील वायनरीनी या भागातील मुला–मुलींना (ही फळे गोळा करणाऱ्यांना) सभासद करून त्यांची एक 'वायनरी विकास संस्था' स्थापन करता येऊ शकते. त्यासाठी फळांच्या हंगामात दररोज मोबाईल व्हॅनवर यंत्र बसवून फळांपासून रस व बी वेगळे करणे व तो रस मध्यवर्ती ठिकाणी आणून त्यापासून अतिउत्कृष्ट वाईन बनविता येऊ शकते. तसेच वायनरी हा घरगुती हस्तव्यवसाय म्हणून त्या भागातील मुला–मुलींना वाईन तयार करण्याचे प्रशिक्षण दिल्यास वाईन उद्योग हा एका वर्षात हजारो मुलांना रोजगार व हमखास उत्पन्नाचे साधन होऊ शकते.

त्या निमित्ताने कळसुबाई या महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखरावर इतिहासातला पहिला तिरंगा ध्वजारोहण सोहळा माझ्या हस्ते पहिल्यांदा पार पडला व त्यानंतर दरवर्षी आता १ मे रोजी तेथे ध्वजारोहण होत आहे. वन्यप्राण्यांच्या अभयारण्यातील क्षेत्रांत वृक्षसंपदाची घनता व विविधतेचे प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे वन्यजीव/

वन्यप्राणी यांच्या शिकारीमुळे होणाऱ्या ऱ्हासास पायबंद बसला आहे. त्यामुळे बिबटे, पिसोळी, कोल्हे, तरस, शेखरू इ. वन्यप्राणी तसेच रानडुक्कर व मोर, सांबर यांचे प्रमाण वाढल्याने जवळपासच्या शेतकऱ्यांच्या पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या अभयारण्याच्या स्थापनेमुळे अवैध गुरेचराई, चोरटी तोड, शिकार बंद झाली आहे. तसे इको-टुरिझममध्ये वाढ झाल्याने स्थानिक तरुणांना बऱ्यापैकी रोजगार व आर्थिक लाभ होत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जीव विविधता वाढली आहे त्यामुळे निसर्गाचे संतुलन राखण्यास मदत होत आहे.

**अकोले तालुक्यातील काही प्रमुख वैशिष्ट्यपूर्ण बाबी :-**

अकोले तालुका म्हटला की, नैसर्गिक विविधतेने नटलेला भूभाग. यात नैसर्गिक शेती, स्थानिक पारंपरिक पिके व बी-बियाणे, जातीवंत डांगी गाईचे (व वळूचे) संगोपन, वनौषधी व ग्रामीण वैद्य परंपरा, अपार वृक्ष व वन्य पशूपक्षी विविधता, मासे, खेकडे, मध गोळा करणे, रानभाज्या, रानमेवा, सांस्कृतिक कार्यक्रम, सण, लग्नपद्धती, पेहराव, आठवडी बाजार, मोढा, स्वातंत्र्यसंग्राम, शौर्य, कथा, ग्रामीण क्रीडाप्रकार, इरजीक, जत्रा, यात्रा, उरूस, बोहडा, भारूड, सप्ता, भजन, कीर्तन, वनउपज (हिरडा, पिसा, खिळखीळा), मंदिरे, गड, किल्ले, शिखरे, पाऊस इ. विविधता पहायला मिळते.

**महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर - कळसूबाई :-**

कळसूबाई हे महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर आहे. या भागात तीन ते चार महिने धो-धो पाऊस पडतो. थोडक्यात महाराष्ट्रातील सर्वात उंच स्थान व भरपूर शुद्ध पाणी. याचाच दुसरा अर्थ येथून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पिण्याचे पाणी १२ महिने उपलब्ध करून देता येऊ शकते. महाराष्ट्राचे राहू द्या, जिल्ह्याचे राहू द्या कमीतकमी उन्हाळ्यातील चार महिने (फेब्रुवारी ते मे) अकोले तालुक्यातील डोंगराळ, आदिवासी भागातील नागरिकांना दिवसातून १ तास नळाचे पिण्याचे पाणी घरपोच का देता येत नाही?

**गड किल्ले :-**

प्रवरा खोऱ्यात रतनगड, आलंग, कुलंग हे गड, आढळ्या खोऱ्यात पाचपट्टा (विश्रामगड), मुळा खोऱ्यात हरिश्चंद्रगड व कोंबड किल्ला असे अनेक गड किल्ले आहेत. ज्यास हजारो वर्षांचा इतिहास आहे. त्याची डागडुजी व देखभाल व्यवस्था जोपर्यंत स्थानिक गावकऱ्यांवर सोपविली जात नाही तोपर्यंत आहे तीच

स्थिता कायम राहील. कोंबड किल्ल्यावर घोड्यावरून बाजारहाट करणाऱ्यांची बाजारपेठ पाहायला मिळते. हा किल्ला अजूनही दुर्लक्षित आहे.

**सांदन दरी :–**

शेंडीवरून उडादावणे–पांजरेस एकमेव व अद्वितीय उत्तरेस सांदन (सांधन) दरी आहे. ही एक नैसर्गिक दरी फॉल्टमुळे तयार झाली आहे. त्यातून सफर करणे, त्यातील जीव विविधतेचा अभ्यास करणे व पर्यटकांनी टाकलेल्या प्लॅस्टिक इ.सारख्या न कुजणाऱ्या वस्तू गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे गरजेचे आहे.

**भंडारदरा धरण (विल्सन डॅम) :–**

१०० वर्षांपूर्वी दगड व चुन्यामध्ये बांधलेले हे धरण एका दुरुस्तीनंतर अजूनही भक्कम आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या रुंदी ही कमीतकमी असून इतक्या उंचीवर दगड चुन्यांत बांधलेले १०० वर्षे टिकलेले हे एकमेव धरण आहे. याचा अंब्रेला फॉल पहाण्याची मजा काही औरच. अनेक चित्रपटांचे शुटिंग या ठिकाणी झाले आहे.

**रंधा फॉल :–**

भंडारदरा धरणाच्या खाली प्रवरा नदीवर रंधा या गावाजवळ प्रवरेवर जो नैसर्गिक फॉल आहे, त्यास रंधा फॉल असे म्हणतात. हा फॉल १०० फुटांपेक्षा उंच आहे. या ठिकाणी पाण्याच्या दाबामुळे खडकांत खोलवर असे खळगा पडला आहे. त्याची खोली मोजता येत नाही अशी आख्यायिका आहे. या परिसरात अत्यंत दुर्मिळ अशा वनस्पती प्रजाती आढळतात. येथेही अनेक चित्रपटाचे शुटिंग होते. जवळपास वाल्मिक ऋषींचा आश्रम आहे. येथे आदिवासी महादेव कोळी समाजाचे घोरपडा मातेचे मंदिर आहे. निसर्गातील घोरपडीस दैवत मानून त्याची हत्या न करण्याची परंपरा ही हा समाज निसर्गाशी किती एकरूप झाला आहे हे दर्शविते व तो निसर्गासच आपला देव मानते.

**काजवा महोत्सव :–**

पावसाळा सुरू होण्याच्या काळात ७ ते ३० जून या दरम्यान या भागातील जंगलांत अगणित काजवे पहायला मिळतात. त्यांचे नृत्य व रचना केवळ विलोभनीय आहेत.

**कौठवाडीचा कठा व राजूरचा उरूस :–**

अक्षय तृतीयेनंतर येणाऱ्या रविवारी येथे बिरोबाची यात्रा भरते. त्या दिवशी नवस केलेले, राजूरहून काळे मोठे मडके (माठ) आणतात. खैराची फोडलेली लाकडे व गोडेतेल आणतात. देवळाच्या पुढे सदर माठ उपडा ठेवून त्याचा एकतृतीयांश भाग करवतीने कापला जातो. त्यात खैर आदींची फोडलेली लाकडे भरून दिवसभर त्यावर गोडेतेल सोडले जाते. वरून पांढऱ्या कापडाने बांधून घेतात असा माठ एका परातीत ठेवला जातो व सायंकाळी साकीरवाडीहून जहागिरदाराची मानाची काठी येऊन भैरोबास वाजतगाजत, नाचत प्रदक्षिणा घालून देवाला शिवल्यावर डाखे सुरू होतात. त्या डाख्यांच्या ध्वनीलहरीमुळे ज्या भगताच्या अंगात येते, तो देवापुढे जाऊन पेटवलेला कठा उचलण्याची परवानगी मागतो. परवानगी मिळाल्यानंतर ज्या भगतांच्या अंगात आले असते त्याचे सर्व कपडे काढले जातात व पेटविलेला कठा डोक्यावर चुंभळ ठेवून मंदिराभोवती वाजत–गाजत परिक्रमा घालण्यास सुरुवात होते. एक पासून तीस परिक्रमा घातल्या जातात व सतत त्यावर गोडेतेल ओतले जाते. डोळ्यात तेल जाऊ नये म्हणून खबरदारी घेतली जाते. सर्व कठे नाचून झाल्यावर दर्शन व नारळ फोडण्यास परवानगी असते. रात्री लोकनाट्याचा कार्यक्रम होतो. जाताना रेवड्या, शेंगोळे, मुरमुरे व डाळ्या याचा प्रसाद म्हणून घरी नेतात. दुसऱ्या दिवसापासून म्हणजे सोमवार ते बुधवार राजूरचा उरूस असतो. पिराचा संदल काढला जातो. या तीन दिवसात दुर्गम भागात राहणारे आदिवासी पावसाळ्यात लागणाऱ्या मीठ, मिरची, कांदे, लसूण, बटाटे, सुकी मच्छी इ. आवश्यक गोष्टी खरेदी करतात. या काळात मधाची विक्री होते. शेतीसाठी लागणाऱ्या बैलांची विक्री मोठ्या प्रमाणात होते. रात्री येथे दोन–तीन दिवस तमाशाद्वारे करमणुकीचे कार्यक्रम होतात. या उरूसानंतर तालुक्यातील यात्रा/जत्रांचा शेवट होतो.

**नैसर्गिक शेती व पारंपरिक पीकपद्धती व बियाणे :–**

प्रवरा व अत्यल्प प्रमाणात मुळा नदीमधून लिफ्टने पाणी उचलून केलेली बागायती शेती वगळता या भागात १९७० पूर्वी १०० टक्के नैसर्गिक व सेंद्रीय शेती केली जात होती. त्यात भातखाचरात रायभोग, जी खेळ, काळभात, आंबेमोहर इ. सुगंधी भाताच्या वाणाबरोबरच कोळपी, ढौळ, वरंगळ इ. भात जाती घेतल्या जात. खरिपात नागली, वरई, सावा, भादली, खुरासणी, उडीद, हुलगे, गोड वाळ

ही प्रमुख तृण, तेलबिया व कडधान्ये घेतली जात. रब्बीमध्ये पाऊस संपताच हरभरे व कडू वाल व खोल सुपिक जमिनीत गहू (बक्षी, बोडका), मसूर ही मिश्र पिके घेतली जात. कडू वाल व हुलगे इतके व्हायचे की अनेकवेळेला त्याची भरड करून दुभत्या गाई व डांगी वळूंना चंदी (खुराक) म्हणून दिला जाई. उन्हाळ्यात जनावरांसाठी शेतातील कडू वालाच्या शेंगांच्या दोन-तीन तोडण्या झाल्यानंतर तो उपटून जनावरांना हिरवा चारा मिळे. जंगलातील उतारावरील क्षेत्रांत उंबर व तिवस यांचा हिरवा पाला उन्हाळ्यात जनावरांना देत असत. त्यावेळी दूध डेअरी नव्हत्या. फक्त राजूर, अकोले, कोतूळ, ब्राह्मणवाडा, समशेरपूर या शहरांत काही प्रमाणात हॉटेलमध्ये दुधाचा रतीब घालत असत. त्यामुळे प्रत्येक घरात दूधदुभते, ताक, दही, तुपाची रेलचेल होती. लहान मुलापासून म्हाताऱ्या माणसाचे दूध-भात हे प्रमुख अन्न होते. त्यामुळे प्रत्येक गावात कुस्ती खेळणारी मुले व तरुण आढळत. गावोगावी जत्रेच्या दुसऱ्या दिवशी भरणाऱ्या हगाम्यात शेकडोंनी पहिलवान भाग घेत. सकस, नैसर्गिक व सेंद्रीय अन्न व दूधदुभते यामुळे लहान थोरांचे आरोग्य टिकून होते. मात्र १९७० नंतर हरित व धवलक्रांतीच्या नावाखाली हायब्रीड बियाणे वाटलं गेले.

**डांगी गाय व वळू :-**

शरीरावर पांढऱ्या रंगावर काळे ठिपके, आखूड शिंगे, स्वभावाने गरीब, कातडीमध्ये तेल स्त्रवणाऱ्या ग्रंथी त्यामुळे अति पावसात ही जात टिकून आहे. जातीवंत गाई-बैलांची पैदास व संगोपन करण्यासाठी 'डांगी गोसेवा मंडळ' गेले ७० वर्षे कार्यरत आहे. दरवर्षी डिसेंबर महिन्यात राजूर येथे तीन दिवसाचे डांगी गाई, वासरू, वळू, बैल यांचे प्रदर्शन भरते. त्यात उत्कृष्ट जनावरांना रोख बक्षिसे व प्रमाणपत्र दिले जाते. या डांगी गाईची जोपासना, सांभाळ करणारा महादेव कोळी समाज तर आहे, परंतु खिरविरे, कोंभाळणे येथील कानडी समाज, समशेरपूर येथील अहमद सदर व इतर मुस्लिम समाज, सावरगाव पाट, शेरणखेल येथील कुणबी (मराठा) समाज प्रामुख्याने डोळ्यापुढे येतात. प्रदर्शनात अशा जातीवंत वळूस पहाण्यास तिकीट लावलेले मला आठवते. प्रदर्शनाचे वेळी मोठ्या प्रमाणात गाई-बैलांची विक्री होते. गाई जरी दूध कमी देत असल्या तरी त्यांचे शेण, गोमूत्र शेतीसाठी उपयुक्त आहे. तसेच बैल काटक व जड कामे करण्यास उत्कृष्ट आहेत. हवामान व पावसाळा बदलल्यामुळे आजमितीस या भागात डांगीव्यतिरिक्त दुष्काळी

भागातील खिलारे बैल शेतीसाठी उपयोगात आणले जात आहेत. गेल्या ६०-७० वर्षात प्रचंड पडणारा पाऊस, घोंगडी, इरले शिवाय पावसाळ्यात गुरे चारता येत नसत किंवा शेतकामे करता येत नसत. आज साधी छत्रीसुद्धा वापरण्याची गरज पडत नाही एवढा हवामान बदल गेल्या साठ वर्षात झालेला मी पहात आहेत.

**रानभाज्या :-**

पावसाळा सुरू होताच चाई, बडधे, कुरडू, पंध अशा शेकडो प्रकारच्या रानभाज्या रानोमाळ मिळत. अन्न हेच औषध आहे असे खऱ्या अर्थाने जगणारी पिढी पन्नास-साठ वर्षापूर्वी होती. मेका, कर्टुले, गामेटी, वाळूक, दोडके, कार्ले, काकडी, घेवडे, वाल, खुरासणीची कोवळी भाजी याचा सर्रास वापर दररोजच्या जेवणात ऋतूमानाप्रमाणे होत असे. भाजीपाला कधी विकत आणलेला मी पाहिला नाही.

**रानमेवा :-**

उन्हाळ्यात व्हिटॅमिन 'सी' जी रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यास मदत करते असा रानमेव्याचा सडा शेताच्या आजूबाजूला पडलेला असायचा. प्रथम आंभेळ, ती संपताच तोरणं, नंतर करवंद व आंबे व पाऊस पडण्याच्या सुमारास आळवं हा प्रचंड ठेवा सर्वत्र पहायला व चाखायला मिळत असे. त्यामुळे सकाळची कामे आटोपताच बच्चेकंपनी रानोमाळ फिरून रानमेव्याचा यथेच्छ आस्वाद घेत. त्याचबरोबर करवंदीच्या जाळीत, बांधांच्या दगडात, आंबे व इतर झाडांवर मधमाशांची मोहळं शोधून ती काढून तो मध तेथेच खाऊन व पोळे भाजीसाठी घरी घेऊन येत. त्यापासून भाजी व कुंकू लावण्यासाठी मेन मिळे. मधमाशांच्या एकेरी, सातेरी व आग्या या प्रमुख जाती होत्या. मात्र आग्या मोहळाचे मध काढण्यासाठी कोळी व ठाकर समाजातील जाणकारच त्याचे मध काढत. आग्या मोहळाची शेकडो पोळे हरिश्चंद्रगडसारख्या कड्यावर आढळत. त्याची मध काढण्यासाठी ठराविक वेलांचा जाड दोर बनवून तो कड्याच्या वरच्या बाजूला बांधला जाई. रात्र झाल्यानंतर टेंभ्याच्या उजेडात ही मंडळी दोरावरून खाली येत व जेथे आत कपारीला आग्या मोहळ आहे तेथे झोका घेऊन एका हातात पाटी व दुसऱ्या हातात मोठी उलथनी (कलथा) घेऊन एका झोक्यात उलाथनीने पोळे कापायचे व दुसऱ्या हाताने ते पाटीत झेलायचे. हा मध काढण्याचा प्रकार म्हणजे फार मोठे धारिष्ट्य व कसब असणारेच हे काम करत. या पोळ्यातून निघालेला मध दहा

लिटरच्या डब्यात भरून राजूरला उरूसाचे वेळी विक्री करत. लहान मुलांना दुपारचा छंद म्हणजे जेथे उन्हाळ्यात पाणी दिसते तेथे मधमाशा पाणी प्यायला (चुंभायला) येतात, तेथे जाऊन त्यापैकी एक-दोन मधमाशा हळूच पकडून त्यांच्या शेपटीची नांगी बाहेर काढून त्याला लुगड्याचा रंगीत धागा बांधून, मधमाशीला हवेत सोडून दिल्यावर ती जिकडे जाते तिच्या पाठीमागे पळत जाऊन ज्या झाडावर ती जाते तेथे जाऊन पोळे शोधून त्याचा मध काढणे हा द्रविडी पोरखेळ अनुभवला नसेल असा एकही मुलगा गावात सापडणार नाही.

उन्हाळा संपून पावसाळा सुरू होताच रानमेवा संपताच रानभाज्यांचा हंगाम सुरू होत असे. शाकाहारींसाठी ती एक मेजवाणीच असे, परंतु निसर्गाने मांसाहारींसाठीसुद्धा तितकीच सोय करून ठेवलेली असे. निरनिराळ्या प्रकारचे मशरूम उदा. भुईफोड, छत्री आळंबी व वारुळावर येणारी लहान पण सर्वात चविष्ट अशी बारीक आळंबी बऱ्यापैकी मिळत असे. पहिला मोठा पाऊस झाला की नद्यांमधून आढ्यात, कडेकपारी चढून मळे, मुऱ्हे व खवले मासे वर वर अगदी भातशेतांत येत. त्यावर भोताड (मोठी मळई) लावून भरपूर मासे मिळत. त्यानंतर भातशेतात भाताची लागवड होऊन महिना दीड महिना झाला म्हणजे शेतं हिरवीगार होताच सांडीच्या खड्डयात मुऱ्हे मासे पहायला मिळत. ते पकडण्यासाठी पितळ्यावर कापड बांधून व त्यास एक इंचाचे भोक करून व त्याचे आसपास दही, भात, भाकरीचा कुस्कूर (भुगा) किंवा बेरकडी खेकडी चेचून त्याचा भाग टाकला म्हणजे मुऱ्हे मासे हळूहळू पितळीत जात, त्यांच्या जाण्या-येण्यावर लांबून नजर ठेवून, पुरेसे आत गेल्यावर अलगद पितळीजवळ जाऊन कापडाच्या भोकावर हात ठेवून पितळी उचलून, पाणी गाळून त्यात आलेले मासे तांब्यात साठवून ठेवत. असे सात-आठ वेळा केले की कुटुंबाची गरज भागेल एवढे मासे मिळत. मुऱ्हा माशास खवले नाहीत की मोठा काटा नाही. लहान मुलाच्या करंगळीच्या आकाराचे हे मासे, माझ्या मते सर्वोत्तम आहेत व तेही भातशेतात. पावसाळा सुरू होताच भातशेत पाण्यानी संपृक्त (उपाळल्यावर) त्यातून हजारोंच्या संख्येने बेरकड नावाच्या पांढऱ्या रंगाच्या खेकडी बाहेर पडत. सायंकाळ झाली की जिकडे तिकडे कोल्हेकुई सुरू होई. भातशेतीच्या कडेने कोल्ह्याचे कळप या बेरकडी खेकड्यांचा आस्वाद घेत रात्रभर फिरत असत. आज ही कोल्हेकुई ऐकायलाही मिळत नाही. याचवेळी सर्वत्र काजवेच काजवे चमकत. ते पकडून बाटलीत भरून विजेरीसारखा

उपयोग करण्यात लहान मुलांना हौस वाटे. या बेरकडी खेकडी सहसा कोणी खात नसत. जेथे कडा व तोही तांबडा, तेथे लहान-मोठा धबधबा असे तेथे लाल रंगाच्या गिंधोडी खेकडी पहावयास मिळत. त्याही कोणी खात नसत. चुकून विरंगुळा म्हणून मुले भाजून खात. तिसरा खेकडीचा प्रकार म्हणजे किरवे. डोंगरमाथ्यावर, दलदलीच्या प्रदेशांत व अति पावसाच्या प्रदेशांत आढळणारी ही जात. आकार लहान. त्यांना पकडून रस्सेदार कालवण व भात हा डांगाणातील पावसाळ्यातील एक मुख्य अन्नप्रकार. चौथा व सर्वोत्तम खेकड्याचा प्रकार म्हणजे चिंभोरी. ही बऱ्यापैकी मोठी, मांसल, मोठे नांगे असणारी व काळी कभिन्न रंगाची. पावसाळ्याच्या सुरुवातीस यांची मादी आपल्या शरीरात अंडी व उबलेली लहान लहान असंख्य पिल्ले घेऊन फिरत असे. त्यांना पकडले जात नसे. सर्वसाधारपणे श्रावण संपल्यावर भाद्रपद व अश्विन महिन्यात भातशेतात, दगडाखाली, बांधाच्या कडेला या खेकडी मिळत. रात्र होताच टेंभा पेटवून भातखाचरांच्या कडेने फिरून चिंभोऱ्या पकडत. पंधरा-वीस मिळाल्या की कुटुंबाचे एकवेळचे काम झाले की मंडळी घरी येत. दिवसा जेथे या खेकडीचे मोठे बिळ आहे त्या ठिकाणी लहान मुले लव्हाळ्याच्या एका टोकास बेडकास मारून बांधत व तो भाग खेकड्याच्या बिळात हळूहळू सरकवत. बेडकाच्या वासाने बिळातील खेकडे त्याला पकडून आणायला लागली की हळूहळू लव्हाळा वर घेत व हाताने मोठी खेकडे पकडत. पावसाळा संपत येताना बांधावर, घरावर लावलेले काकडी व डांगराचे व वाळूक पिकलेल्या पिकू लागे. वाळूक खाण्यास गोड पिठूळ. काकडी व डांगराच्या गुळ व तांदळाचे पीठ घालून गोड भाकरी करत. गुळाच्या गुळवण्याबरोबर या भाकरी खाल्ल्या जात. हिवाळा सुरू होताच हरभरा व गव्हाची पेरणी नैसर्गिक ओलीवर करत. भरपूर दव पडत असल्याने थंडी खूप असे. अशावेळी गोडवालाच्या दाणे भरलेल्या शेंगा आणून त्या मिठाच्या पाण्यात उकडून सायंकाळी खात. लहान मुले, गुराखी मात्र गोडवालाच्या शेंगा तोडून त्याची फोंड लावत. त्यासाठी अंदाजे दोन फुटाचा खड्डा खोदला जाई. जवळपास दगडाच्या भरपूर चिपा गोळा केल्या जात. रान गवऱ्या (रान शेण्या) गोळा करून त्याचा ढीग लावून त्यात या दगडाच्या चिपा तप्त करत व त्या चिपा खोदलेल्या खड्ड्यात काठीने व्यवस्थित लावून त्यावर गोडवालाच्या दाणे भरलेल्या शेंगा पसरवत व त्यावर फांगुळण्याचा पाला टाकून पुन्हा वरून गरम चिपा व गरम राख लावून मातीने बंद केले जाई.

दुसऱ्या दिवशी ती पोंड उकरून गरम गरम स्वादिष्ट व चविष्ट शेंगातील दाणे (प्रोटीन्स) खाण्याची मजाच और आहे. हरभरा पेरून एक महिना झाल्यावर लहान मुली, बायामाणसं हरभऱ्याची भाजी दोन्ही हाताच्या बोटांनी भरभर खुडून आपल्या पाटीत भरत. दोन-तीन तासात मोठी पाटी भरेल इतकी हरभऱ्याची भाजी (आंब असलेली) खुडून त्याची दोन्ही वेळेला भाजी केली जाई. नागलीची भाकरी व हरभऱ्याची भाजी हा सर्रास बेत असायचा. गव्हात चिल नावाचे तण उगवते. चिल म्हणजे एक रानटी चाकवत. त्याची कोवळी पाने भाजीसाठी उपयोगात आणत. हिवाळा संपला की कडू वालाच्या शेंगांच्या दाण्याची आमटी व भात हे घरोघरी केले जाई व सरतेशेवटी हरभऱ्याचा हुळा व गव्हाच्या ओंब्या या पौष्टिक आहाराचा आस्वाद लहान-मोठे सर्व घेत.

थोडक्यात निसर्गाने मानवाला भरपूर दिले आहे. त्या त्या ऋतूमानाप्रमाणे कोणते अन्न (व औषध) मानवाला हवे आहे ते ते निसर्गाने दिले आहे, परंतु आपण आधुनिक शेती, यंत्र व रसायनाचा वापर केल्यामुळे ही जीव विविधता नष्ट झाली आहे. हे चित्र आज पहायला मिळत नाही. पुणतांब्याचे चंद्रकांत बारहाते म्हणतात, 'विकासाची वाटचाल विनाशाकडे' हेच खरे आहे हे सूज्ञास पटल्यावाचून राहणार नाही. पुन्हा निसर्गाकडे गेल्याशिवाय, शहराकडून गावाकडे गेल्याशिवाय माणूस नावाचा प्राणी पहायला मिळेल असे वाटत नाही.

**प्रवरा परिक्रमेतून काय शिकायचे, शिकवायचे व साध्य करायचे :-**

दुर्मिळ वनौषधी व दुर्मिळ नष्टप्राय होत असलेल्या वनस्पती प्रजातींचे जतन व पुनरुज्जीवन करण्यासाठी अशा वनस्पती कोणत्या या ओळखण्याची सवय शाळेत, हायस्कूल व कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुला-मुलींना हवी. त्यासाठी स्वयंसेवी टॅक्सॉनॉमिस्टची (वनस्पतीशास्त्रतज्ज्ञ) गरज भासेन. हे काम शिक्षक, प्राध्यापक सहजरित्या करू शकतील. यासाठी वर्षातून बारा वेळा, प्रत्येक महिन्यातून एकदा, मुलांची सहल त्या-त्या गावांतील वनक्षेत्रांत, पडिक जमिनीवर सातत्याने काढल्यास त्या वनस्पतींची पाने, फुले, फळे असलेला फोटो काढून तो स्वयंसेवी टेक्सॉनॉमिस्टला पाठवायचा. हे टेक्सॉनॉमिस्ट आपणाला त्याचे वनस्पतीशास्त्रीय नाव व कुळ (फॅमिली) कोणते ते कळवतील. काही वनस्पती या पावसाळ्यात फुलतात/ फळतात, तर काही हिवाळ्यात व बऱ्याच वृक्ष प्रजाती उन्हाळ्यात. पान, फुल व फळ असलेली एक छोटीशी फांदी वर्तमानपत्रात घालून ती घरी आणून, त्यावर

जड वजन ठेवले तर ७-८ दिवसांत आपणास उत्तम प्रेस झालेला नमुना मिळेल. ज्या मुलाने तो नमुना मिळविला त्याने त्याचे नाव, गाव, गावातील कुठल्या भागातून तो मिळविला ते ठिकाण, तारीख व ग्रामीण वैद्याच्या किंवा जुन्या जाणत्या वयस्कर गृहस्थाकडून त्याचे स्थानिक नाव व उपयोग याची माहिती लिहून हरबेरीयम शीट (जाड खाकी कागद दीड फूट बाय एक फूट) यावर टेपने चिकटून असे हरेबरीयम शीट शाळा, हायस्कूल व कॉलेजमध्ये आतील भिंतीवर प्रदर्शित करावेत. यातून आपापल्या गावची जैवविविधता कोणती आहे याचा अभ्यास होईल. लहान वयात लागलेल्या या चांगल्या सवयी त्या मुलांना निसर्गप्रेमी बनवतील व हीच मुले पुढे आपली पारंपरिक वनौषधी व दुर्मिळ वनस्पतींचा ठेवा जतन करतील.

ज्या वनस्पती औषधी म्हणून उपयोगात आणल्या जातात किंवा दुर्मिळ आहेत अशा वनस्पतीचे बी गोळा करून त्यापासून शाळेत, हायस्कूल, कॉलेजमध्ये मोकळ्या जागेवर किंवा छतावर छोटी रोपवाटिका करता येईल. कमवा व शिका या उक्तीचा धडा लहान वयात मिळेल व ही रोपे प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपापल्या शेतात, घरी, वनक्षेत्रात जूनमध्ये लागवड करून वनमहोत्सव साजरा करू शकतील. सामाजिक वनीकरण विभाग, कृषि खाते व वृक्षप्रेमी संघटना ह्या अशा शाळा, हायस्कूल, कॉलेजांना लागणारे आवश्यक ते साहित्य व मार्गदर्शन करू शकतील. यातून पर्यावरण बचाव चळवळ तळागाळात जायला मदत होईल.

शेतीभातीमधील पारंपरिकता, वन्यवनस्पती प्रजाती, प्राणी प्रजाती, दुर्मिळ होत चाललेल्या वनस्पती, सुगंधी पिके इ. गोष्टींची पारंपरिक नावे, शास्त्रीय नावे, माहिती आणि जतन करण्यासाठीची उपाययोजना यांविषयी तपशीलवार माहिती मी ग्रंथीत केली आहे. त्यात प्रवरा खोऱ्यातील माहिती तर आहेच; त्याचबरोबर महाराष्ट्रातील सर्व वनक्षेत्रांची माहिती आहे. अभ्यासकांनी, जिज्ञासूंनी थेट माझ्याशी संपर्क साधावा. आता पुस्तकरूपानेही माहिती प्रसिद्ध होत आहे. माझा संपर्क क्र. ९४२२८०५२०१ email : arvindbhange7@gmail.com

**– ए. बी. भांगरे**

**मो. ९४२२८०५२०१**

●●●

# ७) आदिवासी आणि प्रवरा अनुबंध

**प्रस्तावना :–**

कळसुआई प्रवरा माईच्या लेकरांची कथा, व्यथा आणि वास्तविक स्थितीचा फेरफटका मारून प्रवरा परिक्रमा निमित्ताने प्रवरा नदीकाठी वसलेल्या डांगाण भागातील गावांचा चौफेर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

अकोले तालुक्यातील डांगाण भागात म्हणजे राजूर, रंधा, भंडारदरा, बारी, साम्रद, घाटघर, रतनवाडीसह प्रवरेचा पट्टा, बाजूला शेनीत, देवगाव ते तिरडा पाचपट्टा, इकडे पळसूनडे फोफासंडीपासून तळे, कोथळे, कोहणेसह हरिश्चंद्रगड, मुळणाई भागात प्रामुख्याने कोळी महादेव, ठाकर, कातकरी या आदिम जमाती राहतात. डोंगर-दऱ्या, गड-किल्ले, चढ-उतार, नदी-नाल्याचा झाडा-झुडुपांचा, हा प्रदेश निसर्गाचा ठेवा आहे आणि तो इथल्या लोकांनी जपून ठेवला आहे. इथल्या आदिवासी लोकांच राहणीमान, बोली भाषा, परंपरा, कला संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण असून त्याची जपवणूकदेखील केलेली आहे.

**जीवनशैली :–**

डांगाण भागातील आदिवासी लोकांचं राहणीमान साधं सरळ आहे. येथील लोकांचा पेहराव महिलांचा धांदुक फडकी तर पुरुषांचा कोपरी त्यावर सदरा आणि धोतर असायचा, पण काळाच्या ओघात त्यात बदल होत गेला आहे. या भागात कुहीठीच्या गवतापासून गोलाकार छप्पर आणि बांबू किंवा कारवीच्या काड्यांच्या कुडाच्या भिंती घालून केलेली घरं असायची. बदलत्या काळानुसार आणि थोडी आर्थिक सुधारणा झाल्याने आता कौलाची चौमौळी व सिमेंट पत्र्याची दोन पाखी असलेली पक्की घरे आहेत. पाऊस वादळ वारा याचं प्रमाण जास्त असल्याने चौमौळी प्रकारचं छप्पर बनवलं जातं. आदिवासी कोळी महादेव

जमातीची बोलीभाषा, ठाकर जमातीची बोलीभाषा तर कातकरी जमातीची बोली भाषा वेगवेगळी आहे. प्रत्येक जमातीची स्वतंत्र अशी संस्कृती आहे. कोळी महादेव व ठकार किंवा इतर जमाती यांच्यातील लग्न तसेच इतर धार्मिक विधी यामध्ये वेगळेपण दिसून येत. या जमातीवर हिंदू धर्माचा प्रभाव जरी असला तरी त्यांनी आपली संस्कृती जपून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

**व्यवसाय :–**

डांगाणातील आदिवासी समाजाचा मुख्य व्यवसाय हा शेती व जंगलातील रानमेवा गोळा करणे हा आहे. इथे प्रवासाचे प्रमाण जास्त असल्याने याला नगर जिल्ह्याची चेरापुंजीदेखील म्हटले जाते. पाऊस जास्त असल्याने इथे भात नाचणी, वरई ही पावसाळ्यातील प्रमुख पिके तर गहू, हरभरा ही रब्बी पिके घेतली जातात. सोबत शेळी-गाय पालनदेखील केले जाते. आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात हिरडा गोळा केला जातो. जंगलातून गोळा करून आणलेल्या वस्तू विकूनही पुरेसे पैसे मिळत नाही. जंगलातील वनोपजाचे व्यवस्थापन व वापराचे हक्क या समाजाला मिळाले तर दोहोंची समृद्धी शक्य आहे.

**आदिवासी समाजाची धार्मिक स्थळे :–**

आदिवासी समाजावर हिंदू धर्माचा प्रभाव जरी असला तरी मूळ संस्कृतीचीदेखील जपवणूक केली आहे. निसर्गाला देवता मानून त्याची पूजाअर्चा केली केली जाते. आदिवासींचे प्रवरा पट्ट्यातील प्रमुख धार्मिक स्थळे यामध्ये प्रामुख्याने घोरपडा देवी, कळसुबाई, घाटनदेवी, रतनूबाई, अमृतेश्वर मंदिर, तातोबा ऋषी, तेरुंगण बहिरोबा ही आहेत.

**कळसुबाई आई :–**

राजूरपासून २३ किलोमीटर, अकोलेपासून ४३ किलोमीटर अंतरावर बारी गावात महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई आहे. त्या शिखरावर कळसुबाई देवीचं मंदिर असून ती आदिवासी समाजाची कुलदेवी आहे. कळसुबाई देवीबद्दल अशी दंतकथा आहे की, ''प्राचीनकाळी शिखराच्या पायथ्याशी असलेल्या इंदोरा गावात कळसू नावाची महादेव कोळ्याची एक मुलगी होती. लहानपणापासून कामात चलाख आणि बुद्धीने हुशार होती. कळसू ही मुलगी पाटलाच्या घरी कामाला होती. कामाला लागण्यापूर्वी तिने पाटलाला अट घातली होती की, मी केर काढणे व भांडी घासणे सोडून इतर कामे करीन. एकदा पाटलाच्या घरी भरपूर

पाहुणे आले, पाटलाने कळसूला भांडी घासायला लावली, त्यामुळे चिडून कळसू डोंगरावर गेली आणि तिथेच स्थायिक झाली. पुढे तीच कळसुबाई देवी म्हणून नावाला आली. कळसुबाई देवीवर आदिवासी लोकांची खूप श्रद्धा आहे. कळसुबाई शिखराच्या टोकावर देवीचे छोटसे मंदिर बांधले आहे. तर ज्यांना वर जाणे शक्य होत नाही त्यांच्यासाठी माचीवर एक मंदिर बनवले आहे. नवरात्री नऊ माळाच्या काळात अनेक भाविक या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी येत असतात.

**घोरपड्या आई :-**

राजूरपासून १० किलोमीटर तर भंडारदरापासून ९ किलोमीटर अंतरावर रंधा फॉल येथील प्रवरेच्या पत्रात खडकाच्या कपारीत घोरपड्या आईचे (घोरपडा देवी) मंदिर आहे. ही आदिवासींची कुलदेवता असून देवीला प्रसाद लावून डाव उजवा विचारून देवी जो प्रसाद देईल त्याप्रमाणे चांगल्या कामाची सुरुवात करतात. तसेच देवी नवसाला पावते असा लोकांचा समज आहे. आठवर मुलांचं लग्न करण्यापूर्वी या देवीच्या नावाने जावळ देण्याची प्रथा आहे. त्यात कोंबडा, बकऱ्याच्या नैवेद्य दाखवला जातो. या देवीबद्दल आदिवासी समाजात अशी लोककथा आहे की, पूर्वीपासून घोरपडा देवीला बळी देण्याची प्रथा आहे. त्यावेळी बकऱ्या कोंबड्याचा नैवेद्य करण्यासाठी खूप वर्षांपूर्वी नदीच्या डोहातून स्वयंपाकाची भांडी वर येत असत आणि त्यात स्वयंपाक करून देवीला नैवेद्य दाखवत असत आणि कार्यक्रम झाला की भांडे स्वच्छ धुऊन पुन्हा त्या डोहात सोडायचे असा नियम होता, पण त्याकाळी कुण्या एकाने भांडे स्वच्छ न धुता तसेच डोहात सोडले. तेव्हापासून ते भांडे बाहेर येण्याचे बंद झाले अशी ती कथा आहे. सध्या घोरपडा देवी मंदिराचे पुजारी म्हणून कोदणी गावचे श्री. मनोहर बांबेरे कारभार बघतात.

**तातोबा (वाल्मिकी) ऋषी :-**

रंधापासून ५ किलोमीटरवर कोदणी गावात तातोबा (वाल्मिकी) ऋषींचा मठ आहे. रामायण कथा ज्यांनी रचली त्याचे लेखक पूर्वीचा वाल्या कोळी अर्थात नंतरचे वाल्मिकी ऋषी व सीतामाई, लव-कुश याच कोदंडवन म्हणजे आजच्या कोदणी या गावात राहत असत. रामायण कथेप्रमाणे जेव्हा राम वनवासातून अयोध्येत आले तेव्हा सीतेची पावित्र्य परीक्षा झाली. त्यानंतरही देखील तिच्या पावित्र्यावर अयोध्येतील लोकांची उलटसुलट चर्चा सुरू झाली. ही कुजबुज

जेव्हा रामाच्या कानावर आली तेव्हा रामाने सीतेचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. रामाने त्यांचे बंधू लक्ष्मण याला बोलावून घेतले आणि सीतेला जंगलात सोडून यायला सांगितले. सीता गरोदर असताना तिला याच कोदंडवनातील वाल्मिकी ऋषी यांच्या मठाजवळ सोडून लक्ष्मण पुन्हा निघून गेले. याच ठिकाणी लव-कुश यांचा जन्म झाला. लव-कुशचे बाळवते सीतामाईने याच नदीच्या खडकावर धुतले होते अशी आख्यायिका पूर्वीपासून इथे आहे. तातोबा टेकडीच्या जवळ असलेल्या प्रवरा नदीपात्रात ज्या पाऊल खुणा होत्या त्या सीतेच्या आहेत असे पूर्वीपासून बोलले जाते. आता त्या जलविद्युत प्रकल्पाच्या कामात गाडल्या गेल्या व नंतर निळवंडे धरण भरल्याने त्या धरणाच्या पाण्याखाली गेल्या आहेत तर तातोबा टेकडीच्या चौफेर बाजूला पाणी असत. या ठिकाणी महाशिवरात्र निमित्ताने गावच्यावतीने यात्रा भरवली जाते व पंचक्रोशीतील भाविक या ठिकाणी हजेरी लावत असतात.

**महादेव मंदिर तेरुंगण (सरोवर वाडी) :-**

राजूरपासून १२ किलोमीटर अंतरावर तेरुंगण या गावाची वाडी सरोवरवाडी या ठिकाणी प्राचीन महादेवाचे मंदिर आहे. कोळी महादेव जमात ही महादेवाची भक्त असल्याने त्यांना त्यांच्या नावावरून ओळखले जाते. भीमाशंकर ते जव्हार त्र्यंबकेश्वरपर्यंतच्या प्रदेशात कोळी महादेव जमात ज्या ठिकाणी आहे त्या-त्या भागात महादेवाचे मंदिर आहेत. तेरुंगण येथे दरवर्षी महाशिवरात्री निमित्ताने गावाच्यावतीने यात्रा भरवली जाते.

**घाटनदेवी घाटघर :-**

भंडारदरापासून पश्चिमेला साधारण २५ किलोमीटर अंतरावर घाटघर गाव असून त्या गावात घाटनदेवीचे मंदिर आहे. आदिवासी समाजाची कुलदेवी असून नवरात्र दरम्यान येथे घटस्थापना करून उत्सव साजरा केला जातो. या देवीचं मंदिर घाटावर असल्याने तिला घाटनदेवी असेल म्हटले जात, तर तिच्या नावावरून घाटघर हे गावाचं नाव पडले असावे.

**अमृतेश्वर मंदिर, रत्नाबाई मंदिर रतनवाडी :-**

कळसुबाई शिखराच्या रांगेत राजूरपासून ३५ किलोमीटर तर इगतपुरीपासून साधारण ५० किलोमीटर अंतरावर रतनवाडी गाव आहे. गावाच्या सुरवातीलाच आदिवासी कोळी महादेव जमातीचे कुलक अमृतेश्वराचे पुरातन हेमाडपंथी मंदिर

आहे. या मंदिरावरील दगडी नक्षीकाम अत्यंत सुबक आणि देखणे असून त्यात मुख्य गाभाऱ्यात एक शिवलिंग आहे. पावसाळ्यात हे शिवलिंग पूर्णत: पाण्यामध्ये बुडालेले असते.

रतनवाडी येथे रतनगड किल्ला असून तेथूनच अकोले तालुक्याची जीवनगंगा प्रवरा नदीचा उगम झाला आहे. प्रवरा नदीच्या उगमाबाबत पुराणात कथा प्रसिद्ध आहे. ती अशी आहे की, पूर्वी देव व दैत्य यांनी समुद्रमंथन करून अमृत व इतर रत्ने काढायचे ठरवले. त्यांनी मंदराचल पर्वताची रवी व वासुकी सर्पाचा दोर केला व मंथन सुरू केले. देव हे शेपटीच्या बाजूने व राक्षस मुखाच्या बाजूने ओढत होते. मुखातून बाहेर पडलेल्या विषाच्या उष्णतेचा सर्वांना त्रास होऊ लागला. तेव्हा महादेवांनी ते विष प्राशन केले. पुढे समुद्रमंथनातून लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा, धन्वंतरी, चंद्र, रंभा, ऐरावत, अमृत, विष, उच्चै:श्रवा नावाचा घोडा, कामधेनू, शंख, व हरिधेनू अशी चौदा रत्ने निघाली. समुद्रमंथनाच्यावेळी मंदराचल पर्वत खाली जाऊ लागला. तेव्हा विष्णूंनी कूर्मरूप धारण करून तो वर उचलला. चौदा रत्नांची वाटणी होत असताना अमृत व सुरा याबद्दल वाद सुरू झाला. या वादाचा निकाल करताना विष्णू म्हणाले, देवांनी एका पंक्तीला व दैत्यांनी एका पंक्तीला बसावे. एक स्त्री येऊन अमृत व सुरा पंक्तीत वाढेल. ज्याला जे मिळेल ते त्याने घ्यावे. मग विष्णूंनी मोहिनी रूप घेऊन वाटप सुरू केले. मोहिनीच्या रूपाने असूर वेडे झाले असताना विष्णूंनी देवांना अमृत व दैत्यांना मदिरा वाढली. त्यावेळी राहू कपटाने देवाच्या पंक्तीत बसून अमृत प्यायला. हे पाहताच चंद्राने विष्णूला खूण करून कळवले. विष्णूने सुदर्शन चक्र सोडून त्याचा शिरच्छेद केला. त्याचे शीर आकाशात उडाले तर धड पश्चिम समुद्राकडे पळू लागले. हे पाहून देव त्याचा नाश करण्याचा प्रयत्न करू लागले. शंकराने आपला त्रिशूळ त्याच्या पोटात खुपसला. परंतु त्याच्या पोटातील अमृतामुळे त्याचा धडाचा नाश होत नव्हता. तेव्हा शंकरांनी म्हाळसा नावाच्या डोंगरावर राहूच्या घशात अंगठा घालून पोटातील अमृत काढण्याचा प्रयत्न केला, पण राहूच्या पोटातील अमृतामुळे तेच अमृत जाऊन समुद्राला मिळाले. त्या ओघाला प्रवरा नदी असे म्हणतात. प्रवरा नदीने सर्व परिसर समृद्ध केला आहे.

याच गावातील प्राचीन रतनगडावर खडकात आदिवासी कुलदेवी रत्नाबाई देवीचं प्राचीन मंदिर आहे. त्या मंदिराच्या जवळील कुंडातूनच प्रवरेचा उगम होतो.

**पर्यटन स्थळे :–**

सह्याद्री पर्वत रांगेतील सर्वात उंच शिखर कळसुबाई शिखराचा, प्रवरा नदीकाठचा परिसर पर्यटनाच्या बाबतीत प्रसिद्ध आहेत. त्यात प्रामुख्याने कळसुबाई शिखर, भंडारदरा धरण, अँब्रेला फॉल, रंधा फॉल, तातोबा मठ, घाटघर धरण, कोकण कडा, सांदण दरी, अलंग, मदन गड, आजोबा, रतनगड, नेकलेस फॉल, यांचा उल्लेख करता येईल.

**कळसुबाई शिखर :–**

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील बारी या गावात महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर आहे. कळसूबाई शिखराची उंची समुद्र सपाटीपासून १ हजार ६४६ मीटर आहे, तर पायथ्याच्या बारी गावातून याची उंची अंदाजे ९०० मीटर आहे. या शिखरावर जाण्यासाठी मुख्य वाट ही बारी गावातून जाते. राजूरपासून २५ किलोमीटर तर भंडारदऱ्यापासून 'बारी' हे गाव अवघ्या सहा किलोमीटर अंतरावर आहे. बारी गावातून शिखरावर जाण्यास तीन तास लागतात. वाटेत तीन ठिकाणी आता लोखंडी शिड्या बसविलेल्या आहेत. साधारणपणे पाच ते सहा तासात शिखरावर जाऊन येता येते.

कळसूबाईचा डोंगर चढायला सुरुवात केल्यावर गावातून बाहेर पडल्यावर एक ओढा लागतो. हा ओढा ओलांडून झाल्यावर थोड्याच अंतराच्या टप्प्यावर कळसूबाईचे नवीन मंदिर लागते. ज्या लोकांना शिखरावर जाणे शक्य नाही, त्यांच्या सोयीसाठी हे मंदिर बांधलेले आहे. पुढे दुसरी शिडी पार केल्यावर कातळात दोन पावले कोरलेली आहेत, ती कळसूबाईची पावले आहेत अशी श्रद्धा आहे. शिखरावर कळसुबाई देवीचं एक छोट मंदिर आहे. शिखरावर पोहोचल्यावर भंडारदरा धरणाचा अथांग जलाशय दिसतो. त्याचप्रमाणे खाली शहापूर, रतनगड, अलंगगड, आजोबा, तिकडे नाशिक जिल्ह्यातील अचला, अहिवंत, सप्तश्रृंग, मार्कंडा, धोडप, रवळया, रामसेज तर हरिश्चंद्रगड विश्रामगड लक्ष वेधून घेतात. शिखरावर ऑक्टोबर ते मे महिन्याचा कालावधी ट्रेकिंगसाठी चांगला असतो. महाराष्ट्र राज्यातील सर्वात उंच शिखर असल्याने या ठिकाणी ट्रेकर्स ट्रेकिंगसाठी आवडीने येत असतात.

**भंडारदरा धरण (विल्सन डॅम) :–**

महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध भंडारदरा धरणाच्या (विल्सन डॅम) बांधकामाचा

प्रत्यक्ष शुभारंभ १९१० साली तत्कालीन मुख्य अभियंता ऑर्थर हिल यांच्या हस्ते झाला. शेंडी येथील जागा ही धरण बांधण्याच्या दृष्टीने योग्य आहे याचा शोध १९०३ मध्ये चीफ इंजिनिअर ऑर्थर हिल यांनी लावला. १९०३ ते १९१० या सात वर्षाच्या काळात त्यानंतरचे सर्वेक्षण व भूसंपादन सहाय्यक अभियंता एच.ओ.बी. पुली यांनी कार्यकारी अभियंता शौब्रिज यांच्या मार्गदर्शनाखाली केले. भंडारदरापासून मुरखेल, कोळतेंभे, रतनवाडी, साम्रद, घाटघर, शिंगनवाडी, उडदावणे, पांजरे, मुरशेत या नऊ गावांचा परिसर संपादित केला. नदीच्या कडेला रहिवाशी असलेल्या नऊही गाव उठवून धरणाची पातळी सोडून दूर वर फॉरेस्टमध्ये विस्थापित केले. धरण जरी त्या क्षेत्रांत झाले असले तरी वरच्या भागातील लोकांना याचा फायदा झाला नाही. धरणाची पातळी खाली गेल्यानंतर तिथल्या लोकांना पाण्याची मोठी टंचाई भासते.

१९१० साली प्रत्यक्षात धरणाच्या कामाला सुरुवात झाली. बांधकामासाठी लागणारा कच्चा माल इगतपुरी घोटी मार्गे वारांघुशी फाट्यावरून चिचोंडी – शेंडी हा नवीन रस्ता बनवून तेथून येऊ लागला. शेंडी येथे कामगार आणि अधिकारी यांना राहण्यासाठी वसाहत तयार करण्यात आली होती. या धरणाच्या निमित्ताने परिसरातील स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली होती.

धरणाच्या भिंतीचे चुना, वाळू यांच्या मिश्रणातून बांधकाम करण्यात आले. धरणाचे बांधकाम १९२६ साली अवघ्या १६ वर्षाच्या काळात पूर्ण झाले. धरणाची उंची ५०७ मीटर तर रुंदी ८२.२९ मीटर आहे. त्याकाळात भारतातील सर्वात उंच धरण म्हणून भंडारदरा धरण ओळखले जात होते. धरणाचा बांधकाम खर्च १,१३,९०,०६० रुपये इतका आला होता. धरणाचे एकूण क्षेत्रफळ १५.५४ तर एकूण क्षमता ११ टीएमसी आहे.

या धरणामुळे जवळपास ५७००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले होते. त्याचवर्षी १० डिसेंबर १९२६ रोजी तत्कालीन गव्हर्नर लेस्ली वेलस्ली यांच्या हस्ते धरणाचे उद्घाटन करण्यात आले. धरणाला विल्सन डॅम तर धरणाच्या पाणीसाठ्याला ऑर्थर लेक हे नाव देण्यात आले.

धरणाच्या २०० फुटावरील खडकावर असलेल्या व्हॉल्वद्वारे पाणी नदी पात्रात सोडले असता ते खडकावरून वेगाने वाहत नदीपात्रात झेपावते त्यावेळी ते दृश्य एखाद्या भव्य छत्रीसारखे भासते, म्हणून याला अँब्रेला फॉल असे म्हणतात.

छत्रीच्या आकाराचे पाणी जेव्हा नदीपात्रात झेपावते तेव्हा ते दृश्य पर्यटक भान विसरून पाहत राहतात. धरणाच्या भिंतीलगतच एक मोठी बाग तयार करण्यात आली आहे. येथूनच अंब्रेला फॉलचा आनंद घेता येतो. धरणाच्या सर्वच मोऱ्यामधून जेव्हा पाणी सोडले जाते तेव्हा पाहणाऱ्याचा वेळ कसा निघून जातो तेच कळत नाही. पावसाळ्यात अतिरिक्त पाणी जेव्हा स्पिल-वे मधून सोडले जाते त्या प्रचंड वेगाने बाहेर पडणाऱ्या पाण्यावरून माणसाची नजर हटत नाही इतकं मोहक दृश्य दिसते.

**नेकलेस फॉल :-**

रतनवाडीपासून जवळच साधारण एक किलोमीटर अंतरावर नेकलेस फॉल आहे. नेकलेस फॉल बघायला खरं तर पावसाळ्यात खूप गर्दी असते. दोन्ही बाजूने आलेल्या घळेतून पाणी पुढे जाऊन एकत्र येऊन फेसाळत पुढे झेप घेते, बघणाऱ्याला ते जसं अलंकार परिधान केलेल्या स्त्रीच्या गळ्यातील नेकलेससारखा आकर्षक वाटतो. साधारणपणे जून ते सप्टेंबरपर्यंत हा पर्यटकांना आपल्या सौंदर्याने आकर्षित करतो. सप्टेंबरमध्ये येणारी सोनकीची पिवळी धमक फुले यांच्या सौंदर्यात भर पाडतात.

**रतनगड :-**

कळसूबाई शिखराच्या रांगेतील रतनगड किल्ला आहे. रतनवाडी राजूरपासून ३४ किलोमीटर अंतरावर आहे. रतनगडावर जाण्यासाठी पायथ्याशी असलेल्या रतनवाडी गावातून जावे लागते. रतनवाडीस संगमनेरहून अकोले-राजूर-भंडारदरामार्गे जाता येते. मुंबईहून इगतपुरी-घोटी मार्गे भंडारदरा धरणाला वळसा घालून रतनवाडीला पोहोचता येते. रतनवाडीला पोहोचण्यासाठी अकोले-रतनवाडी बस सुविधा आहे, परंतु ती सोयीची नाही. रतनवाडीतून गडावर पोहचण्याकरिता तीन तास लागतात. रतनगड समुद्रसपाटीपासून ३ हजार ५२३ फूट इतका उंच आहे.

१७६३ साली हा किल्ला कोळी सरदार जावजी याने ताब्यात घेतल्याची गॅझेटमध्ये नोंद आढळते. १८१८ सालपर्यंत रतनगड पाच विभागांचे मुख्यालय होते. राजूरची ३६ खेडी, अलंगची २२ खेडी, वाडी परगण्याची २२, सोकुर्ली परगण्याची ६० तर जुरुश्रोशी परगण्याची ६० खेडी होती.

रतनगडावर जाण्यासाठी तीन वाटा आहेत. एक वाट रतनवाडीहून, दुसरी कुमशेतहून शिवकालीन मार्गाने आणि तिसरी साम्रदहून वाट जाते. रतनवाडी

गावातून जाताना नदीच्या कडेने पाऊल वाटेने दाट झाडीतून रस्ता आहे. पाऊलवाटेने बरेच वरती चढून आल्यावरमध्ये लोखंडी शिडीने चढावे लागते. शिडी चढून गेल्यावर पहिला गणेश दरवाजा लागतो. त्यानंतर बाजूला गुहेत रत्ना देवीचं मंदिर आहे. त्याच गुहेशेजारी मुक्काम करण्यासाठी एक गुहा आहे. पूर्वी या ठिकाणी किल्ल्यावरील लोक या गुहेत राहत असत. या गुहेत साधारण ३० ते ३५ लोक राहू शकतात.

रत्ना देवीच्या मंदिरापासून पुढे जाताना प्रमुख दरवाजा लागतो, त्यावर विविध देवादिकांच्या शिल्पे पाहायला मिळतात. त्या दरवाजातून पुढे चालत गेल्यावर मोडतोड झालेल्या भग्न इमारतीचे अवशेष दिसतात. बाजूला थोडं पुढे गेल की कडेलोट पॉईंट दिसतो. वर चढत आले की राणीचा हुडा म्हणजे एक भग्न बुरूज दिसतो कदाचित तो बुरुज निरीक्षण करण्यासाठीचा असेल. तिथून उजव्या हाताला गेल्यावर थंड पाण्याचं कुंड लागत आणि त्याच ठिकाणावरून अमृतवाहिनी प्रवरा नदीचा उगम झाला आहे. बुरूजावर पुढे चालत गेल्यावर गडाच्या मागच्या बाजूने पाऊल वाटेने पुढे जावं लागतं. चालत असताना खाली प्रचंड खोल दरी दिसते. दरीकडे पाहिल्यास डोळे गरगर फिरतात. तिथून पुढे जाताना गडावरील मोर्च्याची ठिकाणे आणि बुरुज लागतात. त्यानंतर अंधार कोठी लागते. या कोठीत उतरेल की आता एक गुहा आहे आणि त्याच्या आता पाण्याचं टाके आहे. एकदम स्वच्छ आणि मधुर पाणी असून पिण्यासाठी ते योग्य आहे. तिथे पाणी पिऊन वरच्या दिशेने चालत चालत गेल्यावर गडाच्या अत्युच्च ठिकाण असलेल्या खडकाच्या भगदडात पोहोचतो. याला हेल्याचं नाकदेखील म्हणतात. या होलमधून खाली हळू उतरावे लागते. थोडं खाली उतरून आल्यावर कल्याण दरवाजा लागतो. यालाच कुणी साम्रद, कोकण किंवा त्र्यंबक दरवाजा असे ही म्हणतात. या दरवाजातून खाली उतरताना कातळात खोदलेल्या पायऱ्या लागतात त्या उतरून कातळ वाटेने पुढे आल्यावर साम्रदचा खुंट्याचा डोंगर लागतो. त्या खुंट्याचा उतरून पुढे साम्रद गावाला जाणार रस्ता आहे. तर उजव्या हाताला चालत चालत जाऊन पुन्हा रतनवाडी गावात पोहोचतो. गावात पुरातन हेमाडपंथी अमृतेश्वरचे मंदिर आहे. तिथे थोडी विश्रांती घेऊन दुसऱ्या स्पॉटवर जाता येते.

**कात्राबाईची खिंड :–**

रतनगडाच्या दक्षिण बाजूने बघितलं की समोरील करवतीच्या पात्यासारखे

कातरलेली डोंगररांग म्हणजे कात्राबाईची डोंगर रांग होय. रतनगडला गेले की कात्राबाईची खिंड चढण्याचा मोह कोणाला होत नाही असं अजून तरी झालं नाही. सात डोंगरांची करवतीच्या पात्याप्रमाणे तयार झाले आहे. कात्राबाईचे सौदर्य खरं तर पावसाळ्यात व हिवाळ्यात पहायला खूप छान वाटते. धुक्याने अंथरलेल्या ढगांच्या आच्छादनात यांचे रूप बघण्याची देहभान विसर पडायला भाग पाडते. कात्राबाई ते हरिश्चंद्रगड कुमशेत मार्गाने करता येतो, मात्र गाईड असल्याशिवाय या मार्गाने जाऊ नये हेही तितकंच महत्त्वाचं. कात्राबाईचा डोंगर चढवून वर गेल्यावर कात्राबाईचे मंदिर लागते. मंदिराचे दर्शन घेऊन पुढे गेले की रतनगडाचा कडेलोट बघता क्षणी कितीही धीट असला तरी हृदयाची धडधड वाढल्याशिवाय राहत नाही. बाजूला दिसतो खुंटा व समोर सह्याद्रीची अखंड रांग, पूर्वेच्या बाजूनी बघितलं तर भंडारदरा धरणाचे जलाशय बघणाऱ्याचे डोळे दिपवून टाकतो.

**सांदण दरी :–**

आशिया खंडातील सर्वात अरुंद दरी म्हणून सांदण दरीची ओळख आहे. राजूरपासून ४५ किलोमीटर अंतरावर साम्रद गाव आहे त्याच गावात सह्याद्रीतील अद्धुत अशी सांदण दरी आहे. भंडारदरा धरणाच्या बॅक वॉटरच्या कडेने साम्रद या गावी जावे लागते. अकोलेवरून राजूर–शेंडी (भंडारदरा)–उडदावणे–साम्रद असा रस्ता आहे. मुंबईकरांसाठी कसारा घाट–इगतपुरी–घोटी मार्गे शेंडीला पोहोचता येते.

सांदण दरी दोनशे ते चारशे फुट खोल आणि जवळ–जवळ चार किलोमीटर लांबवर पसरलेली आहे. पावसाळ्यात सांदण दरीला जाणे अशक्य असते. कारण पावसाचे पाणी याच दरीतून खाली कोसळते. त्यामुळे येथे जाण्याचा उत्तम कालावधी म्हणजे उन्हाळ्यात योग्य असतो. दरीत गेल्यावर दोन पाण्याचे पुल लागतात. पहिला पूल दोन–चार फूट अन दुसरा पुल चार–सहा फूट पाण्यात असतो. हिवाळ्यात पण जाऊ शकतो, पण पाण्याची पातळी तेव्हा थोडी जास्त असू शकते. मुखाजवळच उजव्या हाताला पाणवठा आहे. नैसर्गिकपणे डोंगरातून झिरपणारे थंडगार नितळ पाणी. माणसे आणि जनावरांसाठी दगड रचून वेगळी सोय केलेली दिसते. अतिशय अरुंद घळ, कधी आठ–दहा फूट तर कधी अगदीच जेमतेम एक माणूस जाईल एवढी तीन फूट रुंदी आणि दोन्ही बाजूंना अंगावर

येणारा दगडी कमीतकमी दोनशे आणि जास्तीत जास्त चारशे फूट उंचीचा पाषाणकडा आहे. त्याच घळीतून खाली उतरत अगदी शेवटच्या मुखाशी जाता येते. अंदाजे घळीची लांबी एक किलोमीटर आहे. त्यानंतर समोर जो काही विराट कोकणकड्याचा भाग दिसतो. एकदम हजार-दीड हजार फुटांचा ड्रॉप आणि समोर करुळ घाटाचा कडा आहे. सांधण घळीत पावसाळ्यात काही ठिकाणी बरेच पाणी भरते त्यामुळे त्या जागा थोड्या जपूनच दोराच्या आधाराने पार कराव्यात. खाली पुढे पुढे गेल्यास कोकणात उतरू शकतो. आणि तोच रस्ता आजोबा डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या डेहणे गावापाशी पोहचतो. तेथून आसनगाव जवळ आहे तिथून जाऊ शकतो किंवा करोली मार्गे पुन्हा साम्रद गावी येता येते. मुक्कामाची आणि जेवणाची सोय साम्रद गावात होऊ शकते.

**घाटघर :-**

भंडारदरा धरणाच्या पश्चिमेला २२ किलोमीटर अंतरावर असलेले घाटघर हे ठिकाण पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे. या ठिकाणी नगर जिल्ह्याची हद्द संपते. घाटघर येथील कोकण कडा प्रसिद्ध आहे. सुमारे ४५० फूट खोल दरी असून त्यात शाही नदी वाहते. घाटघरच्या कोकण कड्यापासून ठाणे जिल्हा शहापूर तालुक्याची हद्द सुरू होते. घाटघर अलंगगडच्या पायथ्याशी वसलेलं आहे. घाटघर या ठिकाणी पावसाळ्यात पाच हजार मिलीमीटर पेक्षा अधिक पाऊस पडतो. जोराचा पाऊस, दाट धुकं, दाट जंगल, हिरवळ असलेलं मनमोहक दृश्य पर्यटकांना भुरळ घालत असते.

घाटघरमध्ये कोकण कड्याच्या खोलीचा वापर करून घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प जपानच्या सहाय्याने साकारण्यात आला आहे. २५० मेगावॅटचा वीजनिर्मिती प्रकल्प हा 'पंप स्टोरेज' प्रकारचा आशिया खंडातील सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प आहे. घाटघर येथे बांधण्यात येत आलेल्या ऊर्ध्व धरणातील पाणी डोंगरात खोदलेल्या बोगद्यातून जलविद्युत प्रकल्पात सोडले जाते. या पाण्याच्या आधारे अवाढव्य टर्बाइन फिरून वीज निर्मिती होते व पाणी बोगद्याच्या खालील बाजूला चोंडे निम्न धरणात सोडले जाते. रात्री अकरा नंतर सुमारे सात तास विजेचा वापर करून चोंडे येथील निम्न जलाशयातील पाणी घाटघर येथील ऊर्ध्व जलाशयात खेचून घेतले जाते.

**अलंगगड :–**

राजूरपासून ३४ किलोमीटर अंतरावर घाटघर गाव आहे. त्याच गावात अलंगगड आहे. अलंगगडला जाण्यासाठी घाटघरमधून रस्ता आहे. किल्ल्यावर जाण्यास साधारण सहा तास लागतात. अलंगगड सह्याद्रीच्या उपरांगामधील कळसूबाईची उपरांग ही नैसर्गिकरित्या अतिशय बेलाग आहे. या रांगेतील किल्ले बलदंड असून त्यांना निसर्गाचाही वरदहस्त लाभलेला आहे. या रांगेमधे आड, औढा, पट्टा, बितन, अलंग, मदन, आणि कुलंग असे एकाचढ एक किल्ले प्रवरा नदीच्या खोऱ्यात आहे. किल्लेप्रेमींचे आकर्षण ठरलेले अलंग, कुलंग आणि मदन हे त्रिकुट याच खोऱ्यात आहे. येथे कळसूबाई रांग नाशिक आणि अहमदनगर या दोन जिल्ह्यांच्या सीमेवर उभी आहे. नाशिककडे म्हणजे उत्तर बाजूला इगतपुरी तालूका असून, दक्षिण बाजूला अहमदनगरमधील अकोले तालुका आहे. अकोले तालुक्यामधील भंडारदराचे धरण प्रसिद्ध आहे. रंधा धबधबा, भंडारदरा तसेच अमृतेश्वर मंदिर पाहण्यासाठी शेकडो पर्यटक या परिसरामध्ये भेट देत असतात. यामधील मोजकेच पर्यटक या भागातील दुर्गम किल्ल्यांना भेटी देतात.

**रंधा धबधबा :–**

रतनगडावरून उगम पावणारी डोंगर रांगातून स्वच्छंद वळणे घेत २० कि.मी.च्या प्रवासानंतर अमृतवाहिनी प्रवरा नदी अचानक रंधा खु. येथे ५० मीटर खोल दरीत झेपावते त्या ठिकाणास 'रंधा धबधबा' असे म्हणतात. येथे घोरपडा देवीचे मंदिर आहे. रंधा धबधबा म्हणजे सळसळत्या तारुण्याचा आविष्कारच. त्यावेळी त्या ठिकाणी पाण्याचा हा रौद्र मंगल कल्लोळ, पाण्याचा तो शुभ्र धवल झोत, तुषारांचे वैभव अन् त्या तुषारांवर उमटलेले इंद्रधनू, तेथील नीरव शांततेला भेदणारा प्रपाताचा आवाज या सर्वांच्या संगमातून वेगळेच संगीतमय वातावरण निर्माण होते. पावसाळ्यात तर रंधा धबधबा आणखीनच रौद्र रूप धारण करतो. पण त्याचवेळी त्याठिकाणी धोकादायक परिस्थिती पण निर्माण झालेली असते. बॉलीवूडमधील अनेक चित्रपटांचे चित्रण रंधा फॉल परिसरात झाले आहे. त्यात 'मैने प्यार किया', 'प्रेम', 'कुर्बान', 'राजू चाचा' इतर अनेक गाजलेल्या चित्रपटांतील थरारक दृश्ये येथे चित्रित झालेली आहेत. पावसाळ्यात रंधा धबधब्याला लागूनच दुसऱ्या बाजूला कातळापूरचा धबधबापण प्रेक्षणीय असतो.

**रानभाज्या, कंदमुळे, रानमेवा :–**

डांगाणातील प्रवरेच्या खोऱ्याचा विपुल नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध असा परिसर आहे. कितीही दुष्काळ पडला, कोणतेही संकट आले तरी इथला माणूस कधी डगमगला नाही, घाबरत नाही किंवा कधी टोकाचे पाऊल उचलत नाही, कारण इथला निसर्ग उपाशी मरू देत नाही. अर्थातच या परिसरातील रानभाज्या, कंद मूळ, रानमेवा, औषधी वनस्पती यावर आपलं गुजराण करत असतो. रानभाज्या कंदमुळे या पौष्टिक आहारामुळे इथल्या लोकांची रोगप्रतिकारक शक्ती इतरांच्या तुलनेत चांगलीच आहे. म्हणूनच निसर्गाच्या भरवशावर इथला माणूस परिस्थितीशी दोन हात करून जीवन जगत असतो.

जून महिन्याच्या सुरुवातीला पावसाची सुरुवात झाल्यावर वेली, झाड–झुडपे, गवताने रान हिरवेगार होते. त्याच दरम्यान अनेक रानभाज्या उगवत असतात. त्यात चाई, बढदा, ढापा, कोंबडा, बफली, तेरा, कतेमाथ, लालमाथ, आघाडा, कुर्डू, लोतु, करोली, चित रुक या भाज्या मोठ्या प्रमाणात येतात.

चाईच्या भाजीचा वेल शोधायचा असल्यास डोंगर उतार किंवा कड्या रानात तीन छोटे छोटे पाने असलेला वेल दिसला की समजायचं हा चाईचा वेल आहे. या वेलीचे कोवळे देठ तोडून त्याची भाजी करतात. ही भाजी खूप पौष्टिक आणि चवदार लागते. बढदा ही भाजी देखील कड्या रानात असते. तिच्या पानांची भाजी करतात. ढापा ही मक्याच्या रोपासारखी दिसते. ती कोवळी असतानाच उपटून त्याची भाजी करतात. कांद्याच्या पातीच्या भाजीप्रमाणे खूपच रुचकर आणि पौष्टिक भाजी आहे. कोंबडाची भाजी ही कोंबड्याच्या पायासारखी दिसते म्हणून तिला कोंबड्याच्या भाजी म्हणतात. ही भाजी उडदावणे, पांजरे, साम्रद, घाटघर, गुहिरे या ठिकाणच्या डोंगरावर खूप भेटते. यासारख्या अनेक चवदार आणि सोबतच औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते म्हणून येथील सर्व लोक वर्षातून एकदा तरी या भाज्या खातात.

आषाढ महिन्याच्या शेवटपर्यंत शेतीची महत्त्वाची भात व नाचणीची आवणी (लागवड) पूर्ण होते. त्यानंतर श्रावण महिन्यात निंदणीची किरकोळ कामे असत. पूर्वी श्रावण महिन्यानंतर बहुतेक घरातील धान्य संपत येऊन धान्याचा तुटवडा भासत असायचा, तेव्हा अशावेळी लोकं कडू कडकींद, हेंदा, तांबोळी, भुईपोल, पांदा, अमर कंद यांसारखे कंद मूळ खोदून आणून खात असत. कडकींद

हा अतिशय कडू असा कंद असतो, परंतु त्याला आणल्यावर त्याचे बारीक तुकडे करून त्याचा कडूपणा जाण्यासाठी रात्रभर पाण्यात भिजत ठेवतात. पाण्यात भिजत ठेवल्याने त्याचा कडूपणा बराच कमी होतो त्यानंतर त्याला उकडून खातात. खायला कडवट जरी लागत असला तरी तो पौष्टिक तसेच शक्तीवर्धक आणि विविध विकारांवर गुणकारी असल्याने तो खातात. रान केळी (कवदर) चे कंददेखील असेच उकडून खातात. पंधा हा गाजराच्या झाडासारखे हुबेहूब दिसणारे झुडूप असते. त्याचा कंद रंगाने बटाटाच्या सारखा गाजराहून जरा लहान आकाराचा असतो. चवीला जरी चांगला लागत नसला तरी पोटाची भूक भागवण्यासाठी तसेच औषधी म्हणून हा कंद उकडून खातात. शिरपुंजेच्या भैरव गडासह परिसरातील डोंगरावर मोठ्या प्रमाणावर आहे. अंबर कंदचा शक्तीवर्धक औषधी वनस्पती म्हणून वापर केला जातो. माणसाला अशक्तपणा आला असेल तेव्हा या कंदाचा काढा करून पाजतात, तेव्हा माणसाला एकदम तरतरी येते. त्याचप्रमाणे एखाद्या जनावराला आजार आला ते चरत/खात नसेल तर या कंदाचा काढा करून त्यात थोडी हळद टाकून ते मिश्रण पाजतात.

ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्याच्या दरम्यान एक कंद भेटतो तो म्हणजे आणवा. आणवा ही वेल असून त्याचे मूळ जमिनीत खोलवर जाते. जमिनीत खोलवर खूप वेळ खोदून रताळासारखा दिसणारा कंद काढला जातो. हा कंद पौष्टिक आणि चवदार तसेच औषधी गुणधर्म असल्याने इथले लोक आवडीने खातात. ज्याप्रमाणे वारकरी म्हणतात की आयुष्यात एकदा तरी पंढरीला जावे. अशीच काही इथल्या लोकांची म्हण आहे की, वर्षातून एकदा तरी आणवा खावीत. इतकी आवडीची असल्याने ते खोदण्यासाठी खूप कष्ट जरी घ्यावे लागत असले तरी ते करण्यास इथले लोक तयार असतात.

यांसारख्या अनेक रानभाज्या कंदमुळे या प्रवरेच्या परिसरात आहेत. पण सर्वांची सविस्तर माहिती लिहिल्यास एक स्वतंत्र ग्रंथ तयार होईल म्हणून तूर्तास इतकंच मांडण उचित होईल.

एप्रिल-मे महिन्यापासूनच रानमेवा पिकायला सुरुवात होते. करवंद, आंभळ, तोरणं, चिकणी, आंबे, आळवं, जांभळं, मोह, अशिंद, बोर, पिपर, उंबर अशा अनके प्रकारच्या फळांनी रान पिकून जात. तेव्हा इथला माणूसच नाही तर पशु पक्षीसुद्धा खुश होतात तर त्यांच्या पाण्याचा तुटवडा प्रवरामाई भरून काढते. हा

रानमेवा खाता खाता पुन्हा पावसाळा सुरू होतो. रान हिरवेगार होते, म्हणजेच वर्षभर इथे काही न काही भेटत असत. इतका निसर्गाने भरभरून असलेला परिसर आहे.

**औषधी वनस्पतीचे आगार :–**

डांगाणातील प्रवरेच्या परिसर हा औषधी वनस्पतीचा आगार आहे. कोणताही छोटा–मोठा आजार झाला तर या झाडपाल्याचा उपयोग करून त्यावर उपचार केला जातो. हिरडा, अर्जुन सदडा, शेर, रुई, पारसा एरंड, टनटनी (गुलतुरा), फांगळा, गुलवेल, शतावरी, अंबर कंद, बावा, वरस, निर्गुडी, कांडे चितरुक, नांधुरकी, बुरांडी यांसारख्या अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती भेटतात.

हे सर्व जरी असलं तरी काळाच्या ओघात याचे चित्र दिवसेंदिवस बदलत चालले आहे. शेतीसाठी माळरान डोंगराळ जमिनीचे सपाटीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जातात. करवंद, आळव, तोरण, उंबर यांसारखी कमी होत चालली आहे, तसेच चाई तेरा चितरुक यांसारख्या भाज्या तसेच औषधी वनस्पती देखील दिवसेंदिवस कमी होत चालल्या आहेत. या सर्व वनस्पती जतन व संवर्धन करण्यासाठी शासन स्तरावर समिती नेमून एक पॉलिसी तयार करणे अपेक्षित आहे. त्या अंतर्गत स्थानिक तरुणांना याचे प्रशिक्षण देऊन स्थानिक पातळीवर रानभाज्या तसेच औषधी वनस्पती यांची वनखात्याच्या जमिनीवर अनुदान देऊन किंवा भागीदारी तत्त्वावर शेती करता येऊ शकते. तालुक्यातील कोंभाळणे गावाच्या बीज माता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविल्यास निसर्ग संवर्धनसह स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते.

**सण उत्सव परंपरा :–**

आदिवासी समाज हा निसर्गपूजक आहे. त्यांच्या असलेल्या कुल चिन्हाची म्हणजे वाघोबा, बैलदेव, घोडपडा, वरस, यासारख्या देवी देवतांची पूजा करतात. त्यांच्या नावाने गावोगावी जत्रा यात्रा भरवल्या जातात. जत्रेला कोंबड्या बकऱ्याचा नैवद्य दाखवला जातो त्या निमित्ताने पाहुणे रावळे यांना निमंत्रण दिले जाते. तसेच यात्रे निमित्ताने कुस्तीचा आखाडा भरवला जातो. परिसरातील छोटे मोठे पहिलवान हजेरी लावत असतात.

होळीपासून बोहाडा उसत्व सुरू होतो. हजारो वर्षांपासून आदिवासी देवी–

देवता, राक्षस, पक्षी, प्राणी यांचे मुखवटे चेहऱ्यावर धारण करून सनई संबळच्या तालावर नृत्य सादर करण्याची बोहाडा ही खूप प्राचीन परंपरा आहे. निसर्ग शक्तीचे ऋण फेडण्यासाठी हा उत्सव साजरा होतो. ज्या कुटुंबात किंवा कुळात परंपरेने सोंग घेण्याची प्रथा प्रचलित आहे त्या कुटुंबातील व्यक्ती सोंग घेऊन ही परंपरा चालवतात. कुटुंबात संकटे येऊ नये, पूर्वजांचा कोप होऊ नये, तसेच मुलबाळ व्हावं यांसारख्या अनेक कारणांसाठी नवस केले जातात. त्यानंतर बोहाद्यात सोंगाची सुरुवात होते. साम्रद, घाटघर, मुतखेल, उडदावणे, पांजरे, बारी या गावात जोरदार उत्सव साजरा केला जातो.

परिसरातील उडदावणे गावचे प्रसिद्ध कंबड नृत्य आहे. महाराष्ट्र राज्याच्यावतीने दिवंगत ठका बाबा गंगाड यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथील राज पथावर प्रजासत्ताक दिनी हेच कांबड नृत्य सादर केले होते तेव्हा त्या नृत्यास माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी व प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांच्या हस्ते सुवर्णपदक भेटले होते.

पर्यटनात आदिवासींना असणाऱ्या रोजगाराच्या संधी 'इंटरनेट'च्या वाढत्या वापरामुळे दुर्लक्षित असलेली तालुक्यातील पर्यटन स्थळे आज प्रसिद्धीस येत आहे, त्यामुळे दिवसेंदिवस अकोले तालुक्यातील पर्यटन व्यवसायाला चालना मिळत आहे. कळसुबाई रतनगडच्या पायथ्याचा प्रवरा नदी काठचा परिसर अर्थातच आदिवासी जीवन शैली, धार्मिक स्थळे, प्रसिद्ध पर्यटन स्थळे तिथल्या रानभाज्या कंदमुळेसह औषधी वनस्पती सोबतच सण उत्सव परंपरा या लेखाच्या निमित्ताने वाटाड्या म्हणून फिरवून आणलं.

अशाच प्रकारे आलेल्या पर्यटकांना पर्यटन स्थळे एवं स्थानिक परिसराची सखोल माहिती देणे तसेच पर्यटकांना पर्यटन स्थळापर्यंत जाण्यासाठी सुरक्षित वाट दाखविणे हे वाटाड्या म्हणून असलेलं काम रोजगाराची चांगली संधी निर्माण करत आहे.

सांधण दरीसारख्या ठिकाणाहून खाली उतरण्यासाठी रॅपलिंग साहित्य तसेच अलंग गडावर चढण्यासाठी तत्सम सुरक्षा साहित्य भाडे तत्त्वावर उपलब्ध करून दिल्यास चांगलं उत्पन्न मिळू शकते.

प्रवरा नदीकाठी पावसाच्या सुरुवातीला मोठ्या प्रमाणात काजवे दिसतात. काही वर्षांपासून तिथं काजवा महोत्सव आयोजित केला जातो. हा अनोखा नजराणा पहावयास खूप पर्यटक येत असतात. लहान स्टोल धारक, छोटे मोठे

हॉटेल व्यावसायिक यांचा चांगला व्यवसाय होतो. तसेच घरघुती चुलीवरील जेवणाची जास्त मागणी असते.

हिवाळ्यात कडाक्याची थंडी सोबत धुकं असत. त्यावेळी टेंट कम्पिंगच्या व्यवसायाची नामी संधी असते.

भंडारदरा धरण बॅक वॉटर, निळवंडे धरण बॅक वॉटर मधील रंधा धबधबा ते कोदणी तातोबा डोंगर परिसर येथे बोटिंग व्यवसाय चांगला चालेल.

हॉटेल, लॉजिंग बोर्डिंग, घरघुती जेवणाची खानावळ यात मोठा व्यवसाय निर्माण होईल.

बांबूपासून वेगवेगळ्या शोभेच्या आणि रोजच्या वापराच्या वस्तू, वारली पेंटिंग तयार करून विक्रीतून चांगला रोजगार निर्माण होईल. वन पर्यटन यातून देखील चांगला रोजगार मिळेल.

पर्यटन व्यवसायातून यासारख्या अनेक रोजगाराच्या संधी निर्माण होऊन स्थानिक आदिवासी तरुणांना रोजगार मिळेल, पण आर्थिक पाठबळ आणि प्रशिक्षणाचा अभाव यामुळे या व्यवसायास म्हणावी तशी गती आली नाही.

वन विभाग व पर्यटन विभाग यांच्या माध्यमातून पर्यटनाबाबत स्वतंत्र प्रशिक्षण संस्था स्थापन करून त्याद्वारे प्रशिक्षण दिल्यास प्रशिक्षित गाईड तयार होतील, सोबतच पर्यटन व्यवसायातील बारीकसारीक बाबी समजल्यावर व्यवसायात उतरणे सोपे होईल. बँकांनी नवे व्यावसायिकांना कर्जाच्या अटी शिथिल करून अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यांसारख्या उणिवा दूर करून पर्यटन स्थळांनाचा विकास केल्यास हा डांगाण प्रवरा काठचा भाग सुजलाम सुफलाम होईल.

**– विठ्ठल बारकू खाडे**

**मो. ९७६३७८९२६४**

●●●

# ८) समृद्ध पर्यटन अनुभव

जगभरातील विविध सुंदर पर्यटन स्थळे पाहणे, नानाविध खाद्यपदार्थांची चव चाखणे, भरपूर शॉपिंग करणे म्हणजे पर्यटन? कदाचित प्रसिद्धी माध्यमे पर्यटनाची व्याख्या तशी करीत असतील, परंतु माझ्या मते पर्यटन म्हणजे निसर्ग सौंदर्य, प्राणी, पक्षी, नद्या, संस्कृती, कृषी, लोकगीते, राहणीमान, विरंगुळा आणि शिक्षण याचा सुरेल संगम. आत्ताच्या काळात टुरिझम आणि ट्रॅव्हल यात जो फरक आहे तो समजणे गरजेचे आहे.

आपल्या पूर्वजांनी खूप पूर्वीपासून धर्म आणि पर्यटन आणि स्वास्थ्य यांची सांगड घालून ठेवली त्याचंच एक भाग म्हणजेच यात्रा, जत्रा, परिक्रमा इत्यादी होय. ट्रेकिंग, माऊंटेनेरिंग, क्लायम्बिंग या सर्व गोष्टी पूर्वीही होत्या. आज फक्त कात बदलून त्या पश्चिमेकडून परत आपल्याकडे परत आल्या आहेत.

विशेष म्हणजे पर्यटनासाठी आपल्याला नेहमीच सात समुद्रापार जाण्याची गरज नाही किंवा कुठला ताज महाल व हिमालय देखील ओलांडायचा नाही. आपल्या पंचक्रोशीच्या पलीकडे देखील गेले तरी काहीतरी नवीन गवसतेच. त्याला जोड लागते ती उत्सुकतेची आणि दृष्टीची. उदाहरणार्थ आपल्याजवळचे घ्यायचेच तर प्रवरा परिक्रमेचे घेता येईल. काय नाही या छोट्याश्या परिक्रमेत!

डोंगर, दऱ्या, किल्ले, धबधबे, नदी, धरण, गावे, मंदिरे, सुळके, गवताळ कुरणे, कडे या निसर्गाच्या सर्व आविष्काराचा आपला सामना खूप जवळून होतो. दूर दूर कोणीही नाही ते भरपूर गर्दी असलेली शहरे यामध्ये अनुभवायला मिळतात. ते कसे हे या लेखात पाहू. अगोदर म्हटल्याप्रमाणे पर्यटनात नवनवीन गोष्टी जशा पाहायला मिळतात, अनुभवायला मिळतात आणि तसेच शिकायला देखील मिळते. तर प्रवरा परिक्रमेचा अनुभव हा आयुष्यातील एक अनमोल अनुभव

म्हणून नक्कीच मनात घर करून राहील. मुंबई, पुणे, नाशिक, नगर, संगमनेर आणि शिर्डी या शहरांपासून दोन ते तीन तासांच्या अंतरावर असणारे भंडारदरा धरण जगभरच्या पर्यटकांसाठी आकर्षण असणे नवल नाही. चला तर करूया संकल्प प्रवरेच्या परिक्रमा !

भारत देश हा नद्यांसाठी प्रसिद्ध असलेला देश. त्यातही सप्तसिंधूंचे महत्त्व अनन्यसाधारण. या सात पवित्र नद्यांपैकी गोदावरी ही एक. दक्षिण भारतातील गोदावरी या नदीकाठी आदिम काळापासून संस्कृती बहरली आणि आजतागायत ती सर्वांना समृद्ध करते आहे. तिची महत्त्वाची उपनदी म्हणजेच अमृतवाहिनी प्रवरा. मधुर पाणी असलेली ही नदी सह्याद्रीच्या काळ्या पाषाणातून आपली वाट काढीत कायगाव टोका येथ प्रवरा संगम या नावाने गोदावरीला मिळते.

**डोंगर आणि किल्ले :–**

प्रवरा नदी ही रतनगडापासून प्रवाहित होते. तिन्ही बाजूने उंच असा हा दुर्ग नैसर्गिक विविधतेने नटलेला आहे. खासकरून पावसाळ्यात पूर्ण गडमाथा सोनेरी होतो. छोटी छोटी सोनकीची फुले गडभर फुलतात. धुक्यात लपलेला हा परिसर वर आला की पिवळाधमक झालेला दिसतो आणि हे पाहण्यासाठी ट्रेकर्स दुरूनदेखील येतात. प्रवरेच्या दोन्ही बाजूंनी असणाऱ्या रतनगड आणि कळसुबाई डोंगररांगा ह्या सोनकीच्या आणि कारवीच्या बहारासाठी प्रसिद्ध आहेत. अतिदाट असणाऱ्या जंगलात ही रानफुले आढळत नाहीत.

सह्याद्री पर्वत हा ज्वालामुखीनिर्मित आहे. त्याची प्रचिती येथील तासलेल्या डोंगररांगा पाहिल्यावर कोणालाही नक्कीच येईल. एकावर एक रचलेले थर आणि त्यांची नक्षी ही कोकणाकडे तोंड असणाऱ्या कड्यांवर तर स्पष्ट दिसते. इतकेच काय तर अंगठ्यासारखा असणारा खुट्टा, डोंगराच्या पोटात कोरली गेलेली खोल लांब अशी भेग सांदण असे वेगवेगळे डोंगरांची रूपे येथे दिसतात. याशिवाय प्रवरेच्या कोरलेली सह्याद्रीच्या पोटातील नक्षी तर चांगली लांबरुंद आहे. या नैसर्गिक गोष्टींचाच उपयोग घेऊन येथे उभे राहिले कराल आणि अनगड किल्ले. चढाईसाठी काही सोपे तर काही अतिशय दुर्गम. रतनगडासारख्या किल्ल्यांवर हजारो पर्यटकांचा वावर तर अलंग, मदन आणि कुलंगवर फक्त सराईतांचा संचार. पण येथे सर्वांसाठी काहीतरी नक्की आहेच. येथे जंगल, गवताळ कुरणे आणि कातळ कडे या सर्व गोष्टी आहेत. त्यामुळेच की काय येथे जंगलातले ट्रेक्स,

कड्यांवरचे प्रस्तरारोहण आणि नदीकाठी कॅम्प या सर्व गोष्टी करता येतात. त्याच शिवाय एक पर्यटक म्हणून एका व्यक्तीस अनेक गोष्टी येथे करता येईल. जसे की सांदण दरीतील ट्रेक आणि रॅपलिंग (दोरीच्या साहाय्याने दरीत उतरणे), मंडनगड आणि बाणाचा सुळका रॉक क्लायम्बिंग, अलंगगड, कुलंगगड, रतनगड, पाबरगड, कळसुबाई, नवरा आणि नवरी शिखरांचा ट्रेक या सर्व गोष्टीसाठी तुम्हाला परत परत हा परिसर बोलावतो. फक्त पावसाळ्यात ओसंडून वाहणारे धरण पाहण्यासाठी येणार पाहून आणि वर्षानुवर्षे येणारे जग फिरलेले प्रवासी या सर्वांना हा परिसर आपल्या प्रेमात पडतो आणि हा आहे फक्त प्रवरेच्या उगमाजवळचा साधारणतः ३० किलोमीटर लांबी असलेला भाग.

आज या परिसरात स्थानिक आदिवासी तरुण स्वतःचे पर्यटन केंद्रे कुशलतेने चालवितात आणि जेव्हा तुमचा मार्गदर्शक गावातील व्यक्ती असेल तेव्हा निश्चितच आपली काळजी नाहीशी होते. ज्यांना ट्रेक्स करायचे नाहीत पण शांतपणे कुटुंबासह बोटिंग करायचे, किंवा नदीकाठी राहायचे, विस्तीर्ण आकाशाखाली तंबूत मुक्काम करायचाय. एखाद्याला स्थनिक नृत्य देखील पाहायचंय हे सर्व येथे शक्य आहे.

**किल्ले :–**

दोन हजार वर्षे, अति दुर्गम गडकोट, व्यापारी मार्ग आणि त्याचे रक्षण, कातळकडे, नैसर्गिक रक्षण भारतातील पहिला स्वातंत्र्य संग्राम आणि त्याचे स्मारक अलंग, मदन, कुलंग, पाबरगड, रतनगड, रतनगड गुहा.

**वनवासी जीवन :–**

महादेव कोळी, ठाकर, चाळीसगाव डांगाण नदीच्या उगमाजवळचा भाग दुर्गम असल्याकारणाने येथे ठाकर आणि महादेव कोळी या समाजाची जे या दुर्गम भागाशी एकरूप झालेले आणि निसर्गाच्या चक्रानुसार आपली उपजीविका करणारे. अतिशय कष्टाळू असणारा हा समाज शेती आणि निसर्गातून मिळणाऱ्या उत्पन्नातून आपली गरज भागवितो. सध्या जोडीला पर्यटन आल्याने बहुतांशी राहणीमान उंचावले. अतिवृष्टी असल्याकारणाने येथे डांगी प्रजातीच्या गायी जगतात. उंचीला बेतास बेत परंतु दूध अतिशय उत्तम. तसेच इथला काळा भात. चुकून जरी तुम्ही या प्रकारच्या भाताच्या शेताजवळून गेलात तर एक सुगंध दूरवर तुम्हाला सोबत करेल. हा वाण फक्त इथलाच. भात, नाचणी आणि थोड्याफार

भाज्या ही येथील शेती.

बाकी मग जंगलातून हिरडा, बेहडा, आवळा गोळा करून आणणे. सोबत गायीच्या दुधाचा खवा पेढ्यासाठी विकणे. जंगली गावात आणि शुद्ध पाणी हवेवर जगणाऱ्या गायचे दूधही उत्तमच येणार. त्यामुळे येथील पेढ्याला शिर्डी आणि सर्वदूर मागणी आहे. मनोरंजनाची जेव्हा साधने नव्हती तेव्हा लोकच स्वतः नृत्य प्रकार करायचे. फरक इतकाच की त्याला जोड धर्म आणि गोषीतची दिली जाते. रामायण आणि इतर लोककथांवर आधारित बोऱ्हाडे साजरा केला जातो. जगभर जसे आदिवासी समाजात मुखवट्यांना महत्त्व तसेच इथे देखील आहे. त्यांची अतिशय काळजी घेतली जाते आणि ठराविक वेळी प्रत्येक गावात / वस्तीवर नृत्य साजरे केले जाते. पर्यटनामुळे आता ती तुम्हाला देखील पाहण्याची सोय आहे. ठाकर आणि महादेव कोळी समाजाची वस्ती असेलेल्या भागात काम्बडवाने आणि बोहाडा नि नृत्ये वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मोठे लाकडी मुखवटे आणि त्यासोबत वेशभूषा यांचे मिश्रण रात्रीच्या वेळी गावात पाहताना आपण एका वेगळ्याच काळात जातो. या भागाचे वैशिष्ट्य असे आहे की येथे शांतता आणि स्वच्छ हवा मुबलक आहे. कितीही लोक आले तरी डोंगरदऱ्या त्यांना आपल्यात सामावून घेतात.

हिवाळ्यात प्रचंड थंडी असते, इतकी की संपूर्ण धरण परिसरावर धुक्याची चादरच तयार होते आणि त्यातून डोकावून डोंगरमाथ्यावर येणार सूर्यनारायण कॅमेऱ्यात टिपणे ही पर्वणीच! धरण परिसरातदेखील स्पिलवे भागात नदीचे विशाल रूप पाहण्यास मिळते. येथूनच संपूर्ण डोंगररांग आणि त्याखाली पसरलेले विस्तीर्ण जलाशय दिसते. वर्षभर वेगवेगळ्या वातावरणात हा परिसर आपली विविध रूपे प्रकट करीत असतो.

**धबधबे :–**

ह्या डोंगररांगात सह्याद्रीतील विशाल धबधब्याची खाणच आहे. कोलतेंभे गावाजवळील नेकलेस वॉटरफॉल, पांजरा गावाच्या मागे असलेला उंच असा धबधबा, घाटघर आणि मदन गडाजवळचा धबधबा, अम्ब्रेला फॉल्स (धरणाच्या भिंतीजवळचा), घागर खडक (नेकलेस फॉल्स), आणि साधारणतः दहा किलोमीटर पुढे असलेला रंधा धबधबा. गिरनाईचा हवेत उलट उडणारा धबधबा हा तर गुरुत्वाकर्षणाच्या नियमांना काही काळ धुडकावून लावतो. यातील कोणी रौद्र रूप

दाखवितो तर कोणी धीरगंभीर. आणि शेकडो निर्झर खळाळत डोंगर परिसर गाजवितात. प्रवरेच्या पाण्याचे एक वैशिष्ट्य आहे. हे पाणी कातळखडकातून, आणि एक वृक्षांच्या मुळांमधून आणि मातीतून आल्यामुळे आणि नितळ असल्यामुळे त्यात एक गोडवा आहे जो इतरत्र क्वचितच मिळतो. आणि त्यामुळेच नदीत स्नान केल्याने शरीराला एक वेगळाच फायदा होतो. पावसाळा हा येथील उत्सवाचा काळ. हिरवेगार डोंगर, करोडो रानफुले आणि डोंगरात घुसून थैमान घालविणारे वर आणि ढग कोणालाही कवी बनवतील. याशिवाय भात लावणीचे रमणीय दृश्य तर विचारू नकाच! म्हणूनच याला पावसाचे माहेरघर म्हटले तर योग्यच होईल. त्यामुळेच प्रवरेवर भंडारदरा, निळवंडे आणि घाटघर ही धरणे आहेत आणि प्रत्येकाचे स्वतःचे असे वैशिष्ट्य आणि सौंदर्य आहे. भंडारदरा होऊन शतक ओलांडले तर निळवंडे हे अलीकडचे. घाटघर जलविद्युत प्रकल्प बॅकवॉटरचा आणि तास नजरेआडचा परंतु देखावा मात्र नयनरम्य नक्कीच. यातील भंडारदरा येथे जलविद्युत प्रकल्पही आहे. घाटघर धरणाचे पाणी खाली कोकणात चोंडी या धरणात जाते.

**मंदिरे :–**

मंदिरे म्हटले की आपणाला आठवतात खजुराहो, मदुराई, कांचीपुरम येथील विशाल आणि कोरीव मंदिरे. पण जर तुम्हाला तशीच कोरीव काम केलेली मंदिरे आपल्याजवळ आहे म्हटले तर लवकर विश्वास बसणार नाही. तीन बाजूंनी डोंगर आणि एका बाजून शांत असे नदीपात्र. जवळच कोरीव अशी पुष्करणी हे एखाद्या चित्रात असल्यासारखे मंदिर रतनवाडी या गावात आहे. नुकताच डोंगर खाली येऊन नदीला वाट देतो अशा या दोघांच्या संगमाजवळ काळ्या पाषाणात कोरलेले महादेवाचे मंदिर ज्याला अमृतेश्वर हे नाव आहे. विशेष म्हणजे याचा सभामंडप मागच्या बाजूस आहे. विमान शैलीतील याचा कळस असून खजुराहोसारखी कामशिल्पे देखील या मंदिरावर कोरलेली आहेत.

संगमरवर आणि इतर कुठल्याही दगडापेक्षा सर्वात अवघड अशा ज्वालामुखीजन्य पाषाणातून कोरीव काम नक्कीच वाखाणण्याजोगे आहे. पुष्करणीत प्रत्येक बाजूला देवळीत एक एक देवाची सुंदर अशी शिल्पे येथे आहेत. असेच अकोले शहरात असणारे सिद्धेश्वर आणि गंगाधरेश्वर ही मंदिरे आहेत. जवळच अगस्त्यांचा आश्रम आहे जो भारतातील मध्यवर्ती आश्रम म्हणून विख्यात आहे.

संपूर्ण दक्षिण भारतात वसाहती, संस्कृती आणि धर्माची मांडणी करणारे अगस्त्यांचा वावर या परिसरात होता ही नक्कीच महत्त्वाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. येथून पुढे खाली कायगाव टोक येथील शिवालय देखील तितकेच सुंदर आहे. त्याशिवाय देवगड या परिसरात संस्थांचा आश्रम आणि दत्त मंदिर म्हणजे सुंदरता, स्वच्छता आणि ज्ञानदान यांचा सुरेख संगमच आहे. नदी ही फक्त शेती आणि भौतिक सुबत्ताच देत नाही तर अध्यात्मिक वातावरण निर्माण आणि वृद्धीसदेखील कारण असते याचे उदाहरण म्हणजे प्रवरामाय. संतश्रेष्ठ ज्ञानोबारायांनी नेवासा येथेच ज्ञानेश्वरीची रचना केली. संपूर्ण जगात विशेष असे खांबासाठी असणारे मंदिर त्यामुळेच नेवासा या ठिकाणी आहे. उगमापाशी असलेली मंदिरे ते संगमापर्यंत असलेली मंदिरे, आश्रम आणि नवीन मंदिरे तिच्यासारख्याच सातत्याची साक्ष देतात. गुहेत देव, देवराईतील वृक्ष पूजन, वाघोबा ते शिल्पकलेतील पूर्ण विकास हे सर्व तुम्हाला साधारणतः शंभर किलोमीटरच्या प्रवासात पाहायला मिळेल. नैसर्गिक तत्त्वे ते मानवातील सर्वोच्च विकास या सर्वांविषयीचा पूजनीय भाव स्थानिकांच्या या स्थळांमधून व्यक्त होतो. पर्यटनात निसर्गासोबतच मानवाच्या कलेचा लागलेला हा हातभार पाहून तुम्ही आश्चर्यचकित नक्कीच व्हाल यात काही शंका नाही.

**खाद्य संस्कृती :–**

इतके सगळी ठिकाणे फिरायची आणि घरी जाताना काहीतरी घेऊन तर नक्कीच जायला हवे. काळजी करू नका. राजूर आणि वारंघुशीचा पेढा तुम्ही एकदा खाल्ला तर विसरणार नाही. तळहातावर येईल असा मस्त चकतीच्या आकाराचा हा पेढा खाल्ला की पॉट भरल्यासारखे होते. अकोल्याला जाताना घाटात घट्ट लस्सी तर घश्यापर्यंत येईल इतकी मस्त आहे. येथील डांगी प्रजातीच्या गायी डोंगरात मुबलक चरतात त्यामुळे त्यांच्या दुधाची चव नक्कीच उत्तम आहे. त्यांच्यापासूनच येथील दुग्ध उत्पादने बनतात. याशिवाय येथील शेतकरी हा प्रगत आहे. ऊसशेती मोठ्या प्रमाणात अकोले, संगमनेर, नेवासा आणि राहुरी या भागात होते. त्यामुळे भरपूर साखर कारखाने देखील आहेत. आवळ्याची विविध उत्पादने, आठवडे बाजारातील गोडीशेव, जिलेबी, भेळ आणि अनेक गोष्टी ज्या शहरात मिळणे अवघड आहेत त्या येथे सहजासहजी मिळतील. वर्षातून एकदा भरणारा चाळीसगाव डांगणातील राजूरचा बैलांचा बाजार म्हणजे एक पर्वणीच.

जर तुम्ही स्थानी आदिवासी युवकाच्या घरी किंवा कॅम्पमध्ये राहिलात तर रानभाज्या आणि गावरान जेवण कसे असते ते नक्कीच चाखायला मिळेल.

जाता जात एक अनोखी गोष्ट जी साधारणतः १० ते १५ दिवसच पाहायला मिळते ती म्हणजे काजव्यांचा उत्सव. मे महिन्याच्या शेवटी आणि पावसाच्या पहिल्या काही दिवसांत रात्रीच्या अंधारात करोडो काजवे झाडांवर लखलखत असतात. खास त्यांना पाहाण्यासाठी आणि कॅमेऱ्यात टिपण्यासाठी प्रकाशचित्रकार वाट पाहून असतात. तुम्हाला देखील प्रवरेचा परिसर पाहायचा असेल तर प्रवरा परिक्रमेचे आमंत्रण आहेच. हो फक्त येताना थोडे संवेदनशीलतेने या. जगातील काही जैवविविधतेने नटलेल्या भागांपैकी हा एक भाग मोडतो, निसर्ग सौंदर्य, आदिवासी संस्कृती, अध्यात्मिक ठिकाणे, स्वच्छ नितळ वाहणारे ओढे, झरे, धबधबे आणि अमृतवाहिनी प्रवरा हे सर्व तुम्हाला आनंद आणि शांती नक्कीच देतील. तुमचा उद्देश तो मग पर्यटन, आराम करणे, स्थानिक संस्कृती अनुभवणे, ट्रेक करणे किंवा मस्त ड्राइव्ह करणे नक्कीच सध्या होईल. सोबत रम्य आठवणीदेखील बनतील.

फक्त पुढच्या येणाऱ्या पर्यटकांसाठी इथला परिसर चांगला कसा राहील याचा विचार केला तर निश्चितच तोदेखील तुमच्यासारखाच आनंदी होऊन परत जाईल.

**वन्य जीवन :–**

सह्याद्री पर्वतरांग वन्य जीवनाच्या बाबतीत देखील अतिशय समृद्ध आहे. बिबट्या, रानडुक्कर, सांबर, भेकर, शेकरू, मोर, सर्पगरुड, स्पुनबिल्स, ब्राह्मणी डक, गिधाड, तरस, ब्लु मॉर्मन फुलपाखरू आणि इतरही अनेक प्राणी येथे आहेत. एका भेटीत सर्व काही दिसणार नाही परंतु त्यांच्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा मात्र नक्की सापडतील. बिबट्या हा जंगलात जरी असला तरी दिसणे तसे दुर्मिळच. परंतु अकोले, संगमनेर आणि राहुरी या भागातील उसाच्या शेतीतील वास्तव्य शेतकऱ्यांना नवीन नाही.

**– योगेश कर्डिले**
**अहमदनगर, मो. ९७४०९३२२४८**

●●●

# ९) परिक्रमेतून परिवर्तनाची दिशा

सह्याद्रीच्या पर्वत रांगातील रतनगडाच्या कुशीत अमृतवाहिनी प्रवरा उगम पावते. शिखरस्वामिनी कळसूबाई, अलंगगड, कुलंगगड, मदनगड, रतनगड या डोंगररांगांच्या उतारावर पडणारे पावसाचे पाणी कवेत घेत अनादिकालापासून अमृतवाहिनी प्रवरा वाहत आहे. वर्षभरात तिची नानाविध रूपे किनारा पाहात आला आहे. पावसाळ्यातील तिचे बेभान होऊन वाहणे तर उन्हाळ्यात रोडवलेली जेमतेम धार. प्रवरेचा प्रवाह पावसाळा संपल्यानंतरही तीन-चार महिने कमी अधिक प्रमाणात वाहत असायचा. शंभर वर्षापूर्वी प्रथमच या निसर्गचक्रात मानवी हस्तक्षेपाने बदल झाला. इस्वरदा नामक दोन टेकड्यांना जोडणाऱ्या भंडारदरा धरणाच्या काळ्याशार दगडी भिंतीने प्रवरेचा अनादी काळापासून वाहात असणारा खळाळता प्रवाह अडविला. सह्याद्रीच्या डोंगररांगातील दऱ्याखोऱ्यात प्रवरा बंदिस्त झाली. माणसांच्या गरजेनुसार ती वाहू लागली. अर्थात त्यामुळे वर्षाचे बाराही महिने काही दिवस भंडारदऱ्यापासून ओझरपर्यंत वाहणारी प्रवरा दिसू लागली. प्रवरेचे पाणी नदीतून पाटात आणि पाटातून दुष्काळी भागातील शेत शिवारात फिरू लागले. जिल्ह्याच्या उत्तर भागात अनेक ठिकाणी या पाण्याने समृद्धीची बेटे निर्माण केली. राज्याला दिशा देणाऱ्या कृषी औद्योगिक क्रांतीची मुहूर्तमेढ येथे रोवली गेली.

जिल्ह्यातील हजारो लोकांच्या जीवनात सुखसमृद्धी निर्माण करणाऱ्या या प्रवरामाईच्या नैसर्गिक स्थितीत गेल्या शंभर वर्षात अनेक बदल झाले. सध्या रतनगडापासून संगमनेर तालुक्यातील ओझरपर्यंत नदी वाहती आहे. मात्र पुढे प्रवरा संगमपर्यंत पावसाळ्याच्या कालावधीतील काही दिवस सोडले तर नदी मृत होते. नदीवर ठिकठिकाणी झालेली धरणे कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची शृंखला,

पाण्याचा वाढता उपसा आदी कारणांमुळे नदीचा पायाभूत प्रवाह खंडीत झाला आहे. नदीचे मुख्य कार्य खणण व भरण पूर्णतः थांबले आहे. नदीची वहन क्षमता कमी झाल्यामुळे पुराची तीव्रता वाढली आहे. नदीचे पाणी पुराच्या काळात काठावरच्या शेतात अनेकदा पसरते. शेती गावांचे नुकसान होत आहे. अतिक्रमणांमुळे व अन्य कारणांमुळे नदीला मिळणारे लहान मोठे ओढे, नद्या, नाले यांचे अस्तित्व संपत चालले आहे. शेती विकसित करण्याच्या नादात भूभाग सातत्याने बदलत आहे.

अकोले, संगमनेर, श्रीरामपूर, नेवासा परिसरातील लहान-मोठ्या गावांमुळे होणारे नागरी व औद्योगिक प्रदूषण वाळूचा बेबंद उपसा यामुळे नदीपात्राची दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी गावातील गटारींचे पाणी थेट नदीपात्रात सोडले आहे. अनिर्बंध वाळू उपशामुळे दरवर्षी पात्रात जागोजागी मोठमोठे खड्डे पडतात. गावातील राडारोडा नदीपात्रात आणून टाकला जातो. बऱ्याच ठिकाणी नदीपात्र म्हणजे लोकांना उकिरडा वाटतो. नदीकाठची झाडे-झुडपे व गवताचे आवरण नष्ट झाल्यामुळे दोन्ही काठांची मोठ्या प्रमाणात झीज होत आहे. उसासारखे एक पीक पद्धतीमुळे पाण्याचा अनियंत्रित उपसा तसेच माती व पाण्याचे झालेले प्रदूषणाने नदीतील मासे व जलचरांची जैवविविधता धोक्यात आली. पूर्वी आवर्तन संपल्यानंतरही नदीची पाण्याची धार सुरू राहायची. ठिकठिकाणच्या डोहात पाणी असायचे. आता आवर्तन संपल्यानंतर दोन-तीन दिवसातच पात्र कोरडे पडते. त्याचा परिणाम नदीपात्रातील जैव विविधतेवर झाला आहे. नदीपात्रात पूर्वी असणाऱ्या शेवाळ व अन्य पाणवनस्पती मासे व अन्य जलचर यांचे अस्तित्व संपले आहे. नदीतीतील मासेमारी जवळपास संपुष्टात आली आहे. अनेक ठिकाणी नदीचे पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. आज शुद्धीकरण केले तरच नदीचे पाणी पिता येते अन्यथा नदीचे पाणी पिण्यासाठी वापरले जात नाही अशी स्थिती आहे. प्रवरेच्या नदीमातृक संस्थेचा झपाट्याने ऱ्हास होत आहे.

**पुनरुज्जीवन प्रक्रिया व विविध घटकांचा सहभाग :-**

प्रवरा नदीचे पुनरुज्जीवन शक्य आहे मात्र त्यासाठी सामाजिक राजकीय इच्छाशक्ती व नेमक्या कृतीकार्यक्रमाची गरज आहे. सर्वप्रथम नदीव्यवस्था व परिसंस्थेचे जे नुकसान झाले आहे त्याचे तटस्थ सामाजिक, राजकीय व पर्यावरणीय अवलोकन करणे हा याचा पहिला टप्पा असेल. शेतकरी उद्योजक व्यावसायिक

महिला, मुले युवक निसर्गप्रेमी नदीप्रेमी नागरिक, पत्रकार, वकील सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण अभ्यासक, विविध विचारधारेचे लोक, राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर आदी घटकांना नदीविषयी संवेदनशील बनविणे त्यासाठी जनजागृती करणे व हे काम निरंतर सुरू ठेवणे गरजेचे आहे.

निसर्गस्नेही अशा शाश्वत जीवनशैलीबाबत आग्रही राहिले पाहिजे व लोक स्वतःहोऊन कसे प्रवृत्त होतील असे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. गाळरेषा, पुररेषा हे शब्द फ़क्त कागदावर राहाता कामा नये तर त्याची प्रत्यक्ष अनुभूती लोकांना यायला हवी. त्यासाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ व अन्य नियंत्रक यंत्रणांना प्रो ॲक्टीव्हली (Pro actively) काम करावे लागेल. बोटचेपी कार्यशैली सोडावी लागेल तसा जनमताचा रेटा (Pressur Group) कार्यरत करावा लागेल.

घरगुती व औद्योगिक प्रदूषणाचे नियंत्रण प्रथम करावे लागेल. आज अनेक गावांमध्ये गावातील गटाराचे पाणी थेट नदीत सोडल्याचे दिसून येते. आवर्तन संपल्यानंतर तीन-चार दिवसांतच नदीपात्र कोरडे ठणठणीत होते. नंतर नदीपात्रात त्या गटारीच्या पाण्याचे अस्तित्व अनेक ठिकाणी दिसून येते याला पायबंद घालावा लागेल. डिटर्जंट, किटकनाशके यांचा वापर व परिणाम याविषयी लोकशिक्षण देणे अत्यावश्यक आहे.

घनकचरा व्यवस्थापन हाही गावांच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग आहे. कोणताही कचरा नदीत अथवा नदीकिनारी जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

तसेच यात्रा उत्सव रूढी प्रथा परंपरा यांचा व त्या साजरा करण्याच्या पद्धतीचा पुनर्विचार करावा लागेल.

प्रवरा व तिच्या उपनद्या असणाऱ्या मुळा, आढळा, म्हाळुंगी, कृष्णवंती यांच्या उगमस्थानाचा हा प्रदेश हा दण्डकारण्याचा भाग आहे. अकोल्यात प्रवरेकाठी महर्षी अगस्तींनी आपला आश्रम स्थापन केला तो यामुळेच. म्हणजे एकेकाळी अकोल्यापासून कळसुबाई हरिश्चंद्रगडापर्यंत घनदाट झाडी असणार. काळाच्या ओघात मानवी हस्तक्षेपामुळे हे वनआच्छादन आक्रसत गेले आहे. आता जिल्ह्याच्या पश्चिम टोकाला थोडेफार चांगले म्हणता येईल असे जंगल शिल्लक आहे. या बदलाचे दुष्परिणाम चांगलेच जाणवत आहे. जास्त पावसाचे क्षेत्र हळूहळू कमी

होत चालले आहे. पूर्वी मुसळधार पावसाची धार घाटघरपासून थेट राजूर, विठे घाटापर्यंत यायची. राजूरपर्यंतचे ओढे नाले दुथडी भरून वाहायचे. आता तसे होत नाही.

वृक्ष आच्छादन कमी झाल्यामुळे मातीची धूप मोठ्या प्रमाणात सुरू आहे. जमिनीत पाणी मुरत नसल्यामुळे आता पाऊस उघडताच आठपंधरा दिवसातच ओढे नाले सुकतात. पूर्वीसारखे जास्त काळ वाहत नाहीत. डोंगर रांगातील आदिवासी भूमीपुत्रांना विश्वासात घेऊन पाणलोट विकासाचा कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. थोडक्यात प्रवरा व तिच्या उपनद्यांचे पाणलोट क्षेत्र याचे शास्त्रीयरित्या संवर्धन करावे लागेल. जल, जंगल, जमीन या घटकांचे संवर्धन व जपणूक करणे आवश्यक आहे. अगदी कात्राबाईच्या देवराईपासून प्रवरा संगमपर्यंत ही संवर्धन प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबवावी लागेल.

विकासाबरोबरच पाण्याची मागणी वाढत जाणार. नदी काठावरील गावांचे थेट नदीत जाणारे सांडपाणी शुद्ध करून शेतीसाठी वापरता येईल. ठराविक अंतरावर असे शुद्धीकरण प्रकल्प उभारावे लागतील.

नदीकाठी गाव असूनही आज काही गावांना पाणी टंचाई जाणवते. शिवाय नदीचे पाणीही बऱ्याच ठिकाणी पिण्यायोग्य नाही. नदीकाठच्या सर्व गावांना पुरेशा प्रमाणात वर्षभर पिण्याचे शुद्ध पाणी मिळेल हे पहावे लागेल.

नदी संदर्भातील विविध कामांसाठी प्रवरा रिव्हर रिजनरेशन ॲण्ड डेव्हलपमेंट ॲथारिटी (Pravra River Regenaretion and Devlopment Authority) सारखी निपक्ष व्यवस्था /यंत्रणा निर्माण करणे व तिला प्रस्थापित नोकरशाहीपासून दूर ठेवणे गरजेचे आहे. तसेच या यंत्रणेला उत्तम दृष्टिकोन आणि दूरदृष्टी असणारे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

विविध शासकीय विभाग सामाजिक व पर्यावरणविषयक संस्था तज्ज्ञ व्यक्ती विविध लोककेंदी कायदे यांचा वापर करून पुनरुज्जीवन / संवर्धन कृती योजना, (Consrvetion Manegment Plan) आखणे व नद्यांची समृद्धी जपणे आवश्यक आहे. मुळा प्रवरेच्या लाभ क्षेत्रातील साखर कारखाने, दूध संघ, शिक्षण संस्था यांची या सर्व उपक्रमात महत्त्वाची भूमिका असेल.

प्रवरा नदीच्या काठावर अनेक महत्त्वाची तीर्थ क्षेत्रे, अध्यात्मिक स्थाने आहेत, पण या ठिकाणांची धार्मिक तसेच अध्यात्मिक महती बऱ्याच जणांना

माहीत नसते. स्थानिक लोकांना थोडीफार माहिती असली तरी त्यात सखोलता नसते. विश्वासार्हताही कमीच असते. अशा सर्व स्थळांची धार्मिक, अध्यात्मिक माहिती त्याबाबतच्या पुराणकथा, अशा देवतांबाबत झालेले संशोधन त्याची अध्यात्मिक महती तसेच ऐतिहासिक ठिकाणे व त्यांचा इतिहास याचे नीट दस्ताऐवजीकरण/डॉक्युमेंटेशन करणे गरजेचे आहे. तसेच ही माहिती सर्वांना सहज उपलब्ध व्हायला हवी.

प्रवरा परिसरातील वनसंपदा, प्राणी जीवन, पक्षी जीवन याची माहिती त्यांच्या अभ्यासकांना उपलब्ध व्हायला हवी "Pravara Calling" (प्रवरेची हाक) यासारखे उपक्रम यासाठी हाती घ्यावे लागतील. 'नमामी गंगे नमामी चंद्रभागे' अशा कामातील भलेबुरे उपक्रम त्यासाठी दिशादर्शक ठरतील.

**या प्रक्रियेतील आव्हाने :–**

'राजकीय', 'सामाजिक', सांस्कृतिक', 'अध्यात्मिक', 'पर्यावरणीय', 'औद्योगिक', 'उपजीविकेच्या अंगाने', 'मानसिक'. अंतिम लक्ष्य प्रवरेची परिक्रमा म्हणजे केवळ आध्यात्मिक वा धार्मिक अंगाने नाही तर त्यासाठी नदीचे पावित्र्य जपणारा गाव, समाज व नेतृत्व निर्माण करणे हा ध्यास असावा. पुढील पिढीने हे अतिधाराव्रत अंगीकारावे लागेल. प्रवरेच्या पुनरुत्थानासाठी निर्धार करावा लागेल.

**– प्राचार्य प्रकाश टाकळकर**
**अकोले, मो. ९४२३४६७४१७**

●●●

# १०) केशव गोविंद बन परिक्रमेसाठी योगदानास सिद्ध

श्रीक्षेत्र बेलापूर खुर्द प्रवरा नदीच्या उजव्या तटावर वसलेले स्थान आहे. या ठिकाणीच श्री हरिहर केशव गोविंद महाराज मंदिर प्रवरा नदीच्या काठी असलेले अतिशय पुरातन आणि जागृत देवस्थान आहे. पूर्वी या परिसराला 'बिल्वपुरी' असे संबोधण्यात येत असे. कारण या परिसरात घनदाट बेल आणि चंदनाचे वन होते. अशा या मनमोहक परिसराकडे देवदेवतासुद्धा आकर्षित झाले.

एकदा शिवपार्वती पृथ्वीभ्रमणासाठी या परिसरात आले असता इथला निसर्ग पाहून पार्वती माता मोहित झाल्या. या पर्यटनाचा आनंद लुटत भ्रमण करीत असतांना पार्वती माता तहानेने व्याकूळ झाल्या. सर्वत्र शोध करूनही पाण्याचा एक थेंबही मिळेना तेव्हा भगवान शंकरांनी एक बेलाचे पान तोडून जमिनीवर टाकताच तेथे एक सुंदर सरोवर निर्माण झाले. या सरोवराचे पाणी प्यायल्याने पार्वती माता तृप्त झाल्या आणि या सरोवरात स्नान करणाऱ्यांना इच्छित संततीचा लाभ होईल असा वर देत या सरोवराला 'बिल्वतीर्थ' असे नाव दिले.

देवदेवतांच्या पावन स्पर्शाने पावन झालेल्या बेलापूर खुर्द या गावाला अध्यात्मिक व पौराणिक वारसा लाभला तो श्री हरिहर केशव गोविंद महाराज देवस्थानाच्या रूपाने. प्रवरेचा प्रवाह याच बेलापूरहून संथपणे मार्ग काढत सुजलाम् सुफलाम् बनवत पुढे जातो. या देवस्थानचा आध्यात्मिक, पौराणिक वारसा जपतांनाच येणाऱ्या भक्तांना अधिकाधिक चांगली सेवा देण्यासाठी देवस्थानला एक आकर्षक निसर्गरम्य पर्यटन स्थळ बनविण्याचा श्री हरिहर केशव गोविंद संस्थानच्या विश्वस्तांचा मानस आहे. अहमदनगर जिल्ह्याचे भूषण असलेल्या तीर्थक्षेत्रापैकी एक असलेले श्री हरिहर केशव गोविंद संस्थान तीर्थक्षेत्र विकास निधीतून अनेक कामे मार्गी लावली त्यात प्रामुख्याने भक्तनिवास, प्रवचन हॉल,

लंगर हॉल, प्राथमिक शाळा यांचा समावेश आहे.

पूर्वी त्रिपूर नावाचा दैत्य ब्रह्मदेवाच्या वरामुळे फार उन्मत्त झाला होता. त्रिपुरासुराचा संहार करण्यासाठी सर्व देव विष्णुसह बिल्वतीर्थाजवळ आले. ते रम्य सरोवर पाहून देवांनी त्यामध्ये स्नाने केली व पूजेकरिता प्रत्येक देवांनी आपापल्या नावाने संबोधले जाणारे असे एक एक लिंग स्थापन करून भगवान शिवाची स्तुती केली. नंतर भगवान शंकर संतुष्ट होऊन म्हणाले की, प्रथम बिल्वतीर्थात स्नान करून तुम्ही स्थापन केलेल्या लिंगाची पूजा करावी. त्यानंतर लिंगांना प्रदक्षिणा घालावी. असे जो मनुष्य भक्तीने करील त्याच्या सर्व इच्छा सफल होतील, अंती मोक्ष मिळेल.

अशारितीने श्रीक्षेत्र बेलापूर बन येथून बिल्वतीर्थात स्थान करून श्री हरिहर केशव गोविंद महाराज यांना श्री रुद्राभिषेक करून श्री प्रवरा गोदा मातेस उजव्या बाजूला ठेवून परिक्रमा सुरू करावयाची आणि श्री प्रवरा नदीच्या उगमापासून प्रवरा संगमापर्यंत ती ज्या ठिकाणी गोदावरीला मिळते तेथून प्रदक्षिणा घालून परिक्रमा सुरू केली तिथपर्यंत यायचे अशी परिक्रमेची पद्धत आहे. या दरम्यान ठिकठिकाणी लागणाऱ्या मंदिरात पूजा/अभिषेक करून पुढे मार्गस्थ व्हायचे असते.

**यानि कानि च पापानि जन्मान्तर कृतानि च ।**
**तानि तानि प्रणश्यन्तु प्रदक्षिणा पदे पदे ।।**

या जीवनात आणि जन्मजन्मांतही कळत नकळत केलेल्या पापांचे क्षालन प्रदक्षिणा घातल्यामुळे होते. यावरून असे लक्षात येते की, प्रदक्षिणेचा, परिक्रमेचा एक उद्देश पापक्षालन हाही आहे. मनातील कुविचारांचा त्याग करून सन्मार्गावर पुढे जाण्यासाठी प्रदक्षिणा उपयुक्त ठरते. याचबरोबर ऐहिक आणि प्रापंचिक जीवनातील समस्या सोडविण्यासाठी ही प्रदक्षिणा उपयुक्त ठरते. विनम्रता, कृतज्ञता, श्रद्धा आणि प्रार्थना यांचा मनोरम आविष्कार म्हणजे प्रदक्षिणा आहे. भगवंतावर पूर्ण श्रद्धा ठेवून त्याचे नामस्मरण करीत प्रदक्षिणा घातली जाते. त्यामधून मिळणारी अनुभूती वैयक्तिक शांती, समाधान आणि लाभ मिळवून देणारी असते.
(**संदर्भग्रंथ** : श्री केशव गोविंद माहात्म्य)

**– दिलीप नरहर क्षीरसागर**
नासिक, मो. ९४२३९६४३३४

●●●

# ११) श्री अगस्तीऋषी देवस्थान ट्रस्ट परिक्रमा प्रकल्पाच्या सिद्धीसाठी सिद्ध

महर्षी अगस्त्यमुनींचे चिरसंजीवक वास्तव्य अकोले येथील अमृतवाहिनीच्या तीरी अगस्त्य आश्रमात आहे. अगस्ती ऋषी, प्रभू रामचंद्र, अगस्ती ऋषींचे बंधु महामती, चांगावटेश्वर, वाल्मिकी व धौम्य ऋषी आदींची पौराणिक धार्मिक संदर्भ असणारी अकोले तालुक्याची भूमी प्रवरा खोरे ही पवित्र भूमी मानली जाते.

अगस्ती ऋषींच्या चिरवास्तव्याने आणि प्रभू रामचंद्रांनी येथे आगमन केल्याने या मातीला संस्कृतीचा सुगंध प्राप्त झाला. तर दुसरीकडे छत्रपती शिवाजी महाराजांची पावले या तालुक्यात उमटली आणि येथे वीर रसाचा पोवाडा गायला गेला. त्यामुळे अकोले तालुक्याच्या अशा आध्यात्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक संदर्भांनी तालुक्याला नवा आयाम देण्याचे काम; सध्या अगस्ती देवस्थान ट्रस्ट करीत आहे.

निळाशार जलाशय असणारा भंडारदरा, निळवंडे, आढळा धरणांचा प्रदेश, त्यांच्या जोडीला आकाशाला गवसणी घालणारी कळसुबाई, ऐतिहासिक वारसा जपणारा रतनगड, विश्रामगड, हरिश्चंद्रगड. याला जोडूनच येथे असणारी सांदण दरी आणि दूर सर्वत्र पसरलेली हिरवाई! गिऱ्हेबाज वळण घेणारे रस्ते आणि याला जोडून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणारी अकोले तालुक्याची भूमी म्हणूनच पर्यटकांना आकर्षित करते आहे.

या पवित्र भूमीत कृषी संस्कृतीचे बीजारोपण करणारे अगस्ती ऋषी या अकोल्याजवळील अगस्ती आश्रमात चिरवास्तव्यास आहेत. प्रभू रामचंद्रांनी तेथे आपली पावले उमटवली. अगस्ती ऋषींची गाठ घेतली. याच ठिकाणी रावण

दमनासाठी त्यांना 'आदित्य हृदय स्तोत्र' मंत्र अगस्तींकडून प्रभू रामचंद्र यांना मिळाला. महर्षी अगस्त्यांच्या मार्गदर्शनाने प्रभू रामचंद्र पंचवटीत राहिले. त्याचबरोबर प्रभू रामचंद्रांनी गोदा आणि प्रवरा यांच्या संगमापर्यंत प्रवरेची परिक्रमा केली असावी, असे संदर्भ सापडतात. ही परिक्रमा कलियुगात आता पुनरुज्जीवित करावी, असे प्रवराभक्तांच्या मनी आले. त्यामुळे प्रवरा परिक्रमा ही आजच्या युगाची नवीन हाक ठरली तर नवल वाटणार नाही. नदीकाठी नांदणारी संस्कृती आता हायवे काठावर स्थलांतरित होऊन या संस्कृतीने विकृतीला जन्म दिला आहे. प्लास्टिकने व्यवस्थापनाचा बोजवारा उडून या संस्कृतीने पर्यावरणाला मूठमाती दिली आहे. माणसाच्या जीवनातील पाण्याचे अनन्यसाधारण व अनमोल महत्त्व, या स्थलांतरात गिळंकृत केले आहे आणि पाण्याची गटार गंगा वाहती झाली आहे. त्यातूनच अनेक विकार हळूहळू पुढे येत आहेत. प्रवरा खोरे हळूहळू त्या मार्गाकडे जात आहे. म्हणून वेळीच सावध झाले पाहिजे.

पौराणिक संदर्भामध्ये प्रवरा उगम रतनगडाच्या पायथ्याला म्हणजे रतनवाडी येथे झाला. देव आणि दैत्य यांच्यातील अमृत मंथनाच्या प्रसंगी रत्नगडावर रत्नपूजन घडले. अमृत वितरणाप्रसंगी महर्षी अगस्त्य आणि ब्रह्मर्षी नारद यांनी शिवांना मानवासाठी अमृत वितरीत करण्याची विनंती केली. भगवान विष्णूंनी आपल्या अंगुष्ठ स्पर्शाने अमृत कुंभातून अमृतधारा मानवांसाठी वितरीत केली. असा अमृतवाहिनी प्रवरामातेचा रत्नगड परिसरातील उगम प्रगत करून देणारा आहे, असे पौराणिक संदर्भातून 'अगस्त्य महात्म्य' या ग्रंथातून समोर आले आहे.

पाणी आणि पाण्याच्या भोवती येणारी श्रद्धा! या श्रद्धेमुळेच अगस्ती ऋषी आश्रम आजही तालुक्याचे एक तीर्थक्षेत्र बनले आहे. सुवर्ण मुखरी, किंवा पेहेरा, किंवा पर्वरा किंवा प्रवरा, अमृतवाहिनी अशी विविध नावे मिळालेल्या प्रवरा नदीचे 'प्रवरा गॅझेट' हे खऱ्या अर्थाने या शतकाला मिळालेली मोठी देणगी आहे आणि त्यामुळेच अकोले तालुक्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे.

१९५३ साली स्थापन करण्यात आलेला अगस्ती आश्रमात ट्रस्ट हा खऱ्या अर्थाने आता विकसित होत आहे. आपल्या कार्यकाळात विविध विकासाची कोट्यवधी रुपयांची कामे आपण केली असून त्यामध्ये भाविकांसाठी बांधलेले भक्ती निवास, सभागृह इ. कामे लक्षणीय आहेत. देवस्थानच्या पंधरा एकरच्या जमिनीमध्ये आज अध्यात्मिक संस्कृती पुनरुज्जीवित होत आहे ही निश्चितच

समाधानाची बाब मानली पाहिजे.

येथे स्नानासाठी दोन कुंडं असून भाविकांच्या व पर्यटकांच्या निवासाची व भोजनाची सोय केली जाते. शिवाय या परिसरामध्ये असणारे प्रभू रामचंद्राचे मंदिर, लोपामुद्राचे मंदिर, विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर किंवा शिवमंदिर या सर्व बाबी पाहता पर्यटकांनी या ठिकाणी येऊन निश्चितपणे मुक्काम केल्यास त्यांना सुखद अशी अनुभूती मिळाल्याशिवाय राहणार नाही.

या देवस्थानवर नितांत श्रद्धा व अगस्त्य ऋषींच्यावर निष्ठा ठेवणारे डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी प्रवरा परिक्रमेचा ध्यास घेतला आहे. अगस्ती देवस्थान ट्रस्टने परिक्रमेच्या पुनरुज्जीवनासाठी यजमानपद स्वीकारायचे ठरविले आहे. यानिमित्ताने मी संघटक व संयोजक या नात्याने सर्व प्रवरा खोऱ्यातील भूमिपुत्रांना आणि देश-विदेशातील नागरिकांना प्रवरा परिक्रमा करावी व अमृतवाहिनीचे पूजन करून पुण्य संपादनाबरोबरच जीवनदायिनी प्रवरेचे सौंदर्य, पर्यावरण आणि माधुर्य अबाधित करण्यासाठी कर्तव्यभावनेने पुढे यावे.

परिक्रमेने अनेक हेतू साध्य होतील हे मात्र निश्चित. त्यातून गावोगावी तीर्थक्षेत्र विकास, पर्यटन विकास, तरुणांना रोजगार, सांस्कृतिक चळवळीला बळ आणि विशेष म्हणजे यातून नदीला पुन्हा अमृतवाहिनीचे स्वरूप प्राप्त करून देणारी चळवळ उभी राहील, असा मला विश्वास वाटतो.

**अकोल्यातील अगस्ती आश्रम**

समुद्रमंथन प्रसंगापासून महर्षी अगस्त्यांनी अमृतवाहिनी तीरावर विश्वातील केंद्रीय आश्रम उभा केला, अशी मान्यता आहे. भारतात अनेक ठिकाणी महर्षी अगस्त्यांची आश्रमस्थाने, तपोस्थाने, कार्यस्थळे, संचारस्थळे आहेत. आग्नेय आशिया आणि दक्षिण भारतात तर ती वैपुल्याने आहेत. सप्तर्षींच्या तारकापुंजात एका दिशेला ध्रुव आणि दुसऱ्या दिशेला अगस्त्य तारा जगताला दिशा देण्याचे कार्य करीत आहे. महर्षी अगस्त्य कृषीसंशोधन, पर्जन्य व्यवस्थापन, जलव्यवस्थापन आदी मानवास उपयुक्त सर्व शास्त्रांचे अतिप्राचीन असे उद्‌गाते असून, ते चिरंतन स्वरूपात कार्यरत आहेत. विश्वातील केंद्रीय आश्रम म्हणून अगस्त्य सूक्ष्मरूपाने चिरंतन स्वरूपात येथे राहून कार्य करीत आहेत, असे 'अगस्त्य महात्म्य' म्हणते. प्रभू रामचंद्रांचे तीन वेळा आगमन. अगस्ती महर्षींनी प्रभू रामचंद्रांना येथेच आदित्य हृदय स्तोत्र हा मंत्र दिला. तसेच रावण वधासाठी वापरला रामबाण,

अक्षय बाणभाता, दिव्य खड्ग आदी शस्त्रे या आश्रमात दिली. माता लोपामुद्रासहित अगस्ती ऋषींचे चिरंतन वास्तव्य येथे आहे. अगस्ती ऋषींचा आश्रम हा एक पावन भूमी आणि शक्तिस्थळ आहे. महर्षी अगस्त्य यांनी प्रवरा नदीचे अवतरण केले असे इतिहास सांगतो.

महर्षी अगस्त्यांच्या अगस्त्य आश्रम ते पंढरपूर अशा पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन प्रतिवर्षी मोठ्या श्रद्धेने आणि जिद्दीने केले जाते. या सर्व भक्तांची प्रथम परिक्रमेत सहभागी होण्याची उत्कट इच्छा आहे ही गोष्ट परिक्रमेच्या पुनरुज्जीवनाला बळकटी देणारी आहे.

रत्नगड ते प्रवरासंगम अशी प्रवरेची परिक्रमा परंपरेने घडत रहावी यासाठी देवस्थान ट्रस्टचा अध्यक्ष या नात्याने संघटक म्हणून प्रथम परिक्रमेच्या संयोजनामध्ये प्रवरा खोऱ्यातील सर्व भूमिपुत्रांनी तन-मन-धनाने सहभागी होऊन अमृतवाहिनी प्रवरा मातेचे पांग फेडण्याचा पुण्यमयी प्रयत्न करावा, असे आवाहन पुनःश्च करीत आहे.


**– ॲड. के. डी. धुमाळ**

अकोले, मो. ७०२०१५५०६१, ९४२०१७७७३३

**(शब्दांकन प्रा. डी. के. वैद्य)**

●●●

# लेखक परिचय सूची – प्रा.डॉ. मच्छिंद्र मालुंजकर



**हेरंब कुलकर्णी**

मूळ गाव :- ता. अकोले, जि. अहमदनगर

शिक्षण आणि सामाजिक प्रश्न हे मुख्यत्वे लेखनाचे विषय असून एकूण १० पुस्तके व ४ पुस्तिका प्रसिद्ध.

ग्रंथसंपदा :- 'शाळा आहे शिक्षण नाही', 'परीक्षेला पर्याय काय', 'जे कृष्णमूर्ती आणि कृष्णमूर्ती स्कूल्स', 'शिक्षकांसाठी साने गुरुजी', 'बखर शिक्षणाची', 'आमच्या शिक्षणाचे काय?', माझी शिक्षण परिक्रमा', 'सहावा वेतन आयोग', 'दारिद्र्याची शोधयात्रा', 'कॉमन मॅन'.

सामाजिक क्षेत्रात विधवा महिलांचे प्रश्न, बालविवाहाचे प्रश्न, राज्यातील दारूबंदीचा प्रश्न, बालकामगार, शाळाबाह्य मुले, भटक्या विमुक्तांचे प्रश्न सोडविणाऱ्या संघटनांसोबत कार्यरत.



**विजय प्रल्हाद सांबरे**

मूळ गाव :- आश्वी बुद्रुक, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

शिक्षण :- बी.कॉम. / डिोमा इन नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट

पुणे येथील इकोलोजी सोसायटीमध्ये 'नैसर्गिक साधन संपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन' या विषयात पदविका पूर्ण.

पश्चिम घाट बचाव या मोहिमेत सहभाग, संगमनेर येथील 'लोकपंचायत' या सामाजिक संस्थेसोबत कार्यरत.

कृषी जैवविविधता संवर्धन याविषयी महाराष्ट्र जनुक कोश प्रकल्पात प्रधान संशोधक म्हणून काम.

देशपातळीवर एन.टी.एफ.पी-ई.पी नेटवर्किंग फोरम या संस्थेच्या सुकाणू समितीचे सदस्य म्हणून कार्यरत.

ग्रंथसंपदा :- 'आमचे शेत आमचे विद्यापीठ', 'आदिवासींचे हक्क व वनसंवर्धन विषयक कायदे', 'समग्र डांगी', 'The Dangi : Indigenous Cattle Breed from North Western Ghats', 'सह्याद्रीतील शाश्वत शेती व कृषी संस्कृती'.

विविध वृत्तपत्र, मराठी व इंग्रजीतील मासिके, नियतकालिके, दिवाळी अंक यामध्ये विविध विषयांवरील लेख प्रकाशित.

पुरस्कार :- किर्लोस्कर वसुंधरा पुरस्कार नाशिक, २०१७, सह्याद्री डांगी गोवर्धन संस्थेने २०१८ मध्ये विशेष कार्यासाठी सन्मानित.



**भूषण गोपाळ देशमुख**

मूळ गाव :- ता. शेवगाव, जि. अहमदनगर

शिक्षण :- पदव्युत्तर लोकसंज्ञापन (मास्टर्स इन मास रिलेशन)

४० वर्षे पत्रकारितेत सक्रिय.

केसरी, लोकसत्ता, दिव्य मराठी, सार्वमत, विश्व समाचार, सोलापूर समाचार, सांज समाचार, लोकमत टाइम्स, आकाशवाणी, दूरदर्शन, रेडिओनगर इत्यादींसाठी लेखन.

ग्रंथसंपदा :- 'नगर दर्शन', 'नगर प्रदक्षिणा', 'नगर परिक्रमा', 'डिस्कव्हर अहमदनगर' आदी पुस्तकांची निर्मिती.

स्वागत अहमदनगर हेरिटेज वॉकचे आयोजन विश्वस्त, अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय संस्थापक सदस्य, स्नेहालय सदस्य.

उत्कृष्ट पत्रकारितेसाठी महाराष्ट्र शासनाची ४ पारितोषिके, इतर विविध १२ पुरस्कार.



**महादेव मनोहर कुलकर्णी**

मूळ गाव : वडाळी, ता. शहादा, जि. नंदुरबार

निवास :- पत्रकार वसाहत क्र. २, माणिकनगर, जि. अहमदनगर

शिक्षण :- एम.ए. (मराठी) बी.जे.

औरंगाबाद येथून प्रकाशित होणाऱ्या 'अजिंठान दैनिकात, वृत्तपत्र क्षेत्रात पदार्पण. औरंगाबाद येथे पुणे 'केसरी' वार्ताहर, मराठवाडा विभागीय प्रतिनिधी, अहमदनगर येथे 'केसरी'- जिल्हा प्रतिनिधी, कार्यकारी संपादक, मुंबई येथे 'लोकसत्ता' - उपसंपादक, अहमदनगर येथे 'लोकसत्ता' - जिल्हा प्रतिनिधी, शहर आवृत्ती संपादक, लोकमत आवृत्तीत शहर संपादक, 'पुढारी'त वृत्तसंपादक, 'प्रभात'च्या अहमदनगर आवृत्तीत ब्युरो चिफ अशी पत्रकारितेत ५० वर्षे सेवा केली.

पुरस्कार :- शोधपत्रकारितेबद्दल आचार्य अत्रे पत्रकारिता पुरस्कार, पंडित वा. द. कस्तुरे पुरस्कार, पद्मश्री यमुनाताई खाडिलकर पुरस्कार.

संपादन :- 'परिपूर्ती', 'तिसरी घंटा नव्या शतकाची' या स्मरणिकांचे संपादन व 'मैत्र' या स्मरणिकेचे प्रकाशन. 'मोरजाई', 'कैवारी जनांचा', 'मुलखावेगळा' या ग्रंथांचे संपादक.

औरंगाबाद जिल्हा पत्रकार संघाचे सरचिटणीस व अध्यक्षपद, अहमदनगर प्रेस क्लबचे अध्यक्षपद, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अहमदनगर शाखेचे अध्यक्षपद अशी पदे भूषविली.

नगरचा दुष्काळ, शेती, पाणी, सहकार, साखर कारखानदारी, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण आदी विषयासंबंधी लेखन.

**रामनाथ दशरथ आरोटे**



मूळ गाव :- चितळवेढे, ता.अकोले, जि. अहमदनगर

शिक्षण :- डी.सी.ई., ए.एम.आई.ई., एम.एस्सी. (व्ही.ई. ॲण्ड एस.)

भंडारदरा धरणावर सलग १३ वर्षे शाखाधिकारी म्हणून काम. जलसंपदा विभागातून उपविभागीय अभियंता पदावरून सेवानिवृत्त. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय माउंट आबू (राजस्थान) या जागतिक पातळीवर काम करणाऱ्या संस्थेच्या कार्यात गेल्या ३० वर्षापासून सहभागी तणावमुक्ती, व्यसनमुक्ती, धर्मांधमुक्ती इत्यादी कार्यात सहभाग अध्यात्मिज्ञक चिंतन, मनन.

**अरविंद बाळकृष्ण भांगरे**



मूळ गाव :-

शिक्षण :- शेतकी कॉलेज पुणे एस.एस.सी., युपीएससी.

सहाय्यक वनसंरक्षक :- प. मेळघाट वनविभाग, आल्लापल्ली वनविभाग.

उपवनसंरक्षक :- विभागीय व्यवस्थापक, वनविकास महामंडळ, प्राणहिता स्थित आल्लापल्ली, डहाणू, अहमदनगर, पुणे, सावंतवाडी.

वनसंरक्षक :- पुणे वनवृत्त, पुणे

मुख्य वनसंरक्षक :- नागपूर, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागापूर. प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय महासंचालक, वनविकास महामंडळ, म.रा.नागपूर सेवानिवृत्त २००७. एकूण ... वर्षे सेवा.

महाराष्ट्र वनक्रीडा मंडळ या ट्रस्टच्या स्थापनेत प्रमुख योगदान. गोंडी माडिया मराठी शब्दकोशाचे प्रकाशन. हरिश्चंद्रगड कळसूबाई अभयारण्य स्थापना.

'पारंपरिक वनौषधी व आयुर्वेदिक उपचार पद्धती' हे पुस्तक प्रकाशित.


**विठ्ठल बारकू खाडे**



मूळ गाव :- कातळापूर, ता. अकोले, जि. अहमदनगर

निवास :- शहापूर, जि. ठाणे.

१९८६ ते २०१६ या कालावधीत वनखात्यात वनक्षेत्रपाल ते विभागीय वन अधिकारी या पदांवर ३० वर्षे काम केले. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात विभागीय वन अधिकारी या पदावर सेवानिवृत्त. वनवासी कल्याण आश्रमासाठी काम करून आर्थिक मदत केली. फडकी फाऊंडेशन अकोले द्वारे सामाजिक कार्यासाठी पुरस्कार.



**योगेश अशोक कर्डिले**

मूळ गाव :- चिचोंडी पाटील, ता.जि. अहमदनगर

२० वर्षांपासून भारत भ्रमंती आणि छायाचित्रण या क्षेत्रात कार्यरत. निसर्ग पर्यटन, फॅशन फोटोग्राफी आणि सोबतच सिम्बायोसिस स्कूल ऑफ व्हिजुअल आर्टस् ॲण्ड फोटोग्राफी येथे अध्यापन कार्य.



**प्रकाश पुरुषोत्तम टाकळकर**

मूळ गाव :- ता. अकोले, जि. अहमदनगर

शिक्षण : बी.एस्सी. बी.एड.

'लोकसत्ता' या अग्रगण्य दैनिकाचे तीस वर्षांपासून तालुका प्रतिनिधी, अकोले तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व विद्यमान विश्वस्त.

पत्रकारितेच्या माध्यमातून निसर्ग, पर्यटन, पर्यावरण, शेती, शिक्षण, आरोग्य, राजकारण, समाजकारण, आदिवासींचे विविध प्रश्न, गड किल्ले, मंदिरे, विविध प्रकल्प अशा अनेक विषयांवर विपुल लेखन.

शिक्षण क्षेत्रात चाळीस वर्षांपासून कार्यरत. गुरुवर्य रा. वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजूर येथे प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त.

अकोले तालुका माध्यमिक शिक्षक संघटनेत अनेक वर्षे सक्रीय सहभाग, संघटनेचे माजी तालुका सचिव, आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या 'सत्यनिकेतन' संस्थेच्या कौन्सिलचे सदस्य, लोकपंचायत संस्थेचे उपाध्यक्ष.



**बाळासाहेब सूर्यभान गाडे**

मूळ गाव :- गोटुंबे आखाडा, ता. राहुरी, जि. अहमदनगर

एरीगेशन मॅनेजमेंट पदविका.

जलसंपदा विभागात कार्यरत, २५ वर्षे सेवा. दिंडी (मासिक) दिवाळी अंकातून विविध विषयांवर लेखक प्रसिद्ध. अनेकदा अपघातग्रस्तांना हॉस्पिटलमध्ये पोहचविणे, विवाह जुळविणे, मोडलेले विवाह जुळविणे. भूसंपादित शेतकऱ्यांना मोबदला मिळून देण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न अशा अनेक सामाजिक सेवा कार्यात सहभाग.महाराष्ट्र राज्य रेखाचित्र संघटना अहमदनगर जिल्हा उपाध्यक्ष, बहुजन अधिकारी, कर्मचारी महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष या पदावर कार्यरत.



**दिलीप नरहर क्षीरसागर**


मूळ गाव :- निमगाल खैरी, ता. श्रीरामपूर, जि अहमदनगर

निवास :- बिल्वतीर्थ ले.नं. ०५, सराफ नगर, नाशिक.

शिक्षण :- बी.कॉम.

१९८६ पासून भारत सरकारच्या संरक्षण विभागातील रक्षा लेखा विभागात लेखा परीक्षक आणि वरिष्ठ लेखाधिकारी म्हणून ३५ वर्षे नाशिक, मुंबई, पुणे येथे सेवाकार्य आणि नाशिक येथील रक्षा लेखा कार्यालयातून २०१५ रोजी सेवानिवृत्त.

महाविद्यालयीन जीवनापासून समाजसेवा व अध्यात्माची आवड. नर्मदा परिक्रमा पूर्ण करून विविध कार्यक्रमानिमित्ताने देशाटन.



**ॲड. किसन दगडू धुमाळ (के. डी. धुमाळ)**


मूळ गाव :- धुमाळवाडी, ता. अकोले, जि. अहमदनगर

अध्यक्ष- अगस्ती ऋषी देवस्थान ट्रस्ट अकोले.

प्रथम नगराध्यक्ष- अकोले नगरपंचायत.

माजी संचालक- अगस्ती सहकारी साखर कारखाना.


संस्थापक अध्यक्ष- दिशा फाउंडेशन.



**ह.भ.प. राजेंद्र महाराज नवले**

मूळ गाव :- तांभोळ, ता. अकोले, जि. अहमदनगर


गेली १५ वर्षे कीर्तन सेवा करत असून ते संगीत विशारद आहेत. अध्यात्मिक क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात प्रबोधन कार्य. व्यसनमुक्तीसाठी भरीव कार्य.



**मच्छिंद्र संतू भरीतकर**

मूळ गाव :- टाकळी, ता. अकोले, जि. अहमदनगर

महर्षी अगस्ती आश्रम अकोलेचे कृषी व्यवस्थापन प्रमुख आय.टी. तज्ञ. महर्षी अगस्ती आश्रम अकोले आणि प्रवरा परिक्रमा प्रकल्पाचे प्रसिद्धी प्रमुख. अगस्ती महामुनी चॅनलचे संचालक म्हणून कार्यरत.



**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

महर्षी अगस्त्य मुनींचे साक्षात्कारी अभ्यासक, प्रवरा परिक्रमा संकल्पना प्रेरक, संत साहित्य व लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ साहित्यिक- वैचारिक, संशोधनात्मक, तत्त्वज्ञानात्मक, कथा, कादंबरी, नाटक, ललितलेखन, कविता, चरित्र आदी सर्व वाङ्मयप्रकारात उदंड लेखन, ७६ ग्रंथांचे निर्माते, ज्येष्ठ तत्त्वज्ञ व ज्येष्ठ समुपदेशक तथा मार्गदर्शक.



**सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे**

अगस्त्य वाङ्मयाच्या मराठी अनुवादक
प्रकल्प सहाय्यक




**प्रा.डॉ. मच्छिंद्र केरूजी मालुंजकर**

मूळ गाव :- रूंभोडी, ता. अकोले, जि. अहमदनगर

शिक्षण :- एम.ए., एम.एड्., एम.फिल., पीएच.डी. (मराठी)

निवास :- 'गौराई', दत्तनगर पोलीस कॉलनीजवळ, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर

ग्रंथसंपदा :- 'माझा प्रवास (सन १८५७ च्या बंडाची हकिकत) आस्वाद व मूल्यमापन', भक्तिसाहित्य : स्रोत आणि फलश्रुती' (शिवकाल- रामदास व रामदासी संप्रदाय), 'अभंगपौर्णिमा', 'वाङ्मयाविष्कार चिकित्सा'.



**रामनाथ कारभारी मुतडक**

मूळ गाव :- गर्दनी, ता. अकोले, जि. अहमदनगर

व्यवस्थापक :- अगस्ती ऋषी देवस्थान ट्रस्ट, अकोले, जि. अहमदनगर

माजी सरपंच :- ग्रामपंचायत गर्दनी, अध्यक्ष :- संयुक्त वनव्यवस्थापन समिती गर्दनी. या कार्यकाळामध्ये २०११ वनग्राममध्ये राज्यात प्रथम पुरस्कार प्राप्त. जिल्हा परिषदेचा आदर्श पुरस्कार प्राप्त (शाळा आय एस ओ प्रमाणित शाळा).